।।श्रीदत्तगणेशदत्तगुरुभ्यो नमः।।

श्रीदत्तचम्पूः

प.प. श्रीवासुदेवानन्द सरस्वती स्वामीमहाराजांनीं "श्रीदत्तचम्पू" ह्या काव्याची रचना कयाधू नदीच्या कांठीं नरसी (महाराष्ट्र) येथें शके १८२७ (इ.स. १९०५) च्या त्यांच्या १५व्या चातुर्मासांत केली. "चम्पू" म्हणजेच गद्यपद्यात्मक काव्य. विविध शब्दालंकार व अर्थालंकारांनीं म्हणजेच चमत्कृतींनीं २९नटलेलें(चं) व ग्राहकाला दत्तभक्तीनें पुनीत करणारें (पू) काव्य म्हणूनहि याला "दत्तचम्पू" असें अन्वर्थक अभिधान दिलें असावें. या काव्यावर प.प. श्रीस्वामीमहाराजांची स्वतःची टीका पण आहे. त्यांत त्यांनीं ह्या ग्रंथाच्या रचनेमागील आपली भूमिका कांहींशीं अशी सांगितली आहे. "ऋग्वेदाच्या सहाव्या व आठव्या अष्टकांत विश्वांतील सर्व काव्यें ईश्वरस्वरूपाच्या आंसाभोंवतीं फिरणा या चक्राप्रमाणें आहेत; पण त्या स्वरूपाला मात्र ते स्पर्शूं (जाणूं) शकत नाहींत. तथापि त्या परमेश्वराच्या सगुण स्वरूपाचें स्वशक्तीनें करून माझी वाणी पवित्र करावी असा माझा प्रयत्न आहे."

तीन स्तबकांचें आणि सुमारे साडेतीनशें श्लोकांचें हें काव्य आहे. त्यांत अनुक्रमें कार्तवीर्यार्जुन, अलर्क व आयु या दत्तभक्त राजांचीं चरित्रें आलीं आहेत. म्हणजे श्रीदत्तपुराणांतीलच विषय आहेत. त्याच अनुषंगानें आचारधर्म (पातिव्रत्य, राजधर्म इ.), योग, भक्ति इ. विषयांचेंहि प्रासंगिक मार्मिक विवेचन आलें आहे. संस्कृत काव्याच्या अभ्यासकाला व आध्यात्मिक साधकालाहि तितकाच उपकारक असा हा ग्रंथ आहे.

हा ग्रंथ इथे प.प.श्रीस्वामीमहाराजांच्या स्वकृत संस्कृत भाष्यासह दिला आहे. तसाच वेगळा मराठी भाषांतरासह दिला आहे. त्याचप्रमाणे त्यांतील वृत्तालंकारविवरण पंडितप्रवर श्री. श्रीपादशास्त्री तापस यांनीं केलेले दिले आहे. तसेच या ग्रंथांत योजिलेली वृत्ते आणि अलंकार यांची कोष्टके दिली आहेत. आपल्याला हवा असेल त्या ग्रंथाचा इष्ट त्या भागावर मूषकाने करून तो भाग वाचतां येईल; तसेच छापतां पण येईल.

।। श्रीगणेशदत्तगुरुभ्यो नमः ।।

श्रीपादश्रीवल्लभश्रीनृसिंहसरस्वतीदत्तात्रेयचरणारविंदाभ्यां नमः ।।
श्रीमद्वासुदेवानंदसरस्वतीस्वामिचरणकमलाभ्यां नमः ।।

वासुदेवयतिपादपंकजं चिंतयन् हृदि विभाव्य तत्कृतिम् ।
प्रार्थयामि दयया प्रपूरितं तत्कृतेर्विवरणार्थमादरात् ।। १ ।।

बालोऽयं किं कुर्याव्द्याख्यां ग्रंथस्य दुरवबोधस्य ।
इति मनसि च मा कुर्याद्युष्मत्कृपयाह्यसंभवं किं मे ।। २ ।।
चरितं दत्तचम्प्वाख्यं वासुदेवैर्विनिर्मितम् ।
कुर्वे विवरणं तस्य महाराष्ट्रगिरा मुदा ।। ३ ।।

।। श्री गु रु दे व द त्त ।।
प.प. श्रीवासुदेवानन्दसरस्वतीटेम्बेस्वामीविरचित
श्रीदत्तचम्पूः प्रारभ्यते
(प्रथम स्तबक)
श्रीदत्तचम्पूचें भाषांतर

प्रथम स्तबक

-- भाषांतरकार - **वे. शा.सं. रामचंद्रशास्त्री नारायणशास्त्री जेरे.**
नरसोबावाडी

श्रीमत्परमहंसपरिव्राजकाचार्य श्रीवासुदेवानन्दसरस्वतीविरचिता

।। श्रीदत्तचम्पूः ।।

स्मृतोऽप्यवति यो विघ्नं निघ्नन्नम्बासुतः स्तुतः। गन्धर्वस्थः स हि कलौ मलौघघ्नोऽस्तु मे हृदि।।१।।

अन्वयार्थ :- (**स्मृतोऽपि**) स्मरण केले असतां सुद्धां (**विघ्नं निध्नन्**) विघ्नाचा नाश करणारा असा (**यः**) जो (**अवति**) भक्तांचें रक्षण करतो (**सः**) तो (**गंधर्वस्थः**) घोड्यावर बसलेला अथवा गाणगापुरांत असणारा (**हि**) हें सर्व लोकप्रसिद्धच आहे कीं देवांनीं व मनुष्यांनीं (**स्तुतः**) स्तुति केला गेलेला (**कलौ**) कलियुगामध्यें (**मलौघघ्न**) सर्व पापांचा नाश करणारा (**अम्बासुतः**) अंबा या नांवाच्या ब्राह्मणस्त्रीचा मुलगा नृसिंहसरस्वती दत्तात्रेय किंवा अंबा म्ह. पार्वती तिचा मुलगा गजानन (**सः**) तो (मे) माझ्या (**हृदि**) हृदयामध्यें (अस्तु) असो. म्ह. त्याचें मी स्मरण करतों. ।। १ ।।

योगभ्रष्टः कश्चन ब्रह्मपुत्रः पित्रे प्रोचे यां चकारात्रिपुत्रः।। सल्लीलां तां वच्मि संक्षेपतश्चिच्छुद्ध्यै यायाद्ध्येतदन्तं न कश्चित्।।२।।

अन्वयार्थ :- (**योगभ्रष्टः**) ब्रह्मसाक्षात्कार होण्याकरितां योगाभ्यास करणारा व ब्रह्मज्ञान न होतां मध्येंच मरण पावलेला व योगीकुलांत जन्मलेला (**कश्चन**) कोणी एक (**ब्रह्मपुत्रः**) ब्राह्मणांचा मुलगा (**अत्रिपुत्रः**) त्रिगुणात्मक श्रीदत्तात्रेयानें (**यां सल्लीलां**) जी लीला (**चक्रे**) केली (**तां**) ती (**पित्रे प्रोचे**) आपल्या वडिलांना सांगता झाला. (**तां**) ती लीला (**चिच्छुद्ध्यै**) बुद्धि शुद्धी होण्याकरितां मी (**संक्षेपतः**) संक्षेपानें म्ह. थोडक्यांत (**वच्मि**) सांगतों (**हि**) कारण (**एतदंतं**) या लीलेचें संपूर्णतया वर्णन (**कश्चित्**) कोणीहि (**न यायात्**) करूं शकला नाहीं. ।। २ ।।

पुरा प्रतिष्ठानपुराग्र्य आसीद् द्विजो रुजार्तोऽक्षम एव गन्तुम्।। दृष्ट्वा दिनस्त्रीं स जगौ निजस्त्रीं तद्धाम साध्वि नयाद्य रन्तुम्।।३।।

अन्वयार्थ :- (**पुरा**) कृतयुगामध्यें (**प्रतिष्ठानपुराग्-ये**) प्रतिष्ठान या नांवाच्या गांवांत (**द्विजः**) कौशिक नांवाचा ब्राह्मण (**आसीत्**) राहत असे. (**सः**) तो (**रुजार्तः**) रोगानें अत्यंत पीडित होऊन (**गन्तुम्**) पायानें चालण्याविषयीं (**एव**) सुद्धां (**अक्षमः**) असमर्थ झाला; तेव्हां (**दिनस्त्रीं**) रस्त्यानें चाललेल्या वेश्येला (**दृष्ट्वा**) पाहून (**निजस्त्रियं**) आपल्या बायकोला (**जगौ**) म्हणाला (**हे साध्वि**) हे प्रिये, (**तद्धाम**) त्या वेश्येच्या घरीं (**मां**) मला (**अद्य**) आज (**रंतुं**) संभोग करण्याकरितां (**नय**) घेऊन चल. ।। ३ ।।

इति पतिगदितं सती निशम्य स्मितवदना सदनान्निजान्निजाप्तम्।।
निजभुजमुपरि प्रगृह्य याता निशि तडितापथमावलोक्य शान्ता।।४।।

अन्वयार्थ :- (**इति**) याप्रमाणें (**पतिगदितं**) पतीचें भाषण (**निशम्य**) ऐकून (**स्मितवदना**) हास्यमुखी पतिव्रता (**निजाप्तं**) आपल्या पतीला (**निजभुजशिरसि**) स्वतःच्या खांद्यावर (**प्रगृह्य**) घेऊन (**निजात्**) आपल्या (**सदनात्**) घरांतून (**याता**) बाहेर गेली. (**निशि**) रात्रीं गाढ अंधकारांत (**तडिता**) विजेच्या प्रकाशाने (**अपथं**) कुमार्गाला (**अवलोक्य**) पाहून (**शांता**) स्थिर अंतःकरणानें (**सती**) पतिव्रता (**याता**) चालूं लागली. ।।४।।

कान्ताकान्ताय सा कान्ता प्रयाताकान्तरे स्थिता। कान्तारेऽवीक्ष्य माण्डव्यं शूलोऽतं तं व्यताडयत्।। ५।।

अन्वयार्थ :- (**कांता**) स्वतःसुस्वरुप ती स्त्री (**कांताऽकांताय**) नवऱ्याच्या कामरूप दुःखाचा नाश करण्याकरितां (**प्रयाता**) निघालेली (**अकांतरे**) अंधाररूपी दुःखामध्यें (**स्थिता**) असलेली (**सा**) ती (**सती**) कौशिक ब्राह्मणाची बायको (**कांतारे**) निर्जन मार्गावर (**स्थितं**) असलेल्या (**शूलोतं**) सुळावर चढविलेल्या (**तं**) त्या (**मांडव्यं**) मांडव्य ऋषीला (**अवीक्ष्य**) जाण्याच्या वेगांत न पाहिल्यामुळें (**अताडयत्**) धक्का देउन पुढें गेली.।।५।।

(गद्यम्)**ततः क्रुद्धेन मुनिना मुनिनाथेनापीनालोकनादेतत्पतिना कीनाशभवनातिथिना भाव्यमत्यभिहितमाकर्ण्योद्गतिं मैहीति द्युनाथं शप्त्वाभीष्टं सम्पाद्य स्वसदनं सागमत्।।६।।**

अन्वयार्थ :- (**ततः**) सुळाला धक्का लाग ल्यानंतर (**मुनिनाथेनापि**) सर्व मुनींमध्यें श्रेष्ठ असूनहि (**क्रुद्धेन**) क्रोधयुक्त (**मुनिना**) मांडव्य ऋषींनीं (**इनालोकनात्**) उद्यां सूर्योदय होतांच (**एतत्पतिना**) या स्त्रीचा पति (**कीनाशभवनातिथिना**) यमलोकाला (**भाव्यम्**) जाईल (**इति**) असा (**अभिहितं**) शाप दिलेला (**आकर्ण्य**) ऐकून (**उद्गतिं**) हे सूर्या,तू उदयाला (**मैहि**) येऊं नकोस (**इति**) असा (**द्युनाथं**) सूर्याला (**शप्त्वा**) शाप देऊन (**अभीष्टं**) पतीला जें इष्ट होतें तें (**संपाद्य**) प्राप्त करून घेऊन (**स्वसदनं**) ती स्त्री आपल्या घरीं (**अगमत्**) परत आली.।।६।।

शापाद्भीतो नोदितोऽर्कः सशोकः सर्वो लुप्ताचार आसात्र लोकः।।
ध्वान्ते गाढेऽप्येवमेवास नाकः शोकाविष्टो यज्ञभोक्ताप्यनाकः।।७।।

अन्वयार्थ :- (**शापाद्भीतः**) पतिव्रतेच्या शापानें भ्यालेला (**अर्कः**) सूर्य (**नोदितः**) उदयाला आला नाहीं तेव्हा (**अत्र**) भूमितलावर (**गाढेध्वांते**) गाढ अंधकार पडल्यामुळें (**लुप्ताचारः**) यज्ञयागादि सर्व क्रिया बंद पडल्या. (**सर्वो लोकः**) सर्व पृथ्वीवर (**सशोकः**) हाहाकार

(**आस**) झाला. (**एवमेव**) याचप्रमाणें (**यज्ञभोक्तापि**) यज्ञयादिकांवरच ज्यांची उपजिविका आहे असे (नाकः) स्वर्गामध्यें राहणारे लोकसुद्धां (शोकाविष्टः) दुःखव्याप्त व (**अनाकः**) सुखरहित (आस) झालें ।।७।।

अथ धातृगिरामरावरा अगमन्नत्रिसतीं सतीवराम्।।
अभिवाद्य सतीगृहं सुरा लघु निन्युः सदराः कृतादराम्।।८।।

अन्वयार्थ :- (**अथ**) सर्व देव दुःखी झाल्यावर (**धातृगिरा**) ब्रह्मदेवाच्या सांगण्यावरून (**अमरावराः**) इन्द्रादिदेव (**सतीवरां**) सर्व पतिव्रतांमध्यें श्रेष्ठ अशा (**अत्रिसतीं**) अनुसूयेकडे (**अगमन्**) गेले, (**अभिवाद्य**) आणि तिला सर्वांनीं नमस्कार करून प्रार्थना केली व (**सदराः**) भीतियुक्त (**सुराः**) इन्द्रादिदेव (**कृतादरां**) जिनें इन्द्रादिदेवांचा आदरसत्कार केला आहे अशा अनसूयेला (**सतीगृहं**) कौशिकपत्नीच्या घरीं (**लघु**) ताबडतोब (**निन्युः**) घेऊन गेले.।।८।।

प्राब्रवीद् द्विजसतीमनसूया भारतीमथ सतीमनसूया।।
साधु साध्वि वृष एष धृतस्ते लोक एष हि वशे विहितस्ते।।९।।

अन्वयार्थ :- (**अथ**) कौशिक पत्नीच्या घरीं गेल्यानंतर (**अनसूया**) जिच्या अंतःकरणामध्यें मात्सर्य वगैरे कांहीच दोष नाहींत अशी अत्रिऋषींची पत्नी अनुसूया (**द्विजसतीं**) कौशिक ब्राह्मणाच्या पत्नीला (**सतीं**) पतिव्रतेला (**भारतीं प्राब्रवीत**) गौरवयुक्त वाणीनें म्हणाली. (**हे साध्वी**) हे पतीव्रते (**एषः**) विद्वान लोकांनाच माहीत असणारा (**वृषः**) पातिव्रत्यधर्म (**साधु**) चांगल्या तऱ्हेनें (**ते**) तुझ्याकडून (**धृतः**) आचरला गेला आहे. म्हणुन (**एषः**) हा (**लोकः**) लोक (**ते**) तुझ्या (**वशे**) ताब्यांत (विहितः) आहे.।।९।।

छायेव यानन्यगतिः पतिं भजेत्प्राक्स्वापभुक्ती गतिमत्र या त्यजेत्।।
उत्थानबोधाप्लवमग्रतश्चरेत्पत्योर्ध्वलोकं सति सैव संचरेत्।।१०।।

अन्वयार्थ :- (**अनन्यगतिः**) पति हेंच जिचें दैवत आहे अशी (**या**) जी स्त्री (**छायेव**) जणुं आपलें प्रतिबिंबच आहे असें समजून (**पतिं**) आपल्या पतीची (**भजेत्**) सेवा करील. (**अत्र**) या लोकांत (**प्राक्**) आपला पति निजण्यापूर्वी भोजन करण्यापूर्वी व गमन करण्यापूर्वी (**स्वापभुक्ती**) आपलें निजणें (**गतिं**) बाहेर कोठेतरी जाणें इत्यादि (**या**) जी स्त्री (**त्यजेत्**) आचरण करीत नाहीं. (**उत्थानबोधाप्लवं**) त्याचप्रमाणें पति उठण्यापूर्वी, जागा होण्यापूर्वी व स्नान करण्यापूर्वी (**अगतः चरेत्**) जी स्त्री उठते, जागी होते व स्नान करते, (**हे सति**) हे पतिव्रते (**सैव**) तीच स्त्री (**पत्या**) आपल्या पतीशीं सह (**उर्ध्वलोकं**) पतिलोकाला (**संचरेत**) जाते.।।१०।।

इति ब्रुवन्तीमवदत्सतीं सती प्रशस्तमुक्तं कुत आगमः सति।।
इनोदयायेति तयोदिता सती सतीक्ष्णदृक्प्राह तदा मुनेः सतीम्।।११।।

अन्वयार्थ :- (**सती**) कौशिक पत्नी (**इति ब्रुवन्ती**) पातिव्रत्यधर्माचे निरुपण करणाऱ्या (**सतीं**) अनुसूयेला (**अवदत्**) म्हणाली, (**हे सति**) हे अनुसूये (**इदं**) हें धर्मतत्त्व (**प्रशस्तं**) व्यवस्थित उत्तम सांगितलेंस (**कुतः**) कां बरे (**आगमः**) आपलें येथे येंणे झाले. (**इति**) याप्रमाणें कौशिक पत्नीचें भाषण ऐकून (**इनोदयायेति**) सूर्योदय व्हावा म्हणून या ठिकाणी मी आलें, असें (**तया**) अनुसूयेनें (**सती**) कौशिकपत्नीला (**उदिता**) सांगितलें. (**तदा**) तेव्हां (**सतीक्ष्णदृक्**) कौशिकपत्नी कठोर दृष्टि करुन (**मुनेः सतीं**) अनुसूयेला (**प्राह**) म्हणाली.।।११।।

अत्ति का निजसखीं प्रियं वदाप्यत्तिकाद्य भवती प्रियंवदा।।
वक्ति कागिरमहो न वेद्म्यहं पुत्तिकासमतनुर्भवाम्यहम्।।१२।।

अन्वयार्थ :- (प्रियं) **मला जे प्रिय असेल तें** (वद) **तूं बोल** (का) **कोण बरें** (निजसखी) **आपल्या मैत्रिणीचा** (अत्ति) **घात करील** (अद्य) **पण या वेळेला तर** (अत्तिकापि) **वडील बहिणीप्रमाणें असणारी तूं** (प्रियंवदा) **प्रिय बोलणारी** (कागिर) **कुत्सित शब्द** (वक्ति) **बोलतेस** (अहो) **खरोखर** (न वेद्म्यहं) **माझ्या कानांवर ते शब्द आले नाहीत असेच मी समजतें.** (पुत्तिकासमनतुः) **पण हे शब्द कानीं पडतांच लांकडाच्या बाहुलीप्रमाणें** (अहं) **मी** (भवामि) **निश्चल झालें ।।१२।।उवाचानसूयाह्वयार्कं मया ते प्रियाग्र्ये दयालो हरेर्धाम याते।।**
ततोऽसौ निवर्त्यापि नीरुक्सुराभो द्रुतं दीयते यर्हि ते रोचतेऽद्य।।१३।।

अन्वयार्थ :- (अनुसूया) ऋषिपत्नी अनुसूया (**उवाच**) म्हणाली हे पतिव्रते, (**अर्कं**) सूर्याला (**आह्वय**) बोलाव. (**हे दयाले**) हे सदय पतिव्रते, (**हे प्रियाग्-ये**) तुझा प्राणप्रिय पति (**हरेर्धाम**) सूर्योदयानंतर जर यमलोकांला (**याते**) गेला तर (**ततः**) यमलोकांतून (**अपि**) सुद्धां (**निवर्त्य**) परत या ठिकाणीं आणून (**नीरुक्**) रोगरहित (**सुराभः**) देवाप्रमाणें कांतियुक्त करून (**असौ**) हा तुझा पति (**मया**) मी (**द्रुतं**) लौकरच (**अद्य**) आजच्या आज (**दीयते**) देईन.(**यर्हिं**) जर (**ते**) तुला (**रोचते**) आवडेल तर.।।१३।।

तथेति साऽर्कं प्रणताऽऽह्वयत्सती स तीक्ष्णगुः स्त्रागुदितोऽब्जिनीततिम्।।
प्रहर्षयंश्च व्यथयन्भृशं सतीं हरन्द्विजासूंश्च समं तमस्ततिम्।।१४।।

अन्वयार्थ :- (तथेति) जशी तुजी इच्छा असेल त्याप्रमाणें असे म्हणुन (**प्रणता**) नम्र अशा (**सा सती**) त्या पतिव्रतेनें (**अर्कं**) सूर्याला (आह्वयत्) उदयाला ये असें म्हणून बोलाविले. (**सः**) तो (**तीक्ष्णगुः**) प्रचंडसूर्य (**स्त्राक्**) ताबडतोब (**उदितः**) उदयाला आला. (**अब्जिनीनां**) कमलिनींच्या (**ततिं**) समुदायांना (**प्रहर्षयन्**) विकसित करणारा (**सतीं**) कौशिकपत्नीला (**भृशं**) अत्यंत (**व्यथयन्**) पीडा

देणारा (**द्विजासूंश्च**) कौशिकाच्या प्राणांचे (**हरन्**) हरण करणारा (**समं**) त्याचबरोबर (**तमस्ततिं**) अंधकारसमुदायाचाहि नाश करणारा असा सूर्य उदयाला आला .।।१४।।

देवहूतिदुहिता दयितांघ्रिं सा विचिन्त्य सहसा सहसाऽऽह।।
यर्ह्यनन्यशरणं चरणं मे भर्तुरेव स तु जीवतु जीर्णः।।१५।।

अन्वयार्थ :- (सा) ती (**देवहूतिदुहिता**) अनुसूया (**दयितांघ्रिं**) अत्रिऋषींच्या चरणाचें (**विचिंत्य**) ध्यान करून (**सहसा**) हास्यमुद्रेनें (**सहसा**) एकदम (**आह**) म्हणाली. (**भर्तुः**) पतीचे (**एव**) च (**चरणं**) पाय (**मे**) मला (**यर्हि**) जर (**अनन्यशरणं**) एकमेव उपास्य असतील (**तर्हि**) तर (**जीर्णः**) मेलेला वृद्ध (**स तु**) कौशिक ब्राह्मण (**जीवतु**) जिवंत व्हावा. ।।१५।।

सत्यां वदन्त्यामिति तत्र सत्यां सत्याः प्रमीतो दयितोऽपि विप्रः।।
स जीवितो देव इवास नीरुङ् नितान्तशान्तश्च सतीप्रभावात्।।१६।।

अन्वयार्थ :- (तत्र) त्यावेळीं (**इति**) पूर्वी सांगितल्याप्रमाणें (**सत्यां**) पतिव्रता अनुसूया (**वदन्त्यां**) बोलली (**सत्यां**) असतां (**प्रमीतः**) मेलेला (**अपि**) असतांहि (**सत्याः**) पतिव्रतेचा (**दयितः**) पति (**विप्रः**) कौशिक ब्राह्मण (**सः**) तो (**जीवितः**) जिवंत झाला. (**सतीप्रभावात्**) अनुसूयेच्या प्रभावामुळें (**नितान्तशान्तः**) अत्यंत समाधानशील (**देव इव**) देवाप्रमाणें (**नीरुक्**) निरोगी (**च**) हि पण (**आस**) झाला.।।१६।।

सुमनसो ववृषुः सवरास्तदा सुमनसोऽपि ययुः स्वपदं मुदा।।
यदनुभावत आस सुरत्रयमिहहि कर्दमजात्रिसुतत्रयम्।।१७।।

अन्वयार्थ :- (**तदा**) सूर्योदय झाला तेव्हां (**सुमनसः**) इन्द्रादिदेव (**अपि**) सुद्धा (**सवराः**) वराशीसहित (**सुमनसः**) फुलें (**ववृषुः**) उधळूं लागले (**मुदा**) आणि आनंदानें (**स्वपदं**) आपआपल्या स्थानाला (**ययुः**) गेले. (**यदनुभावतः**) देवांच्या वरप्रभावानें (**इह हि**) खरोखर या लोकांत (**सुरत्रयं**) ब्रह्मदेव, विष्णु आणि शंकर हे तिघे (**कर्दमजात्रिसुतत्रयं**) कर्दमऋषींची मुलगी व अत्रि यांची तीन मुलें होउन (**आस**) राहिले.।।१७।।

लोकेशो दिविचर आस तारकेशो दुर्वासा गविचर आस चण्डिकेशः।।
श्रीदत्तस्त्विह भगवान्स्वयं त्र्यधीशो यद्दृष्ट्यंशत उभयर्द्धिगाः क्षमेशाः।।१८।।

अन्वयार्थ :- (**लोकेशः**) ब्रह्मदेव (**तारकेशः**) चंद्ररुपानें (**दिविचरः**) आकाशसंचारी (**आस**) झाला. (**चंडिकेशः**) शंकर (**दुर्वासाः**) दुर्वासऋषि होऊन (**गविचरः**) भूमीवर संचार करणारा (**आस**) झाला. (**स्वयं**) स्वतः (**भगवान त्र्यधीशस्तु**) त्रिगुणामायाधीश भगवान् श्रीविष्णु (**श्रीदत्तः**) श्रीदत्तरूपानें (**इह**) अत्रिऋषींच्या घरीं (**आस**) राहिला. (**यद्दष्टंयशतः**) ज्या श्रीदत्ताच्या कृपाकटाक्षलेशमात्रानें

(**क्षमेशाः**) राजे (**उभयर्द्धिगाः**) स्वर्ग व मृत्युलोकांतील मुक्ति व धनसमृद्धियुक्त झालें।।१८।।

(गद्यम्)**अथ खलु कश्चन सोमवंशोयोऽत्र क्षत्रियो हैहयोत्तमः कृतवीर्यो मृततनयोऽपि गुरुवर्योपदेशेन सूर्यसप्तमीव्रतं स्वयमनुष्ठाय मैत्रेय्याज्ञयाऽपि जायया द्वादशमासात्मकमनन्तव्रतं कारयित्वा कुमारपराक्रमं शूरतरं कुमारमलभत्।।१९।।**

अन्वयार्थ :- (**अथ खलु**) पूर्वी (**अत्र**) येथें (**कश्चन**) कोणी एक (**सोमवंशीयः**) चंद्रवंशामध्यें उत्पन्न झालेला (**हैहयोत्तम**) हैहयकुलश्रेष्ठ (**कृतवीर्यः**) कृतवीर्य नावांचा राजा होता. (**मृततनयोऽपि**) ऋषीच्या शापानें त्याचा मुलगा मेल्यामुळें (**गुरुवर्योपदेशेन**) बृहस्पतीच्या सांगण्यावरुन (**सूर्यसप्तमीव्रतं**) रविवारीं सप्तमी आली असतां करण्याचें व्रत (**स्वयं**) स्वतः राजानें (**कृत्वा**) करुन (**मैत्रेय्याज्ञयापि**) मैत्रेयीनें सांगितलेलेंहि (**द्वादशमासात्मकं**) एक वर्षभर करण्याचें (**अनंतव्रतं**) अनंताचें व्रत (**जायया**) स्त्रीकडून (**कारयित्वा**) करवून घेऊन (**कुमारपराक्रमं**) कार्तिकेयाच्या तोडीचा (**शूरतरं**) अत्यंत शूर असा (**कुमारं**) मुलगा (**अलभत्**) मिळवला.।।१९।।

(गद्यम्) **अथ काले तमेव सुतमुपनीय ताते दिवमिते सत्यमात्यमुखैः पित्र्यं राज्यं कुर्वित्युदितो विनीतोऽपि स सुतो हसन्नाह।।२०।।**

अन्वयार्थ :- (**अथ**) पुत्रप्राप्तीनंतर (**काले**) अकराव्या वर्षी (**तमेव**) त्या (**सुतं**) अर्जुनाची (**उपनीय**) मुंज करुन (**ताते**) राजा (**दिवमिते सति**) स्वर्गवासी झाला असतां (**अमात्यमुखैः**) सर्व मंत्र्यांनीं (**पित्र्यं राज्यं**) वडिलोपार्जित राज्यकारभार (**कुरू**) तूं आतां पाहा (**इत्युदितः**) असे सांगितलें असतां (**विनीतोऽपि**) अत्यंत नम्र असणारा (**सः**) तो (**सुतः**) अर्जुन (**हसन्**) हंसून (**आह**) मंत्र्यांना म्हणाला।।२०।।

भूषष्ठांशं पण्यकद्वादशांशं भुङ्क्तेऽपश्यन्यः प्रजाः स्वप्रजावत्।।
दण्ड्यादण्ड्यौ वेत्ति नो स्तेनमेनं कालो हन्तीदृङ् न राज्यं ममेष्टम्।।२१।।

अन्वयार्थ :- (**यः**) जो राजा (**प्रजाः**) लोकांना (**स्वप्रजावत्**) आपल्या कुटुंबियांप्रमाणें (**अपश्यन्**) न पाहतां (**भूषष्ठांशं**) भूमीचा सहावा भाग (**पण्यकद्वादशांश**) व्यापारांतील बारावा भाग (**भूङ्क्ते**) कर म्हणून घेतो, (**दंड्यादंड्यौ**) दंड करण्यास कोण योग्य व अयोग्य (**नो वेत्ति**) याचा विचार जो करीत नाहीं (**एनं**) अशा प्रकारच्या (**स्तेनं**) चोराला (**कालः**) यम (**हन्ति**) शासन करतो. (**ईदृक्**) अशा प्रकारचें अनिष्टपरिणामकारक (**राज्यं**) राज्य (**मम**) मला (**न इष्टम्**) इष्टकारक वाटत नाही.।।२१।।

धार्मिकोऽपि नृपो भृत्यकृतांहस्तुर्यभागभाक्।। अतो न तोषदमिदं प्राज्यं राज्यमपूज्यवत्।२२।

अन्वयार्थ :- (**धार्मिकोऽपी**) धर्मानें वागणाराहि (**नृपः**) राजा (**भृत्यकृतांहस्तुर्यभागभाक्**) सेवकांनीं केलेल्या पापाचा चतुर्थांशभागी होतो. (**अतः**) म्हणून (**इदं**) हें (**अपूज्यवत्**) निंद्य असल्यामुळें (**प्राज्यं राज्यं**) पुष्कळ मोठे व एकचक्री राज्य जरी असलें तरी (**तोषदं**) मला संतोषकारक (**न**) वाटत नाहीं.।।२२।।

मुनिवर्गोत्थितो गर्गो भर्गोपम उवाच तम्।। निर्गच्छानिर्गलं दत्तं स चित्तं ते प्रसादयेत्।।२३।।

अन्वयार्थ :- (**मुनीवर्गोत्थितः**) सर्व मुनींमधून उठलेले (**भर्गोपमः**) शंकराप्रमाणें असलेले (**गर्गः**) गर्गाचार्य (**तं**) त्या अर्जुनाला (**उवाच**) म्हणाले, (**अनिर्गलं**) तूं कोणाचेंही न ऐकतां (**दत्तं**) श्रीदत्ताला (**निर्गच्छ**) शरण जा. (**सः**) तो श्रीदत्तात्रेय (**ते**) तुझ्या (**चित्तं**) अंतःकरणाला (**प्रसादयेत्**) शांति देईल.।।२३।।

यदा पदानि देवानां बलाञ्जम्भासुरोऽहरत्।। तदा पदार्थिनो देवाः श्रीदत्तपदमाश्रिताः।।२४।।

अन्वयार्थ :-(यदा) **ज्या वेळी** (देवांना) **इन्द्रादिदेवांची** (पदानि) **स्थाने** (बलात्) **बलात्कार करून** (जंभासुर) **जंभ नावांच्या दैत्यानें** (अहरत) **हरण केली,** (तदा) **त्या वेळीं** (पदार्थिनः) **आपापलीं स्थानें मिळावीं म्हणून इच्छा करणारे** (देवाः) **इन्द्रादिदेव** (श्रीदत्तपदं) **श्रीदत्तात्रेयाला** (आश्रिताः) **शरण गेले. ।।२४।।**

(गद्यम्) **तदनु दनुजा अपि योद्धुकामास्तमाश्रमान्तमासाद्य मायामयीं दत्ताङ्क आसीनामनुत्तमां मानिनीं विलोक्य कामातुरतया बलात्तामादाय द्रुतं निर्ययुः।।२५।।**

अन्वयार्थ :- (**तदनु**) इन्द्रादिदेव श्रीदत्ताला शरण गेल्यावर त्यांचे मागोमाग (**दनुजाः**) दैत्य (**अपि**) सुद्धा (**योद्धुकामाः**) देवांबरोबर युद्ध करण्याकरितां (**तमाश्रमांतं**) दत्तात्रेयांच्या आश्रमांत (**आसाद्य**) येऊन (**दत्तांके**) श्रीदत्तांच्या मांडीवर (**आसीनां**) बसलेल्या (**अनुत्तमां**) अत्यंत सुंदर पण मायामयी मायेंने निर्माण केलेल्या (**मानिनीं**) स्त्रीला (**विलोक्य**) पाहून (**कामातुरतया**) अत्यंत कामपीडित झाल्यामुळें (**बलात्**) बळजबरीने (**तां**) त्या स्त्रीला (**आदाय**) घेऊन (**द्रुतं**) वेगानें (**निर्ययुः**) निघून गेले.।।२५।।

(गद्यम्) **ततो निमित्तभूतैर्देवैस्तानसुरान्घातयित्वा भगवता स्वपदं प्रवेशिता देवता अद्यापि तं भगवन्तं भजन्त एवंप्रभावं भावज्ञं भावलभ्यं सदयहृदयं दत्तात्रेयं शरणं व्रजेति।।२६।।**

अन्वयार्थ :- (**ततः**) स्त्री हरण केल्यानंतर (**भगवता**) श्रीदत्तात्रेयांनी (**निमित्तभूतैः**) निमित्त मात्र असणाऱ्या (**दैवैः**) इन्द्रादि देवांकडून (**तान्**) त्या असुरान् दैत्यांचा (**घातयित्वा**) नाश करवून (**देवताः**) इन्द्रादि देव (**स्वपदं**) आपापल्या स्थानाला (**प्रवेशिताः**) पोंचविले, (**अद्यापि**) हल्लींसुद्धां (**तं**) त्या (**भगवंतं**) श्रीदत्तात्रेयाची (**भजंते**) देव उपासना करतात. (**एवंप्रभावं**) तेव्हां सर्व समर्थ अशा (**भावज्ञं**) सर्वांचे हृद्‌गत जाणणाऱ्या (**भावलभ्यं**) भक्तीनें मिळणाऱ्या (**सदयहृदयं**) दयाशील ज्याचें अंतःकरण आहे अशा (**दत्तात्रेयं**) श्रीदत्तात्रेयाला (**शरणं**) शरण (**व्रज**) जा.।।२६।।

तथेत्युरीकृत्य तदर्जुनोग सह्यं गतोऽसह्यपराक्रमोऽङ्गम्।।
निपात्य दत्ताग्रत आह नम्रस्तं मां प्रभो पाहि तवास्मि कम्रः।।२७।।

अन्वयार्थ :- (**तथा**) ठीक आहे (**इति**) असें म्हणून (**तत्**) गर्गऋषींच्या उपदेशाचा (**अंगीकृत्य**) अंगीकार करून (**असह्यपराक्रमः**) भयंकर पराक्रमी (**अर्जुनः**) अर्जुन (**सह्यं**) सह्याद्रि (**अगं**) पर्वतावर (**गतः**) गेला, (**नम्रः**) आणि नम्रतेनें (**अंगं**) शरीरानें (**दत्ताग्रतः**) दत्तात्रेयांच्या पुढें (**निपात्य**) साष्टांग नमस्कार घातला व (**तं**) श्रीदत्तात्रेयाला (**आह**) म्हणाला, (**प्रभो**) हे समर्था (**मां**) माझें (**पाहि**) रक्षण कर. (**तव**) तुझ्या (**कम्रः**) प्राप्तीच्या इच्छेनें या ठिकाणी आलों (**अस्मि**) आहें ।।२७।।

निर्भर्त्स्यमानोऽपि नृपः सकोपं दत्तेन भावं स गतोऽप्यकम्पम्।।
न विव्यथे सेवनतत्परस्तं प्रोचे गुरुर्येन भयं निरस्तम्।।२८।।

अन्वयार्थ :- (**दत्तेन**) श्रीदत्तात्रेयांनी (**सकोप**) अत्यंत क्रुद्ध होउन (**निर्भर्त्स्यमानोऽपि**) निर्भत्सना केली असतांहि (**सेवनतत्परः**) सेवेमध्यें तत्पर असा (**अकंपं**) निश्चल (**भावं**) भक्तीमध्यें (**गतः**) स्थित असा (**सः**) तो (**नृपः**) राजा अर्जुन (**न विव्यथे**) यत्किंचितहि घाबरला नाहीं. (**येन**) ज्या गुरूंनी (**भयं निरस्तं**) दर्शनमात्रानें भय नाहीसें केलें, (**गुरुः**) ते दत्तात्रेय (**तं**) अर्जुनाला (**प्रोचे**) म्हणाले. ।।२८।।

(गद्यम्) **आयुष्मंस्ते भद्रमितो गच्छ गच्छाहं स्त्रिया उच्छिष्टभाग्विवसनो धर्माधर्मानभिज्ञो भक्ष्याभक्ष्यविवर्जितोऽङ्कगतवनितासंसर्गदूषित उन्मत्तवदतो मत्संगतस्तेऽशुभं भावीत्युक्त्वा दृङ्मात्रेण तद्भुजावपातयत्।।२९।।**

अन्वयार्थ :- (**हे आयुष्मन्**) दीर्घायुषी अर्जुना, (**ते**) तुझें (**भद्रं**) कल्याण असो. (**इतः**) येथून (**गच्छ गच्छ**) तूं आतां जा (**यतः**) कारण (**अहं**) मी (**स्त्रिया**) या स्त्रीमुळें (**उच्छिष्टभाक्**) उच्छिष्ट भक्षण करणारा (**विवसनः**) विवस्त्र असा (**धर्माधर्मानभिज्ञः**) धर्म कोणता व अ धर्म कोणता हें न जाणणारा (**भक्ष्याभक्ष्यविवर्जितः**) कांहीहि भक्षण करणारा (**अंकगतवनितासंगदूषितः**) मांडीवर बसलेल्या या स्त्रीमुळें दोषी व (**उन्मत्तः**) उन्मत्त असा मी झालो आहे. (**अतः**) म्हणून (**मत्संगतः**) माझ्या संगतीनें (**ते**) तुझें कार्य (**अशुभंभावी**) शुभ होणार नाही (**इति**) असें (**उक्त्वा**) म्हणून (**दृङ्मात्रेण**) केवळ दृष्टिक्षेपानें (**तद्भुजौ**) त्याचे दोन्ही हात (**अपातयत्**) खालीं पाडलें ।।२९।।

(गद्यम्) **भगवन् त्वदभिन्नत्वादितः क्वास्य गमनं भवान्मायारचितपदार्थभागिव विक्षेपावरणाभावाद्विवसनो नित्यमुक्तत्वाद्धर्माद्यतीतः स्वयमनश्नन्नश्नतो जीवस्य साक्षीतो भक्ष्यादिवर्जितो भवतो मायाया एकदेशस्थितत्वाद्वनितायाश्चासङ्गतत्वं लोकदृष्ट्या तु दूषितत्त्वमुन्मत्तत्वं चातो मम शुभं भावीत्युक्त्वा मां पाहीति प्रणिपतन्तं**

शोचन्तं वरान्वृणीष्वेत्याश्वास्यामर्जुनशोकं चकार।।३०।।

अन्वयार्थ :- (**हे भगवन्**) षडगुणऐश्वर्यसंपन्न श्रीदत्ता (**त्वदभिन्नत्वात्**) तूं व मी एकच असल्याने (**इतः**) तुला सोडुन (**क्व**) कोठे (**अस्य**) या देहानें (**गमनं**) जावें. (**भवान्**) आपण (**मायारचितपदार्थभागिव**) आपल्या मायेनें निर्माण केलेल्या वस्तूंचा उपभोग आपण घेतां असें मूढ लोकांना वाटते. (**विक्षेपावरणाभावात्**) विक्षेप व आवरण ह्या अज्ञानाच्या शक्ति असल्यानें व आपण तर ज्ञानी असल्यानें आपणांला कोणतेंच आवरण नाहीं. अर्थात् विक्षेप व आवरणही नाहीं. (**विवसनः**) म्हणूनच आपण विवस्त्र आहांत. (**नित्यमुक्तत्वात्**) आपण नित्यमुक्त असल्यानें (**धर्माद्यतीतः**) धर्माधर्माचें उल्लंघन केलें आहे. (**स्वयमनश्नन्**) आपण न खातां (अश्नतः) खाणाऱ्या (**जीवस्य**) जीवाला (**साक्षी**) साक्षीभूतपणें पाहतां (**इतः**) म्हणूनच (**भक्ष्यादिवर्जितः**) भक्ष्याभक्ष्य उभयवर्जित आहांत. (**भवतः**) आपल्या (**मायायाः**) मायेमध्यें (**एकदेशस्थितत्वात्**) आपण एकांशानें आहांत. म्हणून (**वनितायाश्च असंगतत्वं**) स्त्रीसंगति ही तुम्हांला नाहीं (**लोकदृष्ट्या तु**) परंतु लोकांच्या दृष्टीनें पाहिलें तर (**दूषितत्वं**) दोषी आहात, (**उन्मत्तत्वं**) व उन्मत्तहि आहांत असें वाटतें. (**अतः**) म्हणून माझ्या दृष्टीनें (**मम**) माझे (**शुभं**) शुभ (**भावी**) होणार (**इत्युक्त्वा**) असें बोलून (**मां**) माझें (**पाहि**) रक्षण करा (**इति**) असें म्हणून (**प्रणिपतंतं**) नमस्कार करणाऱ्या (**शोचतं**) आक्रोश करणाऱ्या (**अर्जुनं**) अर्जुनाला (**वरान्**) वर (**वृणीष्व**) मागून घे (**इति**) असें (**आश्वास्य**) आश्वासन देऊन (**अशोकं**) शोकरहित (**चकार**) केलें. ।।३०।।

भावार्थ :- अर्जुनाला श्रीदत्तात्रेयांनी येथून जा असें सांगितलें असतां अर्जुन म्हणतो, हे षड्गुणैश्वर्यसंपन्न श्रीदत्ता, जीवब्रम्ह यांचे ऐक्य असल्यामुळें आपल्याहून मी वेगळा नाहीं. तेव्हा आपण ज्या ठिकाणीं असाल त्या ठिकाणींच मी असणार. आपणाला सोडून मी कोठे बरें जाणार आपण मायाविनिर्मित पदार्थांचा उपभोग घेत असून मी हि इतर लोकांप्रमाणेंच एक आहे असें भासवितां. पण खरें पाहिलें असतां तसें नाही. कारण 'असंगो ह्ययं पुरूषः' अशी श्रुति असल्यानें आपण असंग आहांत. आपण पूर्वी सांगितलें कीं मी विवस्त्र आहें, पण तो आपला दोष नसून उलट गुणच आहें. कारण अज्ञानाच्या आवरण व विक्षेप अशा दोन शक्ति आहेंत. सद्वस्तूंचे आच्छादन करून ती नाहीं असा व्यवहार करविणारी आवरणशक्ति व आवरणानंतर त्या वस्तूला विपरीत रूपानें भासवून विपरीत व्यवहार करविणारी विक्षेपशक्ति या दोनही शक्ति अज्ञानाच्या असल्यानें आपल्या स्वरुपावर त्यांची मात चालत नाहीं. म्हणून आपण दिगंबर आहांत. धर्माधर्मांचे अधिकारी बद्ध अज्ञानी पुरुषच आहेत. आपण नित्यमुक्त असल्यानें आपणाला धर्माधर्म काहीच नाहीं. 'अनश्नन्नन्यो अभिचाकशीति' या श्रुतीवरुन आपण काहीच न खातां, जीव खात असतां साक्षीभूतपणें त्याचकडे पाहतां म्हणून असा पदार्थच आपणालां नसल्यानें अभक्ष्यभक्षणरूप दोष आपणांला कोठून लागणार? .आपणालां स्त्रीसंगाची बाधा नाहीं. कारण 'विष्टभ्याहमिदं कृत्स्नं एकांशेन स्थितो जगत्' असे असल्यानें सर्व जगत् एकांशानें व्याप्त करून टाकल्यामुळें आपल्या एकदेशामध्यें मायेचा संबंध आहे. तेव्हां आपला त्या स्त्रीशीं कांहींच संबंध नाहीं. परंतु हें सर्व परमार्थ दृष्टीनें. लोकांच्या दृष्टीनें तर आपण उन्मत्त व दोषी आहांत असें

वाटतें .म्हणून सत्यान्वेषण केलें असतां आपल्या संगतीने माझें निश्चित कल्याण होणार यांत शंका नाहीं. असें वारंवार त्यांच्या पायां पडूं लागला व शोकहि करुं लागला. आणि माझें आपण रक्षण करा असें मुखानें बोलत असतां श्रीदत्तात्रेय त्याला म्हणालें अरें अर्जुना वर मागुन घे मी तुझ्यावर संतुष्ट झालों आहें. असें त्याला आश्वासन देऊन त्याचा शोक नाहीसा केला. ।।३०।।

कृतवीर्यसमुद्रेकः कृतवीर्यनृपार्भकः।। दत्ताभयं नमस्कृत्य दत्तात्रेयमिदं जगौ।।३१।।

अन्वयार्थ :- (**कृतवीर्यसमुद्रेकः**) धाष्टर्य दाखवून आपलें बल ज्यानें प्रकट केलें आहें असा (**कृतवीर्यनृपार्भकः**) कृतवीर्य राजाचा मुलगा अर्जुन (**दत्ताभयं**) ज्यांनी अभयदान दिले आहें अशा (**दत्तात्रेय**) श्रीदत्तात्रेयांना (**नमस्कृत्य**) नमस्कार करून (**इदं**) पुढील श्लोकांत निर्दिष्ट केलेंलें (**जगौ**) बोलला. ।।३१।।

सप्तद्वीपधरेशतान्यवशता युद्धेऽप्रतिद्वंद्वता।। बाहूनां च सहस्रता विजयता ख्यात्याधिकात्पञ्चता।
वित्ता सिद्ध्यनुकूलतार्थबहुताकुण्ठेतिता दातृतायुष्मत्ता भवदङ्घ्रिभक्तिदृढता चान्तेऽस्तु सायुज्यता।। ३२।।

अन्वयार्थ :- (सप्तद्वीपधरेशता) **संपूर्ण पृथ्वीवर माझेंच राज्य असावें** (अन्यवशता) **सर्व लोक माझ्या ताब्यात असावेंत,** (युद्धेऽप्रतिद्वंद्वता) **युद्धामध्यें माझ्यापेक्षां मोठा योद्धा कोंणी असू नये.** (बाहूंना च सहस्त्रता) **मी इच्छा करीन त्या वेळी मला हजार हात असावेत,** (विजयता) **कुठल्याही परिस्थितीत माझा विजय असावा,** (ख्यात्याधिकात्पंचता) **आपल्यासारख्या प्रसिद्ध पुरूषापासून मरण यावे,** (वित्ता) **माझे ठिकाणी विद्वत्ता असावी,** (सिद्ध्यनुकूलता) **सर्व सिद्धी माझ्या ताब्यांत असाव्यात,** (अर्थबहुता) **अक्षय्य धन असावें,** (अकुंठेतिता) **अस्खलित गमन असावें,** (दातृता) **दानशील स्वभाव असावा,** (आयुष्मत्ता) **दीर्घायुष्य असावें,** (भवदंघ्रिभक्तिदृढता) **आपली चरण सेवा घडावी** (च) **आणि** (अन्ते) **शेवटी** (सायुज्यता) **जन्ममरणरहित अशा आपल्या स्वरुपाची प्राप्ती** (अस्तु) **व्हावी.।।३२।।**

तथेति भूपोऽर्थविदोदितो गतो नतोऽभिषिक्तो मुनिभिःपदे स्थितः।।
अधर्मकर्ता परपीडकोऽस्त्रभृन् मया विना हन्मि तमित्यघोषयत्।।३३।।

अन्वयार्थ :- (**अर्थविदा**) आशय जाणणाऱ्या श्रीदत्तात्रेयांनी (**तथेति**) ठीक आहे असें म्हणून (**उदितः**) आश्वासन दिलेला (**नतः**) नम्र असणारा (**भूपः**) राजा अर्जुन (**गतः**) आपल्या नगराला परत गेला, (**मुनिभिः**) गर्गादि सर्व मुनींनीं (**अभिषिक्तः**) राज्याभिषेक केलेला अर्जुन (**पदे स्थितः**) राज्यपदावर आरूढ झाला. (**अधर्मकर्ता**) भूमीवर अधर्म करणारा (**परपीडकः**) दुसऱ्यांना त्रास देणारा व (**मया विना**) माझ्याशिवाय (**अस्त्रभृत्**) जो कोणी हातांत शस्त्र धरील (**तं**) त्याला (**हन्मि**) मी ठार मारीन (**इति**) अशी (**अघोषयत्**) दवंडी त्यानें गांवांत पिटली.।।३३।।

पूर्ग्रामगोक्षेत्रधनाश्वपाता स्मृतोऽपि सर्वार्तिहरोऽरिहन्ता।।
त्राता प्रपन्नस्य रुगाधिहर्ता नैकाङ्गधर्ताऽत्रिजवद्विहर्ता।।३४।।

अन्वयार्थ :- (पूः, ग्राम,गो,क्षेत्र,धन,अश्व,पाता) **नगर, खेडें,गाय, शेत,धन व घोडे वगैरेचें पालन करणारा,** (स्मृतोऽपि) **केवळ स्मरण केलें असतांहि** (सर्वार्तिहरः) **सर्वांची सर्व पीडा नाश करणारा,** (अरिहन्ता) **शत्रूंचा नाश करणारा,** (प्रपन्नस्य) **शरणागतांचे** (त्राता) **रक्षण करणारा,** (रुगाधिहर्ता) **शारीरिक व मानसिक पीडा हरणारा,** (नैकांगधर्ता) **अनेक शरीरें धारण करणारा,** (अत्रिजवत्) **अत्रिपुत्र दत्तात्रेयाप्रमाणें** (विहर्ता) **सर्वत्र संचार करणारा राजा अर्जुन राज्य करुं लागला. ।।३४।।**

नाकाले मृतिररिभीतिरास राज्यं भूपाले नयविदि शासतीज्यपूज्यम्।।
दुर्भिक्षं न हि न हि मारिकेतिभीतिर्न स्तेनाग्निजभयमास कूटनीतिः।।३५।।

अन्वयार्थ :- (**नयविदि**) नीति जाणणारा, (**भूपाले**) अर्जुन राजा (**ईज्यपूज्यं**) श्रेष्ठ लोकांना मान्य असणारा, (**राज्यं**) राज्य (**शासति**) कारभार करीत असतां (**अकाले**) अयोग्य वेळी (**मृतिः**) कोणालाहि मरण (**नाश**) येत नसे. (**अरिभीतिः**) शत्रूंची भीति (**न हि**) वाटत नसें. (**स्तेनाग्निजभयं**) चोर व जाळपोळ यांपासूनहि भय (**नाश**) नसे. (**कूटनीतिः**) गुप्त कारभारहि त्याच्या राज्यांत नव्हता.।।३५।।

कर्कोटकाहिजिद्रेमे परावर्त्य च नर्मदाम्।।
शर्मदां तत्पतिं सिन्धुं जित्वापि बहुनर्मदाम्।।३६।।

अन्वयार्थ :- (**बहुनर्मदा**) पुष्कळ क्रीडानंद देणाऱ्या (**शर्मदां**) व सुख देणाऱ्या (**नर्मदां**) नर्मदा नदीच्या (**परावर्त्य च**) पलीकडे जाऊन आणि (**तत्पतिं**) त्या नर्मदेचा पति (**सिंधुं**) जो समुद्र त्याला (**जित्वापि**) जिंकून आणि (**कर्कोटकाहिजित्**) कर्कोटक सर्पाचा जो मुलगा यालाहि जिंकणारा अर्जुन (**रेमे**) नर्मदा नदीच्या तीरावर स्त्रियांसहित रममाण झाला.।।३६।।

चतुरशीतिसहस्त्रसमा व्यधात्स भुवि राज्यमहो सुयशोऽप्यधात्।।
त्रिभुवने भुवनेशकृपावशादथ विरागमगात्स विधेर्वशात्।।३७।।

अन्वयार्थ :- (**चतुरशीतिसहस्त्रसमाः**) अर्जुनाने याप्रमाणें चवऱ्याऐंशी हजार वर्ष (**भुवि**) भूमितलावर (**राज्यं**) राज्य (**व्यधात्**) केलें (**भुवनेशकृपावशात्**) श्रीदत्तात्रेयांच्या कृपाप्रसादानें (**त्रिभुवने**) स्वर्ग,मृत्यु व पाताळामध्यें (**सुयशोऽपि**) आपलें चांगले यशहि प्रस्थपित केलें. (**अहो**) काय आश्चर्य आहे. (**अथ**) नंतर (**सः**) तो राजा अर्जुन (**विधेर्वशात्**) पूर्व पुण्याईनें (**विरागं**) विरक्त (**गतः**) झाला.।।३७।।

क्व चात्मरूपानुभवप्रमोदाः क्व कुस्त्रियां वर्णरतिप्रमोदाः।।
य इन्द्रियाणां जरयन्ति तेजो रमेत तैः किं चिरजीवितेऽजः।।३८।।

अन्वयार्थ - (**कुस्त्रियां**) दुष्ट स्त्रियांचे ठिकाणीं (**वर्णरतिरप्रमोदाः**)- शृंगारादि क्रिया करून होणारा हर्ष (**क्व**) कोणीकडे (**आत्मरूपानुभव प्रमोदाश्च**) आणि आत्यंतिक दुःखनिवृत्तिपूर्वक सुखप्राप्तिरूप आनंदानुभवजन्यहर्ष (**क्व**) कोणीकडे? (**ये**) जे कुत्सित स्त्रियांचे ठिकाणीं शृंगारादि क्रिया करून होणारे आनंद (**इन्द्रियाणां**) इन्द्रियांचें (**तेजः**) सामर्थ्य (**जरयन्ति**) नाहींसे करतात, (**अजः**) ब्रह्मदेवसुद्धां (**तैः**) त्या आनंदाशीं (**चिरजीविते**) पुष्कळ आयुष्य असूनहि (**रमेत किं**) रममाण होतो का ? अर्थात् दीर्घायुषी ब्रह्मदेवसुद्धां ज्या गर्ह्य आनंदाचा उपभोग घेत नाहीं, तर अल्पायुषी मनुष्यांनीं त्या आनंदामध्यें कां रममाण व्हावें? ।। ३८ ।।

जन्मान्तरे येऽद्य च ते श्व एव तद्भुक्सदा श्वा स खरोऽश्व एव।।
धिक्तान्मनोविभ्रमबन्धहेतून् धिङ् मां न चेक्षे सत आत्मसेतून्।।३९।।

अन्वयार्थः :- (**जन्मांतरे**) पूर्व जन्मामध्यें (**ये**) जे भोग उपभोगले (**ते च**) तेच (**अद्य**) या जन्मामध्येंहि आहेत. (**श्वः एव**) व उद्यांहि तेच उपभोगावयाचे आहेत. (**सदा तद्भुक्**) जो नेहमीं अशा प्रकारचे भोग भोगतो (**सः**) तो मनुष्य (**श्वा, खरः, अश्वः एव**) कुत्रा, गाढव किंवा घोडा आहे असेंच म्हटलें पाहिजे. त्याच्यांत व याच्यांत फरक नाहींच. (**मनोविभ्रमबंधहेतून्**) मनाच्या विविध भ्रमाला कारणीभूत असलेल्या (**तान्**) त्या भोगांना (**धिक्**) धिक्कार असो. (**आत्मसेतून्**) स्वतःला संसारसागरांतून पार जाण्यास मार्गरूप असलेल्या (**सतः**) संतांना (**न च ईक्षे**) मी जाऊन भेटत नाहीं. (**मां**.) तेव्हां मलाहि (**धिक्**) धिक्कार असो.।।३९।।

चलदलान्तजलोपमजीविते मृगजलोपम भोग उ सेविते।।
क्व सुखमद्य विवेक उपस्थितस्तत इतस्तु भजेऽजमुपस्थितः।।४०।।

अन्वयार्थः- (**चलदलांतजलोपमजीविते**) हालत्या पानावर असलेल्या पाण्याच्या थेंबाप्रमाणें आपलें नश्वर जीवित असतांना (**मृगजलोपमभोगे**) मृगजलाप्रमाणें भोग हे खोटे असतांना (**सेविते**) अशा अल्पायुष्यांत जर त्या भोगांचा उपभोग घेतला तर (**क्व सुखम्**) सुख कसें बरें मिळणार ? (**अद्य**) ईश्वरानुग्रहानें आज मला (**विवेकः**) सुविचार (**उपस्थितः**) उत्पन्न झाला आहे हें मी माझें भाग्य समजतों. (**ततः**) म्हणून (**इतस्तु**) इथून पुढें (**उपस्थितः**) त्या श्रीदत्तात्रेयांच्याजवळ जाऊन (**अजं**) त्या दत्तात्रेयांची (**भजे**) सेवा करतों.।।४०।।

एवं सुनिर्विण्णमतिर्नृपतिः प्राप सत्पतिम्।। सद्गतिस्तत्परीक्षार्थं व्यर्थं ध्यानस्थवद्बभौ।।४१।।

अन्वयार्थः- (**एवं**) याप्रमाणे संसार हा असार आहे असें पाहून (**सुनिर्विण्णमतिः**) ज्याच्या अंतःकरणांत वैराग्य उत्पन्न झालें आहे,

असा (**नृपतिः**) अर्जुन राजा (**सत्पतिं**) श्रीदत्तात्रेयांच्याकडे (**प्राप्तः**) गेला. (**सद्गतिः**) साधु लोकांना एकमेव गति असलेले श्रीदत्तात्रेय (**तत्परीक्षार्थं**) अर्जुन राजाची परीक्षा घेण्याकरितां (**व्यर्थं**) उगीचच (**ध्यानस्थवद्बभौ**) समाधिस्थितींत बसले. ।।४१।।

भूयो भूयो नामभिर्देवमुच्चैर्भूयो भूयो हन्त सम्बोध्य नीचैः।।

कं साकं सास्त्रं गिराधाय देवं स्मारं स्मारं तद्यशोऽस्तौत्तमेवम्।।४२।।

अन्वयार्थः- (**भूयो भूयः**) पुनः पुनः (**उच्चैः**) मोठ्या आवाजानें (**भूयो भूयः**) पुनः पुनः (**नामभिः**) पुष्कळ नांवांनी (**देवं**) श्रीदत्तात्रेयांना (**हंत**) खेदानें (**संबोध्य**) हांक मारून (**गिरा**) वाणीनें (**साकं सास्त्रं**) प्रेमाश्रूनें युक्त (**कं**) असें मस्तक (**नीचैः**) नत (**आधाय**) करून (**तद्यशः**) भक्तानुग्रह करणाऱ्या प्रभूचें यश (**स्मारं स्मारं**) पुनः पुनः स्मरण करून (**तं देवं**) त्या श्रीदत्तात्रेयांची (**एवं**) पुढील श्लोकांत सांगितल्याप्रमाणें (**अस्तौत्**) अर्जुनानें स्तुति केली. ।।४२।।

भगवन् सविधे दयानिधे मघवन्मान्य तवाद्य सन्निधे।।

पतितं किमुपेक्षसे हि दृक्पतितं पावयतीश ते स्वदृक्।।४३।।

अन्वयार्थः- (**हे मघवन्**) सर्वश्रेष्ठ (**मान्य**) सर्वमान्य (**हे दयानिधे**) कृपासागर (**हे सन्निधे**) साधु लोकांना आश्रयभूत असणाऱ्या) (**भगवन्**) षड्गुणैश्वर्यसंपन्न श्रीदत्ता, (**अद्य**) आज (**तव**) तुझ्या (**सविधे**) जवळ (**पतितं**) अनन्य होऊन शरण शरण आलो असता (**मां**) माझा (**उपेक्षसे किम्**) तिरस्कार करणार काय? (**हे स्वदृक्**) स्वरूपानुभवामध्ये निमग्न असणाऱ्या (**ईश**) श्रीदत्ता, (**हि**) ज्या अर्थी (**ते**) आपला (**दृक्**) कृपादृष्टिलेशसुद्धा (**पतितम्**) पतितालाहि (**पावयति**) पावन करू शकतो, मग माझ्यासारख्या भक्ताला पावन करील यात काय शंका? ।।४३।। (*योगिनीवृत्तम्*)

अघवानयमित्युपेक्षसे भगवान्माद्य भवान्न चेक्षते।।

मघवाप्यवितो नतो यथाप्यघवानप्यव मां नतं तथा।।४४।।

अन्वयार्थः- (**अयं**) शरण आलेला हा भक्त अर्जुन (**अघवान्**) भयंकर आहे (**इति**) म्हणून जर (**भगवान् भवान्**) षड्गुणैश्वर्यसंपन्न आपण (**अद्य**) आज (**मां**) माझी (**उपेक्षते**) उपेक्षा करीत असाल तर (**अघवानपि**) अत्यंत पापी असूनहि (**नतो मघवा**) पण आपणाला शरण आलेल्या इन्द्राचें (**यथा**) जसें (**अवितः**) रक्षण आपण केलें (**तथापि**) त्याचप्रमाणें (**अघवंतं**) मी जरी पापी असलों तरी (**नतं मां**) आपणांला शरण आलों आहें. म्हणून (**अव**) इन्द्राप्रमाणें माझेंहि आपण रक्षण करा. ।।४४।।

प्रथमं तव माययावृतस्तत एतद्विभवो मया वृतः।।

स्वयमेव निजाहितोऽभवं शरणं त्वाद्य ततो गतोऽस्म्यहम्।।४५।।

अन्वयार्थः- (**प्रथमं**) मी आपल्याकडे पूर्वी आलों त्या वेळीं (**तव मायया**) आपल्या मायेनें (**आवृतः**) आवृत केला गेलों व माझें हित

मला समजलें नाहीं. (**ततः**) म्हणूनच (**एतद्विभवः**) हें सर्व राज्यवैभव (**मया वृतः**) मला असावें म्हणून मीं वर मागून घेतला. (**स्वयमेव**) मी स्वतःच (**निजाहितः**) माझा शत्रु (**अभवम्**) झालों. (**अतः**) म्हणून (**अद्य**) आज (**अहं**) मी (**त्वां**) आपणाला (**शरणं**) अनन्यशरण (**गतः**) आलों आहें. ।।४५।।

क्व च दोष उ एष वदान्यतस्तुषकांक्षिवदेव वदान्यतः।।
भवतोषधिया भव ईप्सितो भवतोभव नाभव ईप्सितः।।४६।।

अन्वयार्थः- (**एष उ**) राज्यादि वैभव मागून घेतलें हा दोष (**अन्यतः**) माझ्याशिवाय दुसऱ्याचा (**क्व च वद**) कोणाचा आहे हें आपण सांगावें. अर्थात् दुसऱ्याचा नाहीं. (**वदान्यतः**) कोणताहि वर मागून घे असें म्हणणाऱ्यापासून (**तुषकांक्षिवदेव**) ज्याप्रमाणें कोंडा मागून घ्यावा त्याप्रमाणें माझें झालें. (**भवतोषधिया**) स्त्रीपुत्रादिसुखप्राप्तीच्या इच्छेनें (**भवः**) पुनर्जन्माला देणारा संसारच (**ईप्सितः**) मागून घेतला. (**हे अभव**) संसाराला नाशक श्रीदत्ता, (**भवतः**) आपल्यापासून (**अभवः**) मोक्ष (**न ईप्सितः**) मागून घेतला नाहीं. ।।४६।।

द्विरदाश्वधनादिषु किं सुखं वरदार्भवधूत्थमु किं सुखम्।।
सुखरूपनिजात्मकविघातकैः किमु तैर्भवसागरपातकैः।।४७।।

अन्वयार्थः- (**हे वरद**) वर देण्यामध्यें समर्थ श्रीदत्त, (**द्विरदाश्वधनादिषु**) हत्ती, घोडे, धनसंपत्तीमध्यें (**किं**) काय (**सुखम्**) सुख आहे? (**अर्भवधूत्थं**) स्त्रीपुत्रादिकांमध्यें (**उ**) हि (**किं सुखम्**) काय सुख आहे? (**सुखरूपनिजात्मविघातकैः**) संसारसमुद्रामध्यें ढकलून देणारे (**तैः**) राज्य, स्त्रीपुत्रादि व पश्वादि जे पदार्थ त्यांच्याशीं (**किमु**) काय कर्तव्य आहे? ।।४७।।

अहिता विहिता मयानुगा विहिता श्रीः सुहितापि सानुगा।।
अनुगायकवत्सुराः कृता अनुगा नैव मृतिः पराकृता।।४८।।

अन्वयार्थः- (**अहिताः**) माझ्याशीं द्वेष करणारे शत्रु (**मया**) मीं (**अनुगाः**) माझे सेवक (**विहिताः**) केले. (**सानुगापि श्रीः**) अष्ट महासिद्धीसहित लक्ष्मीचासुद्धां (**सुहिता कृता**) इष्ट वाटेल त्याप्रमाणें उपयोग केला. (**सुराः**) इन्द्रादि देवांनीं सुद्धां (**अनुगायकवत्कृताः**) माझीच री ओढणें केलें. (**अनुगा**) हरेक जन्मामध्यें मागोमाग येणारे (**मृतिः**) मरण मात्र (**नैव पराकृता**) मीं नाहींसें केलें नाहीं. ।।४८।।

न यमाच्च बिभेम्यहं तथा नयमानी भवचक्रतो यथा।।
न यमादिभिराप्यत पदं नय माद्याभयमीश ते पदम्।।४९।।

अन्वयार्थः- (**यथा**) जसा (**भवचक्रतः**) जन्ममरणरूप संसारचक्रापासून (**अहं**) मी (**बिभेमि**) अत्यंत भयग्रस्त होतों, (**तथा**) तसा (**नयमानी**) न्यायनें वागणारा मी (**यमाच्च**) मला साक्षाद्यमापासूनहि (**न बिभेमि**) भीत नाहीं (**ते पदं**) तेव्हां निर्भय असें जें आपलें स्थान

तें (**यमादिभिः**) यमनियमादि अष्टांग योगानेंहि (**न आप्यते**) मिळूं शकत नाहीं अशा आपल्या स्थानाला (**आद्य**) सर्व कारणांचें कारण (**ईश**) श्रीदत्ता, (**अभयं**) भयरहित अशा (**ते पदं**) आपल्या स्थानाला (**मां**) मला (**नय**) नेऊन पोंचवा. ।।४९।।

स्पृहयामि न भौमवैभवं स्पृहयामीश न दैववैभवम्।।

स्पृहयामि न सिद्धिवैभवं स्पृहयामीश दास्यवैभवम्।।५०।।

अन्वयार्थः- (हे ईश) सर्व जगन्नियंत्या श्रीदत्ता, (**भौमवैभवं**) हें राज्यवैभव (**न स्पृहयामि**) मला नको. (**दैववैभवं**) इन्द्रादि देवांचे ऐश्वर्यहि (**न स्पृहयामि**) मला नको. (**सिद्धिवैभवं**) अणिमादि अष्ट सिद्धिहि (**न स्पृहयामि**) मला नकोत. (**दास्यवैभवं**) केवळ आपल्या चरणाची सेवा (**स्पृहयामि**) अखंड मिळावी एवढीच इच्छा आहे. ।।५०।।

अपि दास्यवतः परतन्त्रता तव दास्यत इन्निजतन्त्रता।।

अत एव मतं तव सेवनं तत एव चरे वनसेवनम्।।५१।।

अन्वयार्थः- (दासवतः अपि) ज्यांना पुष्कळ सेवक आहेत अशा राजांनासुद्दां (**परतन्त्रता**) पारतन्त्र्य आहेच. (**तव दास्यतः इत्**) पण तुझे जे सेवक आहेत त्यांनाच मात्र (**निजतंत्रता**) स्वातन्त्र्य आहे. कारण ते विधिनिषेधातीत आहे. (**अतः एव**) असें आहे म्हणूनच (**तव**) आपली (**सेवनं**) सेवा करावी असें (**मतं**) मला वाटतें. (**ततः एव**) म्हणूनच (**वनसेवनं**) वन्य फलपुष्पादिकांचें सेवन (**चरे**) मी करतों. ।।५१।।

नरको नरकोट्यधिपस्य यदा नरकोत्तरकोशभूतोऽपि तदा।।

वरमेव हि भैक्ष्यममानदं परमेव लभेत्तव यत्पदम्।।५२।।

अन्वयार्थः- (**यदा**) जर (**नरकोट्यधिपस्य**) कोट्यवधि लोकांच्या स्वामीला (**नरकः**) नरकवास असेल, (**नरकोत्तरकोशभृतोऽपि**) त्याचप्रमाणें धनधान्य संपत्ति ज्यांच्याजवळ पुष्कळ आहे अशांनासुद्धा जर नरक असेल, (**तदा हि**) तर मग (**अमानदं**) लाजिरवाणें (**भैक्ष्यं**) हें भिक्षा मागणें (**वरं**) उत्तम दर्जाचें आहे. (**तव यत्परं पदं**) कारण अशा भैक्ष्य वृत्तीनें राहिलें असतां आपलें जें श्रेष्ठ पद आहे (**एव लभेत**) तेंच मिळेल. ।।५२।।

अत एव स्वतःपूर्ण योग्यं योग्याय देहि मे।।

उत्तिष्ठोत्तिष्ठ मद्दृष्ट्या प्रभो जागृहि जागृहि।।५३।।

अन्वयार्थः- (**अत एव**) माझे ठिकाणीं दृढ वैराग्य उत्पन्न झालें आहे म्हणूनच (**योग्यं**) जें योग्य असेल तें (**योग्याय**) योग्य असणाऱ्या (**मे**) मला (**देहि**) आपण द्यावें. (**हे स्वतःपूर्णकामः**) कारण आपण पूर्णकाम आहांत, आपणांला मोबदला नको. (**मद्दृष्ट्या**) माझ्या दृष्टीनें आपण मला निजलेले दिसतां म्हणून म्हणतों कीं (**उत्तिष्टोत्तिष्ठ**) आपण आतां उठावें. (**प्रभो**) सर्वसमर्थ श्रीदत्ता, (**जागृहि**

जागृहि) आपण मला आज्ञा देण्याकरितां आतां जागें व्हा. लवकर जागें व्हा. ।।५३।।

इति स्तुवति मूर्छां च याति भूभृति भूभृति।।
उषस्यृषय एत्येशं नत्वा देवाश्च निर्ययुः।।५४।।

अन्वयार्थः- (**भूभृति**) राजा अर्जुन (**इति**) याप्रमाणें श्रीदत्तमहाराजांची (**स्तुवति**) स्तुति करीत असतां (**च**) आणि (**भूभृति**) सह्याद्रि पर्वतावर (**मूर्छां याति**) मूर्चा येऊन पडला असतां (**उषसि**) प्रातःकालीं (**ऋषयः**) कश्यपादि ऋषि(**च**) आणि (**देवाः**) इन्द्रादि देव (**एत्य**) त्या पर्वतावर येऊन (**ईशं नत्वा**) श्रीदत्ताला नमस्कार करून (**निर्ययुः**) पुनः परत निघून गेले. ।।५४।।

(गद्यम्)तदनूत्थितः श्रीदत्तः शिष्याभिवादितः स्वीकृतशिष्यदत्तामृत आचान्तः श्रितनैर्ऋतदिक्प्रान्तः कृतमलोत्सृतिर्जलाशयमितः शोधितपद्धस्तमुखदन्तः सुस्नातः कृतसंध्योपास्तिस्तर्पितदेवतादिः श्रीपत्तनादाहृतयाचितकः कृतभुक्तिराचान्तः पुनर्ध्यानमास्थितस्तदा प्रणतः शान्ततपा भगवन्नुपोषितं मूर्छितं स्थितमेतं कृतवीर्यसुतं द्रष्टुमर्हसीति प्रणिपपात।।५५।।

अन्वयार्थः- (**तदनु**) कश्यपादि ऋषि व इन्द्रादि देव दर्शन करून गेल्यावर (**उत्थितः श्रीदत्तः**) श्रीदत्तमहाराज उठले. (**शिष्याभिवादितः**) ज्यांना शिष्यांनीं नमस्कार केला आहे असे, (**स्वीकृतशिष्यदत्तामृतः**) शिष्यांनीं दिलेलें पाणी ज्यांनी घेतलें आहे असे, (**आचांतः**) ज्यांनी आचमन केलें आहे असे, (**श्रितनैर्ऋतदिक्प्रान्तः**) शौचाकरितां नैर्ऋत्य दिशेकडे गेलेले (**कृतमलोत्सृतिः जलाशयमितः**) शौचविधि आटोपून, पाण्याकडे गेलेले, (**शोधितपद्धस्तमुखदंतः**) पाण्यानें हात, पाय, मुख धुतलेले असे, व (**सुस्नातः**) ज्यांनी स्नान केलें आहे असे, (**कृतसंध्योपास्तिः**) संध्यावंदन ज्यांनीं केलें आहे असे (**तर्पितदेवतादिः**) ज्यांनीं ब्रह्मयज्ञ केला आहे असे, (**श्रीपत्तनादाहृतयाचितकः**) कोल्हापुराहून ज्यांनी भिक्षा आणली आहे असे, (**कृतभुक्तिः**) ज्यांनी भोजन केलें आहे असे, (**आचांतः**) आचमन केलें आहे असे, श्रीदत्तात्रेय (**पुनर्ध्यानमास्थितः**) पुनः ध्यान लावून बसले, (**तदा**) तेव्हां (**प्रणतः शांततपाः**) नम्र असा शांततपा नांवाचा शिष्य म्हणाला, (**भगवन्**) हे श्रीदत्ता (**उपोषितं**) उपाशी व (**मूर्छितं**) बेशुद्ध अवस्थेंत (**स्थितं**) असणाऱ्या (**एतं कृतवीर्यसुतं**) ह्या कृतवीर्याच्या मुलाला अर्जुनाला (**द्रष्टुमर्हसि**) आपण डोळे उघडून पाहावें (**इति प्रणिपपात**) असें म्हणून श्रीदत्तात्रेयांना शिष्यानें नमस्कार केला. ।।५५।।

उवाच दत्तस्तमुदारचित्तः प्रियाय दत्तः ससुसिद्धिवित्तः।।
भूगोल एवाद्य ददाम्यदत्तं स्वरादिमस्मै यत एष भक्तः।।५६।।

अन्वयार्थः- (**उदारचित्तः**) ज्यांचें उदार अंतःकरण आहे असे (**दत्तः**) दत्तात्रेय (**तं**) त्या शांततपा नामक शिष्याला (**उवाच**) म्हणेले, (**प्रियाय**) मत्प्रिय अर्जुनाला (**ससुसिद्धिवित्तः**) ऋद्धिसिद्धिसहित (**भूगोलः एव**) सप्तद्वीपात्मक राज्य (**दत्तः**) दिलें आहे. (**अद्य**) पण आज

(**अस्मै**) अर्जुनाला (**अदत्तं**) न दिलेलें (**स्वरादिं**) स्वर्गादि ब्रह्मलोकांपर्यंतचें राज्य (**ददामि**) देतों. (**यतः**) कारण (**एषः**) हा माझा (**भक्तः**) भक्त आहे. ।।५६।।

कृतवीर्यसुतो ह्रीतः नतो वव्रेऽमृतं यतः।।
श्रुतभ्रान्तिनिवृत्तिश्च प्राचामाचार्य आह तम्।।५७।।

अन्वयार्थः- (**कृतवीर्यसुतः**) कृतवीर्य राजाचा मुलगा अर्जुन (**-ह्रीतः**) लज्जायुक्त (**नतः**) व नम्र झाला आणि (**अमृतं**) मला मोक्ष (**वव्रे**) पाहिजे असें म्हणाला. (**यतः**) कारण (**श्रुतभ्रांतिनिवृत्तिश्च**) शास्त्राध्ययनानें उत्पन्न झालेले असंभावनादि भ्रम मोक्षानेंच नाहींसे होतात. तेव्हां (**प्राचामाचार्यः**) ब्रह्मादि देवांचेहि जे गुरु श्रीदत्तात्रेय (**तं**) अर्जुनाला (**आह**) म्हणाले. ।।५७।।

भावार्थः- लोभ दाखविला असतांहि अर्जुनानें स्वर्गाची अपेक्षा न करतां मोक्षच मागून घेतला. कारण ब्रह्मज्ञानानें, शास्त्रश्रवण केल्यावर ज्या शंका येतात त्या नाहींशा होतात. प्रमाणासंभावना, प्रमेयासंभावना व विपरीत भावना असे तीन प्रकारचे भ्रम आहेत. हे ज्ञानाला म्ह. मोक्षाला विघ्न करतात, त्यांतील पहिला प्रमाणासंभावना अद्वैत व निरतिशय अखंड एकरस जें ब्रह्म त्याला प्रतिपादक जी प्रमाणभूत श्रुति तिच्याबद्दल शंका येणें. दुसरा प्रमेयासंभावना आपल्या ज्ञानांत विषय जें ब्रह्म तेंच आपलें वस्तुतः स्वरूप आहे कीं नाहीं असा संशय येणें. तिसरा विपरीत भावना-नित्यनिरतिशय सुखरूप व सर्वज्ञ जें ब्रह्म तें अनित्य सातिशय दुःखी व किंचिज्ज्ञ असें माझें स्वरूप कसें असूं शकेल. याप्रमाणें भ्रमत्रयानें भ्रमग्रस्त होऊन शास्त्र वाचून अथवा श्रवण करूनहि त्या मनुष्यास ब्रह्मज्ञान होऊं शकत नाहीं. म्हणून त्याकरितां नेहमीं श्रवण मनन व निदिध्यासन केलें पाहिजे व यानेंच हे भ्रम नाहींसे होऊन ब्रह्मज्ञान होऊं शकतें. म्हणूनच अर्जुनानेंहि इतर स्वर्गादि राज्य न मागतां मोक्षच मागून घेतला. नंतर ब्रह्मादि देवांचे गुरु श्रीदत्तात्रेय अर्जुनाला म्हणाले ते पुढील श्लोकांत सांगतात. ।।५७।।

बृहस्पतिर्देवपतिं स्म वक्ति गाथाततिं तां शृणु भूतिनाथ।।
पुराभवच्छास्त्रविदत्र शास्त्रं त्वाष्ट्रं स विद्वान्कृतभूरिगेहः।।५८।।

अन्वयार्थः- (**हे भूतिनाथ**) हे ऐश्वर्यसंपन्न अर्जुना, (**बृहस्पतिः**) देवांचे गुरूंनीं (**देवपतिं**) इन्द्राला (**गाथाततिं**) जी हकीगत (**वक्ति स्म**) सांगितली, (**तां**) ती हकीगत (**शृणु**) मी तुला सांगतों ऐक. (**पुरा**) पूर्वयुगामध्यें (**अत्र**) पृथ्वीतलावर (**शास्त्रवित्**) कोणी एक शास्त्र जाणणारा (**अभवत्**) होऊन गेला. (**त्वाष्ट्रं शास्त्रं विद्वान् सः**) शिल्पशास्त्र जाणणारा तो शास्त्री त्यानें (**कृतभूरिगेहः**) पुष्कळ लोकांची सुंदर तऱ्हेनें घरें बांधिलीं.।।५८।।

आयादिविद्यस्य गृहं स चक्रे सायासदुःखार्तिरुगादिहीने।।
यज्ञादयस्तद्‌भवनेऽमिताः स्युर्मृतस्ततः स्वर्गमितः सुपुण्यः।।५९।।

अन्वयार्थः- (**सः**) तो शिल्पशास्त्री (**आयादिवित्**) आयव्यय जाणणारा (**यस्य**) त्यांनें कोणाचेंहि (**गृहं चक्रे**) घर केलें कीं (**सायास दुःखार्तिरुगादिहीने**) त्रास दुःखपीडा रोगरहित (**तद्‌भवने**) अशा त्या घरांत (**यज्ञादयः**) यज्ञयागादि (**अमिताः स्युः**) अनेक पुण्यकारक क्रिया होत असते. (**ततः**) याप्रमाणें कांहीं काळ गेल्यावर (**सुपुण्यः**) चांगल्या प्रकारचें पुण्य ज्याचें आहे (**सः**) असा तो शास्त्री (**मृतः**) मेला व (**स्वर्गमितः**) स्वर्गाला गेला. ।।५९।।

भूयोऽत्र भूत्वापि नृपस्ततोऽभूद्‌भूयोऽपि विप्रः स गतोऽमृतं हि।।
गाथादिरेषा त्वपरा तु गाथा विप्रोऽभवत्कश्चनकामशास्त्री।।६०।।

अन्वयार्थः- (**भूयः**) पुनः (**सः**) तो शास्त्री (**अत्र**) पृथ्वीवर (**नृपो भृत्वा**) राजा होऊन (**ततः भूयोऽपि**) नंतर पुनः पुनः जन्माला आला व मेलाहि पण शेवटीं (**विप्रः अभूत्**) ब्राह्मण झाला व (**अमृतं गतः**) मोक्षाला गेला (**हि**) असें पुराणांत प्रसिद्ध आहे. (**एषा तु**) ही तर (आदिगाथा) त्या सातपैकीं पहिली गोष्ट आहे. (**अपरा तु गाथा**) आतां दुसरी गोष्ट सांगतों (**कश्चन**) कोणी एक (**कामशास्त्री**) कामशास्त्र जाणणारा (**विप्रः**) ब्राह्मण (**अभवत्**) होऊन गेला. ।।६०।।

स स्त्रीसुमान्यो वृतराजकन्यो वात्स्यायनोक्तं सुरतं स वेद।।
गन्धर्वतां प्राप्य मृतः स धातृप्रसादस्तत्र गतः स मुक्तिम्।।६१।।

अन्वयार्थः- (**सः**) तो कामशास्त्री (**स्त्रीसुमान्यः**) स्त्रियांना अत्यंत प्रिय असा (**वृतराजकन्यः**) ज्यानें राजकन्येशीं विवाह केला आहे असा (**वात्स्यायनोक्तं सुरतं**) वात्स्यायन कामसूत्राप्रमाणे संभोगक्रिया (**स वेद**) तो जाणत असे. (**मृतः सः**) कांहीं दिवसांनी तो कामशास्त्री मेला, (**गंधर्वतां प्राप्य**) व गंधर्व होऊन (**धातृप्रसादतः**) ब्रह्मदेवाच्या कृपाप्रसादानें (**सः**) तो कामशास्त्री (**तत्र**) त्या गंधर्व अवस्थेंत असतांना (**मुक्तिं गतः**) मोक्षाला गेला. ।।६१।।

तथान्यगाथां शृणु सन्विकंप्रः सप्तग्रहग्रस्त इहास विप्रः।।
क्षिप्रप्रसादो भगवांस्तदोकः प्राप्तः सुगुप्तः खलु येन लोकः।।६२।।

अन्वयार्थः- (**विकम्प्रः सन्**) एकचित्त करून (**तथा**) पूर्वीप्रमाणें (**अन्यगाथां**) तिसरी गोष्ट (**शृणु**) ऐक. (**इह**) या देशांत (**सप्तग्रहग्रस्तः**) सात पिशाचांनी पछाडलेला (**विप्रः**) एक ब्राह्मण (**आस**) होता. (**क्षिप्रप्रसादः भगवान्**) आशुतोष श्रीदत्तात्रेयांच्या दर्शनानें (**लोकः**) त्या ब्राह्मणाचें शरीर (**सुगुप्तःखलु**) खरोखर पिशाचपीडेपासून सुरक्षित झालें. ।।६२।।

तल्लब्धमन्त्रैः क्रमतो द्विजस्य पिता प्रसादाद्विधिनाश्वजस्य।।
न्यवारयद्यद्वदिहात्मदोषा योगैः क्रमान्मुक्तिमगात्तदैषः।।६३।।

अन्वयार्थः- (**द्विजस्य पिता**) पिशाचपीडित ब्राह्मणाच्या बापानें (**तल्लब्धमंत्रैः**) त्या श्रीदत्तात्रेयाच्या कृपेनें मिळालेल्या मंत्रांनीं (**विधिना**) न्यासध्यानादि विधीनें (**आश्वजस्य प्रसादात्**) व दत्तात्रेयांच्या कृपेनें (**क्रमतः**) क्रमाक्रमानें एकेक पिशाच (**न्यवारयत्**) नाहींसें केलें. (**यद्वत्**) ज्याप्रमाणें (**इह**) मोक्षमार्गामध्यें (**क्रमात्**) क्रमानें (**योगैः**) दोषदृष्टीला उपायभूत असलेल्या योगांनी म्ह. चित्तवृत्तिनिरोधांनीं (**आत्मदोषाः**) आत्म्याचे किंवा मनाचे रागादि दोष नाहींसे केले जातात, त्याप्रमाणें (**तदा**) पिशाचांचा नाश झाल्यावर (**एषः**) त्या ब्राह्मणाचा मुलगा (**क्रमात्**) श्रवण, मनन, निदिध्यासनाच्या योगानें (**मुक्तिमगात्**) मोक्षाला गेला. ।।६३।।

तथान्यगाथां शृणु विष्णुदत्तः स्वकर्मणाभ्यर्चितदेवदत्तः।।
भूतेन बल्यन्नभुजापि दत्तस्त्रिर्दर्शितो येन परोऽपि दत्तः।।६४।।

अन्वयार्थः- (**तथा**) त्याचप्रमाणें (**अन्यगाथां**) आणखी एक गोष्ट सांगतों. (**श्रुणु**) ऐक. (**स्वकर्मणाभ्यर्चितदेवदत्तः**) आपल्या वर्णाश्रमाचाराप्रमाणें वागून श्रीदत्तात्रेयाची ज्यानें उपसना केली आहे असा (**विष्णुदत्तः**) विष्णुदत्त नांवाचा ब्राह्मण माहुरपुरांत होता. (**बल्यन्नभुजा भूतेन**) भूतबली खाणाऱ्या कोणी एका पिशाचानें (**त्रिर्दत्तोऽपि दर्शितः**) तीन वेळेस त्या विष्णुदत्त ब्राह्मणाला श्रीदत्तात्रेयांचें दर्शन करवून दिले. (**येन**) ज्या श्रीदत्ताचें दर्शन झालें त्यानें (**परोऽपि**) मोक्षहि (**दत्तः**) विष्णुदत्ताला दिला. ।।६४।।

तथापि गाथा पिशुनो झुटिंगः साध्वीशतुल्याकृतिगः सतीगः।।
स्वरादिसाम्येऽपि तयोर्झुटिंगो बद्धो द्विजेनानृतिवत्कुसङ्गः।।६५।।

अन्वयार्थः- (**तथापि**) त्याचप्रमाणें (**गाथापि**) पांचवी गोष्ट सांगतों ऐक. (**पिशुनः**) अत्यंत दुष्ट (**झुटिंगः**) एक पिशाच (**साध्वीशतुल्याकृतिगः**) एका पतिव्रतेच्या नवऱ्याप्रमाणें आपण रूप घेऊन (**सतीगः**) कपटानें त्या पतिव्रतेशीं तिचा पति बाहेर गेला असतां संभोग करीत असे. (**तयोः स्वरादिसाम्येऽपि**) त्या दोघांचा आवाज, स्वरूप सौन्दर्य हें सर्व एकसारखें जरी होतें तरीपण (**द्विजेन**) त्या विष्णुदत्ताने (**अनृतिवत्**) मंत्राच्या सामर्थ्यानें (**कुसंगः झुटिंगः**) दुष्ट तो पिशाच (**बद्धः**) एका मडक्यांत घालून बंद करून टाकला. ।।६५।।

तथापि गाथा पिबतेऽर्भकाय रुग्णाय निम्बं प्रददौ तदम्बा।।
खण्डप्रलोभाद्भवपीडिताय श्रुतिर्यथाऽमुख्यफलं स्वरादि।।६६।।

अन्वयार्थः- (**तथापि**) त्याचप्रमाणें (**गाथा**) सहावी गोष्ट सांगतों ऐक. (**अपिबते**) औषध म्हणून न पिणाऱ्या (**रुग्णाय अर्भकाय**) रोगी लहान मुलाला (**खंडप्रलोभनात्**) साखराच्या लाडवाचें मिष दाखवून (**तदम्बा**) त्या मुलाची आई (**निंबं प्रददौ**) ज्याप्रमाणें कडु

लिंबाचा रस पाजते, (**तथा**) त्याप्रमाणें (**भवपीडिताय**) संसार हाच कोणी एक रोग त्यानें पीडित मनुष्याला (**श्रुतिः**) चातुर्मास्य याग केला कीं पुष्कळ पुण्य मिळतें असें सांगणारी श्रुति (**अमुख्यफलं स्वरादि**) स्वर्गादि गौण फल सांगून त्या मिषानें मुख्य फल जें कर्म त्यामध्यें रुचि उत्पन्न करते. ।।६६।।

भावार्थः- याप्रमाणें पांच गोष्टी सांगून सहावी गोष्ट सांगणेस आरंभ करातात व ती दोन श्लोकांत सांगतात. आरोग्य होण्याकरिता कडू लिंबाचा रस पी असें रोगी मुलाला सांगतलें तर तो कडू आहे म्हणून पिणार नाहीं म्हणून जर युक्तीनें त्या मुलाला आई सांगेल की, अरे, तो रस पी मग मी तुला साखरेचा लाडू देईन, असें प्रलोभन करून आईनें त्या मुलास सांगितलें तर तो मुलगा झटकन् तो रस पितो व निरोगी होतो. त्याचप्रमाणें संसार हाच कोणी एक रोग त्यांनी पीडित मनुष्याला श्रुति माऊली सांगते कीं, अरे कर्म करा, पण त्यांत कष्ट फार म्हणून कोणीहि कर्म करण्यास प्रवृत्त होत नाहीं. मग श्रुति सांगते कीं या कर्मानें अक्षय्य पुण्य मिळतें असे गौण फल स्वर्गादि सांगून मुख्य फल म्हणजे चित्तशुद्धि करून जीवाला आत्मस्वरूप करते आणि चित्तशुद्धि कर्मानें होतें म्हणून कर्माचें स्वर्गादि गौण फल सांगून, श्रुति कर्मामध्यें जीवाची रुचि उत्पन्न करते व त्यामुळे चित्तशुद्धि होते. नंतर ज्ञानोत्पत्ति होऊन अज्ञान नाश होतो. एकंदरीत चित्तशुद्धि कर्मानें होते व त्यानंतर शमदमादि साधनानें ज्ञान होतें. सारांश, अंतःकरणाच्या शुद्धीकरतां कर्माची अपेक्षा आहे म्हमून परंपरेनें कर्मच ज्ञानाला कारणीभूत असल्यानें श्रुतीनें तें सांगून यत्किंचित् कर्मानेंहि जीवांचा उद्धार केला. ।।६६।।

प्रायश्चित्त्यस्तगुल्मादिरुजं सत्यर्थितो द्विजम्।। निन्ये रसेन प्रकृतिं भवार्तमिव तं कृती।।६७।।

अन्वयार्थः- (**सत्यर्थितः**) माझ्या पतीचा रोग बरा करून मला सौभाग्यदान द्यावें अशी पतिव्रतेनें प्रार्थना केलेला (**कृती**) कुशल विष्णुदत्त (**प्रायश्चित्त्यस्तगुल्मादिरुजं**) ज्याचा देवद्रोहादि पापानें झालेल्या गुल्मव्याधीचा नाश प्रायश्चित्तादि विधीनें केला आहे अशा (**तं द्विजं**) त्या ब्राह्मणाला (**रसेन**) रसायनादि औषधें देऊन (**प्रकृतिं**) पूर्वीप्रमाणें निरोगी (**निन्ये**) केलें (**भवार्तमिव**) संसारपीडित मनुष्याप्रमाणे.।।६७।।

गाथान्तिमाथार्भक आस योगभ्रष्टो द्विजस्योज्झितभोगसङ्गः।।
संसर्गहृत्यै कृतदुष्टचेष्टः संबन्धभीत्यास्य गुरुर्न चेष्टः।।६८।।

अन्वयार्थः- (**अथ अंतिमा गाथा**) आतांपर्यंत सात गोष्टी सांगितल्या पण त्याचप्रमाणें ही एक शेवटची गोष्ट आहे ती सांगतों ऐक. (**योगभ्रष्टः**) ध्यानधारणा करीत असता मध्येंच मेलेला योगी ज्ञान नसल्यामुळें पुनः सत्कुलांत जन्मास येतो. त्याला योगभ्रष्ट म्हणतात, असा कोणी योगभ्रष्ट (**द्विजस्य अर्भकः**) एका ब्राह्मणाचा मुलगा (**आस**) होत. (**उज्झितभोगसंगः**) आपलें खाणेंपिणें किंवा कोणत्याहि गोष्टींशी संगति न करणारा असा, (**संसर्गहृत्यै कृतदुष्टचेष्टः**) ज्यानें लोकांशी आपला संबंध येऊं नये म्हणून विचित्र चेष्टा करून वेडेपणा प्रगट केला आहे असा, (**संबंधभीत्या**) हा पिता ही माता इत्यादि संबंधाला भ्याल्यामुळें (**अस्य**) त्या योगभ्रष्ट मुलाला (**गुरुः न चेष्टः**) आपले आईबापसुद्धां इष्ट वाटत नसत. ।।६८।।

अन्तःसङ्गविसर्गेण तस्य व्यस्य भयं नयम्।। आदेश्य विष्णुदत्तस्तं सतीं प्रकृतिमानयत्।।६९।।

अन्वयार्थः- (**विष्णुदत्तः**) विष्णुदत्तांनी (**अंतःसंगविसर्गेण**) आंतून संगति सोडावी असें सांगून (**तस्य भयं व्यस्य**) त्या मुलाचें भय नाहींसें करून (**नयं आदेश्य**) वेदान्तशास्त्रोपदेश करून (**तं**) त्या मुलाला (**सतीं प्रकृतिं आनयत्**) त्याचा वेडेपणा घालवून शहाणें केलें. ।।६९।।

आर्य पर्यवसानन्तु शास्त्राणां स्त्रोतसामिव।। सिन्धौ ब्रह्मणि दभ्राणामदभ्राणां परेऽद्वये।।७०।।

अन्वयार्थः- (**हे आर्य**) अरे अर्जुना (**दभ्राणामदभ्राणां**) लहान व मोठ्या (**शास्त्राणां**) शास्त्रांचें (**पर्यवसानं तु**) शेवटीं पर्यवसान तर (**स्त्रोतसां सिंधौ इव**) सर्व नद्या शेवटीं ज्याप्रमाणें समुद्रामध्यें च जातात त्याप्रमाणें (**परेऽद्वये ब्रह्मणि**) श्रेष्ठ व एकमेव जें ब्रह्म त्यामध्येंच आहे असें तूं समज. ।।७०।।

ब्रह्मैवैकमिदं पुराद्वयमजं यन्माययोज्जृंभितं रूपाख्यात्मकमेतदत्र सदसत्तत्कार्यकं कार्यकृत्।।
मिथ्याप्येतदनुप्रवेशत इतः सत्यादिरूपं परं तत्त्वं विद्धि धिया सुखी भव कृती योगेन भोगेन किम्।।७१।।

अन्वयार्थः- (**इदं**) हें प्रत्यक्ष दिसणारें जगत् (**पुरा**) सृष्टिउत्पत्तीच्या पूर्वी (**अजं अद्वयं ब्रम्हैवैकं**) जन्मादि विकाराररहित असें अद्वितीय ब्रह्मस्वरुपानेंच होतें. (**यन्मायया रूपाख्यात्मकमेतत्**) ज्या ईश्वराच्या मायेनें नामरूपात्मक ब्रह्मादिस्तंबपर्यंत हें सर्व जगत् (**उज्जृंभितम्**) उत्पन्न केलें. (**अत्र**) या ब्रह्मामध्यें (**सदसत्**) जगद्रूपी कार्य सत् व कारणमात्र प्रकृतिमहत्तत्व अहंकार वगैरे असत् (**तत्कार्यकमपि मिथ्या**) त्या असत्कारणाचें कार्य पंच महाभूतें, चतुर्दश भुवनें वगैरे कार्य करुनहि तें कारण मिथ्या म्ह. खोटेंच आहें. (**एतदनुप्रवेशतः कार्यकृत्**) पण त्या खोट्या कारणाला ब्रह्माची सहायता घेतल्याशिवाय मात्र कोणतेंहि कार्य करता येत नाही. (**इतः परं**) पूर्वी सांगितल्यापेक्षां निराळें म्ह प्रकृतिविकृतिरहित (**सत्यादिरुपं**) सत्य, ज्ञान, आनंद रुप असें जें (**तत्वं**) मूळस्वरुप तें तूं (**धिया विद्धि**) सूक्ष्म बुद्धीनें जाण आणि (**योगेन सुखी कृति भव**) योगाभ्यास करुन निरतिशय आनंदरुप व कृतकृत्य हो. (**भोगेन किम्**) परमसुख मिळाल्यावर मग या क्षुद्र राज्यभोगाची काय पर्वा ।।७१।।

भावार्थः- सर्व शास्त्रें ज्या परब्रह्माचें वर्णन करतात असें तें परब्रह्म कोणतें असें म्हणशील तर हे अर्जुना, त्या परब्रह्माचें स्वरुप तुला सांगतो. आपणाला प्रत्यक्ष दिसणारें हें जगत् उत्पन्न होण्यापूर्वी निर्विकार अद्वितीय असें ब्रह्म तेंच एकमेव होते.माया जरि अनादि असली तरि तिच्यामुळें द्वैत .येऊं शकत नाही. कारण तिला वस्तुस्वरुप नसल्यानें व ती अनिर्वचनीय असल्यानें ब्रह्मापेक्षा विलक्षण-द्वितीय, म्हणून म्हणता येत नाही. एकंदरींत सजातीय, विजातीय व स्वगत अशा भेदभावानें रहित ब्रह्म होतें. पूर्वी एकरुपानें असणारें व आतां तेंच द्वैतरुपानें भासतें. हा विराध वाटतो; पण तो सत्य आहे. जें आम्हांला अद्वैत दिसतें तें केवळ मायेमुळेंच, वास्तविक नाहीं.

त्यामुळें विरोध येऊं शकत नाही. यालाच बाधासामानाधिकरण्य असें म्हणतात. म्हणजे जें द्वैत दिसतें तें मायेमुळेंच, वास्तविक नाही. आणि अशा ब्रह्मानेंच मी पुष्कळ अशी व्हावें अशीं इच्छा केली व मायाउपाधि घेउन आकाशादि सर्व जगत् उत्पन्न केलें. 'तत्सृष्ट्वा तदेवानुप्राविशत्' आणि त्या जगांत समाविष्ट झालें. त्यामुळें चतुर्दशभुवनांची निर्मिति व त्यांतील लोकांची निर्मिति वाटत असूनसुद्धा ती मिथ्या म्हणजे खोटी आहे असें म्हणमें सयुक्तिक वाटतें. नाहीतर मिथ्याप्रकृतिरूप कारणांपासून दृश्यमान सत्य कार्य कसें होईल, ही शंका ब्रह्म त्यांत समाविष्ट झाल्यामुळें आता येऊ शकत नाही. ज्याप्रमाणें राजाची सही किंवा शिक्का एखाद्या चिठोरीवर असल्यास त्या जड कागदाचा खरेपणानें व्यवहार केला जातो. त्याचप्रमाणें या जगालासुद्धा ब्रह्मामुळेंच सत्यता आली आहे. अर्थात जी ब्रह्माची सत्ता तीच जगाची सत्ता. म्हणजें ब्रह्माहून जगाला स्वतंत्र अस्तित्व नाही. सर्वच ब्रह्म आहे. तेव्हा अशा प्रकृतिविकृतिस्वरुपाहून विलक्षण म्हणजें निराळें असंग सत्य,ज्ञान, आनंदरुप व जें देहेंद्रियदि विलक्षण जें तुझें चैतन्य तें एकच आहे, असें तूं सूक्ष्म बुद्धीनें जाण. सर्व भूतांमध्यें सुक्ष्म रूपानें हें ब्रह्म राहिलें असल्यामुळें आह्माला प्रत्यक्ष दिसत नाही. पण 'दृश्यते त्वग्‍र्‍यया बुद्ध्या' या उक्तीप्रमाणें अंतःकरणशुद्धी झाली असतां त्या ब्रह्माचा साक्षात्कार होतो. तेव्हां अशा या योग,ध्यान, धारणाजन्य ज्ञानानें निरतिशय सुखरुप होऊन कृतकृत्य हो, एवढा आत्मरुप मोठा लाभ झाल्यावर यकिंचित् क्षुद्र राज्यभोगाची कोण बरें इच्छा करील ? अर्थात कोणीहि करणार नाहीं.।।७१।।

यमाद्यभिज्ञोऽन्वहमासनज्ञः पीत्वेडयासुं कृतकुम्भकोऽर्कात्।
त्यक्त्वा पुनर्व्यस्तमिति त्रिकालं कालं त्रिमास्या स जयेन्नृपालम्।।७२।।

अन्वयार्थः- (**प्रत्यहं**) दररोज (**यमाद्यभिज्ञः**) यम, नियम, आसन, प्राणायाम, प्रत्याहार,धारणा, ध्यान, समाधि हीं अष्टांगे जाणणारा (**आसनज्ञः**) पद्मासनादि जाणणारा, (**इडया असुं पीत्वा**) इडा नामक नाडीनें श्वासपूरण करुन (**कृतकुंभकः**) मध्यें कुंभक म्हणजें प्राण स्तब्ध करुन (**अर्कात् त्यक्त्वा**) पिंगला नामक नाडीनें पुनः श्वास बाहेर सोडून (**पुनर्व्यस्तं**) पुनः पूर्वीपेक्षां विरुद्ध म्ह० पिंगलेनें आंत घेऊन इडेनें बाहेर सोडावा. (**इति त्रिकालं**) याप्रमाणें त्रिकाल म्ह० सकाळ ,दुपार व संध्याकाळ करावें. (**हे नृप**) हे राजा (**त्रिमास्या**) याप्रमाणें तीन महिन्यांनंतर अभ्यास केला असतां (**अलं**) निश्चयानें (**सः**) तो योगी (**कालं जयेत्**) समाधि लावूं शकतो.।।७२।।

भावार्थः- ज्या योगाभ्यासानें आनंदानुभव आपणाला प्राप्त होतो तो योग कोणता हें सांगतात . यम, नियम, आसन, प्राणायाम, प्रत्याहार, धारणा, ध्यान, समाधि याप्रमाणें योगाचीं अष्टांगें जाणणारा पद्मासनादि आसनें व शास्त्रशुद्ध प्राणायाम केला असतां योगी होतो. तो प्राणायाम याप्रमाणें इडा व पिंगला अशा दोन नाड्या आपल्या शरीरांत आहेत. चित्त एकाग्र करुन आसनाधिष्ठित होऊन प्रथमतः इडा नामक नाडीनें (म्हणजें डाव्या नाकपुडीद्वारां) श्वास आत घेऊन तो आत थांबवून ठेवून म्हणजेंच कुंभक करुन नंतर

पिंगला नामक नाडींतून उजव्या नाकपुडीद्वारां बाहेर सोडावा नंतर या उलट म्ह० पिंगलेने श्वास आत घेऊन द्वाराबाहेर सोडावा याप्रमाणें सकाळ ,दुपार व संध्याकाळ प्राणायामचा अभ्यास केला असतां तीन महिन्यांनंतर निश्चयानें तो योगि समाधी लावू शकतो.।।७२।।

न योगसिद्धिं घटशोधनाज्ञस्त्रिबन्धयुक्ताष्टककुंभकाज्ञः।।
उपैति मुद्रादशकानभिज्ञो विज्ञोऽपि नादश्रवणानभिज्ञः।।७३।।

अन्वयार्थः- (**घटशोधनाज्ञः**) देहशुद्धी न जाणणारा (**त्रिबंधयुक्ताष्टककुंभकाज्ञः**) जालंधरबंधयुक्त सूर्यादिभेदरुपी कुंभक न जाणणारा, (**मुद्रादशकानभिज्ञः**) शक्तिचालनादि ज्या दहा मुद्रा आहेंत त्या न जाणणारा, (**नादश्रवणानभिज्ञः**) आंतून अनाहतनाद येत असतो तो न जाणणारा, (**विज्ञोऽपि**) स्वतः ज्ञानी असूनहि (**योगसिद्धि**) योगाने मिळणारी सिद्धि जिला जीवन्मुक्ती असें म्हणतात, ती (**नोपैति**) वर सांगितलेला योगी प्राप्त करुन घेऊ शकत नाहीं ।।७३।।

भावार्थः- धौति १, बस्ति २, नेति ३, त्राटक ४, नौलिक ५ व कपालभाति ६ या सहा प्रकारच्या कर्मांनीं योग्यानें देहशुद्धि करावयाची असते. ही देहशुद्धि झाल्यावर मग प्राणायाम करणेस कठिणता येत नाहीं. पण ही न कराणारा योगी व पद्मासन घालून हनुवट छातीवर टेकवून खालीं मान घालून केला जाणारा प्राणायाम याला जालंधरबंधयुक्त प्राणायाम असें म्हणतात. प्राणायामांत आठ प्रकारचे कुंभक आहेत. ते म्हणजे सूर्यभेद १, उज्जायी २, सीत्कारी ३, शीतली ४, भस्त्रिका ५, भ्रामरी ६, मूर्च्छा ७ आणि प्लाविनी ८ याप्रमाणें आहेत. **सूर्यभेद** म्हणजे उजव्या नाकपुडीनें श्वास पूरक करून कुंभक करून नंतर डाव्या नाकपुडीनें रेचक म्हणजे श्वास बाहेर सोडणें याला सूर्यभेद असें म्हणतात. **उज्जायी** म्हणजे मुख बंद करून इडा व पिंगला या नाडीनें श्वास हळूं हळूं आंत घ्यावा. तो घेत असतां कंठापासून हृदयापर्यंत त्याचा आवाज व्हावा व सूर्यभेदाप्रमाणेंच कुंभक करून नंतर डाव्या नाकपुडीनें रेचक करावा. याला उज्जायी असें म्हणतात. **सीत्कार** म्हणजे यांत जिभेनें आवाज करीत तोंडानें कुंभक करावा व रेचक मात्र दोन्ही नाकपुडीनें करावा. याला सीत्कार म्हणतात. **शीतली** म्हणजे यांत जीभ ओठाच्याबाहेर काढून श्वासाचें पूरण करावें. नंतर सूर्यभेदनाप्रमाणें नाकपुडीनें रेचक करावा याला शीतली असें म्हणतात. **भस्त्रिका** म्हणजे दोन्ही पाउलें मांडीवर ठेवून म्हणजे पद्मासन घालून ताठ बसून तोंड बंद करून नाकाच्या एका पुडींतून प्रथक रेचक करावा म्ह. श्वास बाहेर सोडावा. सोडतांना त्याचा आवाज होऊं नये व दुसऱ्या नाकपुडीनें श्वासपूरण करावा. उजव्या हाताच्या किरंगळी व तियाच्या जवळील बोटांनी डावी नाकपुडी बंद करून ठेवून उजव्या नाकपुडीनें श्वास जोरानें बाहेर सोडावा. असें करतांना थकल्यास अंगठ्यानें उजवी नाकपुडी बंद करून डाव्यानें श्वास बाहेर सोडावा. याप्रमाणे अदलाबदल करून श्वासप्रश्वास केला असतां भस्त्रिका नामक कुंभक होतो. **भ्रामरी** म्हणजे वेगानें भुंग्याच्या आवाजाप्रमाणे आवाज करून प्राणायाम व कुंभक करावा व नंतर हळूं हळूं रेचक करावा. याला भ्रामरी असें म्हणतात. **मूर्च्छा** म्हणजे यांत पूरक करून जालंधरबंधानें पुष्कळ वेळ कुंभक करून नंतर हळूं हळूं रेचक करावा, याला मूर्च्छाकुंभक असें म्हणतात. **प्लाविनी** म्हणजे सर्व

शरीरभर प्राणसंचार करून त्या प्राणांत जो योगी बुडून जातो म्ह. प्राणमय होतो. ज्याप्रमाणें कमळपत्र आश्रयाशिवाय पाण्यांत राहतें त्याप्रमाणें हा योगी प्लाविनी कुंभकानें पाण्यावरून चालूं शकतो. याला प्लाविनी कुंभक म्हणतात. याप्रमाणें जालंधरबंधयुक्त सूर्यभेदादि अष्टकुंभक न जाणणारा योगी, त्याचप्रमाणें महामुद्रा १, महाबंध २, महावेद्य ३, खेचरी ४, उड्डियानबंध ५, मूलबंध ६, जालंधरबंध ७, विपरीतकरणी ८, वज्रोली ९ व शक्तिचालन १०, या दहा मुद्रा न जाणणारा व कान, नाक, डोळे, मुख हे सर्व बंद करून मन एकाग्र करून बसलें असतां अनाहत म्ह. न वाजवितां झालेला आरंभी नगाऱ्यासारखा व शेवटीं घंटेसारखा नाद ऐकूं येतो तोहि ज्यांनीं ऐकला नाहीं, पण सर्व योगप्रक्रियेचें ज्ञान मात्र उत्तम आहे अशा योग्याला जीवन्मुक्तिरूप योगसिद्धि मिळत नाहीं. म्हणून या सर्व क्रिया केल्या पाहिजेत तरच स्वरूपसुखाचा अनुभव येईल.।।७३।।

प्राणायामोऽण्डगः प्राणः सपञ्चविपले पले।। प्रत्याहारादयो ज्ञेया द्वादशघ्नोत्तरोत्तरम्।।७५।।

अन्वयार्थः- (**सपंचविपले पले**) पांच विपलांसहित दोन पल म्ह. इतका वेळ (**अंडजः प्राणः**) जर ब्रह्मरंध्रांत प्राण राहील तर (**प्राणायामः**) त्याला प्राणायाम असें म्हणावें. (**द्वादशघ्नोत्तरोत्तरं**) अष्टांगामध्यें प्रत्येक अंग बारा बारा पट वाढविणें (**प्रत्याहारादयो ज्ञेयाः**) याचप्रमाणें प्राणायामाच्या बारा पट प्रत्याहार जाणावा. ।।७४।।

जिते प्राणे हृदार्थेभ्यः प्रत्याहृत्याखिलेन्द्रियम्। अविक्षिप्तं स्थिरीकुर्यान्मन आत्मन्यचञ्चलम्।।७५।।

भावार्थ :- जर पांच विपळांनीं सहित दोन पळें इतका काळ ब्रह्मरंध्रांत प्राण राहिला तरच त्याला प्रणायाम असें म्हणावें आणि तोच प्राणायाम अंतःकरणशुद्धि करून सर्व पापांचा नाश करतो. केवळ पोटामध्यें श्वास दाबून ठेवून जर प्राणायामरूपी क्रिया केली तर तो प्राणायाम होत नाहीं व त्यानें अंतःकरणशुद्धीहि होत नाहीं. आतां प्रत्येक जीं अष्टांगें आहेत तीं किती वेळ करावीं याचा खुलासा करतात. यम जर १पट केला तर त्याच्या बारापट नियम व नियमाच्या बारापट आसन. याप्रमाणे प्राणायामादि सर्व प्रत्येकाच्या बारा बारापट वाढवावें. याप्रमाणें केलें असतां चोवीस तासांत एक ध्यान होतें व बारा दिवसांनीं समाधि म्हणजे ब्रह्मंरंध्रांत जर बारा दिवस प्राण राहील तर समाधि साध्य होईल. पुढील श्लोकांत प्रत्याहार व धारणा म्हणजे काय तें सांगतात. ।।७४।।

(गद्यम्) तदनु श्रुत्यनुकूलयुक्त्यनुसारि गुरूक्तं षड्.लिङ्गवित्तं भागत्यागलक्षितं सोऽहमात्मेत्यभेदतः श्रुतं परात्मैकत्वं विजातीयप्रत्ययनिरासपूर्वकं सजातीयप्रत्ययप्रवाहीकरणमनुक्षणं विपर्ययसनिरासकृन्निदिध्यासेत्।।७६।।

अन्वयार्थः- (**प्राणे जिते**) याप्रमाणें प्राणायाम करून प्राणाला वश केलें असतां (**हृदा**) सत्त्वप्रधान अंतःकरणानें (**अर्थेभ्यः**) शब्दादि बाह्य विषयापासून (**अखिलेन्द्रियम्**) सर्व इंद्रियांना (**प्रत्याहृत्य**) पुनः आंत ओढून घेऊन (**अविक्षिप्तम्**), विषयाकडे न जाऊं देतां (**अचंचलं**) शांत अशा (**मनः**) मनाला (**आत्मनि**) आत्माचे ठिकाणीं (**स्थिरीकुर्यात्**) स्थिर करावें. ।।७५।।

भावार्थः- पूर्वी सांगितल्याप्रमाणे प्राणायाम करून प्राणाला आपल्या ताब्यांत ठेवल्यावर मग प्रत्याहार करावा, म्हणजे अंतःकरण हें त्रिगुणात्मक प्रकृतीच्या सत्त्वगुणापासून झालें आहे, अर्थात् तें निर्मल आहे अशा अंतःकरणानें शब्दादि विषयाकडे गेलेलीं पांच इंद्रियें विषयापासून परत फिरवावी; या क्रियेला प्रत्याहार असें म्हणतात. एकदां प्रत्याहार झाला की नंतर मनोजय करण्याकरितां (अंतःकरण व मन एकच) विषयांकडे मनाला जाऊं न देतां त्याला शांत करून म्ह. त्यांतील जो थोडा रजोगुण आहे तो शांत करून तें आत्म्याचे ठिकाणीं स्थिर करावें, यालाच धारणा असें म्हणतात. ।।७५।।

उपस्थिता इहाप्येताः सिद्धयो याः कुबुद्धयः।।

ते भोगबुद्ध्याददते नृप तास्त्यज तापदाः।।७७।।

अन्वयार्थः- (**तदनु**) याप्रमाणें मन स्थिर केल्यावर (**श्रुत्यनुकूलयुक्त्यनुसारी**) श्रुतीला अनुकूल अशा युक्तीचें अनुसरण करणारा अधिकारी (**गुरूक्तम्**) गुरूंनीं सांगितल्याप्रमाणें (**षड्लिङ्गवित्तम्**) उपक्रमादि षड्विध लिंगांनी तात्पर्यावधारण करून जाणलेले (**भागत्यागलक्षितम्**) विरुद्ध जें किंचिज्ञत्व व सर्वज्ञत्व हे दोन भाग टाकून लक्षणेनें मिळणारे (**सोऽहमात्मेत्यभेदतः श्रुतं परमात्मैकत्वं**) तो मी आत्मा आहें अशा श्रुतींनीं अभेद रूपानें सांगितलें जाणारें ब्रह्मात्मैक्य करून (**विजायतीय प्रत्ययनिरासपूर्वकं**) असत् जड आणि दुःखरूप जो प्रत्यय त्याचा निरासकरून (**सजातीयप्रत्यप्रवाहीकरणं**) सत्यज्ञानानंदादि जो सजातीय प्रत्यय त्यानें सहित मी आहें असे जाणून (**अनुक्षणं**) प्रत्येक क्षणीं (**विपर्यासनिरासकृत्**) विरूद्ध धर्माध्यासांचा निरास करणाऱ्यानें (**निदिध्यसेत्**) याप्रमाणें निदिध्यासन करावें.।।७६।।

भावार्थ :- याप्रमाणें धारणा करून मन स्थिर केल्यावर श्रुत्यनुकूल ज्या तर्कानें श्रुतीला बाध येणार नाहीं, अशा तर्कानें म्हणजे युक्तीनें गुरूंनीं सांगितल्याप्रमाणें उपक्रमोपसंहारादि जीं षड्विध लिंगें त्यांनी तात्पर्यावधारण करून 'सोऽहमात्मा' या वाक्यांनीं सांगितलेल्या जीवब्रह्मैक्य श्रुतीमध्यें लक्षणेनें म्ह. जीव किंचिज्ज्ञ आहे तर दोघांचें ऐक्य कसें होणार? पण ऐक्य करण्यामध्यें विरोधी जें किंचिज्ज्ञत्व व सर्वज्ञत्व हे भाग टाकल्यावर फक्त चैतन्य मात्र शिल्लक राहतें व तें तर एकच आहे. हा वाक्यार्थ लक्षणेनें मिळाल्यावर व त्यामुळें ऐक्यबुद्धि झाल्यावर जीवामध्यें भासणारें नश्वरत्व, जडत्व व दुःखत्व या सर्वांचा निरास करून त्याचें मूळचें स्वरूप जें सत्यज्ञानानंदादि अखंडैकरस जो ब्रह्मानुभव त्याचा निरंतर अनुभव घ्यावा. यालाच निदिध्यास असें म्हणतात. आणि हा निदिध्यास नेहमां करण्याचें कारण हें कीं आपणांला नेहमीं जो विपर्यास म्हणजे मी दुःखी वगैरे विरुद्ध धर्माध्यास होत असतो तो होऊं नये व आपलें मूळचें स्वरूप आपणांला समजावें याकरितां हा निदिध्यास सांगितला आहे. ।।७९।।

विक्षिप्तं शमयेत्समाधिसमये चित्तं लये बोधयेदात्मन्येव न चालयेत्तदभये संस्थं न चास्वादयेत्।।

अन्वयार्थः- (**हे नृप**) हे राजा (**कुबुद्धयः**) मंदबुद्धि असणारे (**ते**) लोक (**भोगबुद्ध्या**) उपभोग घ्यावा या बुद्धीनें (**याः सिद्धयः**) ज्या सिद्धि (**आददते**) प्राप्त करून घेतात (**एताः**) त्या सिद्धि (**इह**) मोक्षमार्गांत असतांना (**उपस्थिताः अपि**) जरी प्राप्त झाल्या तरी (**तापदाः**) त्या पीडाकारक आहेत. म्हणून (**ताः**) त्या सिद्धि (**त्यज**) तूं टाकून दे. ।।७७।।

मध्येसाररसं रसं परमितं निर्वातदीपस्थितं चित्तं संयमितं तदेव हि मतं शान्तं समाधिं गतम्।।७८।।

अन्वयार्थः- (**समाधिसमये विक्षिप्तं चित्तं**) समाधीच्या वेळीं चंचल झालें चित्त (**शमयेत्**) शांत करावें. (**लये बोधयेत्**) जर मनाला निद्रा येऊं लागली तर जागें करावें (**च**) आणि तत् तें चित्त (**अभय आत्मनि संस्थं**) जर निर्भय अशा आत्म्यामध्यें स्थिर असेल तर (**न चालयेत्**) त्याला हालवूं नये. (**मध्येऽसाररसं**) आत्मनिष्ठ असतांना असार जो आनंदरस त्याचा (**नास्वादयेत्**) स्वाद घेऊं नये. (**चित्तं संयमितं**) अशा रीतीनें चित्ताचा संयम करून (**निर्वातदीपस्थितं**) शांत स्थळीं असलेल्या दिव्याप्रमाणें जर मन शांत असेल तर (**तदेव हि शांतं समाधिं गतं**) त्या शांत अशा चित्तालाच समाधीमध्यें आहे असें म्हणतां येईल; म्हणूनच (**परं रसं इतं**) परमानंदाला प्राप्त झालें असें (**मतं**) वाटतें. ।।७८।।

योगोऽयं दुःखसंयोगवियोगो भोगसंगहृत्। हृद्दर्पसर्पसर्पघ्नः सुकृताढ्यः कृतान्तकृत्।।
ब्रह्ममूर्तिः शून्यवृत्तिर्यतिः स्वात्मरतिः कृती। भिन्नसंशयहृद्ग्रन्थिः सद्गतिर्मेऽतिवल्लभः।।७९।।

अन्वयार्थ :- (**ब्रह्ममूर्तिः**) जे ब्रह्मरूप आहेत (**शून्यवृत्तिः**) ज्यांच्या चित्तांत कोणत्याहि वृत्ति नाहींत असे (**स्वात्मरतिः**) आत्मनिष्ठ, (**भिन्नसंशयहृद्ग्रंथिः**) ज्यांचे संशय व हृदयग्रंथि नष्ट झाल्या आहेत असे (**सद्गतिः**) परब्रह्मामध्यें नेहमीं रत असलेले (**कृती**) कृतकृत्य असणारे (**यतिः**) संयमी (**मे**) मला (**अतिवल्लभः**) अत्यंत प्रिय आहेत. ।।७९।।

प्रारब्धाय तनुर्यस्य जनुर्यस्य पुनर्न हि।। न हीयतेऽस्य महिमा हिमांशुकुलजाशुभैः।।८०।।

अन्वयार्थ :- (**प्रारब्धाय तनुर्यस्य**) ज्ञानानें संचित व क्रियमाण कर्मांचा नाश होतो. पण प्रारब्धकर्म तसेंच राहतें व त्या भोगाकरितां शरीराची आवश्यकता ज्यांना आहे असें (**जनुर्यस्य पुनर्न हि**) पण ज्यांना हें शरीर नष्ट झाल्यावर पुनर्जन्म नाहीं (**हे हिमांशुकुलज**) हे अर्जुना (**अशुभैः**) अशुभ कर्मानें (**अस्य महिमा**) या ज्ञानी पुरुषाचा महिमा (**न हीयते**) कमी होत नाही. ।।८०।।

राजन्युञ्जन्त्वमप्येवं कार्तवीर्य कृती भव। भवदाज्ञा मतेत्युक्त्वा गत्वा दध्यौ गुहां महान्।।८१।।

अन्वयार्थ :- (**हे कार्तवीर्य राजन्**) हे कृतवीर्याच्या मुला, राजा अर्जुना, (**त्वमप्येवं युंजन्**) तूंहि याप्रमाणे अभ्यास करून (**कृती भव**) कृतकृत्य हो. (**महान्**) याप्रमाणें दत्तात्रेयांनीं सांगितल्यावर अधिकारी अर्जुन (**भवदाज्ञा मता**) आपली आज्ञा मला शिरसावंद्य

आहे (**इत्युक्त्वा**) असें म्हणून (**गुहां गत्वा**) एका गुहेंत जाऊन (**दध्यौ**) ध्यान करूं लागला ।।८१।।

भूयो भूयोऽभ्यसन्सभ्यस्त्रिमासं स समाहितः।। तच्छशंसैत्य गुरवे रवेस्तुल्याय सन्नतः।।८२।।

अन्वयार्थ :- (**सः सभ्यः**) तो श्रेष्ठ अर्जुन (**भूयो भूयः**) पुनः पुनः (**अभ्यसन्**) अभ्यास करणारा (**त्रिमासं समाहितः**) तीन महिन्यांत समाधि लावूं लागला. (**सन्नतः**) गुरूजवळ येऊन त्यानें साष्टांग नमस्कार केला व (**रवेस्तुल्याय गुरवे**) सूर्याप्रमाणें दैदीप्यमान असणाऱ्या श्रीदत्तात्रेयांना (**तच्छशंस**) सर्व हकीगत सांगितली. ।।८२।।

भुक्तो गुर्वाज्ञयाऽसक्तो योगयुक्तोऽभवत्पुनः।। भक्तो युक्तोऽपि वर्षेण हर्षेणोत्थापितः सता।।८३।।

अन्वयार्थः- (**असक्तः**) निरिच्छ होऊन (**गुर्वाज्ञया**) श्रीदत्तात्रेयांच्या आज्ञेनें (**भुक्तः**) भोग भोगून झाल्यावर (**पुनः योगयुक्तः**) नंतर पुनः राजा अर्जुन योगी (**अभवत्**) झाला. (**युक्तोऽपि**) एक वर्ष समाधि स्थितींत असतांहि (**भक्तः**) राजा अर्जुन (**सता**) श्रीदत्तात्रेयांनी (**वर्षेण हर्षेण**) एक वर्षानंतर आनंदानें (**उत्थापितः**) समाधि स्थितींतून उठविला. ।।८३।।

गुरुराह महामतेऽत्र ते वद किं वा अनुभूतमुद्गते।। न रहो हि चिरं परंतप स्थितिरुर्वीश विना परं तपः।।८४।।

अन्वयार्थः- (**गुरुः**) श्रीदत्तात्रेय (**आह**) म्हणाले (**उद्गते महामते**) समाधीमध्यें ज्याची उत्तम गति आहे व बुद्धिमान् अशा अर्जुना, (**अत्र ते किं अनुभूतम्**) तूं या समाधिस्थितींत कशाचा अनुभव घेतलास (**वै वद**) तें निश्चयानें सांग. (**परंतप**) कामादि शत्रूंचा नायनाट करणाऱ्या (**उर्वीश**) योगभूमीचें पालन करणाऱ्या अर्जुना, (**हि**) कारण (**परं तपः विना**) मनाचें व इन्द्रियांचें ऐकाग्र्य झाल्याशिवाय (**चिरं**) पुष्कळ काळ (**रहः**) एकान्त (**स्थितिः**) वास (**न**) होऊं शकत नाहीं.।।८४।।

नृप आह महानुभाव ते कृपया मय्यहहा समाहिते।। त्रिपुटीं न पटीयसी मतिर्धृतिमत्यप्यज वेद भेदहृत्।।८५।।

अन्वयार्थः- (**नृपः**) राजा अर्जुन (**आह**) म्हणाला, (**हे महानुभाव अज**) हे महाप्रभावशाली स्वयंभू श्रीदत्त, (**ते कृपया**) तुझ्या कृपेनें (**मयि समाहिते**) मी समाधिस्थितींत गेलों असतां (**पटीयसी**) अत्यंत कुशल अशी (**धृतिमत्यपि**) व कोणतीहि गोष्ट समजणारी अशी असूनहि (**भेदहृत्**) सर्व भेद नाहींसे करणारी (**मतिः**) मझी बुद्धि (**त्रिपुटीं**) ध्याता, ध्यान, ध्येय, असा भेद (**न वेद**) जाणूं शकली नाही.।।८५।।

भावार्थ :- याप्रमाणें श्रीदत्तात्रेयांचें भाषण ऐकून अर्जुन म्हणाला, हे नित्यसिद्ध महानुभावी श्रीदत्ता, आपल्या कृपेनें कांही काळ अभ्यास केल्यावर मला समाधियोग सिद्ध झाल्यावर अत्यंत कुशल असणारी व कोणतीहि गोष्ट ध्यानांत ठेवणारी अशी असूनहि सर्व द्वैतभावाचा नाश करणारी अशी माझी बुद्धि अत्यंत सूक्ष्म व कुशाग्र असूनहि समाधीचे वेळीं ध्याता, ध्यान व ध्येय म्हणजे मी ध्यान करणारा, हें ध्यान व ध्येय म्हणजे ज्याचें ध्यान करावयाचें तो विषय असा भेद ती घेऊं शकली नाहीं. अर्थात् मला कोणतेंहि भान नव्हतें. ।।८५।।

मनसा सह पञ्च पञ्च च प्रिय गावः स्थिरतां गतां स्थिता। मतिरप्यतिहर्ष उत्थितः स्मर एतामनुवृत्तिमीश्वर।।८६।।

अन्वयार्थः- (**हे प्रिय**) हे भगवन् (**मनसा सह गावः पंच पंच च**) मनाशीं सहित पांच ज्ञानेंद्रियें व पांच कर्मेन्द्रियें (**स्थिरतां गताः**) स्थिर झालीं. (**अतिहर्षः**) ज्याला अत्यंत हर्ष झाला आहे असा मी (**उत्थितः**) समाधीतून उठलों व (**हे ईश्वर**) हे श्रीदत्ता, (**एतां अनुवृत्तिं**) त्या वृत्तींच्या अनुवृत्तींचें (**स्मरें**) मी स्मरण करतों.।।८६।।

भावार्थ :- हे प्रिय हे भगवन् श्रीदत्ता, ज्या वेळीं मीं समाधि लावली त्या वेळीं मनाशीं सहित सर्व अकरा इन्द्रियें म्ह० पांच ज्ञानेंद्रियें व पांच कर्मेन्द्रियें स्थिर झालीं, व स्थिर झालीं असतां मी अत्यंत हर्षयुक्त झालो व समाधी अवस्थेतून उठलों व समाधि अवस्थेंत जी वृत्ति होति तिचें स्मरण करूं लागलों. यद्यपि स्मरणाला अनुभव पाहिजें व त्या वेळीं तर वृत्ति नसल्यानें अनुभव नाहीच मग स्मरण तरीं कसें होणार. पण विशिष्ट प्रकारची वृत्ति जरी झाली नाही तरी आरंभी प्रयत्न केला असल्यामुळें सामान्य रुपानें त्या अवस्थेंचे स्मरण होण्यास हरकत नाहीं. त्या वेळीं समाधि स्थितींत वृत्तीचें ज्ञान जरी होत नसलें तरी त्या वृत्ती आत्मगोचर असल्यामुळें तेवढ्या संस्कारानें समाधीतून उठल्यावर अनुमानानें वृत्तीचें ज्ञान होऊं शकतें. त्यामुळें त्या वृत्तीचें स्मरण करतों हें अर्जुनाचे म्हणणें संगतच आहें।।८६।।

इमं मिमंक्षयानन्दह्रदमेत्य सुखाम्बुधिम्।। गतोऽस्मि विगतोपाधिराधिव्याधी न मे सुधीः।।८७।।

अन्वयार्थः- (**मिमंक्षया**) त्रिविध तापाच्या शांतीकरितां स्नान करण्याच्या इच्छेंनें (**इमं**) ह्या (**आनंद-हदं**) योगी लोकांना गोचर असणाऱ्या आनंदरुपी डोहांत (**एत्य**) जाऊन (**विगतोपाधिः**) ज्याची उपाधि गेली आहे असा होऊन (**सुखांबुधिं**) निरतिशयानंद सागरांत (**गतोऽस्मि**) मी बुडलों आहें. (**सुधीः**) कृपासागर श्रीदत्त (**आधिव्याधि**) खरोखर मानसिक व शारीरिक पीडा (**मे न**) माझ्या नाहींशा झाल्या.।।८७।।

भावार्थ :- त्रिविध तापानें म्ह० कायिक, वाचिक व मानसिक तापानें पोळलों असल्यामुळें त्यांची शांती व्हावी म्हणून स्नान करण्याच्या इच्छेंनें या योगी लोकांना माहीत असलेल्या आनंदरुपी डोहांत बुडी मारली असतां सर्वोपाधिरहित असा मी झालों व सुखसागरांत जाऊन निरतिशय अखंडानंदस्वरूपच झालों. हे श्रीदत्ता, खरोखर आतां माझ्या मानसिक व शारीरिक पीडा शिल्लक राहिल्याच नाहींत ।।८७।।

आलिङ्ग्यालिङ्ग्यधीशस्तं शस्तं प्राह नृपार्जुन। प्रजाः प्रजाधिभूः शाधि गच्छ गच्छ न ते द्वयम्।।८८।।

अन्वयार्थः- (**अलिंग्यधीशः**) परमहंसांमध्यें श्रेष्ठ श्रीदत्तात्रेय (**तं**) त्या अर्जुनाला (**आलिंग्य**) आलिंगन देऊन (**शस्तं प्राह**) खूष होऊन म्हणाले (**हे नृप अर्जुन**) हे राजा अर्जुना, (**प्रजाधिभूः**) तूं प्रजेचा नायक आहेस. (**प्रजाः**) म्हणून प्रजेचें (**शाधि**) नीतीनें पालन कर. (**गच्छ गच्छ**) तूं आतां आपल्या राष्ट्रांत जा (**न ते द्वयम्**) तूं विरक्त असल्यामुळें द्वैत व तदुत्पन्न सुख व दुःख तुला होणार

नाहीं.।।८८।।

अन्तःसङ्गविहीनस्य बहिःसङ्गो न बाधकः।। धर्मं चर परार्थं तु क्वचिद्व्यस्तं बहिश्चर।।८९।।

अन्वयार्थः- (**अंतःसंगविहीनस्य**) ज्यानें कामक्रोधादि आंतूनच सोडले आहेत (**बहिःसंगो न बाधकः**) त्यानें बाह्य जगाशीं संबंध जरी ठेवला तरी तो त्याला बाधक होऊं शकत नाहीं. (**परार्थ**) दुसऱ्याकरितां म्हणून कां होईना (**धर्मं चर**) धर्माचरण कर. (**क्वचित्**) आणि केव्हां केव्हां (**बहिः व्यस्तं**) बाहेर वागणूक अशी दाखीव कीं लोकांनी विक्षिप्त आहे असें म्हणावें. (**चर**) याप्रमाणें वागून राज्य कर.।।८९।।

भजाङ्घ्रि मे यथा देही यजाद्यं मां तथा गृही।। त्यजासक्तिं नष्टभव द्विजादेरर्चको भव।।९०।।

अन्वयार्थः- (**यथा देही**) ज्याप्रमाणें सर्वसामान्य लोक माझी सेवा करितात त्याप्रमाणें (**मे अंघ्रि भज**) माझ्या चरणांची सेवा तूंहि कर. (**यथा गृही**) ज्याप्रमाणें फलाची इच्छा मनांत धरुन यज्ञयागादि क्रिया गृहस्थ लोक करितात त्याप्रमाणें (**आद्यं**) सर्व कारणांचेहि कारण असणाऱ्या (**मां**) माझी निष्कामपणानें (**यज**) यज्ञयागादि क्रियेनें सेवा कर. (हे **नष्टभव**) संसारभ्रम ज्याचा निवृत्त झाला आहे अशा अर्जुना, (**आसक्तिं त्यज**) कर्मामध्यें आसक्ति ठेवूं नकोस. (**द्विजादेः**) ब्राह्मण, गुरू वगैरे श्रेष्ठ लोकांची (**अर्चको भव**) पूजा नेहमीं कर.।।९०।।

तथेत्याज्ञां प्रगृह्यापि श्लथच्चित्तोऽङ्घ्रिदत्तदृक्। दत्तदृग्जातमुदयं नैच्छत्त्यक्तुं महोदयम्।।९१।।

अन्वयार्थः- (**तथा**) ठीक आहे (**इति**) असें म्हणून (**आज्ञां**) त्यांची आज्ञा (**प्रगृह्यापि**) शिरसामान्य करूनहि (**अयं**) हा राजा अर्जुन (**श्लथच्चितः**) ज्याचें अंतःकरण गहिंवरून आलें आहे अशा (**अंघ्रिदत्तदृक्**) श्रीदत्ताच्या चरणांवर दृष्टि ठेवणारा (**दत्तदृग्जातमुद्**) श्रीदत्तात्रेयांच्या दर्शनानें ज्याला आनंद झाला आहे अशा राजाला (**महोदयं**) श्रीदत्तात्रेयांची संगति (**त्यक्तुं नैच्छत्**) सोडूं नये असें वाटूं लागलें. ।।९१।।

सदयं हृदयं यस्य तेन प्रस्थापितोऽपि सः।। वाचा मोचातिरसया स्थितश्चित्र इवाग्रतः।।९२।।

अन्वयार्थः- (**यस्य सदयं हृदयं**) ज्याचें कृपामय अंतःकरण आहे (**तेन**) अशा श्रीदत्तात्रेयांनीं (**मोचातिरसया**) अत्यंत पिकलेल्या केळापेक्षांहि गोड अशा (**वाचा**) वाणीनें (**प्रस्थापितः**) जा म्हणून पाठविलेला (**सः**) तो राजा (**चित्र इव**) एखाद्या चित्राप्रमाणें (**अग्रतः**) श्रीगुरूंच्यापुढें (**स्थितः**) तसाच उभा राहिला. ।।९२।।

प्रस्थायामास पुनः सहासं प्रभुस्ततः प्राप नृपः स्ववासम्।।
नवोदयं चन्द्रमिव प्रजास्तं पपुर्दृशागाच्च तदाधिरस्तम्।।९३।।

अन्वयार्थः- (**ततः पुनः**) नंतर पुनः (**प्रभुः**) श्रीदत्तात्रेयांनीं (**सहासं**) हास्ययुक्त वाणीनें राजाला (**प्रस्थापयामास**) जा असें म्हणून

पाठविलें. (**नृपः**) नंतर राजा (**स्ववासं**) आपल्या राजधानींत (**प्राप**) प्राप्त झाला. (**नवोदयं**) नवीनच उगवलेल्या (**चन्द्रमिव**) चंद्राप्रमाणें (**तं प्रजाः**) त्या राजाला सर्व प्रजाजन (**दृशा पपुः**) डोळे भरून पाहूं लागलें. (**च**) (**तदाधिः**) त्याला पाहतांच प्रजेच्या मानसिक सर्व पीडा (**अस्तमगात्**) नाहींशा झाल्या. ।।९३।।

चक्रे स यज्ञाञ्छशिवंशकेतुरगर्वकामः सुरवंशकेतुः।।
अकम्पतर्तेऽप्यनिलं तदैव स्थिरासनस्थोपि भृशं सदैवः।।९४।।

अन्वयार्थः- (**शशिवंशकेतुः**) सोमवंश कुलाला भूषणभूत अशा (**सः**) तो राजा अर्जुन (**अगर्वकामः**) अभिमान व फलाची इच्छा न कराणा (**यज्ञान्**) यज्ञयाग (**चक्रे**) करूं लागला. (**तदैव**) त्याच वेळीं (**सदैवः**) सर्व देवांशी सहित (**सुरवंशकेतुः**) इन्द्र (**स्थिरासनस्थोऽपि**) त्याचें आसन स्थिर असतांहि (**अनिल ऋतेऽपि**) जोराचा वारा नसतांहि (**भृशं**) जोरानें (**अकंपत**) थरथर कापूं लागला. ।।९४।।

तत्सत्वहृत्यै सुरनोदितोऽर्को भूत्वातिथिः प्राप नृपाधिपौकः।।
नृपादुपादाय स वृक्षभिक्षां नृपं स निन्ये मुनिशापशिक्षाम्।।९५।।

अन्वयार्थः- (**तत्सत्त्वहृत्यै**) राजा अर्जुनाचें सत्त्व हरण करण्याकरितां (**सुरनोदितः अर्कः**) इंद्रादि देवांनीं पाठविलेला सूर्य (**अतिथिः भूत्वा**) अतिथीचें रूप धारण करून (**नृपाधिपौकः**) राजाच्या घरीं (**प्राप**) आला. (**सः**) सूर्यानें (**नृपात्**) राजापासून (**वृक्षभिक्षां उपादाय**) वृक्षांची भिक्षा घेऊन (**नृपं**) अर्जुनाला (**मुनिशापशिक्षां**) वसिष्ठ ऋषींच्या शापास (**निन्ये**) पात्र केलें. ।।९५।।

(गद्यम्) **ततो दैववशादुद्धतेन तेन पराजिता देवता अपराजितमुपेत्याभिष्टूय ख्यात्याधिकात्तन्मृतिं कल्पयामासुः।।९६।।**

अन्वयार्थः- (**ततः**) नंतर कांहीं कारणांनी (**दैववशात्**) व कांहीं दुष्ट दैव असल्यामुळें (**उद्धतेन तेन**) गर्विष्ठ अशा त्या अर्जुनानें (**पराजिताः देवताः**) पराभूत केलेले इन्द्रादिदेव (**अपराजितं उपेत्य**) श्रीविष्णूजवळ येऊन (**अभिष्ट्य**) त्याची स्तुति करून (**ख्यात्याधिकात्**) प्रसिद्ध पुरुषाकडून (**तन्मृतिं**) अर्जुनाचा नाश व्हावा (**कल्पयामासुः**) याप्रमाणें सर्व देवांनी ठरविले. ।।९६।।

(गद्यम्) **अथ हि किल गाधिभूभृति वने निवसति सति परिणयार्थं भृगुणादिष्ट ऋचीको योगप्रभावाद्वरुणादाहृतश्यामकर्णाश्वसहस्त्रं शुल्कत्वेन राज्ञे प्रतिपाद्य स्त्रीमुख्यां सत्यवत्यभिख्यां तत्तनयामुपयेमे।।९७।।**

अन्वयार्थः- (**अथ ह किल**) विष्णूनें वर दिल्यावर पूर्वी अशी एक गोष्ट घडली कीं (**गाधिभूभृति**) गाधि नांवाचा राजा (**वने निवसति सति**) वनामध्यें राहत असतां (**परिणयार्थं**) तूं लग्न कर अशी (**भृगुणादिष्टः**) भृगु ऋषींनीं आज्ञा केलेला (**ऋचीकः**) ऋचीक ऋषी (**योगप्रभावात्**) योगसामर्थ्यानें (**वरुणादाहृतश्यामकर्णाश्वसहस्त्रं**) वरुण लोकांतून आणलेले निळ्या कानाचे हजार घोडे (**शुल्कत्वेन राज्ञे प्रतिपाद्य**) नजराणा म्हणून गाधि राजाला देऊन (**स्त्रीमुख्यां**) सर्व स्त्रियांमध्यें श्रेष्ठ अशा (**सत्यवत्यभिख्यां**) सत्यवती नांवाच्या (**तत्तनयां**) त्या गाधीच्या मुलीबरोबर (**उपयेमे**) ऋचीकांनीं लग्न केलें. ।।९७।।

स्वस्या मातुश्चानुरूपपुत्राप्तये स्नुषार्थितेन भृगुणा कारितपुत्रकामेष्टिचरुप्राशनव्यत्ययेन जनिष्यमाणपुत्रव्यत्यासं निवेद्य स्नुषाप्रार्थनया तत्पुत्रस्यर्षित्वं पौत्रस्य क्षत्रत्वं चाकारि।।९८।।

अन्वयार्थः- (**स्वस्याः**) आपणाला (**च**) व (**मातुः**) आपल्या आईला (**अनुरूपपुत्राप्तये**) योग्य मुलगा व्हावा म्हणून (**भृगुणा**) भृगुऋषीकडून (**कारितपुत्रकामेष्टिचरुप्राशनव्यत्ययेन**) केलेल्या पुत्रकामेष्टि यज्ञांतील चरुप्राशनाची अदलाबदल झाल्यामुळें (**जनिष्यमाणपुत्रव्यत्यासं**) होणाऱ्या मुलांचाहि बदल होणार असें पाहून (**निवेद्य**) ती सर्व हकीगत सुनेला सांगितली. (**स्नुषाप्रार्थनया**) नंतर सुनेच्या प्रार्थनेनें (**तत्पुत्रस्यर्षित्वं**) तुझा मुलगा ऋषीच होईल. (**पौत्रस्य क्षत्रत्वं**) व नातू मात्र क्षत्रिय होईल, (**चाकारि**) असा तपःसामर्थानें भृगु ऋषीनीं बदल केला. ।।९८।।

विश्वामित्रो गाधिपुत्रो मन्त्रदृक्क्षत्रियोऽपि सन्। चरुप्रभावात्तपसा ब्रह्मर्षित्वं गतो मतः।।९९।।

अन्वयार्थः- (**गाधिपुत्रः विश्वामित्रः**) गाधि राजाचा मुलगा विश्वामित्र (**क्षत्रियोऽपि सन्**) क्षत्रिय असूनसुद्धां (**चरुप्रभावात्तपसा**) चरूच्या प्रभावानें व तपश्चर्येच्या योगानें (**ब्रह्मर्षित्वं गतः**) ब्रह्मर्षि म्हणून प्रसिद्ध झाला व (**मतः**) सर्वमान्य (**मंत्रदृक्**) मंत्रद्रष्टा झाला. ।।९९।।

जमदग्निः सत्यवत्या शम्या अग्निरिवाभवत्। शिवांशो मन्त्रदृग्वव्रे शिवांशां रेणुकां सतीम् ।।१००।।

अन्वयार्थः- (**शम्याः**) शमीपासून (**अग्निरिव**) अग्नीप्रमाणें तेजस्वी (**सत्यवत्याः**) सत्यवतीपासून (**शिवांशः**) शंकराच्या अंशरूपानें (**जमदग्निः**) जमदग्नि ऋषि (**अभवत्**) झाले. (**मंत्रदृक्**) कांही ऋचा मंत्र जाणणाऱ्या जमदग्नीनें (**शिवांशां**) पार्वतीची कलारूप असणाऱ्या (**रेणुकां सती**) सती रेणुकेशीं (**वव्रे**) विवाह केला. ।।१००।।

पञ्चासन्तत्सुताः ख्याताः पञ्चाग्नय इवार्चिताः। रामोऽन्तिमोऽत्र परमो धीरो वीरोऽतिशूरजित्।।१०१।।

अन्वयार्थः- (**पंचाग्नय इव**) पांच अग्नीप्रमाणें (**तत्सुताः**) त्या दोघांना (**ख्याताः**) लोकांमध्ये प्रसिद्ध (**अर्चिताः**) लोकपूजित (**पंच**) अशीं पांच मुलें (**आसन्**) झालीं. (**अत्र**) त्यांमध्यें (**अन्तिमः**) शेवटचा मुलगा (**धीरः**) युद्धामध्यें धैर्यसंपन्न, (**अतिवीरः**) अत्यंत बलशाली, (**शूरजित्**) शूरांना जिंकणारा, (**रामः**) राम नांवाचा (**परमः**) साक्षाद्विष्णूचाच अवतारभूत असा होता. ।।१०१।।

भावार्थः- जमदग्नि व रेणुका यांना पांच मुलें झालीं. जमदग्नि हे अग्निहोत्री होते म्हणून कीं काय दक्षिणाग्नि, गार्हपत्य, आहवनीय, सभ्य व आवसथ्य हे पांच अग्नि पुत्ररूपानें त्यांच्या उदरी जन्मास आले. तीं पांच मुलें विख्यात होतीं. सर्व लोक त्यांचा सत्कार करीत असत. त्या पांच मुलांपैकी शेवटचा मुलगा राम या नांवाचा धैर्यशाली, वीर, शत्रूला जिंकणारा असा होता. साक्षात् विष्णूनेंच अवतार घेतल्यामुळें त्याचें गुणानुवर्णन किती करावें तितकें थोडेंच आहे. ।।१०१।।

सस्त्रीकदेवगायकरतिकौतुकदृष्टिदूषिता माता। ताताज्ञप्तेन हता येन स साक्षात्पयोब्धिजामाता।।१०२।।

अन्वयार्थः- (**सस्त्रीकदेवगायकरतिकौतुकदृष्टिदूषिता**) एकदा गंगेमध्यें नावेंत बसलेला आपल्या स्त्रीसहवर्तमान एक गंधर्व क्रीडा करितांना पाहिल्यामुळें दूषित झालेली (**माता**) आई रेणुका (**ताताज्ञप्तेन**) जमदग्नि ऋषींच्या आज्ञेनें (**येन**) ज्या रामानें (**हता**) मारली (**सः**) तो राम (**साक्षात्पयोब्धिजामाता**) समुद्राचा जांवई साक्षात् विष्णूच होता. ।।१०२।।

तातप्रसादतः पुनरपि येनोत्थिता मृता माता। प्राप्ता चायुष्मत्ता जयितास्य गुणस्य को भवेन्माता।।१०३।।

अन्वयार्थः- (येन) **रामानें** (तातप्रसादतः) **जमदग्नींच्या कृपाप्रसादानें** (मृता माता) **मेलेली रेणुका** (पुनरपि उत्थापिता) **पुनः उठविली,** (आयुष्मत्ता जयिता च प्राप्ता) **आणि चिरंजीव असा आशीर्वाद व सर्वत्र जय असावा असा आशीर्वाद प्राप्त करून घेतला.** (अस्य) **या रामाच्या** (गुणस्य) **गुणाचे** (माता) **मापन** (को भवेत्) **कोण करूं शकेल? ।।१०३।।**

शिवाप्तविद्ये शिवतातभक्ते यातेऽटवीमाश्रमगः प्रसह्य। जहार भूपोऽप्यृषिकामधेनुं निन्ये वशं यो निजकामधेनुम्।।१०४।।

अन्वयार्थः- (**शिवाप्तविद्ये**) शंकरापासून ज्यानें विद्या प्राप्त करून घेतली आहे असा (**शिवतातभक्ते**) शिवरूपी जमदग्नींचा भक्त असणारा राम (**अटवीं याते**) वनामध्यें गेला असतां (**आश्रमगः भूपः अपि**) जमदग्नींच्या आश्रमांत येऊन अर्जुन हा राजा असूनहि (**प्रसह्य**) जबरदस्तीनें (**मुनिकामधेनुं**) मुनींच्या कामधेनूला (**जहार**) घेऊन गेला. (**यः**) ज्या राजानें (**निजकामधेनुं**) भक्त लोकांना कामधेनूप्रमाणें असणाऱ्या दत्तात्रेयाला (**वशं निन्ये**) वश करून घेतलें त्याला दुसाध्य काय आहे? ।।१०४।।

रामः स्वमाश्रमं प्राप्य ज्ञात्वा धेनुं हृतां नृपम्। हन्तुं प्राप तमालोक्य राजा बलमचोदयत्।।१०५।।

अन्वयार्थः- (**रामः**) राम (**स्वाश्रमं**) आपल्या आश्रमांत (**प्राप्य**) परत आला व (**हृतां धेनुं**) धेनूचें हरण राजानें केलें (**ज्ञात्वा**) असें पाहन (**नृपं हंतुं प्राप**) राजाला मारण्याकरितां निघाला. (**तं आलोक्य**) आपल्यावर चाल करून राम आला आहे असें पाहून (**राजा बलमचोदयत्**) राजानें आपलें सैन्य त्याच्यावर सोडलें.।।१०५।।

एतै रंहस्विगन्धर्वपदोत्क्षिप्तकुपांसुभिः। पांसुघ्न्यप्यमलापापा कृता मंदाकिनी किल।।१०६।।

अन्वयार्थः- (**एतैः रंहस्विगंधर्वपदोत्क्षिप्तकुपांसुभिः**) वेगवान घोड्यांच्या टापांनी जमिनीवरून वर फेंकली जाणारी जी धूळ त्या धुळीच्या योगानें (**पांसुघ्नी अपि**) पापांचा नाश करणारी असूनहि (**अमला**) व स्वतः निर्मल असूनहि (**मंदाकिनी**) गंगा (**अपापा कृता**) पापरहित केली. ।।१०६।।

पद्मिभिः सप्तधोत्सृष्टैर्दानोदैश्च सुगन्धिभिः। मुनेः पृथ्वी गन्धवतीत्युक्तिः सार्था कृता स्फुटम्।।१०७।।

अन्वयार्थः- (**पद्मिभिः**) हत्तींनीं (**सप्तधोत्सृष्टैः**) सात वेळां टाकलेलें (**सुगंधिभिः दानोदकैः**) सुगंधयुक्त जें दानोदक म्ह. गंडस्थळांतून गळणारें द्रव्य त्यांनीं (**गंधवती पृथ्वी**) पृथ्वी ही गंधवती आहे. (**इति मुनेः उक्तिः**) असें नैयायिक गौतम ऋषींचें म्हणणें

(**स्फुटं सार्था कृता**) स्पष्टपणें सार्थ करून दाखविलें. ।।१०७।।

तयोस्तु कलहात्पूर्वमन्योन्यं विजिगीषताम्। स्यन्दनानामिभाश्वानां ध्वनीनां कलहो महान्।।१०८।।

अन्वयार्थः- (**तयोः**) राम आणि अर्जुन यांचें (**कलहात्पूर्वं**) युद्ध होण्यापूर्वी (**अन्योन्यं**) परस्पर (**विजिगीषतां**) विशेष प्रकारानें जिंकण्याची इच्छा करणाऱ्या (**स्यंदनानां**) रथांचे (**इभानां**) हत्तींचे (**अश्वानां**) घोड्यांचे (**ध्वनीनां महान् कलहः**) मोठमोठे आवाज होऊं लागले. ।।१०८।।

विलोक्य गर्जदुद्वेलजलध्युपमितं चलम्। बालो मुनेर्बलमलं तुमुलं युयुधे बलात्।।१०९।।

अन्वयार्थः- (**मुनेर्बालः**) जमदग्नींचा मुलगा राम (**गर्जदुद्वेलजलध्युपमितम्**) आवाज करणाऱ्या व खवळलेल्या समुद्राप्रमाणें (**चलं बलं**) इतस्ततः पसरलेलें सैन्य (**विलोक्य**) पाहून (**बलात्**) वडिलांनीं दिलेल्या वराच्या जोरावर (**अलं**) घनघोर (**युयुधे**) युद्ध करूं लागला. ।।१०९।।

वडवातनयः खण्डपिण्डाशीतीर्ष्ययागर्ताः। वडवातनयाः खण्डपिण्डाः संतो मृतं गताः।।११०।।

अन्वयार्थः- (**वडवातनयः**) हा राम ब्राह्मणस्त्रीचा मुलगा असल्यानें (**खंडपिंडाशीः**) पोटभर गळ्याला येईपर्यंत साखरेचे लाडू खाणारा आमच्याबरोबर काय युद्ध करणार (**इतीर्ष्यया**) अशा ईर्षेनें (**आगताः**) युद्धाला आलेले (**वडवातनयाः**) घोडे (**खंडपिंडाः संतः**) युद्धामध्यें तुकडे तुकडे होऊन (**मृतं गताः**) मरण पावले. ।।११०।।

एकया परशुतिग्मधारया राम आगतमितस्ततो रयात्।
पञ्जधारतुरगौघमोञ्जसा सञ्जघान घनगर्जनोऽञ्जसा।।१११।।

अन्वयार्थः- (**पंचधारतुरगौघं**) पांच प्रकारच्या गति ज्या घोड्यांच्या आहेत अशा समुदायाला (**ओञ्जसा**) एका झटक्यांत (**इतस्ततः रयात्**) चोहोंकडून वेगानें आलेल्या घोड्यांना (**एकया परशुतिग्मधारया**) एकाच कुऱ्हाडीच्या तीक्ष्ण धारेनें (**घनगर्जनः रामः**) मेघाप्रमाणें गर्जना करणारा राम (**अंजसा**) वेगानें (**संजघान**) मारता झाला. ।।१११।।

यद्भीत्या सरथे कृते च विरथेप्याधोरणेधो रणे जघ्नेऽशेषबलं तदायुधमसृङ्नद्यस्ततः सुस्रुवुः।।
चर्मावर्तयुताभ्रतेभपुलिनाश्छिन्नांघ्रिहस्ताहयो घोरा आमिषकर्दमा हतहयग्राहाः शिरःकच्छपाः।।११२।

अन्वयार्थः- (**यद्भीत्या**) ज्या रामाच्या भयानें (**सरथे**) रथांनी सहित असणारे योद्धे (**विरथे च कृते**) रथरहित केले. (**आधोरणे**) हत्तीवर बसणारे माहुत, (**रणे अधः कृते**) युद्धामध्यें खालीं पडले असतां (**तदायुधं**) त्या रामाचें शस्त्र जें परशु त्यानें (**अवशेषबलं जघ्ने**) सर्व सैन्य नाहीसें केलें. (**ततः**) रणांगणांतून (**असृङ्नद्यः**) रक्ताच्या नद्या (**सुस्त्रुवुः**) वाहूं लागल्या. (**चर्मावर्तयुताः**) त्या नदीमध्यें कातडं ह्याच कुणी लाटा (**मृतेभपुलिनाः**) मेलेले हत्ती हेंच कुणी वाळवंट (**छिन्नांघ्रिहस्ताहयः**) वीर पुरुषांचे तुटलेले हात हेच कुणी साप

(**आमिषकर्दमाः**) मांस हेंच जणूं चिखल (**हतयहग्राहाः**) मेलेले घोडे हे त्या नदींतील मगर (**शिरःकच्छपाः**) वीरांची मस्तकपंक्ति हींच कासवें (**घोराः**) म्हणूनच अत्यंत भीषण अशा त्या नद्या वाहूं लागल्या. ।।११२।।

किरीटी कुण्डली छत्री प्रतापी दुर्धरो रथी। सहस्रकर एत्यात्र मित्रवद्युयुधेऽर्जुनः।।११३।।

अन्वयार्थः- (**किरीटी**) किरीट धारण करणारा, (**कुंडली**) कुंडले धारण करणारा, (**छत्री**) छत्री धारण करणारा, (**प्रतापी**) शूर (**दुर्धरः**) अत्यंत बलवान्, (**रथी**) रथावर बसलेला (**सहस्त्रकरः**) हजार ज्याला हात आहेत असा (**अर्जुनः**) राजा अर्जुन (**अत्र**) समरांगणांत (**एत्य**) येऊन (**मित्रवत्**) सूर्याप्रमाणें (**युयुधे**) युद्ध करूं लागला. ।।११३।।

अर्जुनस्यार्जुनस्येव स्कन्धान्स्कन्धानिवाच्छिनत्। रामो भूयोपि जातान्तान्तन्निर्गममशोषयत्।।११४।।

अन्वयार्थः- (**अर्जुनस्येव**) अर्जुन वृक्षाप्रमाणें (**अर्जुनस्य**) राजा अर्जुनाचे (**स्कंदान् इव**) वृक्षांच्या फांदीप्रमाणें (**स्कंधान्**) बाहु (**राम अच्छिनत्**) रामानें तोडले. (**भूयो जातानपि तान्**) पुनः पुनः उत्पन्न झाले असतांहि ते पुनः तोडले. (**तन्निर्गमं अशोषयत्**) पुनः पुनः उत्पन्न होतात असें पाहून रामानें त्याचें मूळच नाहीसे केलं. ।।११४।।

तदास्मरद्दत्तमकुण्ठचित्तो येनापवर्गस्तु पुराप्युपात्तः। कृत्तोऽपि मूर्धा न नृपेण वित्तः स्वाभेदतो ध्यात इहापि दत्तः।।११५।।

अन्वयार्थः- (**येन**) ज्या अर्जुनानें (**अपवर्गस्तु**) मोक्ष तर (**पुरापि**) पूर्वीच (**उपात्तः**) प्राप्त करून घेतला होता, (**तदा**) त्या वेळीं (**अकुंठचित्तः**) ज्याचें चित्त सर्वत्र गमन करतें असा तो अर्जुन (**दत्तं अस्मरत्**) श्रीदत्तात्रेयांचें स्मरण करूं लागला. (**इहापि**) अंतकाळींसुद्धां (**स्वाभेदतः**) स्वतःशीं अभिन्न रूपानें (**दत्तो ध्यातः**) श्रीदत्तात्रेयांचें ध्यान केल्यामुळें (**नृपेण**) अर्जुनानें (**कृत्तोऽपि मूर्धा**) जरी परशुरामानें मस्तक तोडलें तरी (**न वित्तः**) आपलें मस्तक तोडलें असें जाणलें नाहीं. ।।११५।।

हत्वा नृपं गृहीत्वा गां राम आश्रममश्रमः। एत्य ताताय तत्प्राह स हा हाऽसहन आह तम्।।११६।।

अन्वयार्थः- (**नृपं हत्वा**) राजाला मारून (**गां गृहित्वा**) कामधेनूला घेऊन (**अश्रमः रामः**) ज्याला कांहींच श्रम झाले नाहींत अशा परशुरामानें (**आश्रमं एत्य**) आपल्या आश्रमांत परत येऊन (**ताताय**) जमदग्नींना (**तत्प्राह**) सर्व हकीगत सांगितली. (**असहनः सः**) तें ऐकून जमदग्नींना अत्यंत वाईट वाटलें व (**हा**) शोकानें (**तं**) परशुरामाला (**आह**) म्हणाले. ।।११६।।

दशश्रोत्रियवद्राजा तद्धन्तुस्तीर्थसेवनात्। शुद्धिस्त इति रामोऽपि तथेत्युक्त्वा तथाचरत्।।११७।।

अन्वयार्थः- (**राजा**) पृथ्वीचा पालन करणारा राजा (**दशश्रोत्रियवद्राजा**) दहा वैदिक ब्राह्मणांप्रमाणें श्रेष्ठ असा राजा मानला जातो. (**तद्धन्तुः ते**) तेव्हां त्याला मारणाऱ्या तुझी (**तीर्थसेवनात्**) तीर्थयात्रा केल्यानें (**शुद्धिः**) पापशुद्धि होईल. (**इति**) याप्रमाणें वडिलांनीं सांगितलें असतां (**तथेत्युक्त्वा**) ठीक आहे असें म्हणून (**रामोऽपि**) परशुरामहि (**तथाचरत्**) तीर्थयात्रा करण्याकरितां म्हणून तेथून निघून गेला. ।।१७।।

अर्जुनस्य तनया अनयास्ते प्राप्य यत्र सह रेणुकयास्ते।
योऽप्युपास्य विधिवज्जमदग्निं तं विजघ्नुररिवज्जमदग्निम्।।११८।।

अन्वयार्थः- (**योऽपि**) जो (**विधिवज्जमदग्निं**) विध्युक्त प्रदीप्ताग्नींची (**उपास्य**) उपसाना करून (**रेणुका सह**) स्त्रीशीं सहित (**यत्रास्ते**) ज्या ठिकाणीं बसला होता त्या ठिकाणीं (**अनयाः ते**) अन्यायानें वागणारे ते (**अर्जुनस्य तनयाः**) अर्जुनाचे पुत्र (**प्राप्य**) आश्रमांत येऊन (**तं**) त्या (**जमदग्निं**) जमदग्नींना (**अरिवत्**) शत्रूंप्रमाणें (**विजघ्नुः**) मारते झाले. ।।११८।।

तदा वियुक्तेश्वरतोकरेणुका सार्ता यथैका विपिने करेणुका।
ममाधिभागो यदुपर्यदेवयत् स मे प्रियाः क्वेति च पर्यदेवयत्।।११९।।

अन्वयार्थः- (**तदा**) ऋषींना मारल्यावर (**सा**) ती (**वियुक्तेश्वरतोकरेणुका**) जिचा पति मृत झाला आहे व पुत्रहि जवळ नाहीं अशी रेणुका (**यथैका विपिने करेणुका**) ज्याप्रमाणें निबिड वनामध्यें एकटीच हत्तीण असावी त्याप्रमाणें (**आर्ता**) अत्यंत पीडित झाली. (**ममाधिभागः**) ज्याच्यावर माझें सौभाग्य अवलंबून आहे (**यदुपरि**) ज्याच्या जीवावर मी आजपर्यंत (**अदेवयत्**) आनंदानें दिवस घालविले, (**सः मे प्रियः**) तो माझा प्रियपति (**क्व**) कोठें आहे (**इति च पर्यदेवयत्**) असें म्हणून शोक करूं लागली. ।।११९।।

अहहा हतास्मि दिष्ट(ष्टात्) भ्रष्टाप्ता रुष्ट एव मे स्मरहा।
शरणम् क्वापि न शिष्टं दृष्टं कष्टं परं वरं मरणम्।।१२०।।

अन्वयार्थः- (**अहहा**) हाय हाय (**हे दिष्ट**) हे भाग्या (**हतास्मि**) मी ठार झालें. (**भ्रष्टाप्ता**) जिचा पति नष्ट झाला आहे अशी (**स्मरहा**) शंकरहि (**मे**) माझ्यावर (**रुष्टः एव**) रागावलाच आहे. (**शरणं**) माझें रक्षण करणारा (**क्वापि**) कुठेंहि कोणीहि (**न शिष्टं**) राहिला नाहीं. (**परं कष्टं दृष्टं**) अत्यंत कष्ट झाले. (**मरणं वरं**) आतां यापेक्षा मरण आलेलें बरें. ।।१२०।।

हा नाथ शुद्धगाथ प्रियकथ कथमत्र शस्त्रदितगात्र। गात्रमिदं तेऽर्धं रतिपात्रं तिष्ठेत्पवित्रपरगात्र।।१२१।।

अन्वयार्थः- (**हा नाथ**) हे प्रिय देवा, (**शुद्धगाथ**) पवित्रकीर्ति (**प्रियकथ**) हें प्रियचरित्र (**शस्त्रदितगात्र**) शस्त्रानें ज्याचें शरीर तोडलें असे आपण, (**पवित्रपरगात्र**) ज्यांनी दुसऱ्यांचीं शरीरेंहि पवित्र केलीं आहेत असे (**रतिपात्रं**) रति करण्यास योग्य असे (**इदं ते अर्धं गात्रं**) हें तुझें अर्ध शरीर (**अत्र कथं तिष्ठत्**) तुला सोडून या ठिकाणीं कसें बरें राहील ? ।।१२१।।

हतकायाप्तेन समं स्वर्यास्येऽद्यैव दैवहतकायाः। हतकार्तवीर्य इह मे नार्भोऽतोमी भवन्ति हतकायाः।।१२२।।

अन्वयार्थः- (**हतकायाप्तेन समं**) ज्याला मारलें आहे व जो आप्तहि आहे त्याच्याशीं सह (**स्वः**) स्वर्गाला (**अद्यैव**) आजच (**यास्ये**) मी जाईन. (**दैवहतकामा**) पण मी हतदैवी असल्यामुळें (**हतकार्तवीर्यः**) ज्यांनी अर्जुनाला मारलें अशा (**मे**) माझा (**अर्भः**) परशुरामहि (**इह**) आज या ठिकाणीं (**न**) नाहीं. (**अतः**) जर तो असता तर या रामाकडून (**अमी**) हे शत्रू (**हतकामाः भवन्ति**) नष्ठ झाले असते.

।।१२२।।

इति सत्यां रुदत्यां तत्पुत्रो राम उपैत्य तत्। सर्वं श्रुत्वानुतप्तः सन्प्राह गुर्वहितोऽस्म्यसन्।।१२३।।

अन्वयार्थः- (**इति**) याप्रमाणें (**सत्यां रुदत्यां**) सति रेणुका रडत बसली असतां (**तत्पुत्रः रामः**) तिचा मुलगा राम (**उपेत्य**) जवळ आला व (**तत्सर्वं श्रुत्वा**) ती सर्व हकीगत ऐकून (**अनुतप्तः सः**) त्याला पश्चात्ताप झाला व (**प्राह**) तो म्हणाला, (**गुर्वहितः**) गुरूचें अहित करणारा (**असन् अस्मि**) मी दुष्ट पुत्र आहें. ।।१२३।।

हन्त हन्त बत तात तेऽहितो जात एष न सुतो यतो मृतः।।

त्वं ततः खलकुलाप्तिलाञ्जलैः शुद्धिरस्य न पितस्ततोऽन्यतः।।१२४।।

अन्वयार्थः- (**हन्त हन्त बत**) दुःखी असा मी (**हे तात**) हे बाबा (**एषः**) हा राम (**ते**) तुमचा (**अहितः**) शत्रु (**जातः**) झाला. (**यतः**) ज्या कारणांस्तव (**त्वं मृतः**) आपणांला मरण आलें (**सुतः न**) तो हा मुलगा कसा? (**ततः**) म्हणून (**खलकुलाप्तिलांजलैः**) दुष्ट शत्रूंचीं कुळें हेंच पाणी व तीळ त्यांनी अंजलीनें म्ह. तर्पणानें (**अस्य**) या परशुरामाची (**निष्कृति**) शुद्धि होईल. (**पितः**) बाबा (**ततोऽन्यतः**) यापेक्षां निराळ्या मार्गानें (**न**) होणार नाहीं. ।।१२४।।

इति प्रतिज्ञाय वधाय तेषां रामोऽचिराय प्रययावशेषां।

धरां करिष्यन्ननृपां कृपांशमप्यस्पृशन्प्राप नृपाधिपार्भान्।।१२५।।

अन्वयार्थः- (**इति**) याप्रमाणें (**तेषां वधाय**) शत्रूंचा नाश करण्याची (**प्रतिज्ञाय**) प्रतिज्ञा करून (**रामः**) परशुराम (**अचिराय**) लवकरच (**अशेषां धरां**) सर्व पृथ्वी (**अनृपां करिष्यन्**) निःक्षत्रिय करण्याच्या इच्छेनें (**प्रययौ**) तेथून निघाला. (**कृपांशमप्यस्पृशन् सन्**) मनांत यत्किंचित्हि दया न बाळगतां राजा असा (**अर्जुनपुत्रान्**) अर्जुनाचीं मुलें जेथें होतीं तेथें (**प्राप**) येऊन पोंचला. ।।१२५।।

ब्रह्माण्डान्निजजठरस्थितानन्तान्विस्मृत्य प्रपदभराच्चरन्ननन्ताम्।।

तोयस्थान्तरिमिव चालयन्महात्मा जघ्नेऽरीन्सपदि महारिधामहात्मा।।१२६।।

अन्वयार्थः- (**निजजठरस्थितान्**) परशुराम हा विष्णूचा अवतार असल्यामुळें त्याच्या उदरांत असणारीं (**अनंतान्**) अनंत (**ब्रह्मांडान्**) ब्रह्मांडें त्यांना (**विस्मृत्य**) विसरून (**चरन्**) वेगानें धांवणारा (**तोयस्थां तरीमिव**) नदीमधील नावेप्रमाणें (**अनंतां**) भूमीला (**प्रपदभरात्**) जोरानें पावलें टाकल्यामुळें (**चालयन्**) कांपविणारा (**महात्मा**), ज्याचें भव्य शरीर आहे असा (**महारिधामहात्मा**) मोठमोठ्या शत्रूंचा पराभव करणारा राम (**सपदि**) तात्काळ (**अरीन्**) अर्जुनाच्या मुलांना (**जघ्ने**) मारता झाले. ।।१२६।।

अतितीक्ष्णपरश्वधेनताननतानाशु रणे द्विधा कृतान्।
भुवि भूतगणाय सोऽर्पयन्निनदो यस्य च गां व्यकम्पयत्।।१२७।।

अन्वयार्थः- (**अतितीक्ष्णपरश्वधेन**) अत्यंत तीक्ष्ण अशा कुऱ्हाडीनें (**द्विधाकृतान्**) तोडलेल्या (**अनतान्**) उद्धट असणाऱ्या (**तान्**) त्या शत्रूंना (**रणे भुवि**) त्या रणभूमीवर (**भूतगणाय**) भूतबली म्हणून (**सः**) रामानें (**आशु अर्पयत्**) तात्काळ अर्पण केलें. (**यस्य च निनदः**) ज्याचा आवाज ऐकून (**गां व्यकम्पयत्**) पृथ्वी किंवा स्वर्ग थरथर कापूं लागले. ।।१२७।।

विद्युद्भास्वत्स्वं परितोऽस्त्रं निधुनानं मेघध्वानं मेघरुचोऽलं हतमानम्।
दृष्ट्वा मेघो भुव्यवतीर्णः किमिहास्ते मत्वापीत्थं मत्तमयूरा ननृतुस्ते।।१२८।।

अन्वयार्थः- (**विद्युद्भास्वत्**) दैदीप्यमान् (**अस्त्रं**) परशु (**स्वं परितः**) आपल्या चोहों बाजूंनीं (**विधुनानं**) फिरविणाऱ्या (**मेघध्वानं**) मेघाप्रमाणें आवाज असणाऱ्या (**मेघरुचोऽलं हृतमानं**) मेघापेक्षांहि ज्याची कांति उत्तम आहे अशा अत्यंत शामल परशुरामाला (**दृष्ट्वा**) पाहून (**मेघः भुवि अवतीर्णः**) हा मेघच भूमीवर आला आहे (**किं इहास्ते**) कां हा इथेंच आहे (**इत्थं मत्वापि**) असें समजूनहि (**ते**) जे मत्त झाले होते (**मत्तमयूराः**) ते मत्त मोर (**ननृतुः**) नाचूं लागले. ।।१२८।।

स जयश्रियमुद्वाह्य प्राहाम्बामेत्य भूभृतः। त्रिसप्तकृत्वा हत्वास्त्रैस्तर्पये पितृमुक्तये।।१२९।।

अन्वयार्थः- (**सः**) राम याप्रमाणें (**जयश्रियं**) जयरूपी लक्ष्मीशीं (**उद्वाह्य**) विवाह करून (**अंबामेत्य**) आईजळ येऊन (**प्राह**) म्हणाला, (**त्रिःसप्तकृत्वा**) एकवीस वेळां (**अस्त्रैः**) या परशूनें (**भूभृतः**) राजे लोकांना (**हत्वा**) मारून (**पितृमुक्तये**) वडिलांना मुक्ति मिळावी म्हणून (**तर्पये**) मी तर्पण करतों. ।।१२९।।

इति प्रतिज्ञां कुर्वन्तं सुतं प्राह प्रसूः पुरा। कृत्वौर्ध्वदेहिकं नौ त्वं प्रतिज्ञातमृतं कुरु।।१३०।

अन्वयार्थः- (**इति**) याप्रमाणें (**प्रतिज्ञां**) प्रतिज्ञा (**कुर्वतं**) करणाऱ्या (**सुतं**) परशुरामाला (**प्रसूः**) रेणुकामाता (**प्राह**) म्हणाली, (**पुरा**) अगोदर (**नौ**) आम्हा दोघांची (**और्ध्वदेहिकं**) उत्तरक्रिया (**कृत्वा**) करून (**प्रतिज्ञातम्**) जी प्रतिज्ञा केलीस ती (**त्वं**) तूं (**ऋतं करु**) खरी कर. ।।१३० ।।

तुलायामेकतस्तातं मृतं मामेकतस्तथा। धृत्वावाचीं दिशं याहि यत्र श्रोष्यसि खाद्वचः।।१३१।।
तत्राचार्यं विमात्सर्यं लब्ध्वानुगमनं मया।। कार्यं नौ कर्म ते कार्यं कार्यं सिद्ध्येत्ततस्तव।।१३२।।

अन्वयार्थः- (**तुलायां**) कावडींत (**एकतः**) एका बाजूला (**मृतं तातं**) मेलेल्या तुझ्या वडिलांना (**तथा**) त्याचप्रमाणें (**मां**) मला (**एकतः**) एका बाजूला (**धृत्वा**) घालून (**अवाचीं दिशं**) दक्षिणेकडे (**याहि**) जा. (**यत्र**) ज्या ठिकाणीं (**खाद्वचः**) आकाशवाणी (**श्रोष्यसि**) ऐकशील (**तत्र**) त्या ठिकाणीं (**विमात्सर्यं आचार्यं**) द्वेषरहित स्वकर्मानुष्ठान करणारा आचार्य (**लब्ध्वा**) तुला मिळेल, (**मया अनुगमनं**

कार्यं) व त्या ठिकाणीं माझा या अनुगमनाचा सती जाणेचा विधि यथासांग होईल. (**ते नौ कर्म कार्यं**) त्या ठिकाणीं तूं आमचें और्ध्वदेहिक कर्म कर. (**ततः**) नंतर (**तव**) तुझें (**कार्यं**) निःक्षत्रिय पृथ्वी करण्याचें कार्यं (**सिध्येत्**) सिद्धीस जाईल. ।।१३१।।

तथेति रामोऽपि तथैव गत्वा श्रुत्वा खवाणीं रमणीं गुणीशः।

गत्वाश्रमं मातृगिरा पवित्रं दृष्ट्वाश्रमं तत्र मुदात्रिपुत्रम्।।१३३।।

विचित्रगात्रं शतपत्रनेत्रं वृत्रघ्नमित्रं करुणैकपात्रं।

अङ्के कलत्रं परिगृह्य चित्रं क्रीडन्तमेतं स ददर्श सत्रम्।।१३४।।

अन्वयार्थः- (**गुणीशः**) गुणिश्रेष्ठ (**रामोऽपि**) परशुराम असूनहि (**तथेति**) ठीक आहे असें म्हणून (**तथैव**) रेणुकेनें सांगितल्याप्रमाणें (**गत्वा**) दक्षिणेकडे जाऊन (**रमणीं**) रम्य अशी (**खवाणीं**) आकाशवाणी (**श्रुत्वा**) ऐकून (**गत्वाश्रमं मातृगिरा**) या आश्रमांत जा असें रेणुकेच्या सांगण्यावरून (**दृष्ट्वाश्रमं**) आश्रम पाहून (**तत्र**) त्या आश्रमांत (**विचित्रगात्रं**) विचित्र ज्याचें शरीर आहे अशा (**शतपत्रनेत्रम्**) कमलाप्रमाणें ज्याचे नेत्र आहे अशा (**वृत्रघ्नमित्रम्**) इन्द्राचा मित्र असणाऱ्या (**करुणैकपात्रं**) करुणासागर असणाऱ्या (**अंके चित्रं कलत्रं परिगृह्यक्रीडंतं**) मांडीवर विचित्र स्त्री घेऊन तिच्याशीं क्रीडा करणाऱ्या, (**सत्त्रम्**) साधु लोकांचें रक्षण करणाऱ्या (**एतं अत्रिपुत्रं**) त्या दत्तात्रेयांना (**सः**) राम (**मुदा**) आनंदानें (**ददर्श**) पाहूं लागला. ।।१३३।।१३४।।

भर्त्रा सहगमे मात्रा प्रार्थितो भगवान्भवान्। तत्राचार्यो भवत्वौर्ध्वदेहिकेऽपि च कर्मणि।।।१३५।।

इत्यर्थितोऽपि रामेण क्रमेण ख्यापयन्नयम्। सन्निष्ठां तमसन्निष्ठामिव यातो मतोऽवदत्।।१३६।।

अन्वयार्थः- (**भगवान्**) षड्गुणैश्वर्यसंपन्न आपण आहांत; (**भर्त्रा सह गमे**) पतीशीं सह सती जाण्याकरितां (**मात्रा प्रार्थितः**) आईनें आपली आचार्य म्हणून प्रार्थना केली आहे. (**तत्र कर्मणि**) तेव्हां त्या कर्मामध्यें (**च**) आणि (**और्ध्वदेहिकेऽपि**) उत्तरक्रियेमध्येंहि (**भवान्**) आपण (**आचार्यो भवतु**) पुरोहित व्हावें (**इति**) याप्रमाणें (**रामेण**) परशुरामानें (**अयं**) त्या श्रीदत्ताची (**अर्थितोऽपि**) प्रार्थना केली असतांहि (**क्रमेण सन्निष्ठां**) क्रमाक्रमानें सज्जनांचे ठिकाणी निष्ठा असावी (**ख्यापयन्**) असें सांगून (**असन्निष्ठां**) दुर्जनांचे ठिकाणी निष्ठा असणारा (**यातः इव**) तूं झालांत याप्रमाणें (**तं**) परशुरामाला (**मतः**) मान्य असणारे श्री दत्तात्रेय (**अवदत्**) म्हणाले, ।।१३५।।१३६।।

य अचिनोति शास्त्रार्थं तथाचरति यः स्वतः। आचारे स्थापयत्यन्यान्सैवाचार्यो न चेतरः।।१३७।।

अन्वयार्थः- (**यः**) जो मनुष्य (**शास्त्रार्थं आचिनोति**) शास्त्राचें अध्ययन करतो, (**यः**) जो (**स्वतः**) आपण (**तथाचरति**) त्याप्रमाणें म्ह. शास्त्राप्रमाणें वागतो, (**आचारे स्थापयत्यन्यान्**) आणि दुसऱ्याकडून शास्त्रविहित आचरण जो करवून घेतो (**स एव आचार्यः**) त्यालाच आचार्य म्हणावें. (**इतरः न च**) असें जो करीत नाहीं त्याला आचार्यः म्हणूं नये. ।।१३७।।

अहं परिग्रहं त्यक्त्वा वृत्वात्मरतिमक्रियः। वर्ते स्वच्छन्द आनन्द आचार्यत्वं कथं मम।।१३८।।

अन्वयार्थः- (**अहं**) मीं तर (**परिग्रहं**) पत्नीला (**त्यक्त्वा**) टाकून दिलें आहे आणि (**आत्मरतिं**) संभोगसाधनोपयोगी स्त्रीचा (**वृत्वा**) स्वीकार करून (**अक्रियः**) नित्य जें संध्याकर्म त्यांनी रहित असा मी (**स्वच्छंदे आनंदे**) मला वाटेल तसा आनंदोपभोग घेत (**वर्ते**) वर्तन करीत आहें. (**मम**) तेव्हां मला (**आचार्यत्वं**) आचार्य म्हणून घेण्याची योग्यता (**कथं**) कोठून येणार? ।।१३८।।

नग्न उन्मत्तवद्वर्ते धर्माधर्मविवर्जितः। तिष्ठे वने वनचरप्रियोऽस्पृश्योऽस्म्यवाच्य इत्।।१३९।।

अन्वयार्थः- (**नग्नः**) विवस्त्र होऊन (**उन्मत्तवत्**) उन्मत्ताप्रमाणें (**धर्माधर्मविवर्जितः**) ज्याला धर्म व अधर्म दोनीहि माहीत नाहींत असा (**वर्ते**) मी वागतों. (**वनचरप्रियः**) वनामध्यें फिरणाऱ्या लोकांना मी प्रिय आहें म्हणून (**वने तिष्ठे**) मी वनामध्यें राहातों (**इत्**) म्हणूनच (**अस्पृश्यः**) मी स्पर्श करण्यालाहि अयोग्य व (**अवाच्यः**) बोलण्यालाहि अयोग्य (**अस्मि**) आहें. ।।१३९।।

सुपेशा वयुनं वस्ते प्राग्घृतास्या ममाङ्कगा। नूत्नेयं युवतिर्नित्यं पुराणपुरुषस्त्वहम्।।१४०।।

अन्वयार्थः- (**सुपेशा**) सुस्वरूप स्त्री (**वयुनं**) मनुष्याचें ज्ञान (**वस्ते**) नाहींसे करतें. (**प्राग्घृतास्या**) आरंभीं सुवदना असणारी (**नित्यं नूत्ना इयं युवतिः**) नेहमीं तरुण दिसणारी ही स्त्री (**ममांकगा**) माझ्या मांडीवर आहे; (**अहं तु**) आणि मी तर (**पुराणपुरुषः**) म्हातारा आहें. ।।१४०।।

भावार्थः- सुस्वरूप स्त्रीला पाहिलें कीं ज्ञानी मनुष्याचेंहि ज्ञान नाहींसें होतें, त्याला भान राहात नाहीं तेव्हां मी ज्या वेळेस या स्त्रीचा स्वीकार केला त्यावेळेस ही सुमुखी होती व नेहमीं तरुण दिसणारी ही स्त्री माझ्या मांडीवर बसवून घेतली; इला पाहतांच माझें ज्ञान नष्ट झालें व मी तर म्हातारा आहें मग मीं ही गोष्ट कशी काय केली हें माझें मलाहि समजेना.

दुसरा अर्थः - अघटितघटनापटीयसी माया असें जिचें वर्णन आहे अशी ही मायारूपी स्त्री, तिचें स्वरूप अवर्णनीय आहे म्हणजे अनिर्वचनीय आहे; ही ज्ञानी लोकांची बुद्धि भ्रष्ट करते म्हणजे त्यांच्या ज्ञानावर आवरण करते. इचें मुख गोड आहे, ती नेहमींच तरुण अशी दिसते व माझ्या एकदेशांत ती आहे त्यामुळें तिची बाधा मला कांही नाहीं; कारण मी पुराणपुरुषोत्तम आहें. म्ह. निर्विकार असल्यामुळें ही माया मला बाधा करूं शकत नाहीं. ।।१४०।।

अपूज्यः कर्मणि प्राज्ञ न योज्य इति तद्वचः। श्रुत्वा रामोऽभवन्मौनी तदा माताह मानिनी।।१४१।।

अन्वयार्थः- (**हे प्रज्ञ**) बुद्धिमान् रामा (**अपूज्यः**) अश्रेष्ठ मनुष्य (**कर्मणि**) कर्मामध्यें (**न योज्यः**) नियुक्त करूं नये (**इति**) याप्रमाणें (**तद्वचः**) श्रीदत्तात्रेयांचें वाक्य (**श्रुत्वा**) ऐकून (**रामः**) परशुराम (**मौनी अभवत्**) मौन स्वीकारून बसला. (**तदा**) त्या वेळीं (**मानिनी माता**) रेणुका माता (**आह**) म्हणाली, ।।१४१।।

भवता सदवादि वादिनां मतभेदव्यतिगेन भेदिनाम्। भवतोदितवद्वृषाकपे भवतोऽन्यः क इह त्रिविष्टपे।।१४२।।

अन्वयार्थः- (**भेदिनां वादिनां**) भेदवादी माध्वादि लोकांचा (**मतभेदव्यतिगेन**) जो मतभेद आहे कीं ब्रह्म अद्वितीय आहे का सद्वितीय आहे, या दोन्हींपेक्षां विलक्षण अशा (**भवता**) आपल्याकडून (**सदवादि**) योग्यच सांगितलें गेलें. (**हे वृषाकपे**), हे इच्छित देणाऱ्या व पापांचा नाश करणाऱ्या श्रीदत्ता, (**भवता उदितवत्**) तुम्हीं पूर्वी म्हटल्याप्रमाणें (**भवतः अन्यः**) आपल्याशिवाय दुसरा (**इह त्रिविष्टपे कः**) या त्रिभुवनांत कोण आहे? ।।१४२।।

भावार्थः- **द्वैतवादी माध्वादि लोकांनीं जें आपलें स्वरूप वर्णन केलें आहे; द्वैत, विशिष्टाद्वैत, शुद्धाद्वैत वगैरे या सर्व मतांपेक्षां विलक्षण असें आपलें स्वरूप आहे तें अवर्णनीय आहे; तेव्हां आपण जें पूर्वीं सांगितलें 'नग्नः उन्मत्तः' वगैरे तें सर्व सत्यच आहे. कारण आपलें स्वरूपच तसें आहे. सर्व काम पूरण करणारे व सर्व पापांचा नाश करणारे आपण पूर्वी बोलल्याप्रमाणें 'मी परिग्रह टाकून स्त्रीरत आहें वगैरे' तें सर्व खरेंच आहे. या त्रिभुवनांत तरी आपल्यासारखा दुसरा कोणीहि नाहीं. ।।१४२।।**

इति मातृवचो निशम्य तन्मतिमांस्तन्मुखतो निशम्य तत्। निखिलं तमुवाच सादरं सकलं क्षत्रकुलं हराऽदरम्।।१४३।।

अन्वयार्थः- (**इति**) याप्रमाणें (**तन्मातृवचो निशम्य**) राममातेचें रेणुकेचें वचन ऐकून (**मतिमान्**) कुशाग्र बुद्धि असणारे श्रीदत्तात्रेय (**तन्मुखतः**) तिच्या मुखांतून (**निखिलं तन्निशम्य**) सर्व वृत्तांत ऐकून (**सादरं तं उवाच**) आदरानें परशुरामाला म्हणाले (**अदरं**) निर्भय होऊन (**सकलं क्षत्रकुलं**) सर्व क्षत्रियांचें कूळ (**हर**) नाहींसें कर. ।।१४३।।

इति प्रगल्भं पुरुषो वचस्तदतिप्रतापस्त्ववधार्य शस्तम्।।
देवाज्ञयानीय स तीर्थमस्त्रादेवाज्ञयाजस्य सती सवस्त्रा।।१४४।।
स्नात्वात्र कृत्वापि सुभूषिताङ्गान्यार्याय दत्वापि सुभूषितां गाम्।।
सौभाग्यदानानि च सा विवेश सौभाग्यदापि स्वयमग्निमीशा।।१४५।।

अन्वयार्थः- (**इति प्रगल्भं**) याप्रमाणें प्रशस्त असें (**तद्वचः**) श्रीदत्तात्रेयांचें भाषण (**अवधार्य**) ऐकून (**अतिप्रतापः पुरुषः सः**) अत्यंत पराक्रमी पुरुष तो राम त्यानें (**देवाज्ञया**) श्रीदत्तांच्या आज्ञेनें (**अस्त्रादेव तीर्थमानीय**) आपल्या अस्त्रानेंच पाताळगंगातीर्थ त्या ठिकाणीं आणून (**अजस्य आज्ञया**) श्रीदत्तांच्या आज्ञेनें (**सवस्त्रा सती**) वस्त्रांशी सहित ती रेणुका (**अत्र स्नात्वा**) गंगेमध्यें स्नान करून (**सुभूषितांगानि कृत्वापि**) सर्व शरीर अलंकारानें सुभूषित करून (**आचार्याय**) आर्चायाला (**सुभूषितां गां दत्वापि**) वस्त्रालंकारविभूषित अशी गायहि देऊन (**सौभाग्यदानानि च**) आणि सौभाग्यवायनदान करून (**स्वयं सौभाग्यदापि**) स्वतःला सौभाग्य देण्याची योग्यता असूनहि (**सा**) ती रेणुका (**ईशा अग्निं विवेश**) पतीबरोबर अग्नींत सती गेली. ।।१४४।।१४५।।

मरुतां दिवि वीक्षतां सतां सधवा रेणुभवा सयेषिताम्।
अधिरुह्य सती स्थिता दिवि स्वसुतायापि मुखं ददौ भुवि।।१४६।।

अन्वयार्थः- (**दिवि**) स्वर्गामध्यें (**सयोषितां मरुतां**) आपापल्या स्त्रियेशीं सहित सर्व देव (**ईक्षतां सतां**) पाहत असतां (**सधवा रेणुभवा**) आपल्या पतीशीं सहित रेणु राजाची मुलगी रेणुका (**अधिरुह्य**) विमानामध्यें बसून (**सती दिवि स्थिता**) साध्वी रेणुका स्वर्गांत गेली (**सुतायापि**) रामालाहि आठवणीकरितां म्हणून (**स्वमुखं**) आपलें मुख (**भुवि**) पृथ्वीवर (**ददौ**) ठेवून गेली. ।।१४६।।

धन्यासौ खलु रेणुका सुभविका साक्षात्स्वयं याम्बिका। कन्या रेणुनृपस्य या त्रिकुलजानां सम्यगुन्नायका।।
मान्यावाप हयेष्टिकोटिसुफलं प्रत्यङ्.घ्रि या निर्मलम्। कान्या त्वीदृगिहाग्नयेऽर्पयदलं वर्ष्मालभन्मङ्गलम्।।१४७।।

अन्वयार्थः- (**या**) जी (**रेणुनृपस्य**) रेणु नांवाच्या राजाची (**कन्या**) मुलगी (**त्रिकुलजानां**) तिन्ही कुलांमध्यें उत्पन्न होणाऱ्यांना (**सम्यगुन्नायका मान्या**) उत्तम प्रकारची गति देणारी व मान्य अशी (**या साक्षात्स्वयमंबिका**) जी साक्षात्पार्वतीच असणारी (**सुभाविका**) कुशल असणारी (**असौ रेणुका धन्या खलु**) ती रेणुका खरोखर धन्य आहे. (**या प्रत्यंघ्रि**) जिनें पावलोपावलीं (**हयेष्टिकोटिसुफलं**) कोटी अश्वमेधांचें निर्मळ सुफळ (**अवाप**) प्राप्त करून घेतलें. (**ईदृक् तु का अन्या**) अशी दुसरी स्त्री कोणती आहे! (**इह**) या लोकांत (**अग्नये**) अग्नीला (**अलं वर्ष्म**) आपलें प्रिय शरीर (**अर्पयत्**) तिनें अर्पण केलें, अर्थात् सती गेली (**मंगलं अलभत्**) आपलें कल्याण करून घेतले. ।।१४७।।

इति दिवि भुवि देवैर्मानवैश्च स्तुतायाः। सुगतिमतिधृतिं च प्राप्य नाकं गतायाः।।
यश इह चिरजीवि प्रौढमाप्तं समन्तान्न शतमुखमुखास्तद्वक्तुमीशोऽमितत्वात्।।१४८।।

अन्वयार्थः- (**इति दिवि देवैः**) याप्रमाणें स्वर्गामध्यें देवांनी (**च**) आणि (**भुवि मानवैः**) पृथ्वीवर मनुष्यांनी (**स्तुतायाः**) स्तुति केलेल्या (**अतिधृतिं**) अत्यंत धैर्य करून (**सुगतिं च प्राप्य**) चांगली गति प्राप्त करून घेऊन (**नाकं गतायाः**) स्वर्गाला गेलेल्या रेणुकेचें (**इह प्रौढं यशः**) या ठिकाणीं चिरकाल टिकणारें यश (**समंतादाप्तं**) सर्वत्र पसरलें (**तत् अमितत्वात्**) तें यश पुष्कळच असल्यामुळें (**शतमुखमुखाः**) शेषादि प्रमुख लोक (**वक्तुं न ईशाः**) सुद्धां वर्णन करूं शकले नाहींत. ।।१४८।।

साद्यापि जागर्ति निजार्चकानामभीष्टदानाय सुभाविकानाम्।
धरावरे मातृपुरे वरे तान्छ्राद्धान्नयत्यूर्ध्वगतिं परेतान्।।१४९।।

अन्वयार्थः- (**सुभाविकानां**) भाविक लोकांना (**निजार्चकानां**) आपली पूजा करणाऱ्यांना (**अभीष्टदा नाम**) इच्छित देण्याकरितां (**सा अद्यापि धरावरे**) ती हल्लींसुद्धां सह्याद्रीवर (**मातृपुरे**) माहूर नांवाच्या गांवांत (**जागर्ति**) जागृत आहे. (**तान् परेतान्**) येथें गेलेल्या लोकांना व नरकांत गेलेल्यांनाहि (**श्राद्धात्**) त्या ठिकाणीं श्राद्ध केलें असतां (**ऊर्ध्वं नयति**) स्वर्ग लोकाला घेऊन जाते. ।।१४९।।

दत्ताचार्येण रामोऽपि दत्ताचारोऽकरोद्विधेः। पित्रोः समं साम्परायं निन्ये क्षत्रकुलं क्षयम्।।१५०।।

अन्वयार्थः- (**दत्ताचार्येण**) आचार्यरूपी श्रीदत्तात्रेयांनीं (**दत्ताचारः रामोऽपि**) ज्याला आचारहि सांगितला आहे अशा रामानें (**पित्रोः समं**) दोघांचा एकाच वेळीं (**विधेः सांपरायं**) और्ध्वदेहिक विधि (**अकरोत्**) केला आणि (**क्षत्रकुलं**) क्षत्रियांचें कुळ (**क्षयं निन्ये**) समूळ नाहींसें केलें.।।१५०।।

(गद्यम्) क्षत्रियगर्भस्त्रावि(वी) यदागमः क्षत्रियप्राणहरणं यदीक्षणं तेन रामेण यत्प्रभावतस्त्रिःसप्तकृत्व उरुधारपरशुना निःक्षत्रां गोत्रां विधाय क्षत्रवधदोषहृतये तमेव दत्ताचार्यं वृत्वा चातुर्होत्रादिनेष्ट्वाचार्याज्ञया सागराम्बरां कश्यपाय सर्वस्वं विप्रेभ्यश्च प्रदाय स्वनिवासायाऽसायासं समुद्रादभिनवामवनिमुपलभ्यावस्थाय श्रीदत्तप्रसादात्सावर्णिकेन्तरे महर्षित्वमन्ते ब्रह्मभूयमुपलब्धम्।।१५१।।

अन्वयार्थः- (**यदागमः**) ज्या रामाच्या आगमनानें (**क्षत्रियागर्भस्त्रावी**) क्षत्रियांच्या स्त्रियांचे गर्भस्त्राव होत असत, (**यदीक्षणं**) ज्याच्या पाहण्यानें (**क्षत्रियप्राणहरणं**) क्षत्रियांचे प्राण नाहींसे होत (**तेन रामेण**) त्या रामानें (**यत्प्रभावतः**) ज्या दत्तात्रेयांच्या प्रभावानें (**त्रिःसप्तकृत्वः**) एकवीस वेळां (**उरुधारपरशुना**) तीक्ष्ण धारेच्या कुऱ्हाडीनें (**निःक्षत्रां गोत्रां विधाय**) निःक्षत्रिय पृथ्वी करून (**क्षत्रवधदोषहतये**) क्षत्रियांच्या वधानिमित्त झालेल्या दोषांच्या शांतीकरितां (**तमेव दत्ताचार्यं वृत्वा**) श्रीदत्तात्रेयांना गुरू करून (**चातुर्होत्रादिना इष्ट्वा**) चातुर्होत्रादि यज्ञयाग करून (**आचार्याज्ञया**) गुरूंच्या आज्ञेनें (**सागरांबरां कश्यपाय प्रदाय**) कश्यपाला भूमिदान देऊन (**सर्वस्वं विप्रेभ्यः प्रदाय**) ब्राह्मणांना सर्वस्व देऊन (**स्वनिवासाय**) आपणांला राहण्याकरितां (**असायासं**) जास्त त्रास न करितां (**समुद्रादभिनवामवनिं उपलभ्य**) समुद्रांतून नवीनच एक भूमि उत्पन्न करून (**अवस्थाय**) तिथें राहून (**श्रीदत्तप्रसादात्**) श्रीदत्तात्रेयांच्या प्रसादानें (**सावर्णिकेऽन्तरे**) सावर्णिक मन्वंतरांत (**महर्षित्वं**) महर्षित्व (**अन्ते ब्रह्मभूयं**) शेवटीं ब्रह्मरूपता (**उपलब्धम्**) मिळविली. ।।१५१।।

यत्कीर्तिं बाल ऊचे सुरवरवरतो योऽनसूयात्रिपुत्रो।
जज्ञे जम्भासुरं योऽमरवरकरतो मारयामास भर्गः।।
गाथाभिः सप्तभिर्यद्भजनरस इनं योजयद्योऽपि भूपम्।
तस्यर्षेश्चेष्टदस्तत्पद इति कवितां प्रार्पये स्त्रग्धरान्ताम्।।१५२।।

अन्वयार्थः- (**बालः**) मुलानें (**यत्कीर्ति ऊचे**) ज्याची कीर्ति आपल्या बापाला सांगितली. (**सुरवरवरतः**) इंद्रादि देवांच्या वरानें (**यः अनसूयात्रिपुत्रः जज्ञे**) जो अनसूया आणि अत्रिऋषि यांचा मुलगा झाला, (**अमरवरकरतः**) इंद्रादि देवांकडून (**यः जंभासुरं मारयामास**) ज्यानें जंभासुलाला मारविलें, (**भर्गः**) बृहस्पति व इंद्र यांच्या संवाद रूपानें (**योऽपि**) ज्यानें स्वतः (**सप्तभिः गाथाभिः**) सात गोष्टी सांगून (**यद्भजनरसे इनं भूपं योजयत्**) ज्याच्या भक्तिरसांत अर्जुन राजाला गुंगवून टाकलें, (**तस्य ऋषेश्च**) त्या अर्जुनाचा व रामाचा (**इष्टदः**)

हितकारी जो श्रीदत्तात्रेय (**तत्पदे**) त्याच्या चरणांवर (**इति**) आतांपर्यंत सांगितलेल्या (**स्त्रग्धरांतां**) स्त्रग्धरा जिच्या शेवटीं आहे अशी (**कवितां**) कविता (**प्रार्पये**) मी अर्पण करतों. ।।१५२।।

भावार्थः- स्तबकसमाप्ति या श्लोकांत वर्णन करतात, ज्या श्रीदत्ताची लीला लहान मुलानें आपल्या बापाला सांगितली व इन्द्रादि देवांनी अनसूयेला वर देऊन श्रीदत्तात्रेयांचा अवतार अत्रि व अनसूया यांचे घरीं करविला, ज्या श्रीदत्तात्रेयांनी इन्द्रादि देवांकडून जंभासुराला मारविलें आणि बृहस्पति व इन्द्र यांच्या संवादांत आपण स्वतः सात गोष्टी सांगून अर्जुन राजाला ज्या श्रीदत्तात्रेयांच्या भजनामृतांत गर्क करून सोडलें व अर्जुनाला आणि रामाला इच्छित देणारे जे श्रीदत्तात्रेय त्यांच्या चरणांवर ही कविता अर्पण करतों. त्यां योगानें श्रीदत्तात्रेय संतुष्ट होवोत. ।।१५२।।

प्रथम स्तबक समाप्त

।। श्रीगणेशदत्तगुरुभ्यो नमः ।।

श्रीदत्तचम्पूचें भाषांतर

द्वितीय स्तबक

भाषांतरकार - वे.शा.सं. वामनशास्त्री आत्मारामशास्त्री जेरे, नरसोबावाडी

।। श्री गु रु दे व द त्त ।।

श्रीपादश्रीवल्लभश्रीनृसिंहसरस्वतीदत्तात्रेयचरणारविंदाभ्यां नमः ।।

श्रीमद्वासुदेवानंदसरस्वतीचरणकमलेभ्यो नमः ।।

श्रीमद्‌गुरुचरणसरोरुहेभ्यो नमः ।। ॐ ।।

दत्तात्रेयं नमस्कृत्य वासुदेवं गुरुं सदा ।

धीशुद्‌ध्यर्थमहं कुर्वे टीकां मातृगिरा मुदा ।। १ ।।

श्रीमद्वासुदेवग्रंथ प्रचंड । तेथें न चाले मतीचा पाड । म्हणोनि सद्‌गुरूंचे चरण दृढ । धरोनि कार्या प्रवर्तलों ।।१।। सद्‌गुरूसारिखा । असता पाठिराखा । तरीच या लेखा । धैर्य झालें ।।२।। सद्‌गुरू वासुदेवानंद यती । ग्रंथरूपें श्रुतिसार वर्णिती । त्यांचे तेच जाणोत युक्ती । मतिमंदाचा तेथ न ठाव ।।३।। परी सद्‌गुरूकृपा होतांचि । दत्तचंपूद्वितीयस्तबकाची । भाषांतररूपी सेवा दासाची । मानून घेवोत दत्तगुरु ।।४।। श्रीगुरूंचे गुण माझे दोष । हा मानूनी येथ विशेष । वाचकें ग्रंथ न करावा उदास । प्रार्थुनी ग्रंथा आरंभितों ।।५।।

श्रीदत्तचम्पू
(द्वितीय स्तबक)

सर्वात्मनोऽस्य भजको विधुतान्यभावः कस्याप्यृणी न सकलेशितुरुत्स्वभावः।
हृत्स्थस्य तु प्रियतमोऽस्तयमो भवारेर्जेता त्वमेव स च मे कुहृदो भवारेः।।१।।

अन्वयार्थः- (**सर्वात्मनः**) सर्वात्म स्वरूप असणाऱ्या (**सकलेशितुः**) सर्वांचे नियमन करणाऱ्या (**हृत्स्थस्य**) हृदयामध्यें वास करणाऱ्या (**भवारेः**) संसाराचा शत्रु असलेल्या (**अस्य**) दत्तात्रेयाचा (**विधुतान्यभावः**) दुसरेपणा टाकलेला, (**उत्स्वभावः**) उत्तम स्वभावाचा, (**प्रियतमः**) अत्यंत आवडता, (**अस्तयमः**) यमभयाचा त्याग करणारा, (**भजकः**) भक्त (**तु**) तर (**कस्यापि**) कोणाचाहि (**ऋणी न**) ऋणी नाहीं, (**स च**) असा तो दत्तात्रेय (**त्वमेव**) तूंच (**मे**) माझ्या (**कुहृदः**) दुष्टांतःकरणरूप (**अरेः**) शत्रूचा (**जेता**) शासक (**भव**) हो. ।।१।।

जातः शत्रुजितस्त्वृतुध्वज इति ख्यातः सुतः शत्रुजिद्योऽहन्गालवयज्ञभङ्कृदनुजं क्रोडाङ्गमुर्वीतले।
वव्रे तेन हृतां प्रसह्य च सुतां विश्वावसोः सन्मता दैवेनोपगतां ततः कुवलयाश्वाख्यां गतोऽन्यार्पिताम्।।२।।

अन्वयार्थः- (**शत्रुजितः**) शत्रुजित राजाचा (**सुतः**) पुत्र (**शत्रुजित्**) शत्रूला जिंकणारा (**ऋतध्वज इति ख्यातः**) ऋतध्वज अशा नांवाने प्रसिद्ध (**जातः**) झाला. (**यः**) जो ऋतध्वज (**गालवयज्ञभंक्तारं**) गालव ऋषींच्या यज्ञाचा विध्वंस करणाऱ्या (**क्रोडांगं**) डुकराचें शरीर असणाऱ्या (**दनुजं**) दैत्याला (**उर्वीतले**) पाताळांत (**अहन्**) मारता झाला. (**ततश्च**) आणि नंतर (**तेन**) दैत्यानें (**प्रसह्य**) बलात्कारानें (**हृतां**) हरण केलेल्या (**सन्मतां**) सज्जनांना मान्य असलेल्या (**दैवेनोपगतां**) दैवानें प्राप्त झालेल्या (**विश्वावसोः सुतां**) विश्वावसु गंधर्वाच्या मुलीला (**वव्रे**) वरता झाला (**ततः**) नंतर (**अन्यार्पिताम्**) पितरादिकांनी दिलेल्या (**कुवलयाश्वाख्यां**) कुवलयाश्व अशा प्रसिद्धीस (**गतः**) प्राप्त झाला. ।।२।।

गन्धर्वपुत्री तु मदालसाख्या सख्या प्रयत्नेन नृपाय दत्ता।।
चित्तानुसारिण्यभवद्धवस्य या पात्रभूता परमोद्धवस्य।।३।।

अन्वयार्थः- (**मदालसाख्या**) मदालसा नांवाची (**गंधर्वपुत्री तु**) गंधर्वाची मुलगी तर (**सख्याः**) कुंडला मैत्रिणीच्या (**प्रयत्नेन**) प्रयत्नानें (**नृपाय**) राजाला (**दत्ता**) दिली. (**या**) जी मदालसा (**परमोद्धवस्य**) उत्कृष्ट सोहाळ्यास (**पात्रभूता**) योग्य झाली, (**सा**) ती मदालसा (**धवस्य**) पतीच्या (**चित्तानुसारिणी**) मनोनुकूल (**अभवत्**) झाली. ।।३।।

पातालकेतोर्निहितासुरस्य स तालकेतुः सहजश्चिरस्य।।
वने मुनिः सन्नृपवञ्चनार्थं यथार्थमुर्वीशमयाचतार्थम्।।४।।

अन्वयार्थः- (**निहतासुरस्य**) मारलेल्या दैत्याचा (**पातालकेतोः**) पातालकेतूचा (**सहजः**) बंधु (**सः**) तो (**तालकेतुः**) तालकेतु नांवाचा (**नृपवंचनार्थं**) कुवलयाश्वाला फसविण्याकरतां (**वने**) वनामध्यें (**चिरस्य**) चिरकाल (**मुनिः सन्**) मुनिवेष धारण करणारा असा (**यज्ञार्थं**) यज्ञाकरतां (**उर्वीशं**) राजाला (**अर्थ**) पैसे (**अयाचत**) मागता झाला. ।।४।।

तस्मै कुवलयाश्वोऽदाद्यज्ञसम्पत्तये मुदा। हिरण्मयीं कण्ठभूषां वेषान्तरजुषे मृषा।।५।।

अन्वयार्थः- (**कुवलयाश्वः**) ऋतध्वज (**यज्ञसंपत्तये**) यज्ञाच्या दक्षिणेकरितां (**मुदा**) आनंदानें (**मृषा**) कपटानें (**वेषांतरजुषे**) मुनिवेष धारण करणाऱ्या (**तस्मै**) त्या तालकेतूला (**हिरण्मयीं**) सोन्याची (**कंठभूषां**) गळ्यांतील कंठी (**अदात्**) देता झाला. ।।५।।

तामादाय स तद्राष्ट्रं क्षिप्रमागत्य मायिकः। शृण्वतां तत्र सर्वेषां भूषां दत्वावदन्मृषा।।६।।

अन्वयार्थः- (**ताम्**) त्या (**भूषां**) अलंकाराला (**आदाय**) घेऊन (**सः**) तो (**मायिकः**) मायावी (**तद्राष्ट्रं**) त्या राजाच्या देशांत (**आगत्य**) येऊन (**तत्र**) त्या ठिकाणीं (**सर्वेषां**) सर्व लोक (**शृण्वतां**) ऐकत असतां (**भूषां दत्वा**) ती कंठी देऊन (**मृषा**) खोटें (**अवदत्**) बोलता झाला. ।।६।।

स्मरन्वैरं द्विषन्दैत्यो वनेऽहन्नेकलं नृपम्। दग्ध आरण्यकैरेषा तद्भूषा मे वचोऽमृषा।।७।।

अन्वयार्थः- (**वैरं**) वैर (**स्मरन्**) स्मरणारा (**द्विषन्**) शत्रु (**दैत्यः**) पातालकेतू (**वने**) वनामध्यें (**एकलं**) एकट्या (**नृपं**) कुवलयाश्वाला (**अहन्**) मारता झाला. (**ततः**) नंतर (**आरण्यकैः**) वनांतील भिल्लांनी (**दग्धः**) त्याला जाळलें. (**एषा**) ही (**तद्भूषा**) त्याची कंठमाला. (**मे**) माझें (**वचः**) वचन (**अमृषा**) खोटें नाहीं. ।।७।।

इत्युक्त्वागात्स तद्भूषां योषादाय मदालसा। विवेशाग्नौ ततो भूप एत्याश्रौषीत्तदद्भुतम्।।८।।

अन्वयार्थः- (**इत्युक्त्वा**) असें बोलून (**सः**) तो दैत्य (**अगात्**) गेला. (**योषा**) स्त्री (**मदालसा**) कुवलयाश्वपत्नी (**तद्भुषां**) राक्षसानें दिलेली ती कंठी (**आदाय**) घेऊन (**अग्नौ**) अग्नीमध्यें (**विवेश**) प्रवेश करती झाली. (**ततः**) अग्निप्रवेशानंतर (**भूपः**) कुवलयाश्व (**एत्य**) येऊन (**तदद्भुतम्**) राक्षसाच्या भाषणापासून मदालसेचा मृत्यु वगैरे विचित्र हकीकत (**अश्रौषीत्**) ऐकता झाला.।।८।।

प्रियानृण्याय राड् भोगं त्यक्त्वाऽसङ्गं वने वसन्। कम्बलाश्वाहितनयैर्विनयैः सङ्गतोऽभवत्।९

अन्वयार्थः- (**प्रियानृण्याय**) पत्नीच्या ऋणांतून मुक्त होण्यासाठीं (**राट्**) कुवलयाश्व (**भोगं**) राजविलास (**त्यक्त्वा**) टाकून (**असंगं**) एकटा (**वने**) वनांत (**वसन्**) राहणारा होत्साता (**विनयैः**) विशेष नीतिमान् असलेल्या (**कंबलाश्वाहितनयैः**) कंबल आणि अश्वतर या दोन नागपुत्रांशीं (**संगतोऽभवत्**) संगती करता झाला. ।।९।।

पुत्रमित्रसुकलत्रलब्धये वाक्प्रसादवशतः कृपाब्धये। रम्यमश्वतरकाद्रवेश्वरः संजगौ प्रमुदितस्तदेश्वरः।।१०।।

अन्वयार्थः- (**अश्वतरकाद्रवेश्वरः**) अश्वतर नांनाचा नाग (**पुत्रमित्रसुकलत्रलब्धये**) आपल्या पुत्राच्या मित्राची कुवलयाश्वाची सुंदर मदालसा मिळण्यासाठी (**वाक्प्रसादवशतः**) सरस्वतीला प्रसन्न करून नंतर (**कृपाब्धये**) कृपासागर शंकरास प्रसन्न करण्याकरतां (**रम्यं**) सुस्वर (**जगौ**) गायन करता झाला. (**तदा**) त्या वेळीं (**ईश्वरः**) शंकर (**प्रमुदितः**) प्रसन्न झाला. ।।१०।।

वयोवर्णाकृतिगतिध्वानैस्तुल्यां मदालसाम्। प्राग्वद्वव्रे तथेतीश आभाष्यान्तरधात्पुनः।।११।।

अन्वयार्थः- (**वयोवर्णाकृतिगतिध्वानैः**) वय, वर्ण, शरीररचना, चालणें बोलणें यांनी (**तुल्यां**) मूलतः समान सारख्या (**मदालसाम्**) मदालसेला (**प्राग्वद्वव्रे**) पूर्वीप्रमाणें असलेली मागितली. (**ईशः**) शंकर (**तथेति**) त्याप्रमाणें होईल असें (**आभाष्य**) बोलून (**पुरः**) समोरच (**अंतरधात्**) अंतर्धान पावले. ।।११।।

शिवप्रसादाच्छ्राद्धीयमध्यपिण्डाशनादहेः। पत्न्या निश्वासतो जज्ञे पूर्ववत्सा मदालसा।।१२।।

अन्वयार्थः- (**शिवप्रसादात्**) शंकराच्या वरामुळें (**श्राद्धीयमध्यपिंडाशनात्**) श्राद्धातील मधला पिंड खाल्ल्यामुळें (**अहेः**) नागाच्या (**पत्न्याः**) पत्नीच्या (**निश्वासतो**) श्वासाबरोबर (**सा मदालसा**) ती मदालसा (**पूर्ववत्**) पूर्वी जशी होती तशी (**जज्ञे**) उत्पन्न झाली. ।।१२।।

सा स्वप्नोत्थितवद्बुद्ध्वा दीनवत्पर्यदेवयत्। हा नाथानन्यशरणां मां हित्वाद्य क्व यास्यसि।।१३।।

अन्वयार्थः- (**सा**) ती मदालसा (**स्वप्नोत्थितवद्बुद्ध्वा**) स्वप्नांतूनच जागे झालें असें समजून (**हा नाथ**) हे कांता (**अनन्यशरणां**) त्वदेक शरण असणाऱ्या अशा (**मां**) मला (**हित्वा**) टाकून (**क्व यास्यसि**) कोठें जातोस (**इति**) असें (**दीनवत्**) दीनासारखी (**पर्यदेवयत्**) विलाप करती झाली. ।।१३।।

इत्यहिर्विलपन्तीं तामाश्वास्यानाय्य तत्पतिम्।। तस्मै कुवलयाश्वाय विधिनादान्मदालसाम्।।१४।।

अन्वयार्थः- (**अहिः**) अश्वतरनाग (**इति**) याप्रमाणें (**विलपंतीं**) विलाप करणाऱ्या (**तां**) त्या मदालसेला (**आश्वास्य**) आश्वासन देऊन (**तत्पतिम्**) तिच्या नवऱ्याला (**आनाय्य**) आणवून (**तस्मै कुवलयाश्वाय**) त्या कुवलयाश्वाला (**विधिना**) विधिपूर्वक (**मदालसाम्**) मदालसा (**अदात्**) देता झाला. ।।१४।।

सपारिबर्हामादाय हृष्टां हृष्टोऽपि तां नृपः। पुरमेत्यावदत्तातं जातं यद्धूर्जटेर्वरात्।।१५।।

अन्वयार्थः- (**नृपः**) तो कुवलयाश्व (**सपारिबर्हां**) नजराण्यासहित असलेल्या (**हृष्टां**) आनंदित असलेल्या (**तां**) त्या मदालसेला (**आदाय**) घेऊन (**हृष्टः**) आनंदित (**सन्**) होत्साता (**पुरमेत्य**) आपल्या नगराला येऊन (**तातं**) बापाला (**धूर्जटेर्वशात्**) शंकराच्या प्रसादानें (**यज्जातं**) जें घडलें (**तत्**) तें (**अवदत्**) सांगता झाला. ।।१५।।

दृष्ट्वाद्यां शत्रुजित्सृष्टिं प्रीतो यातोवनं वनम्। सुतन्यस्तधराभारो भेजे भागवतीं गतिम्।।१६।।

अन्वयार्थः- (**शत्रुजित्**) कुलवयाश्वपिता (**आद्यां सृष्टिं**) नवीन झालेल्या स्नुषेला (**दृष्ट्वा**) पाहून (**प्रीतः**) प्रसन्न झाला. (**सुतन्यस्तधराभारः**) आपल्या मुलावर पृथ्वीचा भार टाकलेला असा तो (**वनं**) सेवन करण्यास योग्य अशा (**वनं**) वनांत (**यातः**) गेला. (**तत्र च**) आणि तेथें (**भागवतीं गतिं**) मुक्तीला (**भेजे**) प्राप्त झाला. ।।१६।।

पित्र्ये राज्ये स्थितः ख्यातः शस्तः शत्रुजितः सुतः। प्रजाः प्रजा इवारक्षद्युक्तदण्डः समानदृक्।।१७।।

अन्वयार्थः- (**पित्र्ये**) बापाकडून मिळालेल्या (**राज्ये**) राज्यावर (**स्थितः**) बसलेला (**ख्यातः**) प्रख्यात असलेला (**शस्तः**) प्रशस्त असलेला (**शत्रुजितः सुतः**) शत्रुजिताचा मुलगा (**युक्तदंडधरः सन्**) योग्य दंड करणारा (**समानदृक्**) साम्यदृष्टी ठेवणारा होत्साता (**प्रजा इव**) मुलाप्रमाणें (**प्रजाः**) राज्यांतील लोकांना (**अरक्षत्**) रक्षण करता झाला. ।।१७।।

अन्तर्वत्नी ततः पत्नी सञ्जाता सा मदालसा। **गङ्गा देवव्रतमिव ततोऽसूत सुतं सती।।१८।।**

अन्वयार्थः- (**ततः**) नंतर (**सा**) ती (**पत्नी**) मदालसा (**अंतर्वत्नी**) गरोदर (**संजाता**) झाली. (**ततः**) नंतर (**गंगा देवव्रतमिव**) गंगानदी भीष्माला जशी प्रसवली तशी (**सती मदालसा**) पतिव्रता मदालसा (**सुतं**) मुलाला (**असूत**) प्रवती झाली. ।।१८।।

जातमात्रं सुतं वीक्ष्य बोधदुग्धमपाययत्। स्तन्यं तु प्राणधृतय उल्लापनमिषेण सा।।१९।।

अन्वयार्थः- (**जातमात्रं**) उपजलेल्याच (**सुतं**) मुलाला (**वीक्ष्य**) पाहून (**सा**) ती मदालसा (**उल्लापनमिषेण**) गाण्याच्या निमित्तानें (**बोधदुग्धं**) ज्ञानरूपी दूध (**अपाययत्**) पाजती झाली. (**स्तन्यंतु**) स्तनांतील दूध तर (**प्राणभृतये**) प्राणाचें रक्षण होण्याकरितां (**अपाययत्**) पाजती झाली. ।।१९।।

रोदिषि रे त्वं कस्मात्पूर्वमितस्त्वं यस्मात्। भ्रष्टपथोऽभूस्तस्मात्कष्टमवाप्तमकस्मात्।।२०।।

अन्वयार्थः- (**रे**) अरे मुला (**त्वं**) तू (**कस्मात्**) कशासाठीं (**रोदिषि**) रडतोस? (**यस्मात्**) ज्याअर्थी (**त्वं**) तूं (**इतः**) येथून (**पूर्वं**) पूर्वजन्मीं (**भ्रष्टपथः**) मार्ग चुकलेला (**अभूः**) झालास (**तस्मात्**) त्याअर्थी (**कष्टं**) दुःख (**अकस्मात्**) एकाएकीं (**अवाप्तम्**) प्राप्त झालें. ।।२०।।

काद्य सुतस्ते वनिता क्वाद्य च माता जनिता। **क्वाद्य च याता जनता कोऽपि न तेऽन्तं ह्यविता।।**

अन्वयार्थः- (**ते**) तुझी (**वनितासुताः**) बायकामुलें (**अद्य**) आज (**क्व**) कोठें आहेत? (**जनिता माताच अद्य क्व**) पिता व जन्म देणारी आई हीं आज कोठें आहेत? (**जनता च अद्य क्व याता**) ते तुझे आप्तेष्ट वगैरे लोक आज कोठें गेले? (**ते**) तुझे (**अंते**) शेवटीं (**कोऽपि**) कोणीहि (**न अविता**) रक्षण करणारा नाहीं. ।।२१।।

पूर्वनिकेतार्थरथाः क्वाद्य न तस्यापि कथा। प्राक्च यथाद्यापि तथा तादृशचिन्ता तु वृथा।।२२।।

अन्वयार्थः- (**पूर्वनिकेतार्थरथाः**) पूर्वीच्या जन्मांतील गृह धन व रथादि (**अद्य क्व**) आज कोठें आहेत? (**तस्य कथापि न**) त्या सर्वांची आज वार्तासुद्धां नाहीं (**च**) आणि (**यथा**) जसें (**प्राक्**) पूर्वी (**तथा**) तसें (**अद्यापि**) आज सुद्धां (**भविष्यति**) होईल. (**तादृश चिंता**) तशाची स्मृती (**वृथा**) व्यर्थ आहे. ।।२२।।

नाक्षिविभङ्गो यदि ते रूपविमोहः कुमते। भैक्ष्ययशोत्तं यदि ते नारकभुक्तिर्न च ते।।२३।।

अन्वयार्थः- (**हे कुमते**) अरे व्यावहारिक बुद्धीच्या मुला, (**यदि**) जर (**ते**) तुला (**रूपविमोहः न**) लावण्याचा मोह झाला नसता (**तर्हि**) तर (**अक्षिविभंगो न**) यमाकडून नेत्रभंगहि झाला नसता (**च**) आणि (**यदि**) जर (**भैक्ष्ययशोत्तं**) भिक्षा मागून संपादन केलेलें अन्न खाशील तर (**ते**) तुला (**नारकभुक्तिर्न**) नरक तोंडांत घातला जाणार नाहीं. ।।२३।।

नेट्परिरम्भे त्वयसः स्त्रीपरिरम्भः पयसः। मातुरु पानं न पुनः पाहि सदातः स्वमनः।।२४।।

अन्वयार्थः- (**इट्परिरंभे तु**) ईश्वरास आलिंगन दिलें तर (**अयसः**) तप्त लोखंडाच्या सदृश (**स्त्रीपरिरंभः न**) स्त्रीचें आलिंगन होणार नाहीं; (**पुनः**) वारंवार (**मातुः उ पयसः पानं न**) मातेचें दुग्ध प्राशन करावें लागणार नाहीं. (**अतः**) म्हणून (**स्वमनः**) स्वतःचें चित्त (**सदा**) नेहमीं (**पाहि**) वश ठेव. ।।२४।।

मा स्वप मा स्वप निजरूपे।। एव हि जागृहि जागृहि भूप।।२५।।

अन्वयार्थः- (**रे**) अरे मुला (**मा स्वप मा स्वप**) निजूं नको, ऊठ, निजूं नको. (**भूप**) ज्ञान व योगभूमिकेचें पालन करणाऱ्या राजा (**निजरूप एव**) स्वात्मसुखाचे ठिकाणींच (**जागृहि जागृहि**) जागा राहा, जागा रहा. ।।२५।।

सकलनिशायां रेऽगुणमय्यां ।। मा भज शय्यां स्वेक्षक भूप।।२६।।

अन्वयार्थः- (**रे भूप**) अरे राजा (**हे स्वेक्षक**) बा स्वरूपनिष्ठा (**अगुणमय्यां**) त्रिगुणरहित असलेल्या (**सकलनिशायां**) सर्व लोकांना रात्रीप्रमाणें असणाऱ्या चैतन्यस्वरूपांत (**शय्यां**) झोप (**मा भज**) घेऊं नको. ।।२६।।

जाग्रति सर्वे येषां, तस्यां रे गुणमय्यां स्वापमेहि भूप।।२७।।

अन्वयार्थः- (**रे भूप**) हे भूपा (**यस्यां**) ज्या विषयनिष्ठेंत (**सर्वे जाग्रति**) सर्व लोक जागतात, (**गुणमय्यां तस्यां**) गुणयुक्त त्या विषय निष्ठेंत (**त्वं**) तूं (**स्वापमेहि**) झोपी जा. ।।२७।।

काकोलूकनिड्वद्व्यवहरतस्ते। क्वापि न दिग्भ्रम आत्मज सुमते।।२८।।

अन्वयार्थः- (**सुमते आत्मज**) अरे बुद्धिवान् मुला (**काकोलूकनिड्वद्व्यवहरतस्ते**) कावळ्याच्या व घुबडांच्या प्रमाणें रात्रीहि व्यवहार करणाऱ्या तुला (**क्वापि**) कोठेंहि (**दिग्भ्रमः न**) दिशाभूल होणार नाहीं. ।।२८।।

कनकसुकमनीयकामिनीति प्रथितमहानरकादकास्पदाद्द्राक्।
विषयविषधराद्विषय्यहीन्द्रदपसर दूरमितः प्रमादमृत्युः।।२९।।

अन्वयार्थः- (**अकास्पदात्**) दुःखाचें स्थानभूत असलेल्या (**कनकसुकमनीयकामिनीप्रथितमहानरकात्**) सुवर्ण व सुंदर स्त्रीरूपी प्रसिद्ध भयंकर नरकापासून (**द्राक्**) ताबडतोब (**दूरं अपसर**) दूर सरक, (**तथा**) त्याचप्रमाणें (**विषयविषधराद्विषय्यहींद्रात्**) विषयरूप विष धारण करणाऱ्या इंद्रियरूप सर्पांचा राजा जें मन त्यापासून (**दूरं अपसर**) दूर हो; (**इतः**) याच्यापासून (**प्रमादमृत्युः**) भ्रमरूपी मृत्यु येतो. ।।२९।।

यदि जातिमृतित्रासाद्रोदिषि त्वं न तेऽपि ते। भावषट्कयुतो देहोभावाभावविकारभाक्।।३०।

अन्वयार्थः- (**यदि**) जर (**त्वं**) तूं (**जातिमृतित्रासाद्रोदिषि**) जन्ममरणाच्या त्रासानें रडत असशील तर (**तेऽपि**) जन्ममरणसुद्धां (**ते न**) तुझे नाहींत; (**भावषट्कयुतो देहः**) उत्पन्न होतो, असतो, वाढतो, परिणामास पावतो, क्षीण होतो व मरतो या सहा भावांनी युक्त असलेलें शरीर (**भावाभावविकारभाक्**) जन्म व मरण या विकारांनी युक्त आहे. ।।३०।।

क्षुत्तृड्डुभे असुजाते मोहशुचौ ते न ते मनोजाते। जाते न बन्धमुक्ती ते अपि ते नैव कर्तृसञ्जाते।।३१।।

अन्वयार्थः- (**क्षुतृडुभे असुजाते**) क्षुधा व तृषा हे दोन्ही प्राणापासून उत्पन्न झाले आहेत. (**मोहशुचौ ते न**) मोह व शोक हे तुझी नाहींत (**हि ते मनोजाते**) कारण ते दोन्ही मनापासून झाले आहेत. (**बंधमुक्ती न जाते**) बंध व मोक्ष हे दोन्ही उत्पन्न झाले नाहींत (**ते अपि**) बंध व मोक्षसुद्धां (**कर्तृसंजाते**) कर्त्यापासून झाले आहेत. ।।३१।।

देहाद्यतीत तत्साक्षिन् सङ्घातव्यतिरिक्त ते। विद्धि साक्षित्वबोद्धृत्वे निर्विकारत्वतः स्वतः।।३२।।

अन्वयार्थः- (**हे देहाद्यतीत**) देहेंद्रियादिकांहून पलीकडे असणाऱ्या, (**तत्साक्षिन्**) देहादिकांचा साक्षीस्वरूप असणाऱ्या, (**ते**) तुझें (**साक्षित्वबोध्दृत्वे**) साक्षित्व आणि

बोध्दृत्व हे (**स्वतः**) उपाधीशिवाय (**निर्विकारत्वतः**) व विकार न होतां आहेत (**विद्धि**) असें जाण. ।।३२।।

देशाद्यतीत तेऽनन्त गमागमविवर्जित। न कर्तृत्वं न भोक्तृत्वं केवलानुभवात्मनः।।३३।।

अन्वयार्थः- (**देशाद्यतीत**) देशकालाहून पलीकडचा असणाऱ्या (**अनंत**) अंतरहित असणाऱ्या, (**गमागमविवर्जित**) जन्ममरणरहित असणाऱ्या, (**केवलानुभवात्मनः**) केवल अनुभवस्वरूप असणाऱ्या (**ते**) तुला (**कर्तृत्वं न**) कर्तृत्व नाहीं, (**भोक्तृत्वं न**) भोक्तृत्वहि नाहीं. ।।३३।।

एकमेवाद्वितीयं सत्तत्त्वं ब्रह्म परात्पर। एवं शश्वत्स्वरूपानुसंधानं कुरु तेऽस्तु शम्।।३४।।

अन्वयार्थः- (**परात्पर**) सर्व कारणांच्या कारणस्वरूपा (**एकमेवाद्वितीयं सत्**) द्वैतरहित एकच असलेले जें सद्ब्रह्म (**तद्ब्रह्म त्वं असि**) तें ब्रह्म तूं आहेस. (**एवं शश्वत्स्वरूपानुसंधानं कुरु**) याप्रमाणें सतत ब्रह्मस्वरूपाचें अनुसंधान कर; (**ते शमस्तु**) तुझें कल्याण असो. ।।३४।।

उल्लापनमिषेणैवं बोधयामास तं सुतम्। यथा यथा स ववृधे बोधोऽप्यस्य तथा तथा।।३५।।

अन्वयार्थः- (**एवं**) याप्रमाणें (**उल्लापनमिषेणैव**) गाण्याच्या निमित्तानेंच (**तं सुतं**) त्या मुलाला (**बोधयामास**) बोध करती झाली. (**यथा यथा स ववृधे**) जसा जसा तो मुलगा वाढला (**बोधोऽप्यस्य तथा तथा**) तसा तसा त्या मुलाचा बोधसुद्धां वाढला. ।।३५।।

भूयोऽपि जातं च जगौ सुतं सा तथा तृतीयं तनयं न यं सा।
पस्पर्श सर्वत्र ततापि कामक्रुड्लोभदवाल्पशिखा स्वरामम्।।३६।।

अन्वयार्थः- (**सा**) ती मदालसा (**भूयोऽपि जातं**) पुनः झालेल्या (**सुतं**) मुलाला (**नयं जगौ**) नीतिधर्म गाण्याच्या रूपानें शिकविती झाली. (**तथा तृतीयं**) त्याचप्रमाणें तिसऱ्या मुलालाहि बोध करती झाली. (**स्वरामं तनयं**) स्वरूपसुखांत रममाण असणाऱ्या त्या मुलांना (**कामक्रुड्लोभदावाल्पशिखा**) कामक्रोध लोभरूपी दावाग्नीची ज्वाळा (**सर्वत्र ततापि**) सगळीकडे व्यापून असली तरीसुद्धां (**न पस्पर्श**) स्पर्श करिती झाली नाहीं. ।।३६।।

तेषामपि त्रयाणां विक्रान्तसुबाहुशत्रुजित्संज्ञाः। पुत्राणां स्त्र्यननुमता अनुक्रमेणैव योजिता राज्ञा।।३७।।

अन्वयार्थः- (**तेषामपि त्रयाणां पुत्राणां**) त्या तीनहि मुलांचीं (**स्त्र्यननुमताः**) मदालसेला संमत नसलेली (**विक्रांतसुबाहुशत्रुजित्संज्ञाः**) विक्रांतवर्मा, सुबाहु व शत्रुजित् हीं नांवें (**अनुक्रमेणैव**) यथाक्रमच (**राज्ञा योजिताः**) राजानें ठेविलीं. ।।३७।।

(गद्यम्) **क्षमैकभद्रासनानामनाहताग्र्यतूर्यस्वनानां सर्वत्र समानानां हरीन्नारीधृतयशःप्रकीर्णानां पुष्करछत्राणां पुत्राणां तथाविधादपि भर्तुराधिक्यं सदाप्राकृतवैभवं पश्यन्ती सती सुतरां जहर्ष।।३८।।**

अन्वयार्थः- (**क्षमैकभद्रासनानां**) क्षमा एक सिंहासन आहे ज्यांचें अशा किंवा राजाचें विशेषण लावतांना- पृथ्वीवर एकच सिंहासन आहे ज्याचें-अशा (**अनाहताग्-यतूर्यस्वनानां**) अनाहत नांवाचा योग प्रक्रियेंतील ध्वनी हेंच श्रेष्ठ मंगलवाद्य आहे मंगलनाद ज्याचा अशी वाद्यें आहेत ज्याचीं, असा (**सर्वत्र समानानां**) शत्रु व मित्रांचे ठिकाणीं सारखें वर्तन आहे ज्याचें, अशा किंवा सर्वत्र मानसन्मानानें सहित असणाऱ्या (**हरिन्नारीधृतयशःप्रकीर्णानां**) दिशारूपी स्त्रियांनीं यशरूपी चवऱ्या धारण केलेल्या आहेत ज्यांच्या अशा किंवा मनोहर स्त्रियांनी धरल्या आहेत यशाप्रमाणें शुभ्र चवऱ्या ज्याच्या अशा, (**पुष्करछत्राणां**) आकाश आहे छत्र ज्याचें अशा किंवा श्वेत कमलाप्रमाणें आहे छत्र ज्याचें अशा (**पुत्राणां**) तीन मुलांचें (**तथाविधादपि भर्तुराधिक्यं**) असल्या प्रकारचें वैभव असणाऱ्या पतीपेक्षांहि श्रेष्ठ असणारे असें (**सदाऽप्राकृतं वैभवं पश्यंती**) नेहमीं स्वतःसिद्ध असणारें वैभव पाहणारी (**सती**) साध्वी मदालसा (**सुतरां जहर्ष**) अत्यंत आनंदित झाली. ।।३८।।

(गद्यम्) **बाह्यान्तरावरणहीनानदीनान्परतरलीनान्बहिर्मलिनान् जडोन्मत्तपिशाचवत् स्थितान्सुतानपि तान्पिताऽन्वीक्ष्य प्राकृतलोचन इदं वचनमुवाच।।३९।।**

अन्वयार्थः- (**बाह्यांतरावरणहीनान्**) बाहेरील वस्त्रादि व आंतील अज्ञान या पांघरुणांनीं रहित असलेल्या (**अदीनान्**) प्रसन्न असलेल्या (**परतरलीनान्**) परब्रह्मांत लीन असलेल्या (**बहिर्मलीनान्**) बाहेरील अंगास मळ वगैरे लागलेल्या (**जडोन्मत्तपिशाचवत्स्थितान्**) जडाप्रमाणें, उन्मत्ताप्रमाणें व पिशाचाप्रमाणें असलेल्या (**तान्**) त्या (**सुतानपि वीक्ष्य**) मुलांनासुद्धां पाहून (**प्राकृतलोचनः पिता**) व्यावहारिक दृष्टि असलेला पिता कुवलयाश्व (**इदं वचनमुवाच**) हें वचन बोलला. ।।३९।।

सदावां दम्पती पूतौ सदाचाररतौ मतौ। स्थितौ स्वधर्मे कर्मेदं कुपुत्रफलदं कुतः।।४०।।

अन्वयार्थः- (**स्वधर्मे स्थितौ**) आपल्या धर्माचे ठिकाणीं निष्ठा असणारे, (**सदाचाररतौ**) नेहमीं सदाचरणामध्यें रत असणारे, (**मतौ**) लोकांमध्यें मान्य असणारे, (**पूतौ**) पवित्र असणारे, (**आवां दंपती**) आम्ही पति-पत्नी दोघेहि असून (**अथापि**) तरी सुद्धां (**इदं**) हें (**कुपुत्रफलदं कर्म कुतः**) वाईट मुलें प्राप्त होणारें कर्म कोठून आलें? ।।४०।।

धिक्जन्म कुपुत्रोऽत्र धिक्तत्सद्म वनोपमम्। न यत्र पुत्रसुज्योतिर्नयत्यूर्ध्वं कुलं हि यत्।।४१।।

अन्वयार्थः- (**अत्र कुपुत्रः तज्जन्म धिक्**) ज्यामध्यें कुपुत्र असतो त्या जन्मास धिक्कार असो! (**यत् पुत्रसुज्योतिः**) जी पुत्ररूपी चांगली ज्योती (**कुलं हि ऊर्ध्वं नयति**) कुलास उत्कर्षांस पोंचविते. (**तत्**) ती पुत्ररूपी ज्योती (**यत्र न**) ज्या घरांत नाहीं (**तत् वनोपमं सद्मं धिक्**) त्या वनासारख्या घराला धिक्कार असो ! ।।४१।।

लोकजित्यै मतः पुत्रो लोकपोऽपि तपोऽतपत्। प्रजाकामः प्रजापाश्च कुतो लोकः प्रजा विना।।

अन्वयार्थः- (**लोकजित्यै मतः पुत्रः**) परलोकास साधन म्हणून पुत्र हा प्रशस्त आहे. (**लोकपोऽपि**) ब्रह्मदेवसुद्धां (**तपोऽतपत्**) पुत्राकरितां तपश्चर्या करता झाला. (**प्रजाकामः प्रजापाश्च**) पुत्रांची इच्छा करणारे दक्षादिकसुद्धां (**तपोऽतपत्**) तपश्चर्या करते झाले. (**प्रजा विना कुतो लोकः**) पुत्राशिवाय कोठून स्वर्गादि लोक मिळणार? ।।४२।।

एवं भावनयाज्ञोऽसौ दीनोऽभूद्विपरीतया। जायाथ गुर्विणी भूत्वा भूयोऽसूत सुतं मतम्।।४३।।

अन्वयार्थः- (**एवं असौ अज्ञः**) याप्रमाणें विचाराच्या योगानें अज्ञानी असलेला राजा (**विपरीतभावनया**) विरूद्ध कल्पनेनें (**दीनोऽभूत्**) दीन झाला. (**अथ**) कांही कालानंतर (**जाया**) मदालसा (**भूयो गुर्विणी भूत्वा**) पुनः गरोदर होऊन (**मतं सुतमसूत**) योग्य मुलाला प्रसविली. ।।४३।।

तुङ्गेष्वखगगेषु खगेषु प्रेक्ष्य जातमथ पञ्चसु योषा।
स्वं त्रिशक्तिजमिवाक्षयमेषा शंकिताप्युपदिदेश विदोषा।।४४।।

अन्वयार्थः- (**अथ**) नंतर (**एषा योषा**) ही स्त्री मदालसा (**पंचसु तुंगगेषु**) पांच ग्रह उच्च स्थानांत गेले असतां (**खगेषु अखगगेषु**) कोणतेहि ग्रह अस्ताला गेले नसतां (**त्रिशक्तिजं**) प्रभाव, उत्साह व संधी या तीन शक्तींपासून उत्पन्न झालेल्या (**अक्षयं स्वमिव**) नाश न पावणा-या धनाप्रमाणें (**जातं**) झालेल्या (**वीक्ष्य**) पाहून (**शंकितापि**) साशंक असूनसुद्धां (**विदोषा उपदिदेश**) अज्ञानरहित होत्साती मदालसा उपदेश करती झाली. ।।४४।।

प्रोत्साहितो ज्योतिषिकैः स जातकर्माकरोद्भूपतिरात्मजातम्।
नाम्नाथ संस्कर्तुमुवाच भार्यां किं नाम देयं वद मेऽर्भकाय।।४५।।

अन्वयार्थः- (**ज्योतिषकैः प्रोत्साहितः**) ज्योतिषांनीं उत्तेजन दिला गेलेला (**स भूपतिः**) तो राजा (**आत्मजातं**) आपल्या मुलाचा (**जातकर्माकरोत्**) उत्पन्न झाल्यावर करणेचा संस्कार करता झाला. (**अथ**) जातकर्मानंतर (**नाम्ना संस्कर्तुं**) नामकरण करण्याकरितां (**अर्भकाय**) मुलाला (**किंनाम देयं**) काय नांव ठेवावें (**मे वद**) मला सांग (**इति**) असें (**भार्यामुवाच**) मदालसेला विचारता झाला. ।।४५।।

प्राक्पुत्रनामान्ययि तेऽमतानि कुतो निरर्थान्यपि किं नु तानि।।
मानिन्युवाचाङ्ग गतिर्न यस्य विक्रान्तसंज्ञा न हि साध्व्यजस्य।।४६।।

अन्वयार्थः- (**अयि**) हे प्रिये (**प्राक्पुत्रनामानि**) पूर्वीच्या मुलांची नांवे (**ते कुतः अमतानि**) तुला कां संमत नव्हतीं, (**तानि निरर्थान्यपि किं नु वद**) तींसुद्धां निरर्थक कां आहेत तें सांग. (**मानिन्युवाच**) मदालसा म्हणाली, (**अंग**) बा प्राणप्रिया, (**यस्य अजस्य गतिर्न**) ज्या नित्य आत्म्याला गति नाहीं (**तस्य विक्रांतसंज्ञा साधु न हि**) त्या नित्य आत्म्याला विक्रांत म्हणजे गमन करणारा संज्ञा योग्य होणार नाहीं. ।।४६।।

नाथाङ्गवार्ता न तस्य सार्था सुबाहुसंज्ञा किमतो निरर्था।
एकस्य कः शत्रुरतोऽस्य सार्था किं शत्रुजित्संविदतो निरर्था।।४७।।

अन्वयार्थः- (**नाथ**) हे प्राणनाथ, (**अस्य अंगवार्ता न**) या आत्म्याला निरवयव असल्यामुळें अंग असणें ही वार्तासुद्धां नाहीं; (**तस्य**) त्या आत्म्याला (**सुबाहुसंज्ञा सार्था किं**) सुंदर हाताचा हें नांव योग्य होईल काय? (**अतो निरर्था**) म्हणून सुबाहु हें नांव निरर्थक आहे. (**एकस्य कः शत्रुः**) एकच असणाऱ्या आत्म्याला शत्रु कोण असणार? (**अतः**) म्हणून (**अस्य**) या आत्मस्वरूपी तिसऱ्या मुलाला (**शत्रुजित्संज्ञा सार्था किं**) शत्रूला जिंकणारा हें नांव सार्थक होईल काय? (**अतो निरर्था**) म्हणून ती संज्ञा निरर्थक आहे. ।।४७।।

पारमार्थिकदृशैवमीदृशी व्यावहारिकदृशापि तादृशी। सार्थता न जडमूढडिम्भवद्वर्ततामिह निरर्थाऽभवत्।।४८।।

अन्वयार्थः- (**एवं**) याप्रमाणें (**पारमार्थिकदृशा**) पारमार्थिक दृष्टीनें (**ईदृशी सार्थता न**) याप्रमाणें सार्थकता नाहीं. (**व्यावहारिकदृशापि तादृशी सार्थता न**) व्यावहारिक दृष्टीनें सुद्धां तसली सार्थकता नाहीं. (**इह**) आमच्या घरांत (**जडमूढडिंभवद्वर्ततां**) जडाप्रमाणें, मूर्खाप्रमाणें व पोरकटाप्रमाणें वागणाऱ्या मुलांना (**निरर्थताभवत्**) त्या नांवाची निरर्थकताच झाली. ।।४८।।

व्यवहारसुसिद्धये यदा व्यवहारिन्मत आह्वयस्तदा। कुरु जातमलर्कसंज्ञितं सुमतं ते यदि नाथ मे मतम्।।४९।।

अन्वयार्थः- (**व्यवहारिन्**) व्यवहारांत निष्णात असणाऱ्या (**यदा**) जर (**व्यवहारसुसिद्धये**) लौकिक व्यवहार करण्याकरितां (**आव्हयः**) नांव (**मतं**) मान्य असेल (**तदा**) तर नाथ अहो पतिराज (**यदि मे मतं ते सुमतं**) जर मला मान्य असलेलें तुम्हाला संमत असेल तर (**जातं**) या मुलाला (**अलर्कसंज्ञितं कुरु**) अलर्क असें नांव ठेवा. ।।४९।।

तथेत्याख्यां सुतायादाद्यथेष्टं च धनाद्यदात्। विनयात्स द्विजादिभ्यस्तनयाभ्युदयार्थ्यपि।।५०।।

अन्वयार्थः- (**सः**) तो कुवलयाश्व (**तथा इति**) तुझ्या सांगण्याप्रमाणेंच ठेवूं या असें म्हणून (**सुताय**) त्या मुलास (**आख्यां अदात्**) अलर्क हें नांव ठेवता झाला. (**तनयाभ्युदयार्थी**) मुलाच्या उत्कर्षाची इच्छा करणारा होत्साता (**विनयात्**) नम्रतेनें (**द्विजादिभ्यः अपि**) ब्राह्मणांनासुद्धां (**यथेष्टं धनादि अदात्**) इच्छेप्रमाणें धन, वस्त्रें, धान्य वगैरे देता झाला. ।।५०।।

मुदान्वितोऽपि द्वितीयं कदाचित्तनयं स्वयम्। मलिनं वीक्ष्य सदयं नलिनाक्षोऽब्रवीदयम्।।५१।

अन्वयार्थः- (**मुदान्वितोऽपि**) आनंदित असूनसुद्धां (**नलिनाक्ष अयं**) कमलनेत्र राजा (**कदाचित्**) एकदा (**मलिनं द्वितीयं तनयं स्वयं वीक्ष्य**) घाणेरडा झालेल्या दुसऱ्या मुलाला स्वतः पाहून (**सदयं अब्रवीत्**) दयायुक्त होत्साता बोलला. ।।५१।।

विज्ञाय दण्डनीत्यादि विवाह्य सदृशीं स्त्रियम्। विधाय नीत्या स्वराज्यं पूज्यमिष्ट्वानृणी व्रज।।५२।।

अन्वयार्थः- (**दंडनीत्यादि विज्ञाय**) दंड, नीति वगैरे जाणून (**सदृशीं स्त्रियं विवाह्य**) अनुरूप स्त्रीबरोबर विवाह करून (**नीत्या स्वराज्यं कृत्वा**) नीतीनें स्वतःचें राज्य करून (**पूज्यं इष्ट्वा**) देव, पितर, वृद्ध वगैरे लोकांची सेवा करून (**अनृणी व्रज**) सर्व ऋणांतून मुक्त होत्साता मग वैराग्यानें वनांत जा. ।।५२।।

त्यजात्तमौढ्यं तनुजैधि गेही यजाध्वरैश्च कृतीह देही।
भजाग्रतोऽत्रैव हि सांपरायं व्रजाटवीं प्राप्स्यसि नान्तरायम्।।५३।।

अन्वयार्थः- (**आप्तमौढ्यं त्यज**) हा खुळेपणा धारण केलास तो टाक.(**तनुज**) बा मुला (**गेही एधि**) गृहस्थाश्रमी हो. (**अध्वरैर्यज**) यज्ञ करून देवांना तृप्त कर. (**यैः**) ज्या यज्ञांच्या योगानें (**इह देही कृती**) या लोकांत मनुष्य कृतकृत्य होतो. (**अत्रैव हि**) या गृहस्थाश्रमांतच (**अग्रतो**) वानप्रस्थाश्रम स्वीकारण्यापूर्वी (**सांपरायं भज**) पारलौकिक साधन कर. (**ततः अटवीं व्रज**) नंतर अरण्यांत जा. (**अंतरायं न प्राप्स्यसि**) असें केलेंस तर विघ्न येणार नाहीं. ।।५३।।

प्रहस्याह स तं ज्ञाता सद्विद्या मातृतोर्जिता। स्वानुभूतिर्वृता कान्ता स्वाराज्यस्थिरताऽऽ गता।।५४।।

अन्वयार्थः- (**स ज्ञाता**) तो ज्ञानी सुबाहु (**प्रहस्य**) हंसून (**तं आह**) त्या राजाला म्हणाला, (**सद्विद्या मातृतोर्जिता**) मीं ब्रह्मज्ञान आईकडून संपादन केलें आहे. (**स्वानुभूतिः कांता वृता**) स्वानुभूती हीच स्त्री मीं वरली आहे. (**स्वाराज्यस्थिरतागता**) स्वयंप्रकाश आत्म्यामध्यें मला स्थिरता आली आहे. ।।५४।।

भार्यार्या ते न आचार्या सोदर्या हि वयं त्रयः।। आर्याश्च भविता तुर्यस्त्वमार्यातः कृती भव।।५५।।

अन्वयार्थः- (**आर्या ते भार्या न आचार्या**) पूज्य असलेली तुझी पत्नी आमची उपदेष्ट्री आहे. (**वयं त्रयः सोदर्याः**) आम्ही तिघे भाऊ (**आर्याः**) ईश्वरभक्त आहोंत. (**तुर्यः**) चौथा भाऊ (**भविता**) भक्त होणार आहे. (**आर्य**) श्रेष्ठ असणारा (**त्वं**) तूं ही (**अतः कृती भव**) म्हणूनच कृती हो ! किंवा (**त्वं आर्यातः कृती भव**) तूं आमच्या आईपासून ज्ञान मिळवून कृतकृत्य हो ।।५५।।

द्वयतोऽद्वयमात्मविद्यया पुनरैक्यं न भजेत्पृथक्कृतम्।
मथनेन पृथक्कृतं पुनर्नवनीतं न हि तत्र ऐक्यभाक्।।५६।।

अन्वयार्थः- (**आत्मविद्यया**) ब्रह्मविद्येनें (**द्वयतः**) संसारापासून (**पृथक्कृतं**) वेगळें केलेलें (**अद्वयं**) शुद्ध आत्मतत्व (**पुनः**) परत (**ऐक्यं न भजेत्**) संसाराशीं एकतापन्न होत नाहीं. (**मथनेन**) जसें घुसळण्यानें (**पृथक्कृतं**) ताकापासून वेगळें केलेलं (**नवनीतं**) लोणी (**पुनः**) वेगळें केल्यानंतर (**तत्र**) ताकांत (**न हि ऐक्यभाक्**) एकरूप होत नाहीं.।।५६।।

इत्थं सतां मतमृतममृतस्पर्धि भाषितम्। ज्वरितोऽन्नं तथा तातो मेने तत्कर्णशूलवत्।।५७।।

अन्वयार्थः- (**इत्थं**) या प्रकारचें, (**सतां मतं**) सज्जनांना मान्य असलेलें, (**ऋतं**) खरें, (**अमृतस्पर्धि भाषितम्**) अमृताशीं स्पर्धा करणारें भाषण, (**तातः**) बाप जो कुवलयाश्व, (**यथा ज्वरितोऽन्नं**) ज्याप्रमाणें तापकरी मनुष्य अन्नास क्लेशकारी मानतो, (**तथा**) तसें (**तत्**) तें भाषण (**कर्णशूलवत् मेने**) कानांत सूळ घातल्याप्रमाणें मानता झाला. ।।५७।।

सतामेत्यासतीमुक्तिं प्राह प्राहववित्पतिः। मूढेऽश्राव्यं सुतान् ब्रूषे किं वचो वंशनाशनम्।५८।।

अन्वयार्थः- (**प्राहववित्पतिः**) कोपयुक्त राजा, (**सतीं एत्य**) मदालसेजवळ येऊन (**असतीमुक्तिं प्राह**) कठोर वचन बोलला; (**मूढे**) मूर्खे, (**अश्राव्यं**) ऐकण्यास अयोग्य, (**वंशनाशनं वचः**) वंशाचा नाश करणारें भाषण, (**सुतान्**) मुलांना (**किं ब्रूषे**) कां ऐकवितेस? ।।५८।।

अनेन कूपदेशेन शं न नौ का गतिस्त्वितः। स्वर्गादिस्थपितॄणां नः को निवापप्रदो वद।।५९।।

अन्वयार्थः**-** (अनेन कूपदेशेन**) या वाईट उपदेशानें (**नौ**) आमचें व पुत्रांचें (**शं**) कल्याण (**न**) होणार नाहीं. (**इतः का गतिः**) या मुलांच्या नंतर आमची काय गती होईल? (**नः**) आमच्या (**स्वर्गादिस्थपितृणां**) स्वर्ग, पितृलोक व प्रेतयोनींत असलेल्या पितरांना (**कः**) कोण (**निवापप्रदः वद**) तिलोदक तर्पण वगैरे करणारा कोण आहे, सांग. ।।५९।।**

विधिनेयं कृता वृत्तिः कृत्तिवासःसुतुष्टिदा। पुष्टिदा च नृणां गेही न हि सर्वोपजीवनम्।।६०।।

अन्वयार्थः- (**विधिना**) ब्रह्मदेवानें (**कृत्तिवासः**) ईश्वराला (**सुतुष्टिदा**) अत्यंत तुष्टी देणारी (**इयं**) ही (**वृत्तिः**) श्राद्धादिकवृत्ति (**कृता**) केली आहे. (**नृणां च पुष्टिदा**) ही वृत्ति श्राद्ध करणाऱ्या मानवांसहि सुख देणारी आहे. (**गेही**) गृहस्थाश्रमी, (**सर्वोपजीवनं न हि किम्**) सर्वांना उपकारक नाहीं काय? ।।६०।।

गोहस्तिवीतिसंपत्तिं कुमतिर्यो जहाति ताम्। देवदत्तां मतां गेही देवद्रोही पतेदधः।।६१।।

अन्वयार्थः- (**यः**) जो, (**गेही**) गृहस्थाश्रमी, (**कुमतिः**) क्षुद्रबुद्धि होत्साता (**मतां**) सर्वमान्य असलेल्या (**देवदत्तां**) देवानें दिलेल्या (**तां**) त्या (**गोहस्तिवीतिसंपत्तिं**) गायी, हत्ती, घोडे व धनधान्यादि संपत्तीला (**जहाति**) टाकून देतो, (**देवद्रोही सः**) देवाचा अवमान करणारा असा तो (**अधः पतेत्**) अवनतीस जाईल. ।।६१।।

मान्यः प्रवृत्तिमार्गो नः सर्वोपकरणक्षमः। कुमतीनां तथान्यो नो द्वारं नोऽपि हि तद्गतिः।।६२।।

अन्वयार्थः- (**नः**) आमचा (**सर्वोपकरणक्षमः**) सर्वांना उपकार करण्यास योग्य असा (**प्रवृत्तिमार्गः**) कर्ममार्ग (**मान्यः**) सर्वांना मान्य आहे. (**कुमतीनां**) क्षुद्रबुद्धी लोकांचा (**अन्यः**) दुसरा निवृत्तिमार्ग (**तथा न**) तसा सर्वांना उपकारक नाहीं. (**तद्गतिः हि नोऽपि द्वारं**) कारण निवृत्तिमार्गी लोकांना तर आमच्या गृहस्थांच्या दारांतच वाव आहे. ।।६२।।

दुर्दैवस्य तु मार्गोऽन्य उभयक्लेशदो न किम्। अपुत्रस्य न लोकोऽस्तीत्येषा भाषा श्रुतेर्न किम्।।६३।।

अन्वयार्थः- (**दुर्दैवस्य**) दुर्दैवी निवृत्तिमार्गरत असणाऱ्याचा (**अन्यो मार्गस्तु**) दुसरा म्ह. निवृत्तिमार्ग तर (**उभयक्लेशदो न किम्**) दोन्ही लोकांत कष्टप्रद नाहीं काय? (**अपुत्रस्य**) निपुत्रिकाला (**लोकः नास्ति**) स्वर्गादि परलोक मिळत नाहीं. (**इत्येषा**) अशी ही (**भाषा**) वाणी (**श्रुतेर्न किम्**) श्रुतीची नाहीं काय? ।।६३।।

तस्मादार्योऽर्भकस्तुर्यो भ्रष्टो भवतु नान्यवत्। इति श्रुत्वा पतिर्वचः प्राज्ञी राज्ञी तमब्रवीत्।।६४।।

अन्वयार्थः- (**तस्मात्**) म्हणून (**आर्यः**) श्रेष्ठ असलेला (**तुर्यः**) चौथा (**अर्भकः**) लहान मुलगा अलर्क (**अन्यवत्**) तीन मुलांप्रमाणें (**भ्रष्टः**) कर्मभ्रष्ट (**न भवतु**) होऊं नये (**इति**) असें (**पतिवचः श्रुत्वा**) पतीचें भाषण ऐकून (**प्राज्ञी**) ज्ञानी असलेली (**राज्ञी**) मदालसा राणी (**तम्**) त्या राजाला (**अब्रवीत्**) म्हणाली. ।।६४।।

निवृत्तिमार्गः परमः सतो मतो यतोऽमृतं जय्य इहात्मलोक इत्।
प्रबोधपुत्रेण परेण नेत्यपि श्रुतेः पते शीर्षमशेषविन्मतम्।।६५।।

अन्वयार्थः- (**सतः**) स्वप्रकाश व स्वतः प्रमाण वेदाला (**मतः**) मान्य असलेला (**निवृत्तीमार्गः**) मोक्षमार्ग (**परमः**) श्रेष्ठ आहे. (**यतः**) ज्या निवृत्तिमार्गामुळें (**अमृतं**) अविनाशित्व प्राप्त होतें. (**इह**) या मनुष्यजन्मांत (**प्रबोधपुत्रेण**) ज्ञानरूप पुत्रानें (**आत्मलोकः**) परब्रह्म (**जय्यः इत्**) प्राप्त करून घेणें शक्य आहेच. (**परेण न**) प्रवृत्तिमार्गानें नाहीं. (**पते**) हे नाथा (**अशेषविन्मतम्**) सर्वज्ञ लोकांना मान्य असलेला (**श्रुतेःशीर्षम्**) वेदांत आहे. ।।६५।।

अथापि नाथाद्य भवत्प्रियार्थं यथार्थमस्मै श्रुतदृङ् नयार्थम्।
साधूपदेक्ष्येऽखिलमेवमुक्त्वा सापाठयत्स्वाग्रहमत्र मुक्त्वा।।६६।।

अन्वयार्थः- (**श्रुतदृक्नाथ**) लौकिकशास्त्रदृष्टि असणाऱ्या नाथा (**अथापि**) वेदांत श्रेष्ठ असूनसुद्धां (**भवत्प्रियार्थं**) तुम्हांला आवडण्याकरतां (**अस्मै**) या अलर्काला (**अद्य**) आज (**यथार्थं नयार्थं**) योग्य प्रकारचें नीतिशास्त्र वगैरे (**साधूपदेक्ष्ये**) चांगलें शिकवीन. (**एवमुक्त्वा**) असें बोलून (**अत्र**) उपदेश न करण्याबद्दलचा (**स्वाग्रहं मुक्त्वा**) स्वतःचा निश्चय सोडून (**सा**) ती मदालसा (**अखिलमेव**) सर्वच विद्या (**तम् अपाठयत्**) त्याला पढविती झाली. ।।६६।।

अलर्कः सर्वविद्याः स आददे शिक्षितोऽम्बया। नयादिनिपुणायास्मै दापयामास भूधुरम्।।६७।।

अन्वयार्थः- (**अंबया शिक्षितः**) आईनें शिकविलेला (**स अलर्कः**) तो अलर्क (**सर्वविद्याः आददे**) सर्व विद्या ग्रहण करता झाला. (**नयादि निपुणायास्मै**) नीति वगैरेमध्यें निपुण असणाऱ्या अलर्काला (**भूधुरम्**) राज्याचा जूं (**दापयामास**) देवविती झाली. ।।६७।।

वनं जिगमिषुं कांतमनुयास्यत्यदात्तदा। भाविरिष्टहरं पत्रं गुप्तं पुत्राय सा तदा।।६८।।

अन्वयार्थः- (**वनं जिगमिषुं**) वनांत जाण्याची इच्छा करणाऱ्या (**कांतं अनुयास्यंती**) पतीच्या मागोमाग जाणारी (**सा**) ती मदालसा (**तदा**) जाते वेळीं (**पुत्राय**) अलर्काला (**भाविरिष्टहरं**) पुढें येणाऱ्या संकटाचें निवारण करणारें (**गुप्तं**) पेटींत झाकलेलें (**पत्रं**) पत्र (**मुदा**) आनंदानें (**अदात्**) देती झाली. ।।६८।।

तरुणारुणदीप्त गुप्तचित्करुणाब्धे भवतो विना क्वचित्।
न हि कश्चन तारको द्युमन्महिमन्नुर्भवतोऽत्रिभूर्महन्।।६९।।
भवतेर्पित एष बालको भवतोऽन्यः क इहास्य पालकः।
इत सा प्रतिपाद्य योगिनी पतिमार्यानुगतेव भोगिनी।।७०।।

अन्वयार्थः- (**तरुणारुणदीप्त**) प्रखर सूर्याप्रमाणें दीप्तिमान् असणाऱ्या (**गुप्तचित्**) बुद्धीचें रक्षण करणाऱ्या (**करुणाब्धे**) कृपासागरा (**द्युमन्महिमन्**) प्रकाशशाली महिमा असणाऱ्या (**महन्**) पूज्य असणाऱ्या (**अत्रिभूः**) अत्रिपुत्रा (**नुः**) मनुष्याचें (**भवतः विना कश्चन क्वचित् तारकः न हि**) तुमच्याशिवाय कोणीहि व कोठेंहि रक्षण करणारा नाहीं. (**एष बालकः**) हा मुलगा (**भवतेऽर्पितः**) आपणांस अर्पण केला आहे. (**इह अस्य पालकः**) येथें याचा रक्षण करणारा (**भवतोऽन्यः कः**) आपल्याशिवाय दुसरा कोण आहे? (**इति**) याप्रमाणें (**योगिनी सा**) तापसी असणारी ती मदालसा (**प्रतिपाद्य**) मुलास दत्तात्रेयाला अर्पण करून (**भोगिनीव**) भोगिनी स्त्रीप्रमाणें (**आर्या पतिं अनुगता**) साध्वी मदालसा पतीच्या मागोमाग गेली. ।।६९।।७०।।

(गद्यम्) **अथ ह तातयोर्निर्वाणं गतयोः सतोः पित्र्यभद्रासनासीनं सुधर्माश्रितं विबुधगणपरीतं गुर्वभिमतं मघवंतमपरं जिष्णुमिव सन्तं चोदनाधिया रतामिषसुरासक्तं तमलर्कं बुबोधयिषुः सुबाहुरुत्सृष्टात्तमौढ्य एत्य पित्र्यराज्यभागं याचयित्वा तेन प्रत्याख्यातः प्रयत्नतः काशिराजसाहाय्येन कांश्चित्सामंतामात्यादीन्साम्ना कांश्चिद्दानेन भेदेन च वशीकृत्याग्रजोऽनुजं जिगाय।।७१।।**

अन्वयार्थः- (**अथ ह**) वनांत गेल्यानंतर (**तातयोः निर्वाणं गतयोः सतोः**) आईबाप मुक्तीला गेले असतां (**पित्र्यभद्रसनासीनं**) बापाकडून आलेल्या सिंहासनावर बसलेल्या (**सुधर्माश्रितं**) निष्कपट धर्म करणाऱ्या (**विबुधगणपरीतं**) सुबुद्धिमान् लोकांनीं परिवेष्टित असलेल्या (**गुर्वभिमतं**) मान्य लोकांना अभिमत असलेल्या (**मघवंतं**) बलवान् असणाऱ्या (**अपरं जिष्णुमिव संतं**) दुसरा इंद्रच जणूं असणाऱ्या (**चोदनाधिया**) विधीपूर्वक स्वीकारण्याच्या बुद्धीनें (**रतामिषसुरासक्तं**) मैथुन, मांस व सुरा यांचे ठिकाणीं आसक्त असणाऱ्या (**तमलंर्क**) त्या अलर्काला (**बुबोधयिषुः**) बोध करण्याची इच्छा करणारा (**सुबाहुः**) बडील बंधु सुबाहु (**उत्सृष्टात्तमौढ्यः**) स्वीकारलेला मूढपणा टाकणारा होत्साता (**एत्य**) तेथें येऊन (**पित्र्यराज्यभागं**) बापाच्या राज्याच्या भाग (**याचयित्वा**) मागून (**तेन प्रत्याख्यातः**) त्या अलर्कानें नाकारलेला होत्साता (**प्रयत्नतः**) प्रयत्नानें (**काशिराजसाहाय्येन**) काशिराजाच्या साहाय्यानें (**कांश्चित्सामंतामात्यदीन्साम्ना**) कांही मांडलिकांच्या प्रधान वगैरे लोकांना सामोपचारानें (**कांश्चिद्दानेन भेदेन च**) कांहीना पैसे देऊन व कांहीना फितवून (**वशीकृत्य**) आपल्या वश करून (**अग्रजः**) वडील बंधु सुबाहु (**अनुजं जिगाय**) धाकट्या भावाला पराभूत करता झाला. ।।७१।।

अलर्को विजितो रात्रावलर्कवदगाद्वनम्। तत्र मातृवचः स्मृत्वा पत्रं दृष्ट्वा सुविस्मितः।।७२।।

अन्वयार्थः- (**विजितः अलर्कः**) जिंकला गेलाला अलर्क (**रात्रौ**) रात्रीं (**अलर्कवत्**) त्रास दिल्या गेलेल्या कुत्र्याप्रमाणें (**वनं अगात्**) वनांत गेला. (**तत्र**) वनामध्यें (**मातृवचः स्मृत्वा**) आईचें वचन आठवून (**पत्रं दृष्ट्वा**) आईनें दिलेलें पत्र पाहून (**सुविस्मितः**) अतिशय आश्चर्यचकि झाला. ।।७२।।

त्यक्त्वा स्वेषां विरुद्धानां संगं सत्संगमाचरेत्। इति ज्ञात्वा मातृहार्दं श्रीदत्तं शरणं ययौ।।७३।।

अन्वयार्थः- (**विरुद्धानां**) दुसऱ्या लोकांचा (**स्वेषां**) आपल्या लोकांचा (**संगं**) सहवास (**त्यक्त्वा**) टाकून (**सत्संगमाचरेत्**) सत्संग करावा, (**इति मातृहार्दं ज्ञात्वा**) असें आईचें हृद्गत जाणून (**श्रीदत्तं शरणं ययौ**) श्रीदत्तात्रेयाला शरण गेला. ।।७३।।

स सह्यधामानमपेतमानमसह्यधामानममानमानं। मानं ददन्तं परमात्मने तमानन्दकन्दं नृपितर्ददर्श।।७४।।

अन्वयार्थः- (**स नृपतिः**) तो राजा (**सह्यधामानं**) सह्यपर्वत स्थान असणाऱ्या (**अपेतमानं**) प्रमाणातीत असणाऱ्या (**असह्यधामानं**) सहन करण्यास अशक्य असें तेज ज्याचें आहे अशा (**अमानमानं**) प्रमाणातीत पदार्थांच्यापेक्षां श्रेष्ठ असणाऱ्या (**आत्मने**) आपले (**श्रेष्ठं मानं ददंतं**) चांगल्या प्रकारचें स्वागत करणाऱ्या (**तं आनंदकंदं**) त्या आनंदाचा सांठा असलेल्या दत्तात्रेयाला (**ददर्श**) पाहता झाला. ।।७४।।

निधाय योऽङ्के खलमोहनाय विधाय मायामयभीरुमार्यः।

तडिन्निभां नीलनिभोस्तमारस्तडित्वदाभां धरगो जहार।।७५।।

अन्वयार्थः- (**खलमोहनाय**) दुष्टांना भ्रम वाटण्याकरितां (**तडिन्निभां**) विजेप्रमाणें काती असणाऱ्या (**मायामयभीरुं**) मायारूपी स्त्रीला (**विधाय**) करून (**तां**) त्या मायारूपी स्त्रीला (**अंके निधाय**) मांडीवर ठेवून (**अस्तमारः**) कामाचा ज्यानें जय केला आहे असा (**आर्यः**) श्रेष्ठ असलेला (**नीलनिभः**) नील मण्याप्रमाणें कांती असलेला (**धरगः**) पर्वतावर बसलेला (**यः**) जो अत्रिनंदन (**सः**) तो (**तडित्वदाभां जहार**) वीज असलेल्या मेघाची शोभा हरण करता झाला. ।।७५।।

अशेषदोषक्षपणक्षमाभिर्निःशेषसत्तीर्थसमाहृताद्भिः। कमंडलुं पूर्णमसौ दधानः स्त्रष्टेव रेजेऽमरदत्तमानः।।७६।।

अन्वयार्थः- (**अशेषदोषक्षपणक्षमाभिः**) सर्व पापांचा नाश करण्यास समर्थ असलेल्या (**निःशेषसत्तीर्थसमाहृताद्भिः**) संपूर्ण चांगल्या तीर्थांतून आणलेल्या पाण्यांनी (**पूर्ण**) भरलेला (**कमंडलु**) कमंडलु (**दधानः**) धारण करणारा (**अमरदत्तमानः**) देवांनीं ज्याला मान दिला आहे असा (**असौ**) हा दत्तात्रेय (**स्त्रष्टेव रेजे**) ब्रह्मदेवाप्रमाणें शोभला. ।।७६।।

अतिपिङ्गजटाकिरीटिना समतां यो गतवान्पिनाकिना।

शरदभ्रनिभाच्छभस्मना परिलिप्ताखिलकोमलात्मना।।७७।।

अन्वयार्थः- (**शरदभ्रनिभाच्छभस्मना**) शरद् ऋतूंतील पांढऱ्या ढगाप्रमाणें स्वच्छ भस्म जें (**परिलिप्ताखिलकोमलात्मना**) लेपन केलें आहे कोमल शरीर ज्यानें अशा (**अतिपिंगजटाकिरीटिना**) अतिशय पिंगट जटांचें किरीट असणाऱ्या (**पिनाकिना**) शंकराशीं (**यः समतां गतवान्**) जो दत्तात्रेय तो सारखेपणास प्राप्त झाला. ।।७७।।

सजलजलदमित्राङ्गद्युतिः श्रीकलत्रो विमलकमलनेत्रो मञ्जुलाशेषगात्रः।

अमलसकलचन्द्रस्पर्धिवक्त्रः पवित्रः शुशुभ इव विपत्रः सह्यगो योऽत्रिपुत्रः।।७८।।

अन्वयार्थः- (**यः**) जो (**सह्यः**) सह्याद्रीवर असलेला (**अत्रिपुत्रः**) दत्तात्रेय (**सजलजलदमित्रांगद्युतिः**) पाण्यानें युक्त काळ्या मेघाप्रमाणें अंगकाति असणाऱ्या (**मंजुलाशेषगात्रः**) मनोहर शरीर असणाऱ्या (**अमलसंकलचंद्रस्पर्धिवक्त्रः**) कलंकरहित संपूर्ण चंद्राची स्पर्धा करणारें मुख असणाऱ्या (**पवित्रः**) पवित्र अशा (**विपत्रः**) गरुडवाहन असणाऱ्या (**श्रीकलत्र इव**) लक्ष्मीपति विष्णुप्रमाणें (**शुशुभे**) शोभता झाला. ।।७८।।

निपात्य वर्ष्माग्रत एव दण्डनिपातवत्प्राह तमात्तपीडः।

अतीव दुःखं हि ममोपपन्नं यतीश तस्मादव मां प्रपन्नम्।।७९।।

अन्वयार्थः- (**अग्रतः एव**) श्रीदत्ताच्या पुढेंच (**दंडनिपातवत्**) काठी पडल्याप्रमाणें (**वर्ष्म निपात्य**) शरीर लांब टाकून साष्टांग नमस्कार करून (**आत्तपीडः**) दुःख प्राप्त झालेला अलर्क (**तम्**) त्या दत्तात्रेयाला (**प्राह**) म्हणाला, (**यतीश**) अहो दत्तात्रेया (**मम हि**) मला तर (**अतीव दुःखं उपपन्नं**) फारच दुःख प्राप्त झालें आहे. (**तस्मात्**) म्हणून (**प्रपन्नं मां**) शरण आलेल्या मला (**अव**) प्रसन्न हो. ।।७९।।

श्रीदत्तः प्राह दुःखं क्व वपुषि तव तद्दर्शय त्वं च को वा। ब्रूहीत्युक्तः स्वदेहो घटवदिह तथाचेतनः प्राण एषः।।

क्षुत्तृड्वानिन्द्रियाणि स्वविषयग्रहणार्हाणि चित्सन्निधानाद्धृद्धीश्चाकादिहेतू अपि निखिलमिदं वेद्मि योऽहं स साक्षी।।८०।।

अन्वयार्थः- (**श्रीदत्तः**) श्रीदत्तात्रेय (**प्राह**) म्हणाले, (**तव वपुषि**) तुझ्या शरीरांत (**दुःखं क्व तद्दर्शय**) दुःख कोठें आहे तें दाखीव (**च**) तसेंच (**त्वं वा कः ब्रूहि**) तूं कोण आहेस तें सांग. (**इत्युक्तः सः**) असें विचारला गेलेला तो अलर्क सांगतो, (**देहो घटवत्**) देह हा घटाप्रमाणें जड आहे. (**तथा**) त्याचप्रमाणें (**इह**) या शरीरांतील (**एष प्राणः**) हा प्राण (**अचेतनः**) अचेतन आहे. (**क्षुत्तड्वान्**) व क्षुधा आणि तृषा हे धर्म प्राणाचे आहेत; (**इंद्रियाणि**) सर्व इंद्रियें (**चित्संनिधानात्**) चैतन्याच्या सांनिध्यामुळे (**स्वविषयग्रहणार्हाणि**) आपपले विषय ग्रहण करण्यास समर्थ असतात; (**हृद्धी च**) मन आणि बुद्धी तर (**अकादिहेतू अपि**) सुखदुःखाचें स्थान असून सुखदुःखाला कारणीभूतही आहेत. (**निखिलमिदं**) सर्व हें (**योऽहं वेद्मि**) जो मी जाणतों (**स साक्षी**) तो साक्षीरूप मी आहे. ।।८०।।

आत्माहं दुःखसौख्ये न मम कुमनसस्ते मतेऽध्यासतो मे ते अद्यांजः सबीजे मयि विलयमिते श्रीगुरोः संप्रसादात्।
नाहं दुःखी सुखी वा स्त्र्यननुगसुतधरादेरपेक्षा कुतो मे सम्बन्धोऽङ्गस्य नो मे तत इह तु कुतः स्वात्मनः शत्रुमित्रे।।८१।।

अन्वयार्थः- (**अहं आत्मा**) मी ब्रह्म आहें. (**दुःखसौख्ये मम न**) सुखदुःख हे माझे नाहींत (**ते**) सुख व दुःख (**कुमनसः**) कुत्सित मनाचे आहेत. (**अध्यासतः मे मते**) अध्यासामुळें ते माझे आहेत असें वाटलें. (**अद्य श्रीगुरोः संप्रसादत्**) आज सद्गुरूच्या प्रसादामुळें (**ते**) सुख व दुःख (**अंजः**) झटकन् (**मयि विलयमिते**) माझ्या ठिकाणीं सर्व नाश पावले. (**नाहं दुःखी सुखी वा**) म्हणून मी दुःखी किंवा सुखी नाहीं. (**मे अंगस्य संबंधो न**) मला शरीराचा संबंध नाहीं (**ततः**) म्हणून (**स्त्र्यनुगसुतधरादेरपेक्षा कुतः**) बायको-मुलें-राज्य वगैरेची इच्छी कोठून असणार? (**इह तु**) या अवस्थेंत तर (**स्वात्मनः मे**) स्वरूपनिष्ठ असलेल्या मला (**शत्रुमित्र कुतः**) शत्रु व मित्र कोठून असणार? ।।८१।।

गुरुर्जगौ साध्व्यपि संविदस्याःस्थेम्नेऽद्य योगी मितभैक्ष्यभुक्स्याः।
जितासनश्वासहृषीकचित्तः सञ्चिन्तयात्मानमभेदतोऽन्तः।।८२।।

अन्वयार्थः- (**गुरुः**) गुरुदत्तात्रेय (**जगौ**) म्हणाले (**संवित् साध्वपि**) तत्त्वज्ञान चांगलें असलें तरीसुद्धां (**अस्याः स्थेम्ने**) हिच्या स्थैर्याकरतां (**अद्य मितभैक्ष्यभुक् स्याः**) आज प्रमाणयुक्त अन्न खाणारा हो, (**तथा जितासनश्वासहृषीकचित्तः**) त्याचप्रमाणें आसन, प्राण, मन व इंद्रियें हीं ताब्यांत ठेवणारा होत्साता (**अंतः**) अंतःकरणांत (**अभेदतः**) भेदरहित अशा (**आत्मानं संचिंतय**) आत्म्याचें चिंतन कर. ।।८२।।

पीयूषविषदृष्ट्यात्तौ मानामानौ सुबन्धदौ। विषपीयूषदृष्ट्यात्तौ मानामानौ सुमुक्तिदौ।।८३।।

अन्वयार्थः- (**पीयुषविषदृष्ट्यात्तौ**) अमृत व विषबुद्धीनें स्वीकारलेले (**मानामानौ**) मान व अपमान (**सुबंधदौ**) अतिशय बंधांत टाकणारे आहेत; (**विषपीयूषदृष्ट्यात्तौ**) विष व अमृत दृष्टीनें स्वीकारलेले (**मानामानौ**) मान व अपमान (**सुमुक्तिदौ**) चांगली मुक्ति देणारे आहेत. ।।८३।।

ममता यत्र तु दुःखं तत्र तु मार्जारभक्षिते स्वशुके। यद्वद्दुःखं न वृके तद्वदहंयोः सदैव सुखदुःखे।।८४।।

अन्वयार्थः- (**यत्र ममता**) ज्या ठिकाणीं आपलेपणा असतो (**तत्र दुःखं**) त्या ठिकाणीं दुःख असतें; (**यद्वत्**) ज्याप्रमाणें (**मार्जारभक्षिते स्वशुके दुःखं**) मांजरानें खाल्लेल्या आपल्या पोपटाबद्दल दुःख असतें (**न वृके**) मांजरानें खाल्लेल्या उंदराबद्दल असत नाहीं (**तद्वत्**) त्याप्रमाणें (**अहंयोः**) ज्याला अहंकार आहे त्याला (**सदैव**) नेहमींच (**सुखदुःखे**) सुखदुःख असतें. ।।८४।।

ममताहंता त्यक्ता येनास्य तु मुक्तता ततः सुमते। त्यज ते तत्त्यागः सुमदलनात्सुकरोऽपि साररसदृक्ते।।८५।।

अन्वयार्थः- (**येन ममताहंता त्यक्ता**) ज्यानें ममत्व व अहंकार टाकले आहेत (**अस्य मुक्तता**) त्याला मुक्ति मिळते, (**ततः सुमते**) म्हणून शहाण्या अलर्का, (**ते त्यज**) ममता अहंता टाकून दे. (**साररसदृक् ते**) ब्रह्मनिष्ठ असणाऱ्या तुला (**सुमदलनादपि सुकरः**) फूल चुरगाळण्यापेक्षांहि ममतादि टाकणें सोपें आहे. ।।८५।।

सिद्धयोत्रान्तरायस्ता जहि यद्यप्युपस्थिताः। ततः समाधिसिद्धिस्ते ततो भूयो भ्रमो न ते।।८६।।

अन्वयार्थः- (**अत्र**) या योगमार्गांत (**यद्यप्युपस्थिताः**) जरी सिद्धि प्राप्त झाल्या तरी (**अंतरायस्ताः**) विघ्नरूप त्या आहेत म्हणून (**जहि**) टाकून दे. (**ततः**) नंतर (**ते समाधिसिद्धिः**) तुला समाधि सिद्ध होईल. (**ततः**) नंतर (**ते भूयः भ्रमो न**) पुनः भ्रम होणार नाहीं. ।।८६।।

जीवन्मुक्तिः प्रत्यगभिन्नपरमात्मतत्त्वविज्ञानात्। सुतरां मनोविनाशादत्रैव त्रिविधवासनाहानात्।।८७।।

अन्वयार्थः- (**प्रत्यगभिन्नपरमात्मतत्त्वविज्ञानात्**) प्रत्यक्ष स्वरूप असणारें जें परब्रह्मतत्त्व त्यास जाणल्यामुळें (**सुतरां मनोविनाशात्**) चांगल्या दृढतापूर्ण प्रकारच्या मनोभंगामुळें (**त्रिविधवासनाहानात्**) देह, शास्त्र व लोक या तीन वासनांच्या नाशामुळें (**अत्रैव जीवन्मुक्तिः**) या जन्मांतच जीवन्मुक्ति मिळते.।।८७।।

(गद्यम्) **एवं गुरुणा यथावच्छिक्षितस्य देहाद्युपाधिकमात्मनो नानात्वं कर्तृत्वं भोक्तृत्वं च लोककालागमात्मानित्यत्वं च भोग्यभावानां भगवन्मायामयत्वं च गुरुप्रसादाद्विजानतो विरतस्य प्रशान्तस्य तस्य युगपत्त्रिकाभ्यासवशादपरोक्षसाक्षात्कारदार्ढ्यमभवत्।।८८।।**

अन्वयार्थः- (**एवं**) याप्रमाणें (**श्रीगुरुणा**) दत्तात्रेयानें (**यथावच्छिक्षितस्य**) योग्य प्रकारानें शिकविलेल्या अलर्काला (**देहाद्युपाधिकमात्मनो नानात्वं**) देहोपाधीमुळें आत्मा अनेक भासतो हें, (**कर्तृत्वं भोक्तृत्वं च**) त्याचप्रमाणें आत्म्याला कर्तृत्व भोक्तृक्त्वहि देहोपाधीमुळेंच भासतें हें, (**लोककालागमानित्यत्वं च**) आणि स्वर्गादिलोक भोगकाल व श्रुति यांची अनित्यता (**भोग्यभावानां भगवन्मायामयत्वं**) तसेंच भोग्य स्त्रक्चंदनादि पदार्थ हे ईश्वराच्याच मायेमुळें उत्पन्न झाले आहेत हे, (**सर्वं गुरुप्रसादाद्विजानतः**) सर्व गुरूंच्या कृपेमुळें जाणणाऱ्या (**विरतस्य**) वैराग्यशील असणाऱ्या (**प्रशांतस्य तस्य**) चित्तांत शांत असणाऱ्या त्या अलर्काला (**युगपत्त्रिकाभ्यासवशात्**) एका कालांतच तत्त्वज्ञान, मनोभंग आणि वासनाक्षय या तिघांच्या अभ्यासामुळें (**अपरोक्षसाक्षात्कारदार्ढ्यमभवत्**) प्रत्यक्ष साक्षात्कार होऊन ज्ञानाची दृढता प्राप्त झाली. ।।८८।।

गुणरचितनृदेहसंसृतिघ्नीं परपरमात्मविदं स्वशिष्यलब्धाम्।

द्रुतमिह विदुषोऽस्य सावकाशाण्डचयभृतो जठरे ममुर्मुदो नो।।८९।।

अन्वयार्थः- (**गुणरचितनृदेहसंसृतिघ्नीं**) मायारूप गुणानें केलेल्या नरदेहरूप संसाराला नाश करणारे असें (**परमात्मविदं**) श्रेष्ठ अशा परमात्मविषयक ज्ञान (**द्रुतं**) फार लौकर (**स्वशिष्यलब्धां**) आपल्या शिष्याला मिळालें असें पाहून (**सावकाशांडचयभृतः**) मोकळेपणानें अनंत ब्रह्मांडें धारण करणाऱ्या (**अस्य विदुषः**) या ज्ञानी दत्तात्रेयाच्या (**जठरे**) उदरांत (**मुदः**) आनंद (**न ममु**) मावला नाहीं.) ।।८९।।

गुर्वाज्ञयाग्रजमुपेत्य स आह बन्धो गुर्वाप्तराज्यमिदमस्तसुदुःखसिन्धो।

त्वं स्वीकुरुष्व सुहृदे तव यच्छ वा स्वत्वं स्वीकृतं परिहृतं प्रभुतामुपास्व।।९०।।

अन्वयार्थः- (**गुर्वाज्ञया**) गुरूंच्या आज्ञेनें (**सः**) तो अलर्क (**अग्रजं**) वडील बंधु सुबाहूकडे (**उपेत्य**) येऊन (**आह**) म्हणाला, (**अस्तसमस्तसुदुःखसिंधो**) सर्व दुःखरूप समुद्राचा नाश करणाऱ्या (**बन्धो**) बा अग्रजा, (**इदं**) हें (**गुर्वाप्तराज्यं**) पित्याकडून मिळालेल्या राज्याचा (**त्वं स्वीकुरष्व**) तूं स्वीकार कर (**वा**) किंवा (**तव सुहृदे**) तुझ्या मित्राला काशीराजाला (**यच्छ**) दे. (**स्वीकृतं स्वत्वं**) पूर्वी स्वीकारलेली मालकी (**परिहृतं**) टाकली. (**प्रभुतामुपास्व**) तूं आतां मालकीचा स्वीकार कर. ।।९०।।

सुबाहुरालिङ्ग्य तमाह बन्धो कारुण्यसिन्धोः कृपयास्तबन्धो।

कृतार्थता ते समभागता नः कृताद्य दैवेन भवैकतानः।।९१।।

अन्वयार्थः- (**सुबाहुः**) सुबाहु (**तं आलिंग्य आह**) अलर्काला आलिंगन देऊन म्हणाला (**अस्तबंधो**) मायेचा नाश करणाऱ्या (**बंधो**) भावा (**कारुण्यसिंधोः कृपया**) करुणासागर दत्ताच्या कृपेनें (**ते कृतार्थता जाता**) तुला कृतार्थता आली. (**अद्य दैवेन नः समता कृता**) आज दैवानें आम्हां चौघा भावंडाचा सारखेपणा झाला आहे. (**एकतानः भव**) एकाग्र चित्त हो. ।।९१।.

स्वस्त्यस्तु ते काशिप गच्छयामि वनं कृतार्थोऽद्य न कामकामी।

तं काशिराजोऽप्यवदत्किमाप्तं तन्नैव जाने वद मां तवाप्तम्।।९२।।

अन्वयार्थः- (**काशिप**) अरे काशिराजा (**ते स्वस्त्यस्तु**) तुझें कल्याण असो. (**गच्छ**) तूं आतां जा. (**कृतार्थो वनं यामि**) कृतार्थ असा मी आतां वनांत जातों. (**कामकामी न**) मला कोणतीहि इच्छा नाहीं. (**काशिराजोऽपि तं अवदत्**) काशिराजसुद्धां सुबाहूला म्हणाला (**त्वया किमाप्तं तन्नैव जाने**) तूं काय मिळविलेंस तें मी कांही जाणतच नाहीं (**तवाप्तं मां वद**) तुला काय इष्ट होतें तें मला सांग. ।।९२।.

योगी जगौ मान्यसतीसुता वयं भोगी जजानर्षभवत्क्षितावयम्।

भवत्सहायात्समतात्रिजेक्षयाभवत्सगर्भ्यस्य च शान्तिरक्षया।।९३।।

अन्वयार्थः- (**योगी जगौ**) सुबाहु म्हणाला (**वयं मान्यसतीसुताः**) आम्ही सर्वमान्य पतिव्रता मदालसेचीं मुलें आहोतं. (**अयं**) हा अलर्क (**क्षितौ**) पृथ्वीवर (**ऋषभवत्**)

बैलाप्रमाणें (**भोगी जजान**) भोग भोगणारा होत्साता जन्मला होता. (**भवत्सहायात्**) तुझ्या साहाय्यानें (**अत्रिजेक्षया**) श्रीदत्ताच्या कृपाकटाक्षानें (**सगर्भ्यस्य**) या आमच्या भावाला (**अक्षयाशांतिः**) नाश न पावणारी शांती (**च समता अभवत्**) आणि आमच्या तिघांशीं साम्य झालें. ।।९३।।

स तमथ जगौ स्वत्वान्यत्वे न ते करुणानिधे निरुपमदयाक्लिन्नस्वान्तोऽसि सद्‌गुणशेवधे।
अभवमधुना दैवात्तेऽहं सुसाप्तपदीनभाक् कथमपि ततो मां शाधि स्यान्न येन पुनर्भ्रमः।।९४।।

अन्वयार्थः- (**अथ**) सुबाहुभाषणानंतर (**सः तं जगौ**) काशिराजा सुबाहूला म्हणालाः (**सद्‌गुणशेवधे कृपानिधे**) सद्‌गुणांचे सांठा असणाऱ्या कृपासागरा, (**ते स्वत्वान्यत्वे न**) तुला आपलेपरकेपणा नाहीं. (**निरुपमदयाक्लिन्नस्वांतोऽसि**) उपमारहित अशा दयेनें भिजलेल्या अंतःकरणाचा तूं आहेस. (**अधुना**) आतां दैवात् सुदैवानें (**ते सुसाप्तपदीनभाक्**) तुझी सत्संगति करण्यास मी पात्र (**अभवं**) झालों. (**ततः कथमपि मां शाधि**) म्हणून कसेंहि करून मला ज्ञान दे; (**येन पुनः भ्रमो न**) ज्या ज्ञानामुळें पुनः मला भ्रम होणार नाहीं. ।।९४।।

एवं दीनं प्रणतमथ तं खिन्नचित्तं नितान्तं प्रोचे नो चेन्नरवर महासंपदार्या इहाहुः।
यां तत्त्वज्ञाः परमहितदां साधनाख्यामृते तां नो बोधाप्तिर्भवति भवतो नास्त्यसावाश्रयैताम्।।९५।।

अन्वयार्थः- (**अथ**) काशिराजानें प्रार्थना केल्यानंतर (**एवं दीनं प्रणतं**) याप्रमाणें दीन होऊन नमस्कार करणाऱ्या (**नितांतं खिन्नचित्तं तं**) व अत्यंत खिन्नचित्त असणाऱ्या त्या काशिराजाला (**प्रोचे**) सुबाहु म्हणला; (**नरवर**) अरे नरश्रेष्ठा, (**इह**) या मोक्षमार्गांत (**आर्याः तत्त्वज्ञाः**) श्रेष्ठ तत्त्वज्ञानी लोक (**परमहितदां साधनाख्यां**) अतिशय सुख देणारी साधना नांवाची (**महासंपत् आहुः**) मोठी संपत्ति आहे असें म्हणतात. (**सा नो चेत्**) ती संपत्ती जर नसेल तर (**तां ऋते बोधाप्तिर्न भवति**) तिच्यावांचून ज्ञान होत नाहीं. (**भवतः असौ नास्ति**) तुला ही साधना नाहीं (**अतः एतां आश्रय**) म्हणून तिचा तूं आश्रय कर. ।।९५।।

(गद्यम्) **तदनु महानुभावसेवया षड्लिङ्‌गैस्तात्पर्यावधारणलक्षणेन श्रवणेन युक्त्या संभाविततत्त्वानुसंधानलक्षणेन मननेन ताभ्यां निःसंशयेऽर्थे स्थापितचित्तस्य विजातीयानात्मप्रत्ययानन्तरितसजातीयात्मप्रत्ययप्रवाहीकरणलक्षणेन निदिध्यासेन ध्यातृध्यानभावरहितसुस्थिरध्येयाकारान्तरस्थितिलक्षणेन समाधिना कृती भव।।९६।।**

अन्वयार्थः- (**तदनु**) साधनसंपति मिळविल्यानंतर (**महानुभावसेवया**) सद्‌गुरंच्या सेवेनें (**षड्लिंगैस्तात्पर्यावधारणलक्षणेन श्रवणेन**) उपक्रमादि सहा प्रकारच्या लिंगांनी ज्यांतील तात्पर्य जाणलें आहे अशा श्रवणानें (**युक्त्या संभाविततत्त्वानुसंधानलक्षणेन मननेन**) व जीवशिवांच्या एकतेनें उत्पन्न झाली आहे ध्येयाकारता ज्यामध्यें अशा मननानें (**ताभ्यां निःसंशयेऽर्थे स्थापितचित्तस्य**) श्रवणमननाच्या योगानें अखंडैकरस ब्रह्माचे ठिकाणीं लावलेल्या अंतःकरणाच्या (**विजातीयानात्मप्रत्ययांतरित**) देहादि विरुद्ध ज्ञानानें रहित (**सजातीयप्रत्यप्रवाहीकरणलक्षणेन निदिध्यासनेन**) नित्य शुद्ध, बुद्ध, अद्वय अशा ज्ञानस्वरूप निदिध्यासानें (**ध्यातृध्यानभावररित**) ध्याता, ध्यान व ध्येय व त्रिपुटीनें रहित (**सुस्थिरध्येयाकारांतर स्थितिलक्षणेन**) दृढ व ध्येयाकार मनाची स्थिति ज्यामध्यें अशा (**समाधिना कृती भव**) समाधिसुखानें कृतकृत्य हो. ।।९६।।

यद्यप्यलर्को विषयाक्तचित्तः स्वाम्बाप्रसादेन हि येन दत्तः। गुरुर्गुरूणां भगवानुपात्तस्ततः स मुक्तोऽस्तसमस्तवित्तः।।९७।।

अन्वयार्थः- (**यद्यप्यलर्कः विषयाक्तचित्तः**) जरी अलर्क विषयामध्ये निमग्न असा होता (**तथापि**) तरी (**स्वांबाप्रसादेन**) आपल्या आईच्या कृपाप्रसादानें (**येन**) ज्या अलर्कानें (**गुरूणां गुरूः**) सर्व श्रेष्ठ लोकांचा गुरु (**भगवानुपास्तः**) जो भगवान् दत्तात्रेय त्याची उपासना केली (**ततः**) म्हणून त्या दत्तप्रसादामुळें (**अस्तसमस्तवित्तः स मुक्तः**) सर्व दैवी व मानुषी वित्ताचा त्याग करून मुक्त झाला. ।।९७।।

कोटिजन्मसुकृतादपि लाभो दुर्लभोऽस्य समभूदिह लाभः। यद्दृशा वितिमिरोऽयमलर्कः शेषयेत्किमुदितोऽन्धमिहार्कः।।९८।।

अन्वयार्थः- (**कोटिजन्मसुकृतादपि**) कोटि जन्मांमध्ये केलेल्या पुण्यानें सुद्धां (**यस्य दुर्लभो लाभः**) ज्याचा दुर्लभ आहे तरीहि (**अस्य**) या अलर्काला (**इह लाभः समभूत्**) या जन्मांतच लाभ झाला. (**अयमलर्कः**) हा अलर्क (**तद्‌दृशा**) त्या दत्तात्रेयाच्या कृपादृष्टीनें (**वितिमिरः**) हृदयांधकार गेलेला असा आहे. (**उदितः अर्कः अंधं शेषयेत्किं**)

उगवलेला सूर्य अंधकार शिल्लक ठेवील काय ? ।।९८।।

इत्युक्त्वानुजमाह याहि विपिनं राज्यं कुरुष्वाथवा यास्येऽहं त्विति सोऽगमत्तदनुगः काश्योऽपि सोऽगाद्गतिम्।
पुत्रन्यस्तभरोऽप्यलर्क उदरामत्रो वनं पावनं गत्वात्यन्तिकबुद्धिलब्धपरमानन्दो जगौ पावनम्।।९९।।

अन्वयार्थः- (**इत्युक्त्वा अनुजमाह**) असें काशिराजाबरोबर बोलून अलर्काला म्हणाला (**विपिनं याहि**) वनांत जा (**अथवा**) किंवा (**राज्यं कुरुष्व**) राज्य कर (**अहं तु यास्ये**) मी तर वनांत जातों (**इति स अगमत्**) असें बोलून तो सुबाहु वनांत गेला. (**पुत्रन्यस्तभरः काश्योऽपि**) पुत्रावर राज्यभार टाकलेला काशिराजासुद्धां (**तदनुगः**) सुबाहूच्या मागोमाग जाणारा होत्साता (**गतिमगात्**) मुक्तीला गेला. (**उदरामत्रः**) उदर हेंच ज्याचें भोजनपात्र आहे असा (**पुत्रन्यस्तभरः स अलर्कोऽपि**) पुत्रावर भूमीचा भार टाकणारा तो अलर्क पण (**आत्यंतिकबुद्धिलब्धपरमानंदः**) बुद्धीनें अतिशय आनंद प्राप्त करून घेणारा होत्साता (**पावनं वनं गत्वा**) पवित्र अशा वनांत जाऊन (**पावनं जगौ**) प्रेमगद्गद रमणीय असें गायन करता झाला. ।।९९।।

अहहाऽभेदेनायं भवहाप्तो मे निर्मायम्।।धृ।।
अत्यर्थं यस्य तु सदयं भक्त्यर्थं मृदुलं हृदयम्।
युक्त्यर्थं भाविकहृदयम् मुक्त्यर्थं संसृतिहृदयम्।।
(अन्यारीतिः।)**तममेयं श्रुतिगणगेयं हृतमायं मुनिविज्ञेयं।**
अद्वयं ह्यत्रेस्तनयं भावये दत्तात्रेयम्।।१।।
तष्णायां सत्यां स्त्र्याद्यं यल्लोके तन्नैकस्य।
तृप्तिदं विषसुभोगस्तृप्तयेऽप्यत्र तु कस्य।।
(अन्यारीतिः।)**तृष्णायां नष्टाया मे भोगेच्छा शिष्टा का मे।**
श्रीदत्तेऽत्रात्मारामे सुतरा मे तस्थौ हृदयम्।।२।।
आगमापायीन्द्रियजं सोपाधिकमकसंभिन्नं।
आगमान्यदृशा दृष्टं यत्सुखं स्वस्मादि्भन्नं।
(अन्यारीतिः।)**मौर्ख्यं तत्सत्त्विदमेवं दग्ध्वा योगेन कुभावं।**
प्राप दत्तेनैकीभावं वासुदेवेनैवामायम्।।३।।

अन्वयार्थः- (**अहह**) काय आश्चर्य आहे ! (**म**) माझ्याकडून (**अभेदेन**) अभेदभक्तीनें (**अयं**) हा (**निर्मायं भवहा**) मायारहित असा संसार घालविणारा दत्तात्रेय गुरु (**आप्तः**) मिळविला. (**भक्त्यर्थं**) स्वतःची भक्ती सिद्ध होण्याकरतां (**यस्य तु अत्यर्थं मृदुलं हृदयं**) ज्याचें हृदय तर अतिशय कोमल आहे, (**युक्त्यर्थं**) योगाभ्यास सिद्ध होण्यासाठीं (**भाविकहृद् अयम्**) भाविकांच्या हृदयामध्यें वास करणारा आहे, (**मुक्त्यर्थं**) मुक्ति मिळण्याकरितां (**संसृतिहृत् अयं**) संसाराचा नाश करणारा हा आहे, (**तं अमेयं**) त्या प्रमाणागोचर भासणाऱ्या (**श्रुतिगणगेयं अमायं**) अनंक श्रुतिद्वारा ज्याचें गायन केलें जातें अशा व मायारहित अशा (**मुनिविज्ञेयं अद्वयं**) मुनींनीं जाणलेल्या व द्वैतरहित असणाऱ्या अशा (**अत्रेस्तनयं दत्तात्रेयं भावये**) अत्रिनंदन दत्तात्रेयाला नमस्कार करतों ।।१।। (**तृष्णायां सत्यां**) इच्छा असेल तर (**लोके**) लोकांमध्ये (**स्त्र्याद्यं यत्**) स्त्री वगैरे जे विषय आहेत (**तन्नैकस्य तृप्तिदं**) ते विषय एकाला सुद्धां तृप्ती देणारे होऊं शकत नाहींत (**अत्र तु**) या संसारांत तर (**विषयसुभोगः**) विषयाचा चांगल्या प्रकारें भोग (**कस्य तृप्तये**) कोणाच्या तृप्तीला कारण झाला आहे? (**मे तृष्णायां नष्टायां**) म्हणून माझी भोगतृषाच जर नष्ट झाली तर (**मे भोगेच्छा का शिष्टा**) मला कोणती भोगांची इच्छा राहील ? (**आत्मारामे श्रीदत्ते**) फक्त आत्मसुखांत रममाण होणाऱ्या श्रीदत्ताचे ठिकाणींच (**मे हृदयं सुतरां तस्थौ**) माझें चित्त

अत्यंत स्थिर झालें आहे ।।२।। (**आगमापायि**) उत्पत्ति व नाशशील (**इंद्रियजं**) इंद्रियापासून उत्पन्न झालेलें (**सोपाधिकमसंभिन्न**) उपाधीहून वेगळें असणारें (**आगमान्यदृशा दृष्टं**) वेदापेक्षां दुसऱ्या लौकिक दृष्टीनें पाहिलेलें (**यत्सुखं तत्स्वस्माद्भिन्नं**) जें सुख आहे तें आपल्यापेक्षां वेगळें आहे (**तन्मौर्ख्यं**) असें इंद्रियापासून सुख मिळविणें मूर्खपणा होईल. (**सत्त्विदम्**) खरें जें सुख आहे तें नष्ट तृष्णेमुळें झालेलें तेंच आहे. (**एवं**) याप्रमाणें गाऊन (**योगेन कुभावं दग्ध्वा**) योगसामर्थ्यानें अग्नि धारणा करून त्या अग्नीनें देहादि कुत्सित वासना जाळून (**अमायं**) मायारहित असें (**वासुदेवेन दत्तेन**) सर्व भूतें ज्यामध्यें वास्तव्य करतात असा जो दत्तात्रेय देव त्याच्याशीं (**एकीभावं प्राप**) एकरूप झाला ।।१००।।

द्वितीय स्तबक समाप्तः

श्रीगणेशदत्तगुरुभ्यो नमः

श्रीदत्तचंपूचें भाषान्तर

तृतीय स्तबक

भाषांतरकारः - वे.शा.सं. बापूशास्त्री, कोडणीकर, नरसोबावाडी

अथ दत्तचम्पू :- (तृतीयस्तबकः)

मधुकृदगजगराप्तौ प्राह वैराग्यतोषौ स्वजपिहितजलाभं यः स्वसौख्यं सशेषे।
मृगजलविषयात्प्रह्लादमूचे विरक्तं निजगतिमनुपाधिं तं च निन्ये स्वभक्तम्।।१।।

अन्वय :- मधुकृदजगराप्तौ वैराग्यतोषौ प्र-हादं यः प्राह । (तथा) सशेषे (आत्मनि) स्वसौख्यं स्वजपिहितजलाभं मृगजलविषयात् विरक्तं प्र-हादं ऊचे । च तं स्वभक्तं अनुपाधिं निजगतिं निन्ये ।

अर्थ :- यानंतर संक्षेपानें प्रल्हाद भक्तावर केलेला अनुग्रह मालिनीवृत्तानें वर्णन करतात. मधमाशी व अजगर यांच्यापासून आपणांला प्राप्त झालेलें वैराग्य व संतोष ज्यांनीं आपल्या प्र-हाद नामक भक्ताला सांगितले, स्रक्चन्दनवनितादि उपकरणांनी युक्त असलेल्या आत्म्याचे ठिकाणीं असणारें जें स्वरूपसुख, जलापासून निर्माण झालेल्या शैवालानें आच्छादित असलेल्या जलाप्रमाणें अज्ञानानें आच्छादित झाल्यासारखें दिसतें तें, स्वरूपसुख मृगजलाप्रमाणें असणाऱ्या विषयापासून विरक्त झालेल्या प्रऱ्हादाला ज्यांनी सांगितलें व देहत्रयातीत असणाऱ्या आपल्या वैष्णवपदाप्रत प्रऱ्हादाला ज्यांनी पोंचविलें तेच हे श्रीदत्त होत. ।।१।।

भावार्थ:- कोणा एके वेळीं लोकपरिस्थिति जाणण्याकरतां सह्य पर्वतावर फिरत असतां प्रऱ्हादानें कावेरी तीरावर भोगसाधनरहित असून ज्याचा देह पुष्ट आहे व जो आनंदात आहे, अशा अवधूतांना पाहिलें व एवढा मोठा आनंद तुम्हांला कसा मिळाला, असें त्यानें विचारलें असतां अवधूत सांगतातः- मधमाशी व अजगर या दोघांपासून मी वैराग्य व संतोष हे दोन गुण घेतले,. ते असेः- मधमाशी दिवसभर खपून मध साठवते पण स्वतः उपभोग घेत नाहीं व दुसऱ्याला घेऊ देत नाहीं. अखेर तो साठा मधमाशांना मारून तिसराच घेऊन जातो. यावरुन विषयसंचय करणें दुःखाला कारण आहे. म्हणून विषय हे दुःखदायक असल्यानें त्याज्य आहेंत असा मधमाशीपासून वैराग्य हा गुण घेतला. दुसरा तो अजगर, हा अन्नावांचून पुष्कळ दिवस काढतो. त्याकरतां काहीसुद्धां श्रम करीत नाहीं. यदृच्छेनें केव्हां काहीं मिळेल तितकेच खाऊन आनंदांत असतो. त्यापासून संतोष हा गुण घेतला. त्याचप्रमाणें स्रक्-चंदनवनितादि उपकरणांनीं युक्त असलेल्या आत्माचे ठिकाणीं असणारें स्वरुपसौख्य अज्ञानाने आच्छादित आहे. ज्याप्रमाणें शैवालानें जल आच्छादिलेलें असतें, त्या जलाचा त्याग करून तृषार्त झालेला मनुष्य मृगजलाच्यामागें धांवूं लागतो व त्याला एक पाण्याचा थेंबसुद्धां मिळत नाहीं पण जेव्हां त्याला विचार उत्पन्न होईल तेव्हा तो परत येऊन शैवाल दूर करुन जलपान करतो व सुखी होतो. त्याचप्रमाणें जीव आपल्या अज्ञानानें झाकून गेलेलें स्वसौख्य सोडून देऊन सुख मिळण्याच्या आशेनें सुखाभासरुप असणाऱ्या विषयांकडे धाव घेतों. अर्थात् त्याला तिथें दुःखाचाच अनुभव येतो, आणि जेव्हां त्याला विषयदोष पाहून वैराग्य उत्पन्न होतें, तेव्हां तो गुरूपदेशानें परत फिरून परमसुखाला मिळवतो. याप्रमाणें प्रऱ्हादाला अवधूतानें ज्ञानाचा उपदेश करून पुनरावृत्तिरहित अशा आपल्या वैष्णवपदाला नेलें.।।१।।

पञ्चविंशतिभूम्यादिगुरुप्राप्तं स्वशिक्षणम्। योऽन्वीक्षणं यदुं प्रोचे हेयोपादेयलक्षणम्।।२।।

अन्वयः- पञ्चविंशतिभूम्यादिगुरुप्राप्तं हेयोपादेयलक्षणं अन्वीक्षणं स्वशिक्षणं यः यदुं प्रोचे।

अर्थः- पृथ्वीआदींकरुन पंचवीस पदार्थरूप गुरूंपासून मिळवलेलें दोषत्याग व गुणग्रहण असें अन्तर्मुख वृत्ति उत्पन्न करणारें तत्त्वज्ञान ज्या भगवान् दत्तात्रेयानें यदु नामक राजाला सांगितलें, तेंच हे श्रीदत महाराज आहेत. ।।२।।

धृतिसत्यशमादिसाधनैः सकुसङ्गोत्सृतिभिर्मरुद्घनैः।
अहिपिङ्गलसाध्यदेवता गतिमूचे य इहानताविता।।३।।

अन्वयः- धृतिसत्यशमादिसाधनैः सकुसंगोत्सृतिभिः मरुद्घनैः अहिपिंगलसाध्यदेवताः (प्रति) इह आनताविता यः गतिं ऊचे ।

अर्थः- सात्विक धैर्य, यथार्थ भाषण, व अन्तरिन्द्रियनिग्रह इत्यादि अंतरंगसाधनांनी दुष्ट संगाचा त्याग करून दैवी संपत्तीन मिळणारें ज्ञान या भूलोकीं शरणागतरक्षक अशा ज्या श्रीभगवान् दत्तात्रेयानें पिंगल नाग व साध्यदेव यांना सांगितलें, तेच हे दत्तात्रेय होत.।।३।।

आत्रेयदत्तो विधिविष्णवजात्मा स मे परात्मा गुरुदेवतात्मा।
यो नोऽनसूयात्रिसुतोऽधिपुण्यादिहोपलब्धः सुरतो महात्मा।।४।।

अन्वयार्थः- यः विधिविष्णवजात्मा आत्रेयदत्त मे गुरुदेवतात्मा परात्मा सः अनुसूयात्रिसुतः सुरतः महात्मा इह नः अधिपुण्यात् उपलब्धः (अस्ति) ।

अर्थः- जो ब्रम्हा, विष्णु व महेश्वर असा त्रिगुणात्मक अत्रिकुमार दत्तात्रेय माझा गुरू देवतारूप जो परमात्मा तो दयाळु व आत्मदानामुळें उदार असा या लोकीं आमच्या अत्यन्त पुण्योत्कर्षानें प्राप्त झाला.।।४।।

अनन्यगतिचातकं घन इहाभिवर्षत्यलं तथापि सकलासुधारिपरितृप्तयेऽलं जलम्।
तथा करुणयावतीर्ण इह योऽनसूयासुतो महर्षिवरदोऽपि नोऽत्र परदोऽभवत्सद्गतिः।।५।।

अन्वयः- इह अनन्यगतिचातकं (अभिलक्ष्य) घनः अलं जलं वर्षति । तथापि (तत्) सकलाऽसुधारिपरितृप्तये अलं (भवति एवं यथा) तथा अत्र करुणया अवतीर्णः यः अनुसूयासुतः महर्षिवरदः अपि सद्गतिः सः नः परदः अभवत् ।

अर्थः- या भूलोकीं मेघाच्या पाण्याशिवाय ज्यांना पाणि नाहीं, अशा चातकपक्ष्यांना उद्देशून मेघ भरपूर पाण्याचा वर्षाव करतो. तरी पण तें पाणी सर्व जीवांच्या संतोषाला पुरेंसें होतें. हे जसें आहे तसें या लोकीं अवतारित जे अनुसूयासुत श्रीदत्त अत्रि ऋषींना वर देणारे असूनहि भक्तकामकल्पद्रुम जे दत्तात्रेय ते आम्हां सर्वांना मोक्ष देणारे असे झाले आहेत. ।।५।।

चातकस्य कियती तृडपोऽस्मै यो ववर्ष किमलं न परस्मै।
तास्तथापि न चिरस्थितोऽयं नित्य एष भगवान्वरदोऽयं।।६।।

अन्वयः- चातकस्य तृट् कियती (अत्यल्पजलापेक्षैव) यः (मेघः) अस्मै अपः ववर्ष । ताः परस्मै (इतरजीवाय) अलं न किम् । (अपि तु पयार्प्तमेव) तथापि (ताः) चिरस्थितयः न भवन्ति । अयं वरदः भगवान् श्रीदत्तात्रेयः नित्य एव (भवति) ।

अर्थः- चातकपक्ष्यांची तहान किती? अतिशय थोडी, पण मेघ त्याच्याकरितां वर्षाव करतो. ते पाणी सर्व प्राण्यांची तहान भागवीत नाहीं काय? . तर सर्वांची तहान भागवून पुष्कळ आनंद देतें. परंतु तें पाणी फार वेळ राहत नाहीं. हे वर देणारे श्रीभगवान् दत्तात्रेय निश्चयानें त्रिकालाबाधित म्हणजें अविनाशी आहेत म्हणून मेघाचा दृष्टांत देणें योग्य होत नाहीं.।।६।।

भगीरथो यत्नत आनयद्गां गङ्गां स्वमुक्त्यै न इहापि मुक्त्यै।
साऽयं तथैवापि च सैकदेशेऽयं स्मर्तृगामी सकलप्रदेशे।।७।।

अन्वयः- भगीरथः स्वमुक्त्यै गङ्गां गां आनयत् । सा इह नः अपि मुक्त्यै अभूत्। तथैवाऽपि अयम् । सा च (गङ्गा) एकदेशे (विद्यते) अयं स्मर्तुगामी (अत एव) सकलप्रदेशे (उपलभ्यते) ।

अर्थः- राजा भगीरथानें आरल्या पूर्वजांच्या उद्धाराकरितां तपश्चर्यारुप प्रयत्न करुन गंगा या भूमितलावर आणली. ती गंगा आम्हा सर्वाच्या उद्धाराकरितां उपयोगी पडली. त्याचप्रमाणें हे श्रीभगवान् दत्तात्रेय अत्रिमुनीच्या मोठ्या तपश्चर्यारुप प्रयत्नांनी या भूलोकी अवतीर्ण झालें व आम्हां सर्वाच्या उद्धाराकरितां उपयोगी पडले. म्हणून भगीरथीची उपमा देणें योग्य आहें असे कोणी म्हणेंल तर ही उपमा बरोबर जुळत नाहीं. कारण ती गंगा एका उत्तर प्रदेशांतच आहे. पण श्रीभद्दत्तात्रेय हें स्मर्तुगामि असल्यामुळें जिथें स्मरण होईल तिथें ते येतात. म्हणजे सर्वच ठिकाणीं त्यांची प्राप्ती होते. उपमान व उपमेय यांच्यांत वैशिष्ट्य दाखविल्यामुळें इथें *व्यतिरेक* नामक अलंकार होतो.

तोयैकदानो घन आगतः क्वचिद्गङ्गाघभङ्गा स्थिरकल्पपादपः।
संकल्पितं रात्यघतापपापहाऽसंकल्पितं यश्चरकल्पपादपः।।८।।

अन्वयः- क्वचित् आगतः घनः तोयैकदानः (एव भवति) (या पूर्वोक्ता गङ्गा) अघभङ्गा (एव भवति) स्थिरकल्पपादपः (संनिहितेभ्य एव) सङ्कल्पितं (एव) राति। यः (श्रीदत्तात्रेयः) (सः) अघतापपापहा चरकल्पपादपः (सन्) असङ्कल्पितं (राति)।

अर्थः- कुठून तरी आलेला मेघ केवळ पाणीच देतो, आणखी काहीच देऊं शकत नाहीं. पूर्वी वर्णिलेली गङा नुसतें पापच नष्ट करते. कल्पवृक्षाची उपमा द्यावी तर तो स्थावर कल्पवृक्ष जवळ येणाऱ्यालाच व मागेल तितकेंच देतो. पण जो भगवान् श्रीदत्तात्रेय तो सर्वत्र संचार करणारा कल्पवृक्ष पापताप दैन्य नाहींसें करतो. इतकेंच नव्हे तर आपला भक्त कुठेंहि असो,त्याच्या मनांतील

कामना न मागतांहि पूर्ण करतो. या श्लोकांतहि पूर्वींच्या श्लोकासारखा *व्यतिरेक* आहे. ।।८।।

निद्रा मातृपुरेऽस्य सह्यशिखरे पीठंमिमंक्षापुरे।
काशाख्ये करहाटकेऽर्घ्यमवरे भिक्षाऽस्य कोलापुरे।।
पाञ्चाले भुजिरस्य विठ्ठलपुरे पत्रं विचित्रं पुरे।
गान्धर्वे युजिराचमः कुरुपुरे दूरे स्मृतो नान्तरे।।९।।

अन्वयः- अस्य निद्रा मातृपुरे सह्यशिखरे पीठं काश्याख्ये पुरे अस्य मिमंक्षा करहाटके पुरे अर्ध्यम् । अवरे कोल्हापुरे भिक्षा (अस्ति) पात्र्चाले पुरे भजिः (भवति) । विठ्ठलपुरे अस्य विचित्रं पत्रम् । गांधर्वे पुरे युजिः। कुरुपुरे आचमः । (एवं पर्यटनशीलोऽपि भक्तैः) स्मृतः (यः) दूरे न (वर्तते किन्तु) अन्तरे (प्रादुर्भवति) ।

अर्थः- या श्रीदत्तमहाराजांची निद्रा म्हणजे सह्य पर्वताच्या पायथ्याशीं रेणुकानगरांत आहे. त्यालाच हल्लीं मातापूर असें म्हणतात. सह्यनामक पर्वताचे शिखरावर राहाण्याचें स्थान आहें. या श्रीदत्तात्रेयांचे काशीनामक महाक्षेत्रांत गङ्गास्नान होतें. कऱ्हाडनामक क्षेत्रांत अर्घ्यदान म्हणजे प्रातःसंध्यावंदन असतें. श्रीमहालक्ष्मीचें राहाण्याचें ठिकाण व दक्षिण काशी, या दोन कारणांमुळें श्रेष्ठ अशा कोल्हापुरांत भिक्षा म्हणजें माधुकरी मागणें असतें. पांचालेश्वर क्षेत्रामध्यें त्या माधुकरीचे भोजन होतें. कोल्हापुरांतून भिक्षा आणावयाची आणि पांचालेश्वरी भोजन करावयाचें. भू-वैकुंठ श्रीपंढरीक्षेत्रांत या श्रीदत्तप्रभूचें चंद्रभागातीरावर तिलकधारण म्हणजें गंध लावणें होतें. प्रसिद्ध अशा श्रीगाणगापुरांत श्रीदत्तात्रेयांचे ध्यान होतें आणि कुरुक्षेत्रांत आचमन असतें. याप्रमाणें सर्वत्र संचार करणारा जरी हा प्रभू आहे, तरी भक्तांनी स्मरण करतांच तो दूर राहत नाहीं, तर त्याच्या हृदयांत प्रकट होतों.।।९।।

तमत्रिजातं श्रुतिजातगीतं वदान्यवित्तं प्रथितं हि दत्तं।
सह्याचले चन्द्रकुलोत्थ आयुराजा शरण्यं शरणं जगाम।।१०।।

अन्वयः- श्रुतिजातगीतं वदान्यवित्तं हि प्रथितं शरण्यं सह्याचले (वर्तमानं) अत्रिजातं तं दत्तं चन्द्रकुलोत्थः आयु राजा (पुत्रकामः सन्) शरणं जगाम ।

अर्थः- वेदत्रयींनें वर्णन केलेला, दानशूरांमध्ये श्रेष्ठ म्हणून सर्वप्रसिद्ध,शरण आलेल्यांचे रक्षण करणारा, सह्यनामक पर्वतावर असणारा, असा जो अत्रिऋषि-कुमार त्या श्रीदत्तप्रभूला चंद्रकुलांत जन्मलेला आयु नावांचा राजा पुत्राची इच्छा असणारा शरण गेला. ।।१०।।

स्वच्छाम्बुपूर्णसरसीसरसीरुहान्तश्चक्रेऽत्र केलिकलहं कलहंसजातम्।
तस्मिन्नुडाद्युपरमे परमे निविष्टं देवं ददर्श वरदं वरदण्डहस्तम्।।११।।

अन्वयः- स्वच्छाम्बुपूर्णसरसीसरसीरूहान्तः कलहंसजातं अत्र केलिकलहं चक्रे। रुजाद्युपरमे तस्मिन् परमे (पर्वते) निविष्टं वरदण्डहस्तं वरदं देवं (श्रीदत्तं) ददर्श (आयुः)।

अर्थः- निर्मळ पाण्यांनी तुडुंब भरलेल्या सरोवरामध्यें हंस पक्षी ज्या पर्वतावर क्रीडा करतात, त्या राग, द्वेष व मत्सररहित, श्रेष्ठ सह्य पर्वतावर दण्ड धारण करणारे, वर देणारे, व तेजःपुंज असे जे श्रीदत्तगुरू त्यांना आयुराजानें पाहिलें. ।।११।।

चिरोपोषिताक्षीष्टसत्पारणेव चिरभ्रान्तचित्तभ्रमवारणेव।

कृपेक्षेच्छुनाजस्य मूर्तिर्मुदेव नृपेणेक्षिता तस्य मूर्ता मुदेव।।१२।।

अन्वयः- चिरोपोषिताक्षीष्टसत्पारणा इव (किं च) चिरभ्रान्तचित्तभ्रमावरणा इव तस्य अजस्य मूर्तिः कृपेक्षेच्छुना (नृपेण) मुदेव मूर्ता मुद्रा इव ईक्षिता ।

अर्थः- दर्शनाच्या इच्छेनें पुष्कळ वेळ उपोषित असलेल्या नेत्रांना इच्छाभोजनच कीं काय, किंवा फार दिवसांचा मोहच निरास करणारी कीं काय, अशी त्या जन्मादिविकाररहित श्रीदत्तप्रभूची मनोहर मूर्ति कृपाकटाक्षाची इच्छा करणाऱ्या त्या आयुराजानें आनंदानें मूर्तिमंत देहधारी आनंदच काय अशी पाहिली ।।१२।।

स तमागतमात्मतुष्टये धुतमानं नतमात्मदृष्टये। निजगौरवभृत्सुमर्षणो निजगौ मत्त इव स्वमर्षणः।।१३।।

अन्वयः- आत्मतुष्टये धुतमानं आत्मदृष्टये नतं आगतं (तं भूपं) सततं निजगौरवभृत् सुमर्षण (ईदृगपि बहिः) इव (श्रीदत्तात्रेयः) निजगौ।

अर्थः- पुत्रलाभरुप मिळणाऱ्या आपल्या आनंदासाठी अभिमान टाकलेल्या आणि आपल्या दर्शनाकरितां नम्र होऊन आलेल्या त्या आयुराजाला नेहमी स्वभक्ताचा अभिमान बाळगणारे म्हणूनच भक्तवत्सल, भक्ताभिमानी, असें बिरुद धारणारे श्रीदत्तप्रभू आंत शांत जरी होते, तथापि बाहेरुनच उन्मत्त असून अतिशय राग आल्यासारखे बोलूं लागले. ।।१३।।

रे रे मूढ विरूढदर्प कुपथारूढातिगूढाश्रमे कस्मात्त्वं भ्रमसीत आशु न यदा यास्यस्यरं तेऽश्रमं।

निःशेषभ्रममूलकृंतनमिह द्राक्कारयिष्येऽधुनास्त्रीवक्त्राद्गलता समेन मधुनाशुद्धोऽस्म्यहं सीधुना।।१४।।

अन्वयः- रे मूढ , रे विरूढदर्प हे कुपथारूढ (अस्मिन्) अतिगूढाश्रमें कस्मात् त्वं भ्रमसि। इतः आशु यदा न यास्यसि (चेत्तर्हि) अश्रमं ते निःशेषभ्रममूलकृन्तनं इह द्राक् अरं कारयिष्ये । (यतः) अधुना स्त्रीवक्त्रात् गलता समेन सीधुना अहं अशुद्धः अस्मि ।

अर्थः-- अरे हे विवेकशून्या गर्विष्ठा कुमार्गगा या अगदी एकांतांत असलेल्या आश्रमांत तूं कां फिरतो आहेस एथून आतांच्या आतां जर गेला नाहींस तर विना आयास तुझा माझ्याबद्दल असलेला सर्व भ्रम या क्षणींच समूळ नष्ट करुन टाकीन. कारण या वेळीं मी या स्त्रीच्या मुखांतील अतिमधुर व उच्छिष्ट मद्य प्राशन केल्यामुळें अशुद्ध आहें.।।१४।।

असा हा तात्काळ लक्षांत येणारा उत्तानार्थ झाला. पण भक्तवत्सल श्रीगुरुदत्त यांच्या बोलण्याचा गूढ अभिप्राय वेगळाच आहे. तो असाः-

अन्वयः- हे अमूढ। विरूढदर्प कुपथारुढ। (अस्मिन्) अतिगूढाश्रमे कस्मात् त्वं भ्रमसि। इतः आशु यदा न यास्यसि (चेतर्हि अश्रमं ते निःशेषभ्रममूलकृन्तनं द्राक अरं कारयिष्ये। (यतः) अधुना स्त्रीवक्त्रात गलता मधुना समेन सीधुना अहं शुद्धः अस्मि।।१४।।

अर्थः- हे विचारशीला । गर्विष्ठ व दुराचारी लोकांपेक्षा विशेष म्हणजे सूज्ञपुरुषा राजा। अत्यंत एकान्तांत असलेल्या या आश्रमांत येऊन येथें कां फिरुं लागला आहेस? येथून तात्काळ जर गेला नाहींस तर योगाभ्यासादि श्रम पडू न देतां तुझें सर्व अज्ञान नष्ट करतों. कारण मी या वेळीं सुषुम्ना या नांवाची अमृतस्त्रावी नाडी हीच कोणी स्त्री तिच्या मुखांतून येणारें मद्यासारखें गोड व उन्मत्त करणारें अमृत प्राशन करीत असल्यामुळें मी अत्यंत शुद्ध आहें.।।१४।। (श्रीदत्तात्रेयाचे षोडश अवतार आहेत. त्यांत मायायुक्ताऽवधूत या नांवाचा एक अवतार आहे. तो असा आहे.)

भर्त्सितस्ताडितोप्येवं पतितोऽग्रे स नीतिमान्। दयालो मा कुरूपेक्षां पाहि मेत्याह भक्तिमान्।।१५।।

अन्वयः- एवं भर्त्सितः ताडितः अपि अग्रे पतितः नीतिमान् भक्तिमान् सः (आयुः) दयालो । उपेक्षां मा कुरु मां पाहि इति आह।

अर्थः- याप्रमाणें तिरस्कार केलेला व दगडादिकांनी मार खाल्लेला असा जरी तो आयुराजा होता, तरीहि साष्टांग नमस्कार घालणारा, आचारसंपन्न व प्रेमळ असा तो राजा आयु, हे दयाळा । माझा तिरस्कार करु नका, माझें रक्षण करा असें म्हणाला.।।१५।।

प्रणतं प्राह भगवानसि त्वं मयि भक्तिमान्। मद्यं सास्त्रामिषं देहि हृद्यं तोषोऽन्यथा न हि।।१६।।

अन्वयः- प्रणतं (राजानं) भगवान् प्राह। (राजन्) त्वं मयि भक्तिमान् असि (अतः मह्यम्) सास्त्रामिषं हृद्यं मद्यं देहि। हि अन्यथा (मम) तोषः न (स्यात)।

अर्थः- नम्र अशा आयु राजाला श्रीदत्तात्रेय म्हणाले, राजा तूं माझ्यावर अत्यंत प्रेम करणारा आहेस, म्हणून मला रक्त व मास यांसह गोड मद्य दे. कारण त्यावांचून मला आनंद होणार नाहीं. ।।१६।।

तथेति साक्षात्स पशुसोमबुद्ध्याऽण्डयोनये। यथेष्टं संस्कृतं रुच्यं तथादाच्छास्त्रयोनये।।१७।।

अन्वयः- तथा इति (उक्त्वा सः) अण्डयोनये (च) शास्त्रयोनये (श्रीदत्तात्रेयाय) साक्षात् पशुसोमबुध्या यथेष्टं संस्कृतं रुच्यं मांस च मद्यं अद्यात्।

अर्थः- बरें आहे, आपण म्हणता त्याप्रमाणें देतों. असें म्हणून त्या आयुराजानें या ब्रम्हांडाला व वेदत्रयीला मूळ कारण अशा श्रीदत्तात्रेयांना प्रत्यक्ष मांसदानानें पशुयागसिद्धि व मद्यदानानें सोमसिद्धि होईल, अशा बुद्धीनें पुरे होईपर्यंत व मिष्ट जसें होईल तसें उत्तम रीतीनें तयार करुन त्यांच्या इच्छेप्रमाणेंच मांस व मद्य दिलें.।।१७।।

इतीश्वरः क्षितिपतिना प्रसादितो मतीश्वरः स रुचिरां प्रमोदतः।
जगौ गिरं वरय वरं मदर्चको न चेतरं पुनरिह याचितुं क्षमः।।१८।।

अन्वयः- मतीश्वरः इति क्षितिपतिना (राज्ञा) प्रसादितः ईश्वरः (श्रीदत्तात्रेयः) प्रमोदतः रुचिरां गिरं जगौ। (हे राजन्) मदर्चकः इह पुनः इतरं वरं याचितुं क्षमः न (भवति)।

अर्थः- बुद्दिप्रेरक व निष्कपट सेवेनी आयु राजानें प्रसन्न केलेले सर्व शक्तिमान् श्रीदत्तगुरु अति आनंदित होऊन मधुर वाणीनें म्हणालें, हे राजा। माझी सेवा करणारा भजक या लोकीं मी प्रसन्न जाहलों असतां दुसऱ्याजवळ कसलीही याचना करीत नाहीं. कारण मीच सर्व इच्छा पूर्ण करण्यास समर्थ आहें, हें लक्षांत आणून जो वर मागावयाचा असेल तो माग.।।१८।।

भूपस्तं नत्वाहासुरसुरनरजेतारं शूरं दातारं सुरवर सुतमुत्तारम्।
देहीत्याहेशं विधिहतमतिरेवायू रंकायैकोलं भवति जगत्यूर्णायुः।।१९।।

अन्वयः- भूपः तं ईशं (श्रीदत्तात्रेयम्) नत्वा आह। हे सुरवर। असुरसुरनरजेतारं शूरं दातारं उत्तारं (ईदृशं) सुतं देहि। आयुः विधिहृतमतिः एव (अभूत् हि) जगति रंकाय एकः ऊर्णायुः (अपि) अलं भवति।

अर्थः- राजा आयु त्या सर्वसमर्थ श्रीदत्तात्रेयांना वंदन करुन बोलला, हे देवश्रेष्ठा! दत्तात्रेया! दैत्य, देव व मनुष्य यांना जिंकणारा, पराक्रमी, दाता, कुलाचा उद्धार करणारा असा सुपुत्र द्या. कोणी म्हणेल अहो मोक्ष न मागतां आयुराजानें श्रीदत्तमहाराजांजवळ नश्वर पुत्र कां मागितला, तर दुर्दैवानें त्याच्या बुद्धीला मोह झाला. कारण एकाद्या श्रेष्ठ दात्यानें एकाद्या दरिद्राला हा भाताचा कोंडा न मागतां जन्मभर तुझा चरितार्थ चालण्यासारखें एकादें गांव माग म्हणून पुनः पुनः सांगितले तरी तो कोंडाच मागून घेतो. तसें मोक्ष देणाऱ्या श्रीदत्तप्रभूजवळ राजाला पुत्रच मागण्याची बुद्धि झाली. लोकांमध्ये दुर्दैवानें पछाडलेल्या दरिद्राला श्रेष्ठ दात्यापासून एक बोकड जरी मिळाला तरी तो त्या एका बोकडानेंच संतुष्ट होतो. ।।१९।।. **येथें अर्थान्तरन्यासनामक अलंकार आहे.**

प्रभुरपि च तथाविधात्मजलब्धये फलमिनपतये ददौ स्वविभूतये।
स्वहृदि सकलं निधाय स भावि शं मृडयति मृदिभैर्नृपोऽपि हि बालिशम्।।२०।।

अन्वयः- प्रभुः सः अपि तथाविधात्मजलब्धये च स्वविभूतये इनपतये (तस्य) सकलं भावि शं हृदि निधाय फलं ददौ। हि नृपः (अपि) मृदिभैः बालिशं मृडयति।

अर्थः- सर्वसमर्थ श्रीदत्तप्रभूनेंहि वर मागितल्याप्रमाणें पुत्रप्राप्तिस्तव च विभूतिभूत जो नराधिपति आयुराजा त्याला त्याचें पुढील कल्याण लक्षांत आणून एक फळ दिलें. कोणी म्हणेल हें अयोग्य केलें. तर तसें नाहीं. या लोकींहि प्रत्यक्ष हत्ती, घोडे इत्यादि वैभव

असणारा राजा देखील मातीच्या हत्तीनेंच आपल्या अज्ञ बालकाची समजूत करितो. ।।२०।।

स निजपुरमगात्फलमिदमदात्स्त्रिय इयमपि गर्भमथ वरमधात्।

दिगधिपलवजं दिगिव जलधिजं निजपतिरतितः प्रभुफलबलतः।।२१।।

अन्वयः- सः निजपुरं अगात् । अथ इदं फलं स्त्रियै अदात् । इयं अपि प्रभुफलबलतः (च) निजपतिरतितः जलधिजं दिक् इव दिगधिपलवजं वरं गर्भं अधात् ।

अर्थः- तो आयुराजा आपल्या नगराला आला, आणि त्यानें श्रीदत्तानें दिलेलें प्रसादरुप फळ राणी इंदुमतीला दिलें. तिनें श्रीदत्तप्रसादरभूतफलप्रभावानें व पतिसंभोगानें पूर्व दिशा जशी चंद्राला धारण करते त्याप्रमाणें इन्द्रादि लोकपालांचा अंशभूत असा गर्भ धारण केला. ।।२१।।

(गद्यम्) **तदनु श्यामसुंदरपरपुरुषेण क्षीरपूर्णशंखेनाभ्युक्ष्य मौक्तिकमात्मने दत्तमिति राज्येन्दुमत्याऽऽवेदितस्वप्नस्य श्रीदत्तप्रसादजन्यो हुण्डासुरघ्नः प्रतापी पुत्रो जनिष्यत इति शौनकोदितं भाविफलं चारणमुखाच्छ्रुतं हुण्डासुराय तत्कन्याऽऽवेदयामास ।।२२।।**

अन्वयः- तदनु श्यामसुंदरपरपुरुषेण क्षीरपूर्णशंखेन अभ्युक्ष्य मौक्तिकं आत्मने दत्तं इति राज्ञ्या इन्दुमत्या अवेदितस्वप्नस्य 'श्रीदत्तप्रसादजन्यो हुण्डासुरघ्नः प्रतापी पुत्रो जनिष्यत' इति शौनकोदितं भाविफलं चारणमुखात् श्रुतं, हुण्डासुराय तत्कन्या अवेदयामास।

अर्थः- नंतर सजळ मेघाप्रमाणें सुंदर व तेजस्वी अशा परमश्रेष्ठ पुरुषानें शंखोदकानें आपल्याला अभिषेक करुन एक मुक्ताफल दिलें असें आपल्याला झालेलें अति उत्तम स्वप्न इंदुमतीले राजाला कळविलें. आयुराजानें प्रातःकाळीं शौनकांना ते स्वप्न सांगितलें. शौनकांनीं श्रीदत्तप्रसादानें हुण्डासुराचा नाश करणारा व पराक्रमी असा सुपुत्र इंदुमतीला होईल, याप्रमाणें त्या स्वप्नाचा अर्थ राजाला सांगितला. हुण्डासुरकन्या आपल्या सखीसह बागेंत क्रीडा करीत असतां तिनें आयुराजाचा पुत्र हुण्डासुराचा अंतक जन्माला येणार, असें चारणांच्या संवादामध्यें ऐकिलें व तें वर्तमान तिनें हुण्डासुराला कळविलें ।।२२।।

तप्तुं तपो नृप इतो यदि तर्हि शूरो हुण्डासुरो जितसुरोऽत्र धरोपरीशः।

जातः स देवगदितं स्वमृतं सुतातः श्रुत्वैत्य वीक्ष्य स तथा विमना हि जातः।।२३।।

अन्वयः- यदि नृपः तपः तप्तुं इतः गतः । तर्हि जितसुरः शूरः हुण्डासुरः अत्र धरोपरि ईशः जातः । सः देवगदितं स्वमृतं सुतातः श्रुत्वा (विलिय राजगृहं) एत्य च तथा (तां) वीक्ष्य हि विमनाः जातः।।२३।।

अर्थः- ज्या वेळीं तपश्चर्या करण्याकरतां आयुराजा आपल्या नगरांतून सह्यपर्वतावर गेला त्या वेळी सर्व देवांना जिंकणारा म्हणूनच पराक्रमी असा हुण्डासुर या पृथ्वीचा राजा झाला. त्याच्या कन्येनें चारणदेवांच्या बोलण्यांत ऐकलेला आपला मृत्यु, तिच्यापासून

ऐकून त्या बातमीचा खरेपणा समजून घेण्याकरितां लपून तो हुण्डासुर राजवाड्यांत गेला व गरोदर अशा इंदुमति राणीला पाहून अतिशय खिन्न झाला.।।२३।।

अन्योन्यगौरवस्पर्धिकुचास्ये नीलतार्पिता। गर्भेण केवलं राज्ञ्या नासुरास्येऽपि सार्पिता।।२४।।

अन्वयः- राज्ञ्याः अन्योन्यगौरवस्पर्धिकुचाऽस्ये गर्भेण केवलं नीलता न अर्पिता । (किन्तु) असुरास्ये अपि सा (नीलता) अर्पिता।।२४।।

अर्थः- पोटांत असलेला सूक्ष्म गर्भ त्या हुण्डासुरानें कसा पाहिला तें अनुष्टुप् वृत्तानें सांगतात. राणी इन्दुमतीचें आपल्या मोठेपणाबद्दल एकमेकांचा हेवा करणारे जे स्तन त्यांचें अग्र गरोदरपणामुळें काळे झाले एवढेंच नव्हे तर मृत्युभयानें हुण्डासुराचेंहि तोंड काळें ठिक्कर पडलें. गरोदर स्त्रियांच्या स्तनाचीं मुखें काळीं असतात असें गर्भलक्षण वाग्भट वैद्यक ग्रंथांत दिलें आहे.

तद्गर्भं हन्तुमासुर्या गुप्त एत्य स मायया। ददर्श दष्टदशनो ज्वलत्तत्र सुदर्शनम्।।२५।।

अन्वयः- तद्गर्भं हन्तुं आसुर्या मायया सः गुप्तः एत्य दष्टदशनः (सन्) तत्र ज्वलत् सुदर्शनं ददर्श ।

अर्थः- राणी इन्दुमतीचा गर्भ नष्ट करण्याकरतां आसुरी मायेचा स्वीकार करून तो गुप्त म्ह. छपून त्या राजवाड्यांत आला व अतिशय रागानें त्यानें तेथें तेजस्वी असें गर्भरक्षक श्रीदत्तप्रभूचें सुदर्शनचक्र पाहिलें. ।।२५।।

दुष्प्रधर्षात्स भीतोऽस्यै दुःस्वप्नानि व्यदर्शयत्। त्रयीतनुमनुष्ठाय सा तद्भयमनाशयत्।।२६।।

अन्वयः- दुष्प्रधर्षात्(सुदर्शनात्) भीतः सः अस्यै दुःस्वप्नानि व्यदर्शयत् । या त्रयीतनुं (सूर्यम्) अनुष्ठाय तद्भयं अनाशयत् ।

अर्थः- फार प्रयत्न करूनहि जवळ जावयास कठीण अशा त्या तेजस्वी सुदर्शनामुळें भ्यालेल्या हुण्डासुरानें इन्दुमतीला पुष्कळ वाईट स्वप्नें पाडलीं. तेव्हा इन्दुमतीनें सूर्यनारायणाची प्रार्थनारूप उपासना करून ती स्वप्नभयापासून मुक्त झाली. ।।२६।।

ततः सूतमसूतासौ काले तुङ्गगषड्ग्रहे। महेशः किं नृपगृहेऽवतीर्णो दैत्यनिग्रहे।।२७।।

अन्वयः-ततः काले तुङ्गषड्ग्रहे असौ सुतं असूत। (कथंभूतः) महेशः दैत्यनिग्रहे नृपगृहे अवतीर्णः किम् ।

अर्थः- श्रीमद्दत्तात्रेयांनीं आपल्या सुदर्शन चक्रानें रक्षण केल्यानंतर दहाव्या महिन्यांत सूर्यादि सहा ग्रह उच्चीचे असतांना इन्दुमतीला पुत्र झाला. तेव्हां राजगृहांत जणूं काय दैत्य-नाशाकरतां श्रीशंकरच अवतीर्ण झाले कीं काय असें वाटलें. पांच ग्रह उच्चीचे असतां तो चक्रवर्ती होतो, व सहा ग्रह उच्चीचे असतील तर स्वर्गाचेंहि आधिपत्य त्याला मिळतें. हा नहुष दैवशाली असल्यानें, याच्या जन्मकालीं सहा ग्रह उच्चीचे होते म्हणून याला याच देहानें इन्द्रपदाचा उपभोग घ्यावयास मिळाला. ।।२७।।

या श्लोकांत श्रीशंकरच अवतीर्ण झाले काय हा उत्प्रेक्षा अलंकार होतो.

आनन्दो भूपतेः पूर इवाब्धेरब्जवीक्षणात्। नान्तः स्थातुं समर्थोऽभूत्पुत्रसद्रत्नवीक्षणात्।।२८।।

अन्वयः- पुत्रसद्रत्नवीक्षणात् आनंदः भूपतेः अंतः स्थातुं न समर्थः अभूत । (कस्य इव) अब्जवीक्षणात् अब्धेः पुर इव।
अर्थः- ज्याप्रमाणें चंद्राला पाहून समुद्राचा आनंद पूररूपानें बाहेर पडतो तसा आपल्या सर्वोत्कृष्ट मुलाला पाहून झालेला आनंद आयुराजाच्या अंतःकरणांत मावला नाहीं, तर तो बाहेर पडला. ।।२८।।

मुदाप्लुतोऽभ्यर्च्य देवान्स पितॄन्मुक्तबन्धनः। धनाद्यदाद् द्विजातिभ्यो जातकृत्ये महाधनः।।२९।।

अन्वयः- मुद्रा प्लुतः महाधनः सः जातकृत्ये देवान् (च) पितॄन अभ्यर्च्य मुक्तबंधनः (सन्) द्विजातिभ्यः धनादि अदात् ।।
अर्थः- आनंदाश्रूंनीं स्नान झालेला, श्रीमान् असा जो आयुराजा त्यानें जातकर्म संस्कारांत करावयास लागणारे देवपितृगणार्चन व नांदीश्राद्ध पुण्याहवाचनपूर्वक करून व वृद्धिश्राद्ध करून पितृऋणांतून मुक्त झालेल्या त्यानें ब्राह्मणांना द्रव्य, भूमि, इत्यादि दानें दिली. ।।२९।।

मायामाराध्य मायावी गत्वारिष्टं स दानवीम्। मायमुद्भाव्य तं पोतं सुप्तेभ्योऽहरदद्भुतम्।।३०।।

अन्वयः-**मायावी सः (तामसीम्) मायां आराध्य (दास्याः अंगं प्रविष्टः सन्) अरिष्टं गत्वा (तत्र प्रस्वापिन्याख्याम्) दानवीं मायां उद्भाव्य सुतेभ्यः (मात्रादिभ्यः सकाशात्) अद्भुतं तं पोतं अहरत् ।**
अर्थः- त्या मायावी हुण्डासुरानें तमोगुणात्मक मायेची उपासना करून तिच्या प्रभावामुळें व त्याच्या सुदैवानें, बाहेर आलेल्या एका दासीच्या अंगांत प्रवेश करून तो सूतिकागृहांत गेला; आणि तेथें सर्वांना निद्रा येणाऱ्या प्रस्वापिनी नांवाच्या दैत्यमायेचा मंत्रप्रयोग करून इन्दुमति वगैरे तेथील सर्व लोक झोपलें असतां तिथून त्या लोकविलक्षण मुलाला घेऊन घरीं गेला. ।।३०।।

शक्तो दत्तोऽप्यदान्मंत्रशक्त्यै मानं स दानवः। नवपाकं स्त्रियै दत्वा तत्पाकं कर्तुमादिशत्।३१।।

अन्वयः- शक्तः अपि दत्तः मन्त्रशक्त्यै मानं अदात्। सः दानवः नवपाकं स्त्रियै दत्वा तत्पाकं कर्तुं आदिशत् ।।
अर्थः- मग काय श्रीदत्तात्रेयांना सुद्धां दैत्यमायेची भीति वाटली? तेच अनुष्टुप् वृत्तानें पुढील श्लोकांत सांगतात. माया निवारण करण्यास समर्थ जरी दत्तमहाराज होते तरीहि त्यांनीं मंत्रशक्तीला मान दिला. त्या दानवानें नुकताच जन्मलेला तो कोमल बालक आपल्या स्त्रियेच्या स्वाधीन करून त्या मुलाचें मांस शिजवून दे असें तिला सांगितलें. ।।३१।।

सा प्रेक्ष्य सनालं सास्राक्ष्यपि बालं। प्राहैष न वध्यः प्राज्ञायममेध्यः।।३२।।

अन्वयः- सा सनालं (तं) बालं प्रेक्ष्य अपि सास्राक्षी प्राह । हे प्राज्ञ एषः (बालः) न वध्यः । (यतः सद्योजातः) अयं अमेध्यः (अस्ति) ।
अर्थः- त्या मुलाला पाहून आश्चर्यचकित होऊन ती दैत्यस्त्री बोलली तें असेः - ती हुण्डासुरपत्नी नाळेसह असलेल्या त्या मुलाला पाहून दयेनें तिच्या नेत्रांतून अश्रु वाहूं लागले व म्हणाली, हे सूज्ञ पतिदेवा ! हा बालक मारणें योग्य नव्हे. कारण आपण विद्वान्

आहां तरी नुकताच जन्मलेला बालक मनुष्यभक्षक अशा आम्हांलासुद्धां भक्षण करण्यास अपवित्र आहे. ।।३२।।

प्राहापि स बालः प्राप्तो मम कालः। भक्ष्योऽद्य दुरात्मा रक्ष्योऽयमिहात्मा।।३३।।

अन्वयः- सः अपि असुरः प्राह (हे मूढे) अयं बालः मम कालः (अस्ति। मया) प्राप्तः (अतः) अद्य दुरात्मा भक्ष्यः । (यतः) इह (अयं देहरुपः) आत्मा रक्ष्यः ।

तें आपल्या स्त्रियेचें भाषण ऐकून हुण्डासुर तिला म्हणाला,

अर्थः- तो हुण्डासुर बोलला. हे मूर्ख स्त्रिये ! हा बालक देवांनीं योजलेला माझा मृत्यु आहे. याला मीं महत्प्रयासानें मिळविलें आहे. म्हणून आज दुष्ट मृत्युरूप अशा या बालकाला भक्षण करणेंच उचित आहे. कारण हा देहरूपी आत्मा वाटेल तें करून रक्षण करणेंच योग्य आहे. विरोचन नामक आपल्या गुरूंच्या मतांत देह हाच आत्मा आहे म्हणून वाटेल तीं वाईट कृत्यें करूनहि देहाचें रक्षण केलें पाहिजे. शत्रु निर्बल आहे म्हणून त्याची उपेक्षा करणें बरें नव्हे. उपेक्षा केली तर सूक्ष्म रोग जसा उपेक्षा करणाऱ्याला बलवान् होऊन नष्ट करतो, तसाच शत्रूहि समूळ नाश करतो. द्रव्य, पुत्र, स्त्री इत्यादि पुनः पुनः मिळविणें शक्य आहे. पण देह मिळणें दुर्लभ आहे. म्हणून मृत्युरूप या मुलावर दया करणें म्हणजे आपणच आपला नाश करून घेतल्यासारखें होईल. तरी मी म्हणतों तेंच योग्य आहे. तरी सत्वर मांसपाक कर व मला दे. ।।३३।।

तथेति दुष्टधीः सादात्सैरन्ध्यै च स्वयं ह्यदात्। सा च तं बल्लवकरे सोऽस्त्रं हन्तुं दधौ करे।।३४।।

अन्वयः- दुष्टधीः सा (तं) तथा इति (उक्त्वा तस्मात् बालं) आदात् । (च) स्वयं तं (हन्तुं) सैरन्ध्यै अदात् । सा च (तं) बल्लवकरे (अदात्) सः हि (तं हन्तुं) करे अस्त्रं दधौ ।

अर्थः- पतीच्या उपदेशानें निर्दय बनलेली ती हुण्डासुर स्त्री 'बरें आहे आपण म्हणतां तसें करितें ' असें बोलून तिनें त्याच्यापासून त्या मुलाला आपल्याजवळ घेतलें व मारण्याकरतां स्वतः एका दासीच्या स्वाधीन केलें. त्या दासीनें तो मुलगा स्वयंपाक्याजवळ दिला. त्यांनींही मुलाला मारण्याकरितां हातांत शस्त्र घेतलें. ।।३४।।

सुगुप्तचक्रोपरि तच्छितास्त्रं भग्नं तथान्यत्प्रहृतं शितास्त्रम्।
ग्राव्णीव खड्गं परभक्तिसारविप्रे प्रयुक्तोऽपि यथाभिचारः।।३५।।

अन्वयः- सुगुप्तचक्रोपरि प्रहृतं तत् शितास्त्रं भग्नम् । तथा अन्यत् (प्रहृतं) शितास्त्रं अपि ग्राव्णि खड्गं इव तथा भग्नम् । परभक्तिसारविप्रे प्रयुक्तः अभिचारः यथा (निष्फलः) तथा बाले प्रहृतं शिताऽस्त्रं निष्फलं बभूव (इति अपरः दृष्टांन्तः) **।**

अर्थः- श्रीदत्तसुदर्शनानें सुरक्षित त्या मुलावर मारलेलें तें तीक्ष्ण शस्त्र मोडून पडलें. नंतर बल्लवानें दुसरें तीक्ष्ण शस्त्र घेऊन पुनः प्रहार केला. पण तेंहि शस्त्र दगडावर मारलेल्या तरवारीप्रमाणें पूर्वीसारखेंच मोडून गेलें. याला दुसरा दृष्टान्तः - ज्ञानोत्तरकालीन

परभक्ति हेंच बल असलेल्या ब्राह्मणावर योजलेला मारक प्रयोग जसा निष्फळ होतो, तसें तें शस्त्र निष्फळ झालें. रक्ताचा एकही थेंब तेथें दिसला नाहीं. परमात्म्यानें रक्षिलेल्या भक्तास कोणीहि कांहींसुद्धां करूं शकत नाहीं. यावरून श्रीदत्तमहाराजांचें भक्तवात्सल्य किती आहे हें सहज लक्षांत येण्यासारखें आहे. ।।३५।।

तदा क्रूरापि सैरन्ध्री द्रुतचित्ताह बल्लवम्। न जह्येतं शिरस्यस्य देवोऽधात्करपल्लवम्।।३६।।

अन्वयः- तदा क्रूरा अपि (सा) सैरन्ध्री द्रुतचित्ता (सती) बल्लवं आह । (हे बल्लवं) एतं (बालम्) न जहि । हि देवः अस्य शिरसि करपल्लवं अधात् ।

अर्थः- त्या वेळीं निर्दय असूनहि ती दासी दयार्द्र होऊन त्या बल्लवाला म्हणाली, हे बल्लवा, आतां या मुलावर तूं शस्त्रप्रहार करूं नको. कारण देवांनीं याच्या मस्तकावर वरदहस्त ठेविला आहे. हा कोणाकडूनहि मारला जाणार नाहीं. ।।३६।।

तथेति पोतं स च तं वसिष्ठद्वारे निधायैककुरङ्गपोतम्।
हत्वा ददौ तत्पलमासुराय हुण्डाय धूर्तः कुधियेऽचिराय।।३७।।

अन्वयः-तथा इति (उक्त्वा) सः धूर्तः (बल्लवः तं) पोतं वसिष्ठद्वारे निधाय एकं कुरङ्गपोतं अचिराय हत्वा च (पक्त्वा) तत्पलं कुधिये असुराय ददौ ।

अर्थः- त्या दासीचें भाषण ऐकून बरें आहे, याला मी मुळींच मारीत नाहीं असें सांगून लबाड बल्लवानें त्या बालकाला वसिष्ठ ऋषींच्या आश्रमद्वारांत नेऊन ठेविलें; आणि एका हरिणाच्या पाडसाला तात्काळ मारून व शिजवून तें मांस त्या दुष्ट हुण्डासुराला दिलें. हें काम त्या बल्लवानें इतक्या त्वरेनें केलें कीं त्याचें कपट त्या हुण्डासुराला समजलें तर नाहींच, उलट आपल्या मृत्युरूप शत्रूला आपण खाऊन टाकलें, म्हणून त्याला अतिशय आनंद झाला. ।।३७।।

ततः प्रभाते विदुषां वरिष्ठो दृष्ट्वा सुतं दिव्यदृशा वसिष्ठः।
दत्तप्रसादं सुतमायुषस्तं विज्ञाय चादाय निनाय पस्त्यम्।।३८।।

अन्वयः- ततः प्रभाते विदुषां वरिष्ठः वसिष्ठः (तं) सुतं (प्रथमं प्राकृतया) दृष्ट्या दृष्टा च दिव्यदृशा दत्तप्रसादं आयुषः सुतं विज्ञाय (दयया कराभ्यां) तं आदाय पस्त्यं निनाय ।

अर्थः- त्यानंतर इकडे प्रातःकाळीं ज्ञानी जनांत श्रेष्ठ अशा वसिष्ठांनीं त्या मुलाला प्रथम सामान्य दृष्टीनें पाहिलें. आणि नंतर ज्ञानदृष्टीनें, श्रीदत्तकृपेनें मिळालेला आयुराजाचा हा पुत्र आहे, असें जाणून दयाळू होऊन आपल्या हातांनीं त्याला उचलून आपल्या आश्रमांत नेलें ।।३८।।

दत्तप्रसादोऽयमिहायुषोऽर्भो दत्तः प्रसादो विधिनेति सोऽदात्।
पत्न्यै महापूरुषलक्षणं तं प्रेम्णापि साऽपात्कमलेक्षणं तम्।।३९।।

अन्वयः- (हे पत्नि) अयं दत्तप्रसादः आयुषः अर्भः इह विधिना दत्तः प्रसादः इति सः पत्न्यै अदात् । सा अपि महापुरुषलक्षणं कमलेक्षणं तं प्रेम्णा अपात् ।

अर्थः- आणि वसिष्ठ बोलले, हे स्त्रिये ! हा बालक श्रीदत्तकृपेनें झालेला आयुराजाचा पुत्र आहे. येथें आपल्या सुदैवानें आणून दिलेला हा प्रसाद आहे. हें आपलें महद्भाग्य होय. असें बोलून वसिष्ठ मुनीनें त्या मुलाला सती अरुंधतीच्या स्वाधीन केलें. तिनेंही रेखांकित महापुरुष चिन्हांनीं युक्त अशा त्या मनोहर बालकाचें मोठ्या प्रेमानें पालन केलें. ।।३९।।

ददौ डिम्भायाभिधानं करिष्यत्यरिबन्धनम्। अत्यर्थं नहुष इत्यर्थज्ञर्षिमारिषः।।४०।।

अन्वयः-हि अत्यर्थं अरिबंधनं करिष्यति (अयं बालः) इति अर्थज्ञर्षिमारिषः (वसिष्ठः तस्मै) डिम्भाय नहुष इति अभिधानं ददौ।

अर्थः- निश्चयानें हा शत्रुबंधन-शत्रुपराजय करणार म्हणून शब्दार्थ जाणणारे जे वसिष्ठमुनि त्यांनीं त्या मुलाचें नांव नहुष असें ठेविलें. ।।४०।।

दिने दिने स ववृधे शशिवच्छशिवंशजः। तपनर्षिकरस्पर्शात्परेशानुग्रहादपि।।४१।।

अन्वयः- -शशिवंशजः सः (नहुषः) तपनर्षिकरस्पर्शात् (च) परेशाऽनुग्रहात् अपि दिने दिने शशिवत् ववृधे ।

अर्थः- चन्द्रवंशांत जन्मलेला तो नहुष तपस्वी वसिष्ठमुनीच्या लालनपालनानें व श्रीदत्तकृपेनेंच शुक्लपक्षांतील चन्द्राप्रमाणें वाढूं लागला. शुक्लपक्षांतील चन्द्राप्रमाणें नहुष वाढूं लागला. याला श्रीमहाराजांनीं दोन हेतु दिले आहेत. एक तपनर्षिकरस्पर्श व दुसरा परेशानुग्रह; यांमध्यें दुसरा हेतु चन्द्र व नहुष या दोहोंमध्यें समान आहे. कारण चन्द्र सर्वांतर्यामीं भगवत्कृपेनें कला संपादन करतो, व नहुषहि श्रीदत्तकृपेनेंच वाढत होता. पहिल्या हेतूंत तपस्वी जे वसिष्ठ ऋषि नहुषाचें लालपालन करीत असल्यामुळें कर म्हणजे हस्तस्पर्श असणें साहजिक आहे. करस्पर्शावांचून लालनपालन शक्य नाहीं हें नहुषपक्षीं योग्य झालें. चन्द्रपक्षीं तपनर्षि म्हणजे तापदायक व गति असणारा सूर्य त्याचे कर म्हणजे किरण त्यांचा स्पर्श म्ह. प्रवेश त्यामुळें चन्द्र वृद्धि पावतो असें आहे. जलमय चन्द्रामध्यें सूर्यकिरण संक्रामित होतात व त्यामुळेंच त्याला प्रकाश मिळतो असा वैदिक सिद्धान्त आहे. हा श्लोक द्व्यर्थी असून उपमा अलंकार इतका बरोबर साधला आहे कीं उपमान व उपमेय यांचीं अनुक्रमें लिंग व वचनेंहि बदललेलीं नाहींत. वसिष्ठकरस्पर्श व सूर्यकरस्पर्श यांनीं नहुष वाठतो व चंद्रहि वाढतो. अशी अगदीं बरोबर उपमा क्वचित्च सांपडते हें विशेष आहे. ।।४१।।

उपनीतः स मुनिना विनीतः शिक्षितोऽमुना। विद्याकलासु निष्णातः स्ववेदे च विशेषतः।।४२।।

अन्वयः- अमुना मुनिना (वसिष्ठेन) उपनीतः च शिक्षितः विनीतः सः (नहुषः) विद्याकलासु निष्णातः । विशेषतः स्ववेदे (निष्णातः अभवत्) ।

अर्थः- नंतर त्या मुनि वसिष्ठानें त्याचें मौंजीबंधन केलें, व त्याला शिक्षण दिलें. त्यामुळें नम्र असा तो नहुष सर्व विद्येंत व कलेंत पारंगत झाला. विशेषतः धनुर्विद्येंत तरबेज झाला. ।।४२।।

राज्ञी बुद्ध्वा सुमतिः प्राज्ञी सेन्दुमती सती। अरिष्टेऽर्भमपश्यन्ती मूर्च्छिता पतिताऽधृतिः।।४३।।

अन्वयः-अथ सुमतिः प्राज्ञी सती सा राज्ञी इन्दुमतिः बुद्ध्वा अरिष्टे अर्भं अपश्यन्ती (ततः) अधृतिः मूर्छिता (सती भुवि) पतिता ।

अर्थः- इकडे बुद्धमति साध्वी ती राणी इन्दुमति जागी झाली व जवळ मूल नाहीं असें पाहून गतधैर्य होऊन भूमीवर मूर्च्छित पडली.।।४३।।

उत्थाय च बुद्ध्वा बालं निजबुद्ध्या। अन्वेष्य रुरोदार्ता सा तनुमध्या।।४४।।

अन्वयः- सा (इन्दुमतिः) बुद्ध्वा च उत्थाय निजबुद्ध्या बालं अन्वेष्य तनुमध्या आर्ता (सती) रुदोद ।

अर्थः- ती इन्दुमति शुद्धीवर येऊन उठून बसली व तिनें आपल्या बुद्धीप्रमाणें इकडे तिकडे मुलाचा शोध केला, परंतु मूल न दिसल्यामुळें ती सौंदर्यवती दुःखानें व्याकुळ होऊन रडूं लागली. ।।४४।।

कुमारललितां मां व्यधात्क्षणमपीमां। विधिः सकलपालः स किं खलु न बालः।।४५।।

अन्वयः- (यः) इमां (वन्ध्याम्) अपि मां क्षणं कुमारललितां व्यधात् । सः सकलपालः विधिः बालः किं न खलु ।

अर्थः- ज्यानें वंध्या अशासुद्धां मला फार थोडा वेळच पुत्रवती केलें तो सर्वपालक ब्रह्मदेव खरोखर अज्ञानी नव्हे काय? तर हा त्याचा खेळ अज्ञानी मुलासारखाच आहे. ।।४५।।

माणवकाक्रीडितप्रायविचेष्टो हि स कः। प्राक्तनदुष्कर्मवशात्प्रादुरभूत्किं कुदशा।।४६।।

अन्वयः- माणवकाक्रीडितकप्रायविचेष्टः सः कः (ब्रम्हा) हि । (अथवा) प्राक्तन्तुकर्मवशात् (इयम्) कुदशा प्रादुरभूत् किम् ।।

अर्थः- तो ब्रह्मदेव अल्पबुद्धि मनुष्याप्रमाणें व्यवहार असलेला निश्चित आहे. कारण मी तसा अनुभव घेत आहें. किंवा त्याला तरी बोलून नांवें ठेवून काय उपयोग आहे? माझ्याच पूर्व जन्मार्जित पापानें पुत्रविरहरूप ही दुर्दशा आली असेल काय? तर त्यामुळेंच आली हें निःसंशय. ।।४६।।

चित्रपदार्थचौर्याच्चित्रमभूत्किमार्या। एहि कुरु स्तनपानं देहि सुदर्शनमानम्।।४७।।

अन्वयः- चित्रपदार्थसुचौर्यात् इह (इदम्) चित्रं अभूत् किम् । हे आर्या एहि स्तनपानं कुरु (मह्यम्) सुदर्शनमानं देहि ।

अर्थः- किंवा धनरत्नादि चोरल्यामुळें अकस्मात पुत्रनाशरूपी हें अद्‌भुत संकट आलें असेल काय? हे सत्कुलप्रसूता! बाळा ये, स्तन प्राशन कर, आणि तुझें सुंदर मुख दाखवून मला आनंदित कर, ज्यायोगें मी कृतार्थ होईन. ।।४७।।

विद्युन्मालातुल्यो योगः स्वानां यद्यप्येषोयोगः। सोढुं शक्यो नैवातीव प्राप्तं कष्टं दुष्टं देव।।४८।।

अन्वयः- यद्यपि स्वानां योगः विद्युन्मालातुल्यः (अस्ति तथापि) अयोगः सोढुं न शक्यः । (अत एव) हे देव अतीव कष्टं प्राप्तम् ।

अर्थः- जरी हा स्वजनसमागम विद्युल्लतेप्रमाणें क्षणभंगुर आहे, तरी त्याचा विरह अज्ञानामुळें सहन करणें शक्य होत नाहीं म्हणूनच हे दत्तात्रेय ! हें अत्यंत दुःख मला प्राप्त झालें आहे. ।।४८।।

भुजगशशिभृता रोषः कुत इह मयि तत्तोषः। प्रणतिमखत एवास्तु प्रभुरथ मुदं स यातु।।४९।।

अन्वयः- भुजगशिशुभृताः रोषः कृतः । (अतः) प्रणतिमखत एव इह मयि तत्तोषः अस्तु । अथ सः प्रभुः मुदं यातु ।

अर्थः- अलंकार म्हणून ज्यांनीं लहान लहान सर्प आपल्या अंगावर धारण केले आहेत ते शिवरूप दत्तात्रेय, ही संकटाचे वेळीं मात्र माझें स्मरण करते व सुखकाळीं मला विसरते, म्हणून माझ्यावर जणुं रागावले आहेत. त्यांना माझें नमस्कार असोत. ते अपराधी अशा माझ्यावर या नमनरूपी यागानें कृपा करून संतुष्ट होवोत. ।।४९।।

आयुरप्याकुलप्राणवायुरत्यार्त एत्य ताम्। मूर्च्छितां वीक्ष्य वनितां मूर्च्छितोऽगादचेष्टताम्।।५०।।

अन्वयः- अत्यार्तः आकुलप्राणवायुः आयुः अपि (अरिष्टम्) एत्य मूर्च्छितां तां वनितां वीक्ष्य मूर्च्छितः (सन्) अचेष्टतां अगात् ।

अर्थः- दुःखानें अतिशय व्याकूळ असा आयुराजाहि त्या सूतिकागृहांत येऊन मूर्च्छित पडलेल्या त्या इन्दुमतीला पाहून स्वतः मूर्च्छित होऊन निश्चेष्ट झाला. ।।५०।।

लब्धसंज्ञोऽवनिपोऽथ दैवप्रलब्ध आह प्ररुदन् तदैव।
सदैव रक्षार्थमिहार्चिता ये मुदैव तेऽप्रभवस्त्वपाये।।५१।।

अन्वयः- अथ दैवप्रलब्धः सः अवनिपः लब्धसंज्ञः तदा एव प्ररुदन् आह । इह ये रक्षार्थं सदा एव अर्चिताः (ते च) मुदा एव ते अपि अस्मिन् अपाये अप्रभवः (अभवन्) ।

अर्थः- नंतर प्रारब्धानें फसविलेला तो आयुराजा शुद्धीवर येतांच शोक करूं लागला व म्हणाला, येथें मूल व बाळंतीण यांच्या संरक्षणाकरितां नेहमीं देव व ब्राह्मणादिकांचें अर्चन केलं व नोकरचाकरांचा धनवस्त्रादि देऊन सत्कार केला. हें सर्व आनंदानेंच केलें असता या संकटकाळीं तें सर्व निरुपयोगी ठरलें. ।।५१।।

धिक्प्राकारान्सपरिखान्धिक्प्रासादांश्च साररान्।
धिग्बलं मन्त्रजालं च धिग्धर्मं कोऽपि न प्रभुः।।५२।।

अन्वयः-सपरिखान् प्राकारान् धिक्, च साररान् प्रासादान् धिक् । बलं धिक्, च मंत्रजालं धिक् (च) धर्मं धिक्, कः अपि प्रभुः न।
अर्थः- खंदकांनी युक्त असलेल्या या तटबंदीला धिक्कार असो, व चांगले दरवाजे असलेल्या या राजवाड्यालाहि धिक्कार असो, आणि या चतुरंग सेनेला धिक्कार असो; मंत्रसमूहाला धिक्कार असो व या धर्मालाहि धिक्कार असो. कारण मला या संकटांतून वांचविण्यासाठी यांपैकीं कोणीहि समर्थ झाला नाहीं. ।।५२।।

वन्ध्यं तपोऽभूदपि कृछ्रसाध्यं वन्ध्यं जपाद्यं च सुयत्नसाध्यं।
साध्यं किमेभिर्यदि वामदैवमाध्यंचितोऽत्र त्वभवं सदैव।।५३।।

अन्वयः-कृच्छ्रसाध्यं तपः अपि वन्ध्यं अभूत् । च सुयत्नसाध्यं जपाद्यं वन्ध्यं (अभूत्) यदि वामदैवं (तर्हि) एभिः किं साध्यम्। (न किमपि) अत्र तु सदा एव आध्यंचितः अभवम् ।
अर्थः- कष्टानें साध्य होणारें तपसुद्धां व्यर्थ गेलें, आणि मोठ्या प्रयत्नानें साध्य होणारे जपादिक फुकट गेले. प्रारब्ध प्रतिकूल असतां काय साध्य होणार? कांहींहि होणार नाहीं. या जन्मांत पुत्र होण्यापूर्वी पुत्राकरतां तपश्चर्या करून कष्ट भोगिले आणि आतां पुत्रवियोगानें दुःख भोगीत आहें. एकूण सर्व काळ मानसिक दुःखांनी व्यापून गेलों आहें. ।।५३।।

दुर्दर्श ईशोऽपि मयात्रिजातः संपूजितो येन वरोऽपि दत्तः।
दत्ताभये तत्पदि मेऽस्ति चित्तं दत्ताश्रयं तं प्रणमामि दत्तम्।।५४।।

अन्वयः-दुर्दर्शः अपि अत्रिजातः ईशः दत्तः मया संपूजितः । येन वरः अपि दत्तः । दत्ताभये तत्पदि मे चित्तं अस्ति। तं दत्ताश्रये दत्तं प्रणमामि ।
अर्थः- दुर्दैवी लोकांना ज्याचें दर्शनसुद्धां होणें कठीण अशाहि अत्रिकुमार समर्थ श्रीदत्ताचें मीं चांगलें पूजन केलें, आणि त्यांचेकडून मी वरहि मिळविला. स्वभक्तांना अभय देणाऱ्या श्रीदत्तचरणीं माझें चित्त स्थिर झालें आहे. त्या आपल्या भजकांना आधार देणाऱ्या श्रीदत्तात्रेयांना मी नमस्कार करतों. ।।५४।।

भगवन्किमु मामुपेक्षसे मघवन्मान्य सहापि नेक्षसे।
चरितं किमु दुष्कृतं मया चरितं वाग उतेश ते मया।।५५।।

अन्वयः-हे भगवन् । मां (भक्तम्) उपेक्षसे किमु । हे मघवन्मान्य। सह (माम्) न ईक्षसे अपि । (ईदृशम्) दुष्कृतं मया किमु आचरितम्। हे ईश। वा उत ते आगः मया चरितं (तत्) वद ।
अर्थः- हे भगवन् दत्तात्रेय ! आपला भक्त अशा माझेकडे आपण दुर्लक्ष कां करतां ? दुर्लक्ष करणें योग्य नाहीं. हे देवन्द्रमान्या !

दत्तगुरो ! एकदांसुद्धां माझ्याकडे पाहत नाहीं काय? असें कोणतें पाप मीं केलें आहे, किंवा हे प्रभो ! असा अपराध करी कोणता केला आहे तें सांगा, कीं ज्यामुळें आपल्याला माझ्याकडे पाहावेंसेसुद्धां वाटत नाहीं? ।।५५।।

प्रणमामि विभो प्रसीद मे प्रणतेऽपीश धृते महादमे। शरणं क्व परं परेश नश्चरणं तेऽभयदं गतिर्हि नः।।५६।।

अन्वयः-हे विभो। (त्वाम्) प्रणमामि । मे प्रसीद । हे ईश (त्वया) प्रणते अपि (मयि) महादमे धृते (सति) हे परेश । (त्वत्तः) परं नः शरणं क्व ((अतः प्रसीद) ।

अर्थः- हे सर्वव्यापी दत्तगुरो ! मी तुम्हांला नमस्कार करतों. माझ्यावर प्रसन्न व्हा. हे समर्था देवा ! आपण चरणीं नम्र असलेल्या मला अशी मोठी शिक्षा कराल तर हे सर्वश्रेष्ठा श्रीदत्ता ! आपल्याशिवाय दुसरा आम्हांला रक्षण करणारा कोण आहे? कोणीहि नाहीं. म्हणून माझ्यावर प्रसन्न व्हा. कारण भयहारक आपले चरणकमल हे आम्हांला खरोखर अनन्यगति आहेत. ।।५६।।

पुत्रार्थं त्वाराध्य लब्ध्वापि कान्तं पुत्रार्थं ते सत्प्रसादादकान्तम्।
नक्षेऽद्यार्तो नष्टपुत्रः सुरेश वीक्ष्ये त्वत्तोऽन्याश्रयं नो परेश।।५७।।

अन्वयः- हे परेश पुत्रार्थं त्वा आराध्य ते सत्प्रसादात् कान्तं पुत्रार्थं लब्ध्वा अपि अकान्तं न ईक्षे । हे सुरेश । अद्य नष्टपुत्रः (अत एव) आर्तः (सन्) त्वत्तः अन्याश्रयं न वीक्षे ।

अर्थः- हे सर्वश्रेष्ठ श्रीदत्ता ! पुत्राकरितां आपली उपासना करून आपल्या कृपाप्रसादानें मनोहर असें पुत्ररूप फळ मिळूनहि माझ्या दुःखाचा नाश झाला नाहीं. हे प्रभो ! आतां नष्टपुत्र म्हणूनच अतिशय दुःखी अशा मला आपल्यावांचून दुसरा आधार दिसत नाहीं. आपणच आमचे सर्वाधार आहां. ।।५७।।

इति विक्लवितं निशम्य तन्मतिवित्क्लिन्नमना मनागपि।
सदकासहनो मनोजवं मनुमेवेरयितुं स्म वाञ्छति।।५८।।

अन्वयः-इति तत् विक्लवितं निशम्य मतिवित् क्लिन्नमनाः मनाक् अपि सदकासहनः मनोजवं मुनिं (नारदम्) एव ईरयितुं वाञ्छति स्म ।

अर्थः- याप्रमाणें तें आयुराजाचें दीन भाषण ऐकून आपण भक्ताचें अन्तःकरण जाणणारे व दयाशील, थोडेंहि भक्तदुःख सहन न करणारे जे श्रीदत्त प्रभु त्यांनीं मनाप्रमाणें वेग असलेल्या नारद ऋषींना पाठवावें असें मनांत आणलें. ।।५८।।

अर्थार्थी पूर्वमप्यार्तो भक्तोऽनुग्राह्य एव मे। इति देवर्षिमात्रेयो मतिदेवः समीरयत्।।५९।।

अन्वयः-पूर्वं अर्थार्थी अपि भक्तः (अधुना) आर्तः (अयम्) मे अनुग्राह्यः एव। इति मतिदेवः आत्रेयः देवर्षिं (नारदम्) समीरयत्।

अर्थः- प्रथम अर्थार्थी भक्त असून आतां पुत्र नष्ट झाल्यामुळें आर्त भक्त झाला आहे. म्हणून द्विगुण भक्ति असल्यानें हा राजा अनुग्रहाला पात्र झाला आहे. म्हणून बुद्धि-प्रकाशक अत्रिकुमार श्रीदत्त यांनी राजाचें दुःख नष्ट करण्याकरिता देवर्षिनारदांना आयुराजाकडे जाण्याविषयीं प्रेरणा केली. ।।५९।।

विष्वक्प्रसारिधामाधः पतन्सूर्य इवापतत्। रणद्वीणो हरिं गायन्नारदो दिव्यदर्शनः।।६०।।

अन्वयः-विष्वक् प्रसारिधामा अधः पतन् सूर्यः इव रणद्वीणः हरिं गायन् दिव्यदर्शनः नारदः आपतत् ।

अर्थः- ज्याचें तेज सर्वत्र पसरणारें आहे असा पृथ्वीवर येणारा सूर्यच कीं काय असे, स्वतःच वाजणारी महती वीणा धारण करणारे, श्रीहरीचें गायन करीत, अलौकीक ज्ञानवान् नारदमुनि आकाशमार्गानें खालीं आले. ।।६०।।

तदोर्ध्वमुत्क्रामत आत्मनोऽसून्मुदोत्थितोस्याश्वभिवादनेन।
भूयो यथावत्प्रतिपाद्य पाद्यपूर्वैः स आनर्च सुरर्षिमाद्यम्।।६१।।

अन्वयः- तदा मुदा उत्थितः सः (राजा) ऊर्ध्वं उत्क्रामतः आत्मनः असून् आशु अस्य (नारदस्य) अभिवादनेन भूयः यथावत् प्रतिपाद्य पाद्यपूर्वैः (उपचारैः) आद्यं सुरर्षिं (नारदम्) आनर्च ।

अर्थः- नारदमुनि आले असतां आनंदानें उठणाऱ्या त्या आयुराजानें ऊर्ध्व गति होणाऱ्या आपल्या प्राणांना तात्काळ नारमुनींना अभिवादन करून स्थिरता आणली आणि पाद्यादि उपचारांनी श्रेष्ठ अशा देवर्षि नारदाचें पूजन केलें. ।।६१।।

भक्त्या विधाय प्रणतीरुदन्तं विज्ञाप्य दुःखं पुरतो रुदन्तम्।
हसन् तमाश्वास्य स चारुवाचमृषिः स्मरन्नत्रिजमित्युवाच।।६२।।

अन्वयः-भक्त्या प्रणतीः विधाय उदन्तं च दुःखं विज्ञाप्य पुरतः रुदन्तं तं (राजानम्) आश्वास्य अत्रिजं स्मरन् हसन् ऋषिः (नारदः) इति चारुवाचं उवाच ।

अर्थः- आणि भक्तीनें अनेकानेक नमस्कार करून पुत्र नष्ट झालेलें वर्तमान व विरहामुळें झालेलें दुःख सांगून पुढें शोक करूं लागला. त्या आयुराजाला शांत व्हावयास सांगून श्रीदत्ताचें स्मरण करून देवभक्त असूनहि दुःखित झालेल्या त्याला पाहून हंसणारे देवर्षि नारद पुढील श्लोकांत सांगितल्याप्रमाणें मधुर बोलले. ।।६२।।

कथंचनापि स्मरणेन यस्य सद्यो भवान्तो भवतीह तस्य।
पदं चिदानन्दमयात्मलोकं भजंश्चिरान्नापि जहासि शोकम्।।६३।।

अन्वयः- कथंचन अपि यस्य स्मरणेन सद्यः भवान्तः भवति । इह चिदानंदमयात्मलोकं पदं चिरात् भजन् अपि शोकं न जहासि (इति चित्रम्)

अर्थः- पुत्रादि फलप्राप्ती अशा कोणत्याहि इच्छेनेंहि ज्याचें स्मरण केलें तरीसुद्धां भक्त संसारापासून मुक्त होतो. परंतु या लोकीं त्या सच्चिदानंदरूप पदाचें पुष्कळ काल सेवन करूनहि तूं दुःखाचा त्याग करीत नाहींस हें आश्चर्य आहे. ।।६३।।

विधूतरागपङ्कं हि श्रेयोयनमुपेयुषः। निरपायाश्रयानन्ता प्राप्यासौ वसुधा मता।।६४।।

अन्वयः- विधूतरागपङ्कं श्रेयोयनं उपेयुषः तस्य असौ (श्रीदत्तात्रेयः) निरपायाश्रया अनन्ता प्राप्या मता वसुधा (अस्ति) ।

अर्थः- संपूर्ण विषयाभिलाषरूप दोषरहित जो मोक्षमार्ग त्याला प्राप्त झालेल्या मुक्त भगवद्भक्तांना श्रीभगवान् दत्तात्रेय हेंच सर्व दुःखरहित, विशाल व उपनिषदांना मान्य असें विश्रांतिस्थान आहे. ।।६४।।

अध्यात्मदृष्ट्या प्रकृतेः परस्ताद्बहिर्विकारं पुरुषं महर्षिः।
यं वा उदासीनमनाद्यनन्तं शशंस सोऽस्मात्क इहापरोऽपि।।६५।।

अन्वयः- महर्षिः (कपिलः) अध्यात्मदृष्ट्या उदासीनं (अतः) बहिर्विकारं प्रकृतेः परस्तात् (सन्तम्) अनाद्यनन्तं यं (पुरुषम्) शशंस । सः (पुरुषः) अस्मात् (श्रीदत्तात्) अपरः इह कः अपि न ।

अर्थः- प्रकृति व पुरुष यांच्या विवेकानें मोक्ष मिळतो अशी शंका घेऊन सांगतात. महर्षि कपिल यांनीं अध्यात्मदृष्टीनें निर्लेप म्हणूनच षोडशविकाररहित, त्रिगुणात्मक प्रकृतीच्या पलीकडे असलेला आदि व अंतरहित जो पुरुष वर्णन केला आहे, तो या श्रीदत्तात्रेयापेक्षां निराळा असा कोणीहि नाहीं. ।।६५।।

स एव तप्त्वा तप आत्मनोदः स्वाभिन्नशक्त्यासृजदप्रमेयः।
सद्धर्मगुप्त्यै मुनिजोऽवतीर्णः कस्तद्गुणान्सद्गतिदान्वितीर्णः।।६६।।

अन्वयः- स एव अप्रमेयः (श्रीदत्तः) तपः तप्त्वा स्वाभिन्नशक्त्या अदः (विश्वम्) असृजत् । (पुनः) सद्धर्मगुप्त्यै अवतीर्णः मुनिजः (अभूत्) सद्गतिदान् तद्गुणान् कः वित्तीर्णः (न कः अपि) ।

अर्थः- पूर्वीं वर्णन केलेल्या त्याच इन्द्रियजन्य ज्ञानाला अविषय अशा श्रीदत्तात्रेयानें सृष्टि निर्माण करण्याचा विचार करून आत्म्याहून भिन्न नसलेलें विश्व निर्माण केलं, म्हणजे स्वतः जगद्रूप झाले. आणि पुनः साधूंच्या व धर्माच्या रक्षणाकरतां अत्रिमुनीच्या पोटीं अवतार धारण केला. त्या श्रीदत्त परमात्म्याच्या मोक्षदायक ज्या लीला त्यांचा पार कोण जाणूं शकेल ? तर कोणालाहि जाणतां येणार नाहीं. कारण त्यांच्या गुणांचा अंतच नाहीं. ।।६६।।

तस्मात्प्रसन्नात्तु शुगास्पदः सुतः प्राग्याचितः सद्गतिदाद्विमोहतः।
योऽजायमानः पितरौ पुरा चिरात्संक्लेशयेच्च प्रसवात्ततः परम्।।६७।।

जातो ग्रहार्तेः परतोऽपि मौर्ख्याद्व्रती त्वविद्यो विबुधो विवाहात्।
युवौपपत्यात्सुतवांश्च नैस्व्यात्पुत्रेण किं शर्म सदार्तिदेन।।६८।।

अन्वयः- प्रसन्नात् तस्मात् (श्रीदत्तात्) सद्गतिदात् विमोहतः (त्वयां) प्राक् शुगास्पदः सुतः याचितः । यः पुरा चिरात् अजायमानः (अपि) पितरौ संक्लेशयेत् । च ततः परं प्रसवात् । जातः (अपि) ग्रहार्तेः परतः (बाल्य) मौर्ख्यात् । व्रती तु अविद्यः। अविबुधः अविवाहात् च युवा औपपत्यात् सुतवान् नैस्व्यात् (पितरौ संक्लेशयेत् एवम्) सदार्तिदेन पुत्रेण किं शर्म । (न किमपि)।

अर्थः- प्रसन्न व सद्गति देणाऱ्या त्या श्रीदत्तापासून मोहामुळें तूं दुःख देणारा पुत्र मागून घेतलास. जो जन्मापूर्वी पुष्कळ दिवस पुत्र न झाल्यामुळें आईबापांना कृछ्रादि तपश्चर्या करावी लागल्यानें कष्ट देणारा होतो, आणि नंतर प्रसूति दुःखानें कष्ट होतात. ।।६७।। जन्मल्यानंतरहि ग्रहादि पीडेनें, बालपणीं मूर्खपणामुळें, मौजीबंधनानंतर विद्या न आल्यामुळें, मूर्ख असा विवाह न झालेमुळें, तरुणपणीं जारकर्मामुळें आणि संततियुक्त अशा दारिद्र्यामुळें दुःख देतो. याप्रमाणे सर्वदा दुःख देणाऱ्या पुत्रापासून सौख्य कोठून मिळणार? कोठूनहि मिळणार नाहीं. ।।६८।।

गौणात्मा नृहरिरिवात्र पुत्रसंज्ञो मिथ्यात्मा घट इव चात्र गात्रसंज्ञः।
मुख्यात्मा परतरचित्स एष दत्तः सख्या युग्भव खलु तेन चाप्रमत्तः।।६९।।

अन्वयः- नृहरिः इव पुत्रसंज्ञः गौणात्मा (अस्ति) च अत्र गात्रसंज्ञः घटः इव मिथ्यात्मा (जडत्वात्) च परतरचित् मुख्यात्मा सः एषः दत्तः (अबाधितत्वात्) तेन सख्या युक् खलु अप्रमत्तः भव ।

अर्थः- पण "आत्मा वै पुत्रनाम" या श्रुतीवरून पुत्र आत्माच आहे. अनात्मा नव्हे अशी शंका घेऊन प्रहर्षिणीवृत्तानें सांगतात :

सिंहासारखा पुरुष आहे असें म्हटलें असतां सिंहाचें संपूर्ण गुणधर्म पुरुषाचे ठिकाणीं येत नाहींत; परंतु क्रौर्य, शौर्य इत्यादि गुणांनीं युक्त आहे इतकाच त्यांतील आशय आहे. म्हणून या ठिकाणीं गौणीवृत्ति आहे. तसेंच पुत्र हा गौणात्मा आहे. मुख्यात्मा नव्हे. त्याप्रमाणें देहात्मा हाहि घटाप्रमाणें मिथ्यात्मा आहे. जसा घट जड असतो तसा हा सुद्धां जड आहे. तसेंच देहादि अहंकाराहून निराळा असलेला जो चैतन्यरूप आत्मा हाच मुख्यात्मा. तोच हा दत्तात्रेय होय. कारण तो त्रिकालाबाधित आहे. तोच नेहमीं उपकारक असल्यानें परमसखा आहे. त्याची प्राप्ति होण्याकरतां खरोखर सावधानचित्तानें त्याचें चिंतन कर. तरच त्याची प्राप्ति होईल. नाहींपेक्षां तो मिळणार नाहीं. ।।६९।।

यतो यावदिष्टं ततः प्रेम तावत्सदा प्रेयसि त्वात्मनि प्रेम शश्वत्।
अतश्चान्यतः संविविच्य प्रियत्वं विधेह्याशु दत्तात्मनि क्षत्रिय त्वम्।।७०।।

अन्वयः- यतः यावत् इष्टं तावत् ततः प्रेम (विद्यते) च सदा प्रेयसि आत्मनि तु शश्वत् प्रेम (एव) अतः अन्यतः (आत्मानम्)

संविविच्य हे क्षत्रिय.। त्वं आशु दत्तात्मनि प्रियत्वं विधेहि ।

अर्थः- पुत्र हा गौणात्मा असो, तथापि प्रेम करण्याचें तें स्थान आहे. म्हणून शोक कसा नाहींसा होणार? अशी शंका घेऊन भुजंगप्रयात वृत्तानें सांगतात :-पुत्रदारादिक जोंपर्यन्त आपल्या मनाप्रमाणें वागतात तोंपर्यन्त त्यांच्यावर प्रेम असतें. तेच प्रतिकूल झाले म्हणजे त्यांच्यापासून दुःख होऊं लागतें. म्हणून तें प्रेम व्यभिचारी आहे. परन्तु नेहमीं अतिशय प्रिय अशा आत्म्यावर मात्र निरंतर प्रेम असतें. कित्येक वेळां मला धिक्कार असो, असें मनुष्य म्हणतो तें त्याचें म्हणणें देहदुःख निमित्तानें असल्यामुळें देहालाच उद्देशून असतें. कारण आपण नसावें, असें कोणांसहि कधींहि वाटत नाहीं. म्हणून पुत्रादिकांहून निराळा व देहादिकांहून निराळा असलेल्या आत्म्याचें सूक्ष्म बुद्धीनें विवेचन करून हे क्षत्रिय, म्हणजे दुःखापासून स्वतःचें रक्षण करण्याऱ्या राजा ! तूं देहपात होण्यापूर्वी तात्काळ श्रीदत्तगुरुरूप आत्म्यावर प्रेम कर. म्हणजे त्याचें ज्ञान करून घे. त्याचें ज्ञान करून घेणें म्हणजेच त्याच्यावर प्रेम ठेवणें होय. ।।७०।।

तत्रात्मनीदं जगदत्र चात्मेत्येवंविदो नैव हि शोकमोहौ।
एवं विचार्य त्यज राजवर्य शोकं कुरु स्वीयमवश्यकार्यम्।।७१।।

अन्वयः-तत्र (श्रीदत्ताख्ये) आत्मनि इदं जगत् (अस्ति) च अत्र (साक्षिणि) (सः दत्तः) आत्मा (वर्तते) एवंविदः शोकमोहौ न एव हि। हे राजवर्य । एवं विचार्य शोकं त्यज (च) स्वीयं अवश्यकार्यं कुरु ।

अर्थः- आत्म्यावर प्रेम करणें हें बोधाचें लक्षण आहे. प्रियत्व म्ह. बोध व त्याचें फल हें *इन्द्रवज्रा* वृत्तानें सांगतातः-
त्या दत्तरूप आत्म्याचे ठिकाणीं हें प्रत्यक्षादि प्रमाणांनी भासणारें भूतभौतिक विश्व आहे. आणि या स्वरूपभूत प्रत्यगात्म्याचे ठिकाणीं तो श्रीदत्तरूप आत्मा आहे. म्हणजे त्यांच्यामध्यें भेद नाहीं, असें जाणणाऱ्याला शोक व मोह होतच नाहींत, अशा श्रुतिसिद्धान्त आहे. हे राजा ! असा विचार करून शोकाचा त्याग कर, आणि अवश्य असें स्वतःचें कर्तव्य भगवद्भजन कर, म्हणजे कृतार्थ होशील. ।।७१।।

हुण्डासुरेण नीतोऽपि सुतस्ते दत्तरक्षितः। गेहेऽस्ति कस्यचिदृषेः स तं दैत्यं हनिष्यति।।७२।।

अन्वयः- हुण्डासुरेण नीतः अपि दत्तरक्षितः ते सुतः कस्यचित् ऋषेः गेहे अस्ति । सः तं दैत्यं हनिष्यति ।

अर्थः- श्रीदत्तात्रेयानें रक्षण केलेला तुझा पुत्र जरी हुण्डासुरानें नेला तरी कोणत्यातरी ऋषीच्या आश्रमांत कुशल आहे. तो त्या दैत्याचा नाश करील. ।।७२।।

तं पश्यस्यचिरेणेति निवेद्य मुनिपुङ्गवः। नृपस्य पश्यतस्तत्र विद्युद्वत्स तिरोदधे।।७३।।

अन्वयः- तं अचिरेण एव (त्वम्) पश्यसि। इति निवेद्य मुनिपुंगवः (नारदः) तत्र पश्यतः नृपस्य (पुरतः) विद्युद्वत् तिरोदधे ।
अर्थः- व त्याला लवकरच तूं पाहशील, असें त्या आयुराजाला सांगून मुनिश्रेष्ठ नारद तेथें पाहणाऱ्या राजापुढें एकदम विजेप्रमाणें गुप्त झाले. ।।७३।।

नारदेन गदितं गतशोकः शारदेन्दुवदनः सविवेकः।
वल्लभां स पुनरुक्तमिवोचे सापि हापितशुगात्तमुदूचे।।७४।।

अन्वयः- शारदेन्दुवदनः सविवेकः (अत एव) गतशोकः सः (राजा) नारदेन गदितं (पुत्रवृत्तम्) पुनरुक्तं इव वल्लभां (इन्दुमतीम्) ऊचे । हापितशुगा आत्तमुत् सा (वक्ष्यमाणं) उवाच) ।
अर्थः- नंतर शरत्कालीन स्वच्छ चन्द्राप्रमाणें प्रसन्नमुख व विवेकी म्हणूनच दुःख नष्ट झालेल्या त्या आयुराजानें नारदमुनीनें सांगितलेला पुत्रवृत्तान्त पुनः सांगितल्याप्रमाणेंच कीं काय इन्दुमतीला निवेदन केला. जिनें पुत्रविरहरूप दुःख सोडलें आहे, म्हणून आनंदित झालेली ती इन्दुमती पुढें श्लोकांत सांगितल्याप्रमाणें बोलली. ।।७४।

नमस्तेऽकहन्त्रे समस्तेष्टदात्रे विहस्तेष्टकर्त्रे समस्तेडितात्रेः।
प्रियायाः प्रभावात्तवेहोपलब्धिः क्रियाहीन ते मेऽर्पिताद्योपलब्धिः।।७५।।

अन्वयः- हे समस्तेडित ! अकहन्त्रे समस्तेष्टदात्रे विहस्तेष्टकर्त्रे ते नमः ! अत्रेः प्रियायाः (अनुसूयायाः) प्रभावात् इह तव उपलब्धिः (समजनि) हे क्रियाहीन ! अद्य ते (त्वया) मे मह्यम्) उपलब्धिः (सद्बुद्धिः) अर्पिता (अस्ति) !
अर्थः- हे सर्वदेवादिस्तुत श्रीदत्ता ! दुःख नष्ट करणाऱ्या, सर्वांच्या मनकामना पूर्ण करणाऱ्या, दुःखाकुलांना इच्छित देणाऱ्या अशा आपल्याला नमस्कार असो. अत्रिऋषिपत्नी अनुसूया तिच्या तपःसामर्थ्यानें आम्हांला आपली प्राप्ति झाली. हे चतुर्विध क्रियाफलरहित अशा श्रीदत्ता ! आज आपण मला सद्बुद्धि दिली हें माझें मोठें सुदैव होय. ।।७५।।

सदैव तेऽङ्घ्र्यंबुजपञ्जरेऽद्य मुदैव मानसहंस ईड्य।
अकंपमस्त्वित्यधिपं ननाम सकंपरोमाञ्चयुगाह नाम।।७६।।

अन्वयः- हे ईक्ष्य मे मानसहंसः मुदा एव अद्य ते अंध्यम्बुजपंजरे सदा एव अकम्पं अस्तु ! इति अधिपं (श्रीदत्तात्रेयम्) ननाम। सकम्परोमाञ्चयुक् (इन्दुमती 'दत्तात्रेय दत्तात्रेय' इति) नाम आह ।
अर्थः- हे स्तुत्य ! माझा मनरूपी राजहंस आनंदानेंच यदा आपल्या चरणकमलरूपी पिंजऱ्यांत सर्वकाळ स्थिर होवो. असें श्रीदत्तगुरूंचें इन्दुमतीनें स्तवन करून त्यांना वंदन केलें. आणि कंप व रोमांचादि अष्ट सात्त्विक भावांनीं युक्त होऊन मोठमोठ्यानें

दत्तात्रेय दत्तात्रेय असा नामघोष केला ।।७६।।

जगौ नृपालोऽखिलहेतुभूत विगौरवाद्याखिलसेतुभूत।
अभूतपूर्वा इह तेऽनुवेलं लीला विभांत्याधिहरा इहालम्।।७७।।
योगीक्षते योगवशीकृतेन चित्तेन यत्सत्तव देव धाम्नः।
जिज्ञासुरस्मीश्वर धीर तं त्वां भक्त्या मुमुक्षुः शरणं प्रपद्ये।।७८।।

अन्वयः- (अथ) नृपालः (आयुः) जगौ । हे अखिलहेतुभूत ! हे आद्य ! हे विगौरव ! हे अखिलसेतुभूत ! (श्रीदत्त) इह ते लीलाः अनुवेलं अभूतपूर्वाः एव विभान्ति । (ताः) इह अलं आधिहराः (भवन्तु)।। ७७।। हे देव ! यत् सत् तव (धाम) योगवशीकृतेन चित्तेन योगी ईक्षते । तस्य धाम्नः जिज्ञासुः अस्मि । हे धीर ! हे ईश्वर ! (अहम्) मुमुक्षः (सन्) तं त्वां शरणं प्रपद्ये ।।७८।।

अर्थः- नंतर आयुराजाहि इन्द्रवज्रावृत्तांनीं पुढील दोन श्लोकांनी स्तवन करूं लागला :-

इन्दुमतीनें स्तुति केल्यानंतर आयुराजा स्तवन करूं लागला. हे सर्व स्थिर व चरादि विश्वाला आद्य कारणरूपा ! हे सर्वांना कारण असून अभिमानरहिता ! हे सर्वधर्मरूपा श्रीदत्ता ! या लोकीं तुझ्या लीला प्रत्येक वेळीं नवीन नवीन असल्यासारख्याच वाटतात. त्या लीला आमच्या मानसिक व्यथा पूर्णपणें निवारण करोत ! ।।७७।। हे देवा ! जें त्रिकालाबाधित तुझें स्वरूप वशीकारनामक वैराग्यपूर्वक अभ्यासानें स्वाधीन केलेल्या चित्तानें योगी लोक पाहतात, तें स्वरूप मी जाणण्याची इच्छा करितों. श्रीगुरूंना शरण जाऊन त्यांचेकडून समजून घ्यावें, असें म्हणाल तर हे बुद्धिप्रेरका दत्ता ! आपण सर्व गुरूंचेहि गुरु आहां; म्हणून मुमुक्षु असा मी आपल्याला शरण आलों आहें. ।।७८।।

इति संप्रार्थ्य देवेशमतिसंतुष्टमानसः। भगवत्कीर्तनप्रेमनिर्वृत्तोऽभूत्सदैव सः।।७९।।

अन्वयः- अतिसंतुष्टमानसः सः (आयुः) इत देवेशं सम्प्रार्थ्य सदा एव भगवत्कीर्तनप्रेमनिर्वृतः अभूत् ।।

अर्थः- ज्याचें मन अत्यंत सन्तुष्ट आहे असा तो आयुराजा याप्रमाणें श्रीदत्तगुरूंचे स्तवन करून सर्वकाल श्रीदत्तनामस्मरणानें लाभलेल्या नितिशय प्रेमानें समाधान पावला. ।।७९।।

नहुषस्त्वेकदारण्ये शुश्राव मृगया चरन्। आकाशवाण्या स्वोदन्तं गुरवे स शशंस तत्।।८०।।

अन्वयः- एकदा अरण्ये मृगयां चरन् नहुषः आकाशवाण्या स्वोदन्तं शुश्राव । (च) सः तं गुरवे शशंत ।।

अर्थः- एकदां अरण्यांत शिकारीस गेलेल्या नहुषानें आकाशवाणीवरून आपलें वृत्त ऐकलें व तें त्यानें गुरुजींना सांगितलें.।।८०।।

वसिष्ठोऽप्यादितः सर्वं निवेद्य सुरदुर्हृदाम्। वधायाज्ञापयत्सोऽपि प्रतस्थे चिन्तयन्गुरुम्।।८१।।

अन्वयः- वसिष्ठः अपि आदितः सर्वं (वृत्तम्) निवेद्य सुरदुर्हृदां वधाय तं आज्ञापयत् । सः (नहुषः) अपि गुरुं चिन्तयन् प्रतस्थे।

अर्थः- वसिष्ठमुनीनेंहि पूर्वीपासून घडलेली सर्व हकिकत त्याला सांगून देवशत्रु जे दैत्य त्यांच्या नाशाकरतां युद्धास आज्ञा दिली. तो नहुषहि गुरु वसिष्ठांचें चिंतर करून युद्धाकरतां निघाला. ।।८१।।

धीसारथिर्देहरथोऽर्थवाहो हृत्प्रग्रहो ज्ञानिवदेक एव।
महाबलानां हतये प्रतस्थे सुरद्विषां देवगुरूक्तिशक्तिः।।८२।।

अन्वयः- धीसारथिः देहरथः अर्थवाहः हृत्प्रग्रहः एक एव देवगुरूक्तिशक्तिः (सः नहुषः) महाबलानां सुरद्विषां हतये ज्ञानिवत् प्रतस्थे।

अर्थः- युद्धाकरितां केलेलें प्रस्थान गमन उपजातिवृत्तानें सांगतात. दृढनिश्चयात्मक बुद्धि ही ज्याला सहाय्य करणारा सारथि आहे, आणि देह हाच ज्याचा रथ आहे, म्हणजे पायींच जाणारा, इंद्रियें ज्याचे घोडे आहेत, संकल्पात्मक मन ज्याला लगाम आहे, असा एकटाच, देवस्वरुप जे गुरु त्यांची आज्ञा ही ज्याची शक्ति आहे, असा तो नहुष बलाढ्य, देवशत्रु दैत्यांना मारण्यासाठीं ज्ञानविवेकी मनुष्य सात्त्विक बुद्धि ज्याचा सारथि म्हणजे सहाय्यकर्ता आहे,कृच्छ्रादि तपांनीं कृश झालेला देह ज्याचा रथ आहे, इंद्रियनिग्रह हा ज्याचे घोडे आहेत, शांतह्वदय सद्‌गुरूंचा उपदेश ही ज्याची शक्ति आहे, असा शम-दमादि हेच कोणी देव त्यांचा द्वेष करणारे रागद्वेषादि जे शत्रु त्यांच्या नाशाकरितां जसा प्रवृत्त होतो, त्याप्रमाणें निघाला. ।।८२।।

आजानुबाहुं शरचापहस्तं पद्भ्यां चरन्तं निजकार्यसक्तम्।
दृष्ट्वेव रामं मघवा ससूतं तस्मै रथं प्रेरयदाशु सास्त्रम्।।८३।।

अन्वयः- आजानुबाहुं शरचापहस्तं पद्भ्यां चरन्तं निजकार्यसक्तं रामं इव (वर्तमान तम्) दृष्ट्वा ससूतं सास्त्रं रथं तस्मै (नहुषाय) आशु मघवा प्रेरयत् ।

अर्थः- दीर्घबाहु हातांत धनुष्य व बाण घेणारा, रथाशिवाय पायांनींच जाणारा, देवकार्यमध्यें आसक्त अशा रावणवधाकरतां प्रवृत्त झालेल्या दाशरथि श्रीरामाप्रमाणें असलेल्या त्या नहुषाला पाहून सारथि व शस्त्रें यांनीं सज्ज असलेला रथ त्या नहुषाकरतां देवेन्द्रानें तत्काळ पाठविला. ।।८३।.

उग्रायेव रथं तस्मै भूरथाय स मातलिः। सोपस्करं रथं प्रादात्सन्नद्धः सोऽपि चारुहत्।।८४।।

अन्वयः- भूरथाय तस्मै (नहुषाय) उग्राय इव सः मातलिः सोपस्करं रथं प्रादात् । सः अपि सन्नद्धः (सन्) आरुरोह ।

अर्थः- भूमि हाच ज्याचा रथ आहे असा पादचारी-पायींच जाणाऱ्या नहुषाला त्रिपुरवध करण्यासाठीं प्रवृत्त झालेल्या भूमि हाच रथ असलेल्या महेशाप्रमाणें त्या देवेन्द्रसारथ्यानें सर्व शस्त्रादि युद्धसाधनांनी सज्ज असां रथ दिला. रथ मिळाल्यानंतर तो नहुषहि त्या

त्या मंत्रांनीं कवचादि धारण करून तयार झालेला रथांत बसला. ।।८४।।

तत्साहाय्याय सन्नद्धा स्वयं देवाः समागताः। तत्कोलाहलमाकर्ण्य चकितोऽभून्महासुरः।।८५।।

अन्वयः- तत्सहायाय ते सन्नद्धाः देवाः स्वयं समागताः । तत्कोलाहलं आकर्ण्य महासुरः चकितः अभूत् ।

अर्थः- त्या वेळी त्यां नहुषाला सहाय्य करण्याकरतां कवच शस्त्रादि धारण करून सर्व देव आपणहूनच तेथें आले. तेव्हां तो देवसेनेचा गलबला ऐकून एवढा मोठा कोण शत्रु आला आहे म्हणून हुण्डासुर आश्चर्यचकित झाला. ।।८५।।

(गद्यम्) **तदनु दनुजाय आयुःपुत्रो युद्धाय आगच्छति इति श्रुतवते पूर्वदत्तः अर्भः हतो न वा इति शश्वत् पृच्छते हुण्डाय स्वप्राणपरीप्सया भार्यादयो हत एव इति मृषा प्रतिपादयामासुः।।८६।।**

अर्थः- नंतर हुण्डासुरानें आपला दूत पाठवून शत्रु कोण आहे याची चौकशी केली. तो आयुराजाचा पुत्र नहुष युद्धासाठीं येत आहे असें ऐकून पूर्वी मारण्याकरितां दिलेला बालक मारला किंवा नाहीं, असें आपली स्त्री व दासी इत्यादिकांना पुनःपुनः विचारलें. तेव्हां त्यांनीं मरणाच्या भीतीनें आपण आणून दिला त्याच वेळीं त्याला मारून टाकलें असें खोटें त्या हुण्डासुराला सांगितलें. ।।८६।।

(गद्यम्) **अत्रान्तरे हुण्डकारारुद्धया अशोकसुंदर्या शुककन्यया प्रेरितां रंभां दैत्यवधोत्तरं देव्या दर्शनं भविष्यति इति नहुषो निवर्तयामास।**

अर्थः- मध्यंतरी हुण्डासुराच्या बंदिशाळेंत ठेवलेली जी शुककन्या अशोकसुन्दरी तिनें मला येथून मुक्त करा असें नहुषाला सांगण्याकरितां रंभेला पाठविलें. तिनें नहुषाची भेट घेतली व अशोकसुंदरीची प्रार्थना त्याला कळविली. तेव्हां नहुषानें हुण्डासुराचा नाश केल्यानंतर तिची भेट होईल असें आश्वासन देऊन रंभेला परत पाठविलें. ।।८७।।

हुण्डासुरोऽपि संशुष्यत्तुण्डोऽसुरबलं बली। चतुरं राजपुत्राय चतुरंगमचोदयत्।।८८।।

अन्वयः- बली हुण्डासरः अपि संशुष्यत्तुण्डः (सन्) चतुरं चतुरङ्गं असुरबलं राजपुत्राय (नहुषाय) अचोदयत् ।

अर्थः- मोठा बलवान् असूनहि ज्याचें तोंड सुकून गेलें आहे, अशा त्या हुण्डासुरानें युद्धांत तरबेज असलेले हत्ती, घोडे, रथ व पदातिपायदळ अशीं चार अंगें असलेलं दैत्यसैन्य युद्ध करण्यासाठी नहुषावर पाठविलें. ।।८८।।

दैत्याः समेत्य रणसीम्न्यमृतानवेक्ष्य। मर्त्यं ह्युपेक्ष्य सहसारिहृदभिलक्ष्य।।
बाणांस्तरां खरतरान्मुमुचुः कृतान्तप्राणापहारकुशलान्युयुधुर्नितान्तम्।।८९।।

अन्वयः- दैत्याः रणसीम्नि समेत्य (तत्र) अमृतान् अवेक्ष्य (च) मर्त्यं (नहुषम्) हि उपेक्ष्य सहसा अरिहृत् अभिलक्ष्य तरां खरतरान्

कृतान्तप्राणापहारकुशलान् बाणान् मुमुचुः । (च) नितान्तं युयुधः ।।८९।।

अर्थः- हुण्डासुरांने पाठविलें तें दैत्यसेन्य त्या युद्धभूमीवर आलें, व त्यानें तेथें असलेल्या मरणरहित अशा देवांना पाहून आणि निश्चित मरण असलेल्या नहुषाचा त्याग करून एकदम, शत्रु जे देव त्यांच्या वक्षःस्थलावर नेम धरून अत्यन्त तीक्ष्ण व मृत्यूचाहि प्राण घेण्यास समर्थ असे बाण सोडण्यास सुरुवात केली व निकरानें युद्ध करूं लागले. ।।८९।।

नहुषोऽसुरपीडितान्सुरानवलोक्याथ जघान सोऽसुरान्।
पतिताः कतिचिद् द्विधा कृता भुवि कृत्ता दितमस्तका मृताः।।९०।।

अन्वयः- सः नहुषः असुरपीडितान् सुरान् अवलोक्य अथ असुरान् जघान । कतिचित् (दैत्याः) द्विधा कृताः भुवि पतिताः । कतिचित्) कृत्ताः (भुवि पतिताः) कतिचित् दितमस्तकाः मृताः (अभवन्) ।

अर्थः- त्या नहुषानें दैत्यपीडित अशा देवांना पाहिल्यानंतर दैत्यांना मारवयास प्रारम्भ केला. तेव्हां तेथें रणाङ्गणावर कित्येक दैत्य देहाचे दोन दोन भाग झालेले भूमीवर पडले. कित्येक छिन्नभिन्न होऊन भूमीवर पडले आणि कित्येक दैत्य मस्तकें धडावेगळीं झाल्यानें मृत झाले. ।।९०।।

क्षणेन सैन्यं चतुरंगमोजसा रणे हतं मत्तमतीव तेजसा।
पलायिताः केऽपि हताश्च केऽपि तान्बलाद्विलोक्याप तदाशु हुण्डकः।।९१।।

अन्वयः- (नहुषेण) अतीव तेजसा मत्तं चतुरङ्गं सैन्यं रणे क्षणेन ओजसा हतम् । के अपि पलायिताः च के अपि हताः । हुण्डकः तान् विलोक्य बलात् आशु अपतत् ।

अर्थः- नहुषानें मोठा पराक्रम करून मदोन्मत्त चतुरंग सैन्याचा त्या रणांगणावर थोड्या वेळांतच नाश केला. कित्येक वीर पळून गेले व कित्येक मरून पडले. त्या वेळीं हुण्डासुर आपल्या सैन्याचा पराभव पाहून मोठ्या वेगानें रणांगणावर आला. ।।९१।।

हुण्डासुरः प्राह मनुष्यपोत ज्ञातं न ते मे बलमल्पचित्त।
प्राप्तोऽस्मि कालो यदि जीवनेहा चेन्मां गतास्त्रः शरणं व्रजेह।।९२।।

अन्वयः- हुण्डासुरः (नहुषम्) प्राह । हे मनुष्यपोत !, ते मे बलं न ज्ञातम्। हे अल्पचित्त !, (अहम्) ते कालः प्राप्तः अस्मि। यदि ते जीवनेहा चेत् (तर्हि) इह गतास्त्रः (सन्) मां शरणं व्रज ।

अर्थः- हुण्डासुर नहुषाला म्हणतो, हे मानवपुत्रा ! तुला माझे बल माहीत नाहीं. हे बालबुद्धे ! हा मी तुझा काळ आलों आहे. जर तुला जगण्याची इच्छा असेल, तर या ठिकाणीं सर्व शस्त्रें टाकून देऊन मला शरण ये. ।।९२।।

हसितवदनो बालोऽदीनो जगौ खलु मे शृणु। प्रहर कुचर त्वं मां कामं दयामिह मा कुरु।।
न हि शशिकुले जातः कश्चिन्नरः शरणं गतो। जनुषि विरहं पित्रोः कर्तुस्तवास्म्यसुहातः।।९३।।

अन्वयः- अदीनः (अत एव) हसितवदनः बालः (नहुषः तम्) जगौ । (हे दुष्ट!) मे खलु शृणु । हे कुचर ! त्वं मां कामं प्रहर । इह मयि दयां मा कुरु । हि शशिकुले जातः कश्चित् नरः शरणं न गतः । जनुषि मे पित्रोः विरहं कर्तुः तव असुहा (कालः) आगतः अस्मि ।

अर्थः- त्यानंतर उत्साही म्हणूनच हंसतमुख असा बाळ नहुष हुण्डासुराला बोलला, हे दुष्टा ! तूं माझें बोलणें नीट ऐकून घे. हे दुराचारी दैत्या ! तूं माझ्यावर खुशाल यथेष्ट शस्त्र चालव. येथें मजवर कसलीहि दया करूं नको. खरोखर या सोमवंशांत जन्मलेला कोणताहि पुरुष शत्रूला कधींहि शरण गेलेला नाहीं. माझ्या जन्मकाळीं माझ्या माता-पित्यांना विरहदुःख देणाऱ्या तुझा प्राण घेणारा हा मी तुझा काळच आलों आहें. ।।९३।।

इत्युक्त्वा निजघान बाणनिचयैर्हुण्डं स मायाविनं। मायां तस्य विधूय देवगुरुपद्ध्यानप्रभावाच्च तम्
हत्वाह्नाय जयश्रिया सह तदाऽशोकान्वितां सुन्दरीं। वव्रे गुर्वनुमोदितोऽपि च सुरान्स्वर्गाय स प्रैरयत्।।९४।।

अन्वयः- इति उक्त्वा सः (नहुषः) मायाविनं हुण्डं बाणनिचयैः जघान । च तस्य मायां विधूय च देवगुरुपद्ध्यानप्रभावात् तं हत्वा तदा अन्हाय जयश्रिया सह अशोकान्वितां सुन्दरीं गुर्वनुमोदितः वव्रे। अपि च सः (नहुषः) सुरान् स्वर्गं प्रैरयत् ।

अर्थः- असें भाषण करून त्या नहुषानें मायावी हुण्डासुरावर बाणांचा वर्षाव केला आणि त्यानें निर्माण केलेली अनेक प्रकारची माया नाहींशी केली व देवाहून भिन्न नसलेल्या गुरूंच्या चरणकमलचिंतनप्रभावानें त्या हुण्डासुराचा वध केला. त्या वेळीं तात्काळ विजयश्रीसह पूर्वीं वर्णन केलेल्या अशोकसुंदरीचे पाणिग्रहण वसिष्ठगुरूंच्या अनुमतीनें केलें. आणखी त्या नहुषानें युद्धामध्यें सहाय्याकरतां आलेल्या सर्व देवांना स्वर्गास पाठविलें. ।।९४।।

वसिष्ठेनाज्ञप्तः सह वनितयोपेत्य विनयी। जयी पित्रोः पादान्विधिवदभिवाद्याह न मयि।।
विधेयाऽसूया स्वाचरणगुणबद्धो जनिमान्। परेशाधीनोऽसौ कुहकगुणबद्धेध्मनरवत्।।९५।।

अन्वयः- वसिष्ठेन आज्ञप्तः वनितया सह (पितरौ) उपेत्य । विनयी जयी (सः) विधिवत् पित्रोः पादान् अभिवाद्य आह (भवद्भिः) मयि असूया न विधेया । हि जनिमान् स्वाचरणगुणबद्धः असौ परेशाधीनः कुहकगुणबद्धेध्मनरवत् (अस्ति) ।

अर्थः- "तूं आपल्या मातापितरांच्या दर्शनाकरितां जा" अशी वसिष्ठानें त्याला आज्ञा केली. त्याप्रमाणें आपल्या नूतन भार्येसह वडिलांच्या जवळ येऊन नम्र व ज्याला प्राप्त झाला आहे अशा नहुषानें यथाविधि वडिलांच्या पायांवर मस्तक ठेविलें आणि म्हणाला,

तुम्ही माझ्याकडे दोषदृष्टीनें पाहूं नका. कारण जन्माला आलेला मनुष्य आपल्या त्रिविध कर्मरूपी रज्जूनें बांधिलेला असतो, म्हणून तो परमेश्वराधीन आहे. ज्याप्रमाणें सूत्रधार काष्ठाच्या बाहुलीला नाचवील त्याप्रमाणें ती नाचते. तसा जीव ईश्वराधीन आहे. ।।९५।।

जननी नवनीतकोमलं सुविशालं सुतवर्ष्म मञ्जुलम्। परिरभ्य मुमोद साऽप्यलं खलु मातुर्यदु चन्द्रशीतलम्।।९६।।

अन्वयः- जननी नवनीतकोमल मञ्जुलं सुविशालं सुतवर्ष्मं परिरभ्य अलं मुमोद । यदु (सुतालिङ्गनम्) खलु मातुः चन्द्रशीतलं (अस्ति) ।

अर्थः- नहुषाची माता इन्दुमती नवनीतासारख्या मृदु व सुंदर अशा आपल्या मोठ्या झालेल्या मुलाला आलिङ्गन देऊन अतिशय संतुष्ट झाली. मातेला खरोखर पुत्राचें आलिङ्गन चंद्राप्रमाणें शीतळ वाटतें. ।।९६।।

प्रभोर्वरं नारदवाक्यमायुः स्मृत्वा पुनर्नष्टसुताप्तिमोहः।
मुमोद नालं सकलं मृषेति विद्वान्विरक्तः स गृहाश्रितोऽपि।।९७।।

अन्वयः- प्रभोः वरं (च) नारदवाक्यं स्मृत्वा आयुः पुनः नष्टसुताप्तिमोहः अलं न मुमोद । सकलं मृषा इति विद्वान सः गृहाश्रितः अपि विरक्तः (आसीत्) ।

अर्थः- श्रीसमर्थदत्तमहाराजांचें वर-प्रदान व महर्षि नारदांचें वचन यांचें स्मरण करून आयुराजाला पुनः पुत्रलाभ झाला असूनहि त्याचा मोह नष्ट झाल्यानें त्याला फारसा आनंद झाला नाहीं. कारण जरी तो गृहस्थाश्रमी होता तथापि सर्व मिथ्या आहे असें जाणणारा तो आनंदांत गढून गेला नाहीं. ।।९७।।

जरसा पलितत्त्वेन श्रुतिमेत्यावेदितान्तकोपगमः। पुत्रन्यस्तमहीधूः सस्त्रीकोऽगाद्वनं वनं वृतावगमः।।९८।।

अन्वयः- जरसा पलितत्वेन श्रुतिं एत्य आवेदितान्तकोपगमः (अत एव) पुत्रन्यस्तमहीधूः सस्त्रीकः वृतावगमः (सः) वनं अगात्।

अर्थः- वृद्धत्वामुळें जो केशांना पांढरेपणा आला त्यानें कानाजवळ येऊन मृत्यूचें आगमन समीप आहे असें कळविलें, म्हणूनच त्या आयुराजानें आपला औरस पुत्र जो नहुष त्याजवर राज्याचा सर्व भार सोंपवून इन्दुमतीसह ज्याला आत्मज्ञान झालें आहे असा तो राजा वनात गेला, म्हणजे त्यानें वानप्रस्थ आश्रमाचा स्वीकार केला. ब्राह्मणांनाच फक्त संन्यासाश्रमाचा अधिकार आहे, इतर वर्णांना नाहीं अशी स्मृति आहे. ।।९८।।

तत्र विप्रधन आबभौ प्रभौ लब्धभक्तिरथ योगविद्विभौ।
लीन आस सुतरां स विद्विषड्डिण्डिमोपममहोक्तिरद्विषत्।।९९।।

अन्वयः- तत्र विप्रधनः प्रभौ लब्धभक्तिः आबभौ । विद्विषत् योगविद् सः विभौ सुतरां लीनः आस । डिण्डिमोपममहोक्तिः अद्विषत् (बभूव) ।

अर्थः- त्या वनांत सत्य, धर्म इत्यादि ब्राह्मणाच्या धनाप्रमाणें ज्याचें धन आहे असा आयुराजा भक्तानुग्रहसमर्थ श्रीदत्तात्रेयाविषयीं परमभक्तिप्राप्त झालेला शोभूं लागला. त्यानंतर जीवब्रह्मैक्यस्वरूपयोग ज्याला लाभला आहे, व ज्याचे कामादि सहा शत्रू निघून गेले आहेत, असा तो राजश्रेष्ठ व्यापक श्रीदत्तरूप परब्रह्माचे ठिकाणीं सर्व उपाधींचा परित्याग करून अत्यंत लीन झाला. आणि "ज्ञानानेंच कैवल्य प्राप्त होतें" अशी दुन्दुभीप्रमाणें असलेली सत्पुरुषांची वाणी निर्बाध झाली. ।।९९।।

या सारात्रेरात्मजस्येयमत्रेरुक्तारात्रेर्दिव्यलीला मयात्रेः।

सात्रेयस्य प्रीतिदास्त्वीरकस्य प्रेम्णोत्सृष्टा शालिनीयं परस्य।।१००।।

अन्वयः- सारात्रेः अरात्रेः अत्रेः आत्मजस्य या इयं मया उक्ता दिव्यलीला प्रेम्णा (मया श्रीदत्तपदे) उत्सृष्टा सा इयं शालिनी परस्य ईरकस्य अत्रेः आत्रेयस्य प्रीतिदा अस्तु ।

अर्थः- श्रीसद्‌गुरुमहाराज ग्रंथांतीं ग्रन्थालंकारभूत मङ्गल शालिनीवृत्तानें केलेलं पुढील श्लोकांत सांगतात -

ब्रह्मज्ञान म्हणजे अपरोक्ष साक्षात्कार असणारे, सर्व पातकांचा नाश करणारे व मृत्यु नष्ट करणारे जे अत्रिऋषि त्यांच्या पुत्राची मीं वर्णन केलेली, ही ज्ञान उत्पन्न करून देणारी असल्यानें शोभणारी, दिव्यलीला प्रेमानें श्रीदत्तचरणारविन्दाचे ठिकाणीं अर्पण केली आहे. ती ही दिव्यलीला परमश्रेष्ठ व बुद्धीला प्रेरणा करणाऱ्या आणि त्रिगुणात्मिका माया व तिचे कार्य यांनीं रहित असणाऱ्या श्रीदत्तात्रेयांना संतोषकारक होवो. ॐ तत्सत् ।।१००।।

इति श्रीमत्परमहंस परिव्राजकाचार्य श्रीमद्वासुदेवानंदसरस्वतीविरचिते
श्रीदत्तचंप्वाख्यप्रबन्धे हुण्डासुरवधो नाम तृतीयगुच्छः समाप्तः।।

श्रीदत्तात्रेयार्पणमस्तु ।

तृतीय स्तबक समाप्त .